# पत्रां द्वारे
# करणानुयोग परिचय




डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा

# पत्रांद्वारे
# करणानुयोग परिचय

लेखिका
डॉ. सौ. उज्ज्वला दिनेशचंद्र शहा
एम.बी.बी.एस., डी.सी.एच., डी.जी.पी.

संपादक
पं. श्री. दिनेशभाई शहा
एम. ए., एल. एल. बी.

वीतरागवाणीप्रकाशक
१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.)
मुंबई-४०० ०२२.

| | | |
|---|---|---|
| मराठी | चौथी आवृत्ति ८ मार्च २०११ | २,००० प्रति |
| | तीन आवृत्त्या | ५,००० प्रति |
| हिन्दी | तीन आवृत्त्या | ६,००० प्रति |
| गुजराती | तीन आवृत्त्या | ३,००० प्रति |
| इंग्लिश | दोन आवृत्त्या | ३,००० प्रति |
| | | १९,००० प्रति |

**दातार**

| | |
|---|---|
| एक मुमुक्षु भगिनी, यू.एस.ए. | २०,००० |
| मिकी शाह, यू.एस.ए. | ८,००० |


**– आमची प्रकाशने –**

| | |
|---|---|
| (१) जैनतत्त्व परिचय–मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश | रु. १५/- |
| (२) कारण कार्य रहस्य–मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश | रु. १५/- |
| (३) करणानुयोग परिचय–मराठी, हिन्दी, गुजराती | रु. १५/- |
| (४) पंचलब्धि–मराठी, हिन्दी, गुजराती | रु. १५/- |
| (५) भक्तामरस्तोत्र प्रवचन–मराठी | रु. १५/- |
| (६) सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी | रु. १२५/- |
| (७) सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी | रु. १५०/- |
| (८) सम्यग्ज्ञानचन्द्रिका लब्धिसार-क्षपणासार एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी | रु. १००/- |

— प्राप्तिस्थान —

**वीतरागवाणीप्रकाशक**

१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.), मुंबई – ४०० ०२२.

फोन : ०२२-२४०७ ३५८१

E-mail : ujwaladinesh@yahoo.com

**किंमत : रु. १५/-**

# लेखिकेचे मनोगत

जैन तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने माझे जीवनच आमूलाग्र बदलून गेले. खऱ्या अर्थाने या जीवाचे जीवन सुरू झाले, जीवाचा जीवपणा उमजून आला. १९९२ साली मी व माझे पति श्री. दिनेशचंद्र शहा यांनी व्यवसायातून निवृत्ति घेतली. आम्ही झपाटल्यासारखा स्वाध्याय सुरू केला. दिवसाकाठी ८-८॥ तास आम्हा दोघांचा एकत्र स्वाध्याय होई. प्रथमानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग यांच्या अनेक ग्रंथांचा वारंवार अभ्यास झाला परंतु करणानुयोगाशी म्हणावी तेवढी जवळीक नव्हती, वाचन नव्हते.

ब्र. पं. श्री. यशपाल जैन यांच्याकडून 'गुणस्थान-प्रवेशिका' शिकल्यानंतर गुणस्थानासंबंधी बऱ्यापैकी ज्ञान झाले, करणानुयोगाची गोडी उत्पन्न झाली. त्यानंतर दृष्टि सम्यग्ज्ञानचंद्रिका-जीवकाण्डाकडे वळली. सुरुवातीची २५-३० पाने वाचल्यानंतर 'हे आपल्या आवाक्याबाहेरचे आहे. आपण आपले अध्यात्मग्रंथच वाचूया. तेच नाहीतरी कार्यकारी आहेत' असे 'ह्यां'चे मत पडले. परंतु स्त्रीहट्टापुढे ते काय करणार? आम्ही दोघांनीही १९९३ साली ग्रंथाचा आद्योपांत स्वाध्याय केला.

दरम्यान 'जैनतत्त्व परिचय' पुस्तक लिहून प्रकाशित केले. त्याचबरोबर त्यांनी भाषांतर केलेली भक्तामर प्रवचन, स्वानुभव व परमात्मा कसे बनाल ही पुस्तके देखील छापली. ही सारी पुस्तकं तसेच तीन भाषांमध्ये तत्त्व परिचय या सर्वांचे प्रूफ रीडिंगसह सर्वच गोष्टी आम्ही दोघांनी हाताळल्या. ४-६ महिने यातच गेले आमचा वैयक्तिक स्वाध्याय कमी झाला परंतु इतरांच्या आग्रहास्तव मी सकाळी दीड तास व ते संध्याकाळी तीन तास असे साडे चार तास आम्ही सामूहिक स्वाध्याय घेऊ लागलो.

एक बाळंतपण झालं की स्त्री मनाशी ठरवते की नको रे बाबा पुन्हा हा उपद्व्याप! तसे आमचे झाले. पुस्तके लिहून व प्रकाशित करून व लोकांपर्यंत पोहोचवून आता पुन्हा या भानगडीत पडावयाचे नाही असे ठरविले. परंतु त्या पुस्तकाची लोकप्रियता, अनेक नव्या जुन्या अभ्यासूंचा मिळालेला प्रतिसाद, लोकांनी वेगवेगळ्या वेळी अजून काही तरी लिहा म्हणून केलेला आग्रह याला मान देऊन लिखाण करायचे ठरविले व मनात सदोदित चालणाऱ्या चिंतनाला लेखणीद्वारे वाट मिळाली.

स्वत: वाचण्यापेक्षा इतरांना शिकविण्यामध्ये विषयाचे बारकावे अधिक स्पष्ट होतात. त्यामुळे ग्रंथच माझे गुरु ठरले. पं. टोडरमलजींनी सारे काही एवढे सोपे करून समजाविले आहे की ते समजण्यामध्ये व समजाविण्यामध्ये आम्हाला आगळा वेगळा आनंद मिळाला.

रोज शिकवत असलेला हा विषय मी अनेक ठिकाणी प्रवचनात घेतल्यामुळे सर्वत्र लोकांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद व त्यांची विषय

समजण्याची उत्कट उत्कंठा व अभिलाषा पाहून याच विषयावर मी लिखाण करावयाचे ठरविले. हा विषय क्वचितच हाताळला गेलेला असल्यामुळे लोकांनी असे सांगितले की हा अवघड विषय तुम्ही अगदी सहज कळेल अशा भाषेत सांगत असल्यामुळे तुम्ही यावर पुस्तक लिहा. म्हणून या विषयावर पुस्तक लिहिण्याचे मी धाडस केले.

करणानुयोगासंबंधी लेखमाला मी प्रथम हिंदीमध्ये लिहिण्यास सुरुवात केली. दिल्लीच्या 'सन्मति-संदेश' मासिकात हे लेख ' चिरकाल पुरानी, सुनो अपनी कहानी' या नावाने प्रसिद्ध होऊ लागले. ते वाचून माझी मावशी सौ. चारुशीला दोशी म्हणू लागली की, 'हे मराठीत लिही ना! आम्हाला त्याचा अधिक लाभ मिळेल' त्यानंतर मी ठाम निश्चयाने लिखाणाचे काम मराठीत सुरु केले. दोन महिन्यात पुस्तक लिहून पूर्ण झाले.

लिहिणे हे देखील स्वाध्यायाचेच अंग आहे. माझीही वीस प्ररूपणांची उजळणी झाली. भेदविज्ञानाला पुष्टी मिळाली. कर्म-नोकर्माचे स्वरूप स्पष्टपणे भासित झाल्याने माझ्या श्रध्देमध्ये दृढता येत राहिली.

पुस्तकात अनेक ठिकाणी मला स्वत:ला व मुलींना उद्देशून मी 'हे जीव' असे संबोधन वापरले आहे. मुलींकडेदेखील जीव या दृष्टीने मी पहाते व त्याच दृष्टीने त्यांना उपदेश दिला आहे.

या पुस्तकात केवळ करणानुयोगाचाच विषय नाही परंतु जोडीला द्रव्यानुयोगाच्या अपेक्षेने त्यावर विचार केला आहे, चिंतन केले आहे, आत्मानुभवाची प्रेरणा दिली आहे. करणानुयोग शिकून स्वत:कडे कसे वळायचे, हे सारे शिकून आपणास काय लाभ? हे शिकणे किती जरूरीचे आहे अशी चर्चा येथे केली आहे.

करणानुयोगाचा हा विषयच गहन आहे, परंतु मनाला खिळवून ठेवणारा हा विषय वाचकांना सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या लिखाणात कोठे चूक राहू नये म्हणून वारंवार सम्यग्ज्ञानचंद्रिकेचा आधार घेतला आहे. तरी काही उणीव राहिली असल्यास ती जरूर निदर्शनास आणून देण्याची वाचकांना विनंति करते.

हा 'करणानुयोग परिचय' वाचकांना करणानुयोगाच्या अभ्यासासाठी आणि आत्मानुभवासाठी प्रेरणादायी ठरो.

**डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा.**

* * *

# संपादकीय

कोणत्याही अनोळखी ठिकाणी जायचे असेल तर मनामध्ये बऱ्याच गोष्टींचा कोलाहल होत असतो. अजाण अशा प्रांतात जाताना मनाची जी घालमेल होते तसे माझे करणानुयोग आगमाच्या अभ्यासापूर्वी झाले होते.

हा असला गूढ व गहन विषय समजेल का? आणि एवढ्या बारकाव्यासहितच्या वर्णनाने आपले काय बरे साध्य होणार आहे? वगैरे अनेक शंका कुशंकांनी माझे मन घेरले होते. एवढे खंबीर असे माझे मन सुध्दा सुरुवातीला चरकले. वाटले उगाचच नादी लागलो आपण या विषयाच्या! परंतु वाटाड्या चांगला असेल तर भिण्याचे कारण नसते. तद्वतच उज्ज्वलाच्या आग्रहाने तिच्या सोबत या विषयात उतरण्याचेच ठरविले.

समजो वा न समजो पण गोम्मटसारवरील पं. टोडरमलजींची टीका— 'सम्यग्ज्ञानचंद्रिका—जीवकाण्ड' अथपासून इतिपर्यंत वाचण्याचा चंगच बांधला, कंबर कसली व ते पुस्तक पूर्ण वाचले. त्यावेळेला काय समजले असेल ते समजले असेल. परंतु एखादी गोष्ट हाती घेतली की ती तडीस न्यायची या वृत्तीमुळे व हे पुस्तक पूर्ण वाचल्यामुळे कोलंबसाला अमेरिका सापडल्याचा किंवा नील आर्मस्ट्राँगला चंद्रावर पोहोचण्याचा जो आनंद झाला असेल त्याहीपेक्षा जास्त आनंद मला झाला.

नंतर आमचे सहस्वाध्यायी चेंबूरचे श्री. अरविंदभाई दोशी यांनी हा विषय तुम्ही आम्हाला शिकवा असा सौ. उज्ज्वलाकडे लकडा लावला व परत आम्ही ८-१० जणांनी दुसऱ्या वेळेला त्याचा स्वाध्याय केला. अगदी प्रत्येकाकडून तिने त्यातली गणितं व बारकावे पाटी पेन्सिली घेऊन घटवून घेतले त्यामुळे विषय जास्त बारकाव्यासह लक्षात आला.

अनेक जीवांचे असे मत असते की करणानुयोगाच्या अभ्यासामध्ये वेळेचा अपव्यय होतो. बुद्धिला जी कसरत करावी लागते त्यामानाने हाती काहीच लागत नाही. त्यापेक्षा द्रव्यानुयोगाच्या अभ्यासाने त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याचे चिंतन मनन करून त्याला साध्य करण्याचा प्रयत्न अधिक चांगला! वास्तविक हेही म्हणणे खोटे नाही परंतु जर खरोखरीच प्रयत्न होत असतील व फलप्राप्ति होत असेल तर त्यापेक्षा उत्तम गोष्ट कोणतीच नाही. परंतु सबब पुढे करून जर हा जीव आपला उपयोग स्वकडे न वळविता इतरत्र वाया घालवित असेल तर अशा जीवांनी करणानुयोगाचा अभ्यास करायलाच पाहिजे. त्यामुळे उपयोगाची सूक्ष्मता होते. सर्वज्ञाच्या ज्ञानाची झलक फार जवळून लक्षात येते व मीही सर्वज्ञासारखा सर्वज्ञस्वभावी आहे याचीही आठवण होते. आणि मुख्य म्हणजे जे आपण द्रव्यानुयोगामध्ये शिकतो ते सिद्धान्त याच्या विषयामुळे अधिक प्रभावीपणे मनात ठसतात व सर्वज्ञ भगवंतांनी सांगितलेल्या सिद्धांतांची श्रद्धा अधिक दृढ होते. सर्वज्ञाची

महिमा जागृत होते. शिवाय चारही अनुयोगांचे तात्पर्य वीतरागताच आहे म्हणून त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेदभाव करणे चुकीचे ठरेल!

असो. एकंदरीत या नव्या विषयाचा परिचय झाल्याने व तो अनेकांसमोर मांडण्यात आल्याने अनेकांनी सौ. उज्ज्वलाला आग्रह केला की हा विषय फार सोप्या भाषेत आपण समजावता तरी कृपा करून 'पत्रांद्वारे जैनतत्त्व परिचय' प्रमाणे यावरही एक पुस्तक लिहा. त्यामुळे तिने हे पुस्तक लिहिण्याचा व आम्ही ते छापण्याचा प्रपंच केला.

आणि गंमत पहा! या पुस्तकाचे प्रूफ रीडिंग करीत असताना आम्ही दोघे तिच्या मावशी सौ. चारुशीला यांच्या घरी म्हणजे माहीम येथे रहाणारे श्री. विजयकुमार दोशी यांच्याकडे गेलो, तर बोलता बोलता विषय निघाला. आम्ही परत पुस्तक छापत आहोत हे समजताच हे पुस्तक आपण जरूर छापा पण याचा पूर्ण खर्च आम्ही उचलणार आहोत असा बघता बघता त्यांनी एकमुखाने निर्णय घेतला.

पहा एखादे चांगले काम हाती घेतले की त्याला मदत करणारे लोक आपोआप भेटतात त्यांना हुडकावे लागत नाही. त्याप्रमाणे आम्हाला प्रिंटरदेखील तेवढ्याच स्वखुशीने हर तऱ्हेची मदत करणारे श्री. उमेशभाई भेटले. त्यांनी पुस्तक सुबक व मोहक बनविण्यात हातभार लावलेला आहे.

तसेच नेहमीप्रमाणे चेंबूरचे श्री. अरविंदभाई मोतीलाल दोशी यांनी हे पुस्तक लिहा, लिहा म्हणून आग्रह धरला नसता तर कदाचित हे पुस्तक एवढ्या लवकर छापूनही झाले नसते.

पहा बरे! करणानुयोगाचा विषय म्हटला की लोकांना तो गहन व कठीण वाटतो. खरं सांगायच म्हटलं तर सहसा त्याच्या वाटेला कोणी जात नाही. परंतु अत्यंत सोप्या व सरळ भाषेत हे पुस्तक लिहले गेल्याने वर्षाच्या आतच मराठी भाषेतील २५०० पुस्तके संपली व दुसरी आवृत्ति काढावी लागली. २००० गुजराती पुस्तके तर लगेचच संपली व दुसऱ्या आवृत्ति साठी ३००० पुस्तके छापावी लागली. हिन्दी सुद्धा २००० काढून तिचीही नवी आवृत्ति निघण्याच्या मार्गावर आहे.

अनेक दातार तर हातात पैसे धरूनच उभे आहेत. बऱ्याच जणांनी ॲडव्हान्स मध्ये पैसे दिलेले आहेत. त्यांच्या सहकार्यानेच ही आवृत्ति छापून आपणासमोर सादर करताना आनंद वाटतो.

तसेच जिनवाणीचा प्रचार-प्रसार इतक्या वेगाने होत असलेला पाहून ऊर भरून येतो.

**पं. दिनेशभाई शहा**

* * *

**MP3 सीडीज् (128 KBPS) (प्रत्येक सी.डी. मध्ये १२ तासांची प्रवचनं आहेत)**

## — पं. दिनेशभाई शहा —

| | | | |
|---|---|---|---|
| लघु जैन सिद्धांत प्रवेशिका | ७ सीडीज् | नियमसार | ३६ सीडीज् |
| बालबोध पाठमाला | ४ " | प्रवचनसार | ५० " |
| वीतराग विज्ञान पाठमाला | ५ " | समयसार | ७५ " |
| तत्त्वज्ञान पाठमाला | ५ " | योगसार | ५ " |
| गुणस्थान विवेचन | ५ " | कार्तिकेयानुप्रेक्षा | १९ " |
| रत्नकरंड श्रावकाचार | १३ " | कारण कार्य रहस्य | १ " |
| मोक्षमार्ग प्रकाशक | २३ " | छहढाला | ४ " |
| आत्मसिद्धि | १२ " | बृहद् द्रव्यसंग्रह | ८ " |

◆ जैन सिद्धांत : शिबिर १ व २ – Visual 16 DVDs

◆ गुणस्थान – Visual 10 DVDs

## — डॉ. उज्ज्वला शहा —

| | | | |
|---|---|---|---|
| क्रमबद्धपर्याय | ४ सीडीज् | सात तत्त्व | १ सीडीज् |
| करणानुयोग परिचय | ३ " | धवला (पु. १ से १६) | १०२ " |
| निमित्त उपादान + पंचपरावर्तन | २ " | जयधवला (पु. १ से १६) | ११७ " |
| पंचलब्धि | २ " | योग | १ " |
| पांच भाव | १ " | जैनभूगोल + १४ कलर चार्टस् | २० " |
| पांच भाव (तत्त्वार्थसूत्र) | २ " | कारण कार्य रहस्य | २ " |
| प्रमाद के भेद | १ " | सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड | २५ " |
| षट्स्थानपतित हानि वृद्धि | १ " | सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड | १५ " |
| संख्यामान | १ " | | |

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड : शिबिर १ व २ – Visual 16 DVDs

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड अर्थसंदृष्टि – Visual 18 DVDs

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड : शिबिर १ व २ – Visual 20 DVDs

# अनुक्रमणिका


| पत्रांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १) | कर्म बंध | १ |
| २) | घाति-अघाति कर्म | १० |
| ३) | कर्म-स्थिति, आबाधाकाल व उदयकाल | १९ |
| ४) | नोकर्म-बंध, स्थिति, उदय | ३१ |
| ५) | कर्म-नोकर्म निषेकरचना | ४२ |
| ६) | जीव आणि कर्मांची स्वतंत्रता | ५२ |
| ७) | कर्म-उपशम, उदीरणा | ६२ |
| ८) | कर्मांच्या उर्वरित अवस्था | ७२ |
| ९) | गुणस्थानादि जाणण्याचे प्रयोजन | ८० |
| १०) | गुणस्थान-सामान्य चर्चा (सम्यक्त्व प्राप्तिची पात्रता प्रकिया व स्वरुप) | ८६ |
| ११) | गुणस्थान आरोहण - देशविरत गुणस्थान | ९६ |
| १२) | मुनींची गुणस्थाने | १०३ |
| १३) | गुणस्थान-विभाजन, गमनागमन व काळ | १११ |
| १४) | जीवसमास | १२५ |
| १५) | पर्याप्ति प्ररूपणा | १३५ |
| १६) | प्राण प्ररूपणा | १४१ |
| १७) | संज्ञा-प्ररूपणा, गति, इंद्रिय, काय-मार्गणा | १४६ |
| १८) | योग, वेद, कषाय, ज्ञान व संयम - मार्गणा | १५६ |
| १९) | दर्शन, लेश्या, भव्य, सम्यक्त्व, संज्ञी, आहार - मार्गणा व उपयोग प्ररूपणा | १६२ |

# कर्म बंध

पत्रांक १ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २३ जुलै १९९९

डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा
१५७/९ निर्मला निवास,
सायन (पूर्व) मुंबई ४०००२२.
फोन नं. ४०७३५८१

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

'पत्रांद्वारे जैनतत्त्व परिचय' या पत्ररूप स्वाध्यायानंतर बराच काळ लोटला. या दरम्यान तुम्ही 'माता' झालात. मुलांच्या संगोपनामध्ये व इतर जबाबदाऱ्यांमध्ये दंग असताना देखील तुमची स्वाध्यायाची रुचि कायम आहे हे पाहून बरे वाटले. आता केवळ स्वतःच शिकून चालणार नाही; मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी तुमचीच आहे.

पूर्वी मी तुम्हाला पत्रांमध्ये म्हटले होते की 'कर्म व गुणस्थान' हा विषय मी तुम्हाला पुढे कधी तरी शिकवेन. आता कर्म, गुणस्थान, पर्याप्ति, प्राण, जीवसमास, मार्गणा इत्यादि विषयांवर थोडीफार माहिती तुम्हाला करून द्यावी अशी माझी इच्छा आहे.

आजपासून मी 'आपली कहाणी' सांगणार आहे. ही कहाणी आहे माझी, तुमची, इतरांची-स्वतःला विसरलेल्या सर्व जीवांची! जीव तर अनादिपासून जीवरूपानेच होता, आहे व राहील, परंतु या जीवाने चुकून शरीरालाच जीव म्हणजे 'मी' असे मानले व त्याची कर्मकहाणी तयार झाली. आज ही कर्मकहाणी म्हणजेच कर्मबंधनाची कथा आपण ऐकणार आहोत.

आचार्यांनी आपल्याला सहा द्रव्यं, सात तत्त्व, निमित्त, रागादि विकार, कर्म, गुणस्थान, मार्गणास्थान इत्यादि अनेक गोष्टींचे स्वरूप सांगितले आहे. त्याचेच आपण ज्ञान करून घेत आहोत. हे सारे निमित्ताचे व संयोगाचे ज्ञान करण्यास आपण प्रारंभ करणार आहोत, परंतु ध्रुवस्वभावाची दृष्टि कायम ठेऊन हा

अभ्यास करावयाचा आहे. सात तत्त्वांचे स्वरूप पुन्हा एकदा विस्ताराने वाचून, त्यावर सतत चिंतन मनन करून नंतर या विषयाचे ज्ञान केल्याने आपल्याला भेदज्ञान करण्यास विशेष मदत मिळणार आहे.

आजपासून बंधनाची ही कथा तर ऐकवेन, परंतु दृष्टि आपल्या अभेद ध्रुवस्वभावावर ठेवून ऐका. लहानपणी तुम्ही भयकथा ऐकताना माझा हात घट्ट पकडून ऐकत होतात, तसेच आता 'मी जीवतत्त्व' आहे असे स्वतःचे स्वरूप निश्चित करूनच ही गोष्ट प्रारंभ करूया.

पत्राच्या प्रारंभी आपण सिद्धांना नमस्कार केला आहे. सिद्धांचे स्वरूप द्रव्यकर्म, भावकर्म व नोकर्म यांनी रहित असे आहे. या तीन प्रकारच्या कर्मांचे स्वरूपच जर आपल्याला माहीत नसेल तर कर्मविरहित सिद्धांचे स्वरूप तसेच सिद्धसमान आपल्या शुद्धात्म्याचे स्वरूप आपल्या लक्षात येणार नाही.

अगदी सोप्या भाषेत सांगायचं तर कार्माणवर्गणा नावाच्या पुद्‌गल स्कंधापासून बनलेले ते द्रव्यकर्म आहे, जीवाचे मोह, राग द्वेष परिणाम ते भावकर्म आहे व शरीर, मन, वाणी इत्यादि जीवाचे नोकर्म आहे. आता आपण कर्म असा उल्लेख करणार आहोत त्यावेळी द्रव्यकर्माबद्दल ही चर्चा आहे असे तुम्ही लक्षात ठेवा.

जीव आणि कर्म अनादिपासूनच एकमेकांशी बांधलेल्या अवस्थेत आढळतात अर्थात जीव आणि कर्म यांचा बंध अनादिपासूनचा आहे. कोणीही जबरदस्तीने हा बंध घडवून आणलेला नाही. जीव प्रथम सिद्धसमान शुद्ध होता व नंतर कर्म येऊन त्याच्याशी बांधली गेली असेही मुळीच नाही. जसे खाणीमध्ये सुवर्णपाषाण आढळतो तेथे कोणीतरी सोने व माती यांचे मिश्रण केलेले नाही, अनादिपासूनच त्यांची संयुक्त अवस्था आढळते. तद्वतच जीव सुद्धा अनादिपासून कर्म संयुक्त आहे.

प्रत्येक जीवाशी अनंत कर्मपरमाणुंचा बंध झालेला आहे. यामध्ये जीव एक आहे, तो असंख्यात प्रदेशी, अरूपी, संकोच विस्तार शक्तीने युक्त, चैतन्यमय आहे व कर्मपिंड जो आहे तो अनंतानंत परमाणुंचा समूह आहे, रूपी आहे, अचेतन आहे.

कर्मामध्ये जाणण्याची शक्ति नाही. या कर्मपिंडातून प्रत्येक समयाला काही परमाणु सुटून निघून जातात तसेच प्रत्येक समयाला काही परमाणु नव्याने येऊन त्यात मिसळतात. परमाणु येऊन मिळतात त्याला 'बंध' असे म्हणतात व कर्मपरमाणु निघून जातात त्यास 'उदय' असे म्हणतात.

कर्माचा बंध होतो त्यावेळी हे निश्चित होते की ते किती काळ जीवाबरोबर राहील - त्या काळास 'स्थिति' असे म्हणतात. स्थिति पूर्ण झाल्यावर कर्म निघून जाते - खिरते त्यास उदय म्हणतात. कर्माचा उदय होतो म्हणजेच कर्म स्थिति पूर्ण झाल्यावर खिरून जाते त्यावेळी त्या कर्माचे फळ जीवास मिळते, त्यास त्या कर्माचा 'अनुभाग' अथवा 'फळ' किंवा 'रस' म्हटले जाते. स्थितिप्रमाणे अनुभागही कर्म बांधतेवेळीच निश्चित होतो. तुम्ही म्हणाल ही स्थिति व अनुभाग कोण निश्चित करते ? कर्म तर अचेतन आहे त्याला कसं कळतं की काय आणि किती फळ द्यायचे ते ? त्याचेही उत्तर पुढे येईल.

कर्माची जी स्थिति व अनुभाग बांधले जातात त्यामध्ये जीवाचे मोह-राग-द्वेष निमित्त आहेत. मोह म्हणजे मिथ्यात्व व राग द्वेष म्हणजे कषाय. मिथ्यात्व व कषाय या दोन्हींना मिळून शास्त्रामध्ये कषाय हे एकच नाव दिले आहे व कषायामुळे (निमित्ताने) कर्माची स्थिति व अनुभाग बांधला जातो असे कथन केले आहे. तुमच्या सूज्ञपणावर मला भरवसा आहे त्यामुळे शास्त्रावर बोट ठेऊन 'पहा फक्त कषायामुळेच बंध होतो, मिथ्यात्व बंधामध्ये अकिंचित्कर आहे ' असे म्हणण्याचा वेडेपणा तुम्ही करणार नाही याची मला खात्री आहे.

हे जे कर्म बांधले जाते त्यावेळी काही विशिष्ट संख्येमध्ये परमाणु येतात, ही संख्या अनंत आहे. निरंतर प्रत्येक समयामध्ये अनंत कर्म परमाणु बांधले जातात त्यास 'समयप्रबद्ध' (एका समयात बांधले गेलेले) म्हणतात. प्रत्येक समयात १ समयप्रबद्ध परमाणु बांधले जातात व १ समयप्रबद्ध परमाणु सुटून वेगळे होतात - त्यांचा कर्मपणा नाहीसा होतो बांधल्या जाणाऱ्या परमाणुंच्या संख्येला 'प्रदेशबंध' असे नाव आहे.

हे अनंत कर्म परमाणु येऊन पूर्वीच्या कर्मपिंडामध्ये जोडले

जातात- बंध होतो, त्यावेळी त्यांचे वेगवेगळ्या आठ कर्मप्रकारांमध्ये विभाजन होते. कर्माचे हे जे आठ भेद होतात त्यास 'प्रकृतिबंध' असे म्हणतात. प्रकृति म्हणजे स्वभाव. ही कर्म काय फळ देतात त्यावरून त्यांच्या भिन्न भिन्न प्रकृतींची भिन्न भिन्न नावे पडली आहेत. या आठ कर्मांची अर्थात कर्मप्रकृतींची नावे आहेत - १) ज्ञानावरण, २) दर्शनावरण, ३) मोहनीय, ४) अंतराय, ५) वेदनीय, ६) आयु, ७) नाम आणि ८) गोत्र. यांना 'मूलप्रकृति' असे म्हणतात. यांचे आणखी भेद/प्रभेद म्हणजेच (सब डिव्हिजन्स) केले जातात त्यांना 'उत्तरप्रकृति' असे म्हटले जाते.

तुम्ही म्हणाल, 'कर्माचे हे विभाजन कोण करत असेल बरे ? आपणही दर समयाला अनंत कर्मपरमाणु बांधतो व सोडतो, परंतु आजपर्यंत आम्हाला याचा पत्ताही नव्हता.' कर्म स्वतःच या आठ प्रकृतिरूप विभाजित होत असते. त्यांचा अन्य कोणीही कर्ता नाही. ज्याप्रमाणे आपण भोजन केले असता अन्नाचे रूपांतर रक्त, हाडे, चरबी, स्नायु, विष्टा इत्यादि रूप होत असते, त्यांचा कर्ता तर इतर कोणीही नाही, त्याप्रमाणे कर्म स्वतःच्च मूलप्रकृतिरूप व उत्तरप्रकृतिरूप विभाजित होत असते. या प्रदेशबंध ( परमाणुंची संख्या) व प्रकृतिबंध (आठ कर्मप्रकृति स्वभावानुरूप विभाजित होणे) होण्यामध्ये जीवाचा 'योग' निमित्त आहे.

त्यासाठी योग म्हणजे काय हे जाणणे जरूरी आहे. लौकिक भाषेमध्ये योग हा शब्द आपण अनेक वेगवेगळ्या अर्थांनी वापरतो नाही का ? जसे, आज पैशाचा योग दिसतोय, अहो काय योगायोग बघा, योगाभ्यासाने आमची तब्येत कशी निरोगी आहे, अमुक व्यक्ति फार मोठा योगी आहे, एवढेच काय, विमा कंपनीदेखील दावा करते की तुमच्या योगक्षेमाची आम्ही काळजी वहातो. असो. यातील कोणताच योग येथे अभिप्रेत नाही.

जीवाच्या प्रदेशांचे कंपन होणे, प्रदेश सकंप होणे यास 'योग' म्हटले आहे. आत्मप्रदेश चंचल होतात - कंपन पावतात म्हणून यास 'द्रव्ययोग' म्हणतात. या कंपनामुळे जीवामध्ये कर्मांना आकर्षित करण्याची शक्ति उत्पन्न होते त्यास 'भावयोग'

म्हटले आहे. ज्याप्रमाणे लोहचुंबकामध्ये लोखंडाला आकर्षित करण्याची शक्ति आढळते त्याचप्रमाणे आत्मप्रदेशांच्या परिस्पंदनामुळे-कंपनामुळे-जीवामध्ये कर्मांना आकर्षित करण्याची शक्ति आढळते त्यास भावयोग म्हणतात.

मुलींनो, तुमच्या आता लक्षात आलेच असेल की ज्यावेळी कर्माचा बंध होतो त्यावेळी चार प्रकारांनी कर्मबंध होतो म्हणजेच बंधाचे चार भेद आहेत. ते याप्रमाणे १) प्रदेशबंध २) प्रकृतिबंध ३) स्थितिबंध आणि ४) अनुभागबंध. यापैकी प्रदेशबंध व प्रकृतिबंध होण्यामध्ये योग निमित्त आहे व स्थिति-अनुभाग बंधामध्ये कषाय (मिथ्यात्व, रागद्वेष) निमित्त आहेत. यापैकी प्रदेश, प्रकृति, स्थिति यापैकी कोणीही जीवाच्या सुखदु:खाचे कारण नाही. कर्माचा जो अनुभाग अर्थात फळ आहे त्यामध्ये जर जीव जोडला गेला व त्याने पुनश्च मोह, राग, द्वेष केले तर तो दु:खी होईल व त्यामुळे नवा कर्मबंधही होईल.

पहा हं, नीट लक्ष देऊन ऐका, जीव जो दु:खी आहे तो स्वत:च्याच मोह-राग-द्वेष परिणामांमुळे दु:खी आहे. कर्म त्याला सुखी-दु:खी करत नाही कारण कर्म हे परद्रव्य आहे, अचेतन आहे. मुलींनो, आपल्या जीवनात हर्ष शोकाचे अनेक प्रसंग ओढवतात, त्यावेळी आपण एखाद्या विशिष्ट व्यक्तीला त्याबद्दल जबाबदार धरतो. साहजिकच त्या व्यक्तीबद्दल राग किंवा द्वेष उत्पन्न होतो व त्या व्यक्तीशी संबंध जुळतात किंवा तुटतात. अशावेळी ती व्यक्ति निमित्त नसून आपणच पूर्वी बांधलेल्या कर्माचा उदय त्या प्रसंगामध्ये निमित्त आहे असे शास्त्रवचन जाणल्याने आपणास खऱ्या निमित्ताचे ज्ञान होते. आपलंच कर्म खोटं तर दोष देणार कोणाला ? अशी जाणीव झाली असता इतर व्यक्तींना दोष देण्याची आपली वृत्ती थंडावते.

केवळ कोणते निमित्त आहे हे जाणणे म्हणजे निमित्तासंबंधी खरे ज्ञान नव्हे; तर निमित्त कार्यामध्ये काहीही करत नाही असे जाणणे हेच खरे ज्ञान होय. मुलींनो, निमित्ताचा स्वीकार करून निमित्ताच्या नावाखाली त्याला कर्तापणा बहाल करून आपण नामानिराळे रहाण्याच्या साळसूदपणा करतो. परंतु कर्माचा उदय कसाही असो, आपण त्याच्याकडे पाहून वर्तमानकाळी कोणते

परिणाम करतो हे पूर्णपणे आपल्या हाती आहे. त्यामध्ये इष्ट अनिष्ट परिणाम आपण करतो हा आपला मिथ्यात्व परिणाम आहे, कर्म आपल्याला जबरदस्तीने मिथ्यात्वभाव करण्यास भाग पाडत नाही. त्याचप्रमाणे इष्ट-अनिष्ट मानलेल्या गोष्टीकडे पाहून वर्तमानकाळामध्ये राग, द्वेष, हर्ष, शोक करत बसणे हा आपला कषायभाव आहे, कर्म जीवास कषाय करण्यास भाग पाडत नाही.

एखाद्या दोषाचे-चुकीचे खापर दुसऱ्याच्या माथी फोडले तर तो दोष टाळण्याचा आपण प्रयत्नच करणार नाही, परंतु आपल्या स्वतःच्या दोषास दोषरूपाने स्वीकारणे हेच तो दोष टाळण्यासाठी उचललेले पहिले पाऊल आहे. आपण स्वतःलाच बजावले पाहिजे की, "बा जीवा ! वर्तमानकाळामध्ये तू जे बरे—वाईट फळ भोगत आहेस ते तुझ्या पूर्वी केलेल्या कषायांचेच फळ आहे; कारण त्या कषायांच्या निमित्तानेच त्यासमयी बांधलेल्या कर्मामध्ये अनुभागबंध झाला होता. कर्माची स्थिति पुरी झाल्याने ते फळ आता तुझ्या वाट्याला आले आहे. वर्तमानकाळात तू जे रागद्वेष, मोह करत आहेस त्यामुळे वर्तमानकाळी तर तू दुःखी आहेसच परंतु आता नवा स्थितिबंध व अनुभागबंध करून भविष्यकालीन दुःखाची देखील तू स्वतःच तरतूद करून ठेवत आहेस, त्याचे बी पेरत आहेस.

आपण आता हे पाहिले की योगामुळे कर्म जीवाकडे आकृष्ट होतात-येतात-त्यांचा आस्रव होतो - त्यांची संख्या निश्चित होते व त्यांच्या प्रकृति ठरतात. परंतु नुसत्या योगामुळे काही स्थिति बांधली जात नाही व अनुभागही बांधला जात नाही. गुणस्थानासंबंधी तुमचा अभ्यास नाही तरीदेखील ही गोष्ट येथे नमूद करते की एकूण चौदा गुणस्थानं असतात, त्यापैकी १ल्या गुणस्थानापासून १०व्या गुणस्थानापर्यंतच्या जीवांमध्ये कषायांचा सद्भाव असतो, ११व्या गुणस्थानापासून १४व्या गुणस्थानापर्यंत कषायांचा अभाव असतो. जो योग आहे त्याचा १ल्या गुणस्थानापासून १३व्या सयोगकेवली गुणस्थानापर्यंत सद्भाव असतो. १४व्या अयोगकेवली गुणस्थानामध्ये योगाचा अभाव असतो.

याचा अर्थ असा होतो की १ल्या गुणस्थानापासून १०व्या गुणस्थानापर्यंत कषाय व योग दोन्हीही असतात त्यामुळे चारही

प्रकारचा बंध तेथे होतो. त्या कर्माच्या आगमनास 'साम्परायिक आस्त्रव' म्हटले आहे. साम्परायचा अर्थ कषाय असा होतो. ११, १२ व १३व्या गुणस्थानामध्ये योग असतो पण कषाय नसतो त्यामुळे प्रदेशबंध व प्रकृतिबंध होत असला तरी त्यात स्थिति व अनुभाग नसल्याने कर्म येऊन त्याच समयात खिरून जातात. ज्याप्रमाणे भिंतीवर फेकलेली कोरडी रेती भिंतीवर चिकटून रहात नाही त्याप्रमाणे हे कर्मपरमाणु जीवाबरोबर चिकटून रहात नाहीत, तसेच त्याचे काही फळदेखील मिळत नाही. या आस्त्रवाच्या प्रकाराला 'ईर्यापथास्त्रव' असे नाव आहे.

१४व्या गुणस्थानामध्ये कषाय तर नसतोच, शिवाय योगाचाही अभाव असतो. आत्मप्रदेशांचे कंपन पूर्णपणे नाहीसे होते - अकंप अवस्था असते त्यामुळे कर्माचे आगमन सुद्धा होत नाही - आस्त्रवच होत नाही तर बंधाचा प्रश्नच कोठे उद्भवतो ? गुणस्थानातीत अशा सिद्ध अवस्थेमध्ये तर जीव पूर्ण शुद्ध अवस्थेमध्ये विराजमान असतो, त्याच्या सत्तेमध्ये एकही कर्म नसते, पुन्हा जीव ना कषाय करतो, ना योग होतो त्यामुळे अनंत काळ जीव निष्कर्म अवस्थेमध्ये स्वतःच्या अनंत शक्तींच्या व्यक्त पर्यायांचा आस्वाद घेत अर्थात अनंत अव्याबाध सुखाचा उपभोग करीत रहातो.

कर्माचा जीवाशी हा जो बंध होतो त्यास 'संश्लेष संबंध' म्हणतात. हा विशिष्ट बंध आहे. काही काळासाठी हा संबंध कायम रहातो. इतर द्रव्यांशी व इतर पुद्गलांशी जीवाचा असा संबंध नसतो, इतर द्रव्यांशी तर जीवाचा एकक्षेत्रावगाही संबंध असू शकतो. कर्माशीही एकक्षेत्रावगाही संबंध असतो, परंतु जीव एक ठिकाण सोडून अन्य ठिकाणी गेला असता कर्मही त्याच्या बरोबर बद्ध अवस्थेत जाते.

आपण दागिने घालून इकडून तिकडे जातो त्यावेळी ते दागिनेही जातात, परंतु ते काढून आपण अन्य दागिने घालू शकतो, त्यांना कपाटात ठेऊन आपण इतरत्र जाऊ शकतो. परंतु कर्माच्या बाबतीत तसे होत नाही. कर्माची स्थिति पूर्ण होईपर्यंत ते जीवाशीच बांधलेल्या अवस्थेत रहाते. सतत जीवाबरोबर रहाते. तुम्ही म्हणाल, 'शरीरदेखील जीवाबरोबर सदैवच रहाते'. हो, पण एक भव संपून दुसऱ्या भवात जाताना म्हणजे मृत्युनंतर

हे शरीर सोडून जीव इतरत्र गमन करतो ; शरीर व जीव भिन्न होतात त्याप्रमाणे कर्माला सोडून जीव अन्य भवात जाऊ शकत नाही. जीवासह त्याचे कार्माण व तेजस शरीर दुसऱ्या भवात जाते.

कर्माचा बंध झाल्यानंतर कर्म जीवाबरोबर रहातात. जुनी काही कर्म निघून जातात व नवी नवी येत रहातात त्यामुळे जीव कधीही आपोआप चुकून कर्मविरहित होऊ शकत नाही. जीवाबरोबर कर्माचे हे अस्तित्व आहे त्याला कर्माची 'सत्ता' असे म्हणतात. त्या कर्माबद्दल बोलताना 'सत्तेमध्ये पडलेले कर्म' असा उल्लेख केला जातो. कर्मबंध झाल्यानंतर काही कर्म करोडो, अब्जो, सागरो वर्षांपर्यंत सत्तेमध्ये पडून रहातात व आपापली स्थिति पुरी झाल्यावर फळ देऊन निघून जातात. ज्याला आत्ताच आपण 'उदय' असे म्हटले होते. ध्यानात ठेवा, सत्तेमध्ये असलेल्या कर्मांचे काहीही फळ मिळत नाही. आपल्याला अनेकदा दिसतं की काही व्यक्ति एवढं चांगलं वागतात, पाप करीत नाहीत तरी त्यांच्यावर संकटं कोसळतात व काही व्यक्ति पापात मग्न असूनही वैभवात व चैनीत रहातात. त्याचे कारण हेच आहे की सध्या जे संयोग प्राप्त होतात, धन-वैभव मिळते ते पूर्व कर्माचे फळ आहे व आता पाप करून जे नवीन कर्म बांधले जाईल त्याचे फळ भविष्यात मिळणार आहे.

पार्श्वनाथ भगवानांची कथा तर तुम्हाला माहीतच आहे. मुनि पार्श्वनाथ आत्मध्यानात मग्न असताना त्यांच्या अनेक भवांचा वैरी-कमठाचा जीव-त्यांच्यावर घोर उपसर्ग करतो. त्यावेळी पार्श्वनाथ मुनींच्या म्हणजे त्या जीवाच्या बरोबर तीर्थंकर प्रकृति सत्तेमध्ये पडली होती. परंतु एवढे महान पुण्यकर्म सत्तेत असूनही जोपर्यंत त्या कर्माचा उदय झाला नाही तोपर्यंत त्याचे फळही त्यांना मिळाले नाही.

कर्माची सत्ता सदैव कायम रहाते याचे एक उदाहरण पाहूया. जरा कल्पना करा की पाण्याने भरलेली एक मोठी टाकी आहे, त्यामध्ये वरून ५ नळांमधून पाणी पडत आहे व त्याच वेळी खालच्या भागात असलेल्या त्याच आकाराच्या ५ नळांमधून पाणी बाहेर वाहून जात आहे. तर मग मला सांगा की ती टाकी किती दिवसांमध्ये रिकामी होईल ? नाही ना होणार रिकामी ?

कर्माच्या बाबतीतही असेच आहे. त्यांचाही निरंतर बंध व उदय होत रहातो व कर्माची सत्ता कायम रहाते. असो, या रहस्यमय कर्मकहाणीचे पुढचे प्रकरण सुरू करण्यापूर्वी आज आपण काय शिकलो ते पाहूया.

१. जीवाच्या मोह-राग-द्वेष परिणामांच्या निमित्ताने स्वयं परिणमित कार्माणवर्गणांच्या विशिष्ट अवस्थेला 'कर्म' असे म्हणतात.

२. जीवाच्या मोह, राग, द्वेष परिणामांच्या निमित्ताने कार्माण वर्गणांचा आत्मप्रदेशांशी जो विशिष्ट संश्लेष संबंध होतो त्यास 'बंध' असे म्हणतात.

३. बंधाचे चार प्रकार आहेत - प्रकृतिबंध, प्रदेशबंध, स्थितिबंध आणि अनुभाग बंध.

४. कर्माचा आपापला वेगळा स्वभाव आहे. स्वभावानुसार वेगवेगळ्या प्रकृति म्हटल्या जातात. कर्मरूप होण्यायोग्य कार्माणवर्गणांचे ज्ञानावरणादि प्रकृतिरूप परिणमन होणे यास 'प्रकृतिबंध' म्हणतात.

५. प्रत्येक समयाला जेवढे पुद्गल परमाणु कर्मरूप परिणमन करून जीवाबरोबर बांधले जातात, त्या प्रमाणाला - संख्येला 'प्रदेशबंध' म्हणतात.

६. कर्मरूप परिणमित झालेले पुद्गल परमाणु आत्म्याबरोबर एकक्षेत्रावगाह संबंधाने ज्या कालावधिपर्यंत बंधनात रहातात त्यास 'स्थितिबंध' म्हणतात.

७. बांधल्या जाणाऱ्या कर्माच्या फलदान शक्तीस 'अनुभाग बंध' म्हणतात.

८. अनेक वेगवेगळ्या वेळी बांधलेली कर्म जीवप्रदेशांमध्ये वास्तव्य करून रहातात. त्याला 'सत्ता' किंवा 'सत्व' असे म्हणतात.

९. कर्माची स्थिति पूर्ण झाल्यावर कर्म फळ देते त्यास 'उदय' म्हणतात. आज येथेच विराम घेते.

कळावे,

**तुमची आई.**

# घाति-अघाति कर्म

पत्रांक २ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २६जुलै१९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

पत्ररूप स्वाध्यायास आपला पुनश्च प्रारंभ झाला आहे. तुमच्या पत्रोत्तराची वाट न बघता मी शक्यतो लवकर लवकर पत्र लिहीत जाईन. तुमचे प्रश्न असतील तर अवश्य कळवा. कर्मासंबंधीचा हा विषय अतिशय अद्‌भुत व विस्मयकारी आहे. हा विषय लक्षात आल्यानंतर वस्तुस्वरूपाचे चित्रण स्पष्टपणे आपल्या अंतःचक्षुसमोर उभे रहाते.

मागच्या पत्रात आपण बंध व उदय या शब्दांचा अर्थ पाहिला होता. त्याबद्दल अधिक माहिती आपण आज घेणार आहोत. त्यापूर्वी ८ कर्मांचे स्वरूप थोडक्यात पाहूया. त्यांची नावे आपण पूर्वी पाहिलेली आहेत. ८ कर्मप्रकृतिंपैकी ४ घातिकर्म आहेत व ४ अघातिकर्म आहेत. ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय ही ४ घातिकर्म आहेत. आणि वेदनीय, आयु, नाम व गोत्र ही अघातिकर्म आहेत. घातिकर्म नावानुरूप कोणाचा तरी घात करत असणार. द्रव्याचा तर कोणी नाश करू शकत नाही. शास्त्रात लिहिलय की ते जीवाच्या गुणांचा घात करतात. तुम्ही विचाराल की, 'द्रव्य व गुणांचा नित्यतादात्म्य संबंध असताना गुणांचा घात होईलच कसा ?' तुमचे म्हणणे बरोबर आहे. आता राहता राहिली पर्याय. पर्यायाचा घात म्हणजे नाश तर होऊ शकत नाही कारण पर्याय एक समयाची आहे व पर्यायविरहित द्रव्य होऊच शकत नाही.

घात शब्दाचा अर्थ येथे असा घ्यायचा आहे की जीवाचे व त्याच्या गुणांचे जे सामर्थ्य स्वभावामध्ये आहे ते पर्यायामध्ये प्रकट न होऊ देणे. ज्ञानावरण या शब्दाचा अर्थ आहे जो ज्ञानावर आवरण घालतो. याला मेघाच्छादित सूर्याचे उदाहरण दिले जाते परंतु ते उदाहरण काही अंशीच लागू पडते, पूर्णपणे नाही. मेघांच्या पलीकडे सूर्य आपल्या पूर्ण प्रकाशाने तळपत असतो परंतु ज्ञानावरण कर्माच्या उदयामध्ये जीवाचे पूर्ण ज्ञान

पर्यायामध्ये प्रकट नसते. ज्ञान प्रकट झाले व कर्मांनि त्यावर आवरण घातले असे होऊ शकत नाही.

या ४ घातिकर्मांचे फळ जीवाच्या काही गुणांच्या अवस्थांमध्ये निमित्त ठरते म्हणून यांना जीवविपाकी कर्म असेही म्हणतात. त्यापैकी ज्ञानावरण व दर्शनावरण ही दोन कर्म अनुक्रमे ज्ञान व दर्शन गुणांची शक्ति त्या त्या गुणांच्या पर्यायांमध्ये व्यक्त होऊ देत नाहीत म्हणून आवरण घालणारी ही कर्म आहेत. अंतराय हे कर्म बाधा आणणारे-विघ्न उपस्थित करणारे-मोडता घालणारे कर्म आहे. स्वाध्यायाला न येणाऱ्या मंडळींना तसे हे बरेच उपयोगी 'कोलीत' आहे. 'अहो, आमची यायची खूप इच्छा होती हो, पण काय करणार ? अंतराय कर्म आडवं आलं ना !' ही ठरलेली थाप ऐकायला मिळते. परंतु 'माकडाच्या हाती कोलीत' ही म्हण ठाउक आहे ना तुम्हाला ? 'कर्माचा उदय असणे,' 'अंतराय कर्म आडवं येणं', 'निश्चय असू द्या हो पण व्यवहार तर असतोच ना', 'आपण अनेकांतवादी आहोत हाही खरा आणि तोही खरा' अशी अनेक शास्त्रवचनं चुकीच्या अर्थाने वापरून अनेक जण आपल्या (अ)ज्ञानाचे प्रदर्शन करीत हिंडत असतात. त्यांची अशीही गैरसमजूत असते की पहा मी या लोकांना त्यांच्याच भाषेत गप्प बसवले की नाही ?

जीवाच्या दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य यांच्यामध्ये बाधा आणणाऱ्या कर्माला अंतराय कर्म म्हणतात. जसे आपल्याला एखाद्या संस्थेला दान देण्याचे भाव झाले परंतु घरच्या व्यक्तींनी त्या संस्थेबद्दल संशय व्यक्त केला म्हणून दान देण्यात आले नाही, त्यावेळी त्या व्यक्तिमुळे बाधा आली असे आपण म्हणतो, परंतु खरे पाहता अंतराय कर्माचा उदय हे त्याचे निमित्त आहे. आपली बँकेतली ठेव आपणास आज मिळणार होती पण बँकेचा हरताळ असल्याने आज मिळू शकली नाही हा लाभामध्ये अंतराय झाला; तसेच भोग-उपभोगासंबंधी समजावे. भोग म्हणजे ज्या वस्तुंचा एकदाच वापर होऊ शकतो जसे, भोजन; उपभोग म्हणजे ज्या वस्तु वारंवार आपण वापरतो जसे-कपडे, घर, दागिने इत्यादि.

खरे पाहता हे दानादि सर्व जीवाचे गुण आहेत. जीव पर्यायामध्ये शुद्धता प्रकट करतो हेच तो स्वतःला दान देतो, तोच

त्याचा लाभ आहे, भोग आहे, उपभोग आहे त्यामध्ये हे अंतराय कर्म बाधा आणते.

वीर्य हा गुण आहे व पुरुषार्थ ही त्याची पर्याय आहे. स्वभावाची रचना पर्यायात करणे हे याचे कार्य आहे. जीवाचा पुरुषार्थ प्रकट होत नाही, तेव्हा अंतराय कर्माचा उदय आढळतो. याचा अर्थ असा नाही की अंतराय कर्म जीवाचा पुरुषार्थ होऊ देत नाही. जीव स्वतःच पुरुषार्थ करत नाही त्यावेळी निमित्तावर आरोप येतो.

ज्ञान, दर्शन, वीर्य गुणांवर पूर्ण आवरण कधी पडत नाही. ज्ञानाची कितीही हीन अवस्था झाली तरी अल्प ज्ञानाचा उघाड रहातोच. सूक्ष्मातिसूक्ष्म जीवसुद्धा कधी ज्ञान, दर्शन, वीर्य रहित होत नाहीत.

घातिकर्मापैकी मोहनीय नावाचे जे कर्म आहे ते आवरणही घालत नाही व बाधाही आणत नाही परंतु श्रद्धा व चारित्र गुणांच्या पर्यायांमध्ये विपरीतता-विकार होण्यास निमित्त ठरते. श्रद्धेच्या विपरीततेला मिथ्यात्व म्हणतात व चारित्राच्या विकारास कषाय (राग द्वेष) म्हणतात. श्रद्धेच्या विपरीततेमुळे ज्ञान व चारित्रही विपरीत होते, म्हणून मिथ्यात्व या शब्दामध्ये मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान व मिथ्याचारित्र तिन्ही गर्भित होतात. नवीन बंधास कारण कोण याचा विचार करतांना आपण पुन्हा या मोहनीय कर्माबद्दल बोलूया.

घातिकर्मांना 'जीवविपाकी' म्हणतात कारण त्यांच्या उदयाचे फळ सरळ सरळ जीवाच्या गुणांमध्ये मिळते, त्याप्रमाणे अघातिकर्मांना 'पुद्‌गलविपाकी' कर्म म्हणतात. कारण त्यांचा विपाक म्हणजे रस-फळ मुख्यत: पुद्‌गलामध्ये अर्थात बाह्यसंयोगात मिळते. वेदनीय, आयु, नाम व गोत्र ही ४ अघातिकर्म आहेत. वेदनीयकर्माच्या दोन उत्तरप्रकृति आहेत - सातावेदनीय आणि असातावेदनीय. सातावेदनीय कर्माच्या उदयामध्ये जीवाला अनुकूल संयोग प्राप्त होतात व असातावेदनीय कर्माच्या उदयामध्ये प्रतिकूल संयोग प्राप्त होतात.

आयु, नाम आणि गोत्र या कर्मांचा शरीराशी निमित्तपणा आहे. जन्मापासून मरणापर्यंतचा काळ यास आपण आयु म्हणतो.

सूक्ष्मतेने पाहिले तर मरणाच्या पुढच्याच समयाला विग्रहगतिमध्ये नवीन भवाची आयु प्रारंभ होते. आयुचे दोन प्रकार आहेत एक 'भुज्यमान आयु' व दुसरी 'बध्यमान आयु'. आपण सध्या मनुष्यपर्यायामध्ये आहोत अर्थात मनुष्यायु भोगत आहोत, ती आपली भुज्यमान आयु आहे म्हणजे ज्या आयुकर्माचा उदय वर्तमानकाळी चालू आहे त्यास भुज्यमान आयु म्हणतात. आपल्या या चालू भवात आपण पुढील एक भवासंबंधी आयु बांधतो त्यास बध्यमान आयु म्हणतात. चार प्रकारचे आयुकर्म आहे—देवायु, मनुष्यायु, तिर्यंचायु व नरकायु.

नामकर्माच्या ९३ प्रकृति आहेत. शास्त्रात याला चित्रकाराची उपमा दिली आहे. चित्रकार ज्याप्रमाणे अनेक प्रकारचे आकार व रंगीबेरंगी चित्र काढतो त्याप्रमाणे नाम कर्मानुसार गति, जाति, शरीर, संहनन, संघात इत्यादि शरीरासंबंधी फळ मिळते अर्थात शरीराची उंची, रंगरूप, आकार, हाडांची बळकटी, अवयवांची रचना, चाल, स्वर, जीवाचे यशापयश वगैरे या नामकर्माच्या उदयाच्या निमित्ताने ठरते. श्वासोच्छ्वास, द्रव्यमन वगैरे पुद्गलाची रचनादेखील नामकर्मामुळे होते. एवढेच काय तीर्थंकर नामप्रकृति नावाची एक नामकर्माची उत्तरप्रकृति आहे. बालबोध भाग १ मध्यै तीर्थंकर भगवान या धड्यात तुम्ही पाठ केले होते आठवतंय? की तीर्थंकरांना तीर्थंकर नावाच्या नामप्रकृतिचा उदय असतो त्यामुळे समवशरणादि विभूति त्यांना प्राप्त होतात.

गोत्रकर्माच्या निमित्ताने उच्च गोत्र अथवा नीच गोत्र प्राप्त होते. उच्च किंवा हलक्या कुळात जन्म होतो व त्यामुळे जीवाला मोठेपणा वा हीनपणा भोगावा लागतो.

या सर्व बाह्य गोष्टी खरोखरी सुख-दुःखाचे कारण नाहीत, जीवाचा मोहच सुख-दुःखात निमित्त आहे. निर्मोही मुनींना ऋद्धि प्राप्त होवो अथवा परिषह प्राप्त होवो, तरीदेखील त्यांना सुख-दुःख होत नाही. मोही जीवाला कारण मिळो अथवा न पण मिळो, त्याला स्वतःच्या संकल्पांमुळे सुख-दुःख होतच रहाते.

या घाति अघाति कर्मांच्या उदयामुळे काय काय फळ मिळते व जीवाची दशा काय होते याचे सविस्तर व सोपे वर्णन

मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथामध्ये दुसऱ्या अध्यायात 'कर्मबन्धनरूप रोगके निमित्तसे होनेवाली जीवकी अवस्था' या शीर्षकाखाली केले आहे. ते तुम्ही वाचा - वारंवार वाचा. नुसत्या पत्ररूप स्वाध्यायाने काही फायदा होणार नाही. आता ग्रंथांचे वाचनही तुम्ही स्वतः केले पाहिजे. जसे तुम्ही तुमच्या मुलांना - रोहित, रीया, रोहनला स्वतःच्या हाताने भरवत होतात परंतु ही मुलं आता मोठी होऊ लागलीत तसे तुम्ही त्यांना आपापल्या हाताने जेवायला शिकवित आहात.

आठ कर्मांपैकी आयुकर्म सोडून इतर सात कर्मांचा बंध तर निरंतर चालूच असतो, आयुचा बंध कधी कधी होतो. आयुबंधासंबंधीचे विवेचन पुढे करेन. जीवाबरोबर सत्तेमध्ये असलेल्या कर्मांपैकी आपापली स्थिति पुरी करून आठही कर्म निरंतर उदयास येत असतात.

तुम्ही म्हणाल की, "सात किंवा आठ कर्मांचा बंध निरंतर चालू आहे व आठही कर्मांचा उदय निरंतर चालू आहे. तर यातून सुटण्याचा काही मार्ग आहे की नाही? की हे रहाटगाडगे असेच चालू रहाणार? पूजाअर्चा, व्रत, उपवास करून तरी कर्म नाहीशी होतील की नाही? पूजेमध्ये तर आपण म्हणतो की 'अष्ट कर्म विध्वंसनाय धूपं निर्वपामीति स्वाहा', मग याचा अर्थ काय? आम्ही पाप केलं असेल तर आता पुण्य करून त्यांची वजाबाकी करून कर्मांची शिल्लक शून्य करून टाकू."

हो, हो - जरा धीराने घ्या. पहिल्या प्रथम हे लक्षात घ्या की पाप व पुण्य ही कर्मप्रकृतिंची नावे - विशेषणं आहेत. पापप्रकृति बांधण्यात कारणभूत अशा अशुभ भावांनाही पाप म्हणतात, ते कारणामध्ये कार्याचा आरोप करून केलेले उपचार कथन आहे. तद्वतच ज्या परिणामांनी पुण्यप्रकृति बांधल्या जातात त्या शुभपरिणामांना उपचाराने पुण्य म्हटले जाते. कोणत्या कर्मप्रकृति पापरूप आहेत व कोणत्या पुण्यरूप आहेत हे ठाऊक आहे तुम्हाला? चारही घातिकर्म तर पापप्रकृतिच आहेत व चार अघातिकर्मांमध्ये प्रत्येकाचे दोन दोन भेद आहेत - पुण्य आणि पाप. सातावेदनीय, देवायु, मनुष्यायु, शुभनाम, उच्चगोत्र इत्यादि पुण्यप्रकृति आहेत व असातावेदनीय, नरकायु, अशुभनाम,

नीचगोत्र इत्यादि पापप्रकृति आहेत.

आपण आत्ताच हे पाहिले होते की सात किंवा आठ प्रकृतिंचा बंध सतत होत असतो. तुम्ही शुभभाव करा अथवा अशुभभाव करा, आठ कर्म बांधली जातात, बंध होतो, बंधातून सुटका होत नाही. एखाद्या व्यक्तीने शुभभाव केला असता त्याला आठ कर्मांचा बंध होतो. त्यापैकी ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय ही चार घातिकर्म तर पापप्रकृति आहेत व अघातिमध्ये पुण्य व पाप या दोन प्रकारांपैकी त्याला पुण्यप्रकृतिंचा बंध होतो. म्हणजेच शुभभाव (पुण्य) केले असता पुण्य व पाप दोन्हीचा बंध होतो. एखाद्याने अशुभभाव (पाप) केले तर त्यावेळी त्याला चार घातिकर्म-ज्या पापप्रकृति आहेत त्या व चार अघातिकर्मांपैकी पापप्रकृतिं यांचा बंध होतो.

अर्थात पुण्य केले असता पुण्य व पाप प्रकृतिंचा बंध होतो व पाप केले असता पाप व पाप प्रकृतिंचा बंध होतो म्हणूनच शास्त्रामध्ये म्हटले आहे की,'पापाला पाप तर सारी दुनिया म्हणते परंतु पुण्यदेखील पाप आहे हे फार विरळ्या लोकांना माहीत आहे'. जे जीवाला बंधनात टाकते ते पवित्र कसे म्हणावे? ते हितकारी कसे असेल? हे ऐकून तुम्ही असे म्हणू नका की, 'मग बरं झालं आता आम्हाला पुण्य करावयाची गरज नाही, सोडून देऊ'.

शास्त्रातला उपदेश जीवांच्या कल्याणासाठी असतो. पुण्य सोडून द्याल तर पाप करून नरक-निगोदात जायची इच्छा आहे की काय? मान्यतेमध्ये पुण्य हे सोडून देण्यायोग्य आहे, हेय आहे हे समजल्यानंतर पुण्य व पाप दोन्ही सोडून शुद्धात्म्यामध्ये लीन व्हायचे आहे, शुभोपयोग व अशुभोपयोग सोडून शुद्धोपयोग प्रकट करावयाचा आहे, असा योग्य अर्थ लावला पाहिजे.

आता प्रश्न असा आहे की आठही कर्मांचा उदय निरंतर चालू असतो व त्याचे फळ जीवास मिळते. परंतु नवीन बंध का होतो? काय आठही कर्मांचा उदय नवीन बंधास कारणभूत आहे ? आपण आठ कर्मांच्या उदयामध्ये काय काय फळ मिळते हे पाहिले होते.

**कर्माचा उदय**

| घातिकर्म | अघातिकर्म |
|---|---|
| १. ज्ञानाची हीनता | १. संयोगांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता |
| २. दर्शनाची हीनता | २. आयु |
| ३. श्रद्धा व चारित्राची विपरीतता | ३. शरीरादिची रचना |
| ४. दान, लाभ, भोग, उपभोग व वीर्य यांच्यामध्ये बाधा | ४. गोत्र |

वरील आठ गोष्टींपैकी कोणत्या गोष्टी नवीन कर्मबंधास कारण आहेत हे पाहूया. ज्ञान, दर्शन, वीर्य हे जीवाचे स्वभाव आहेत. ते थोडे प्रकट आहेत व थोडे अप्रकट आहेत. जो प्रकट आहे तो जीवाचा स्वभाव आहे व स्वभाव कधी बंधाला कारणीभूत असू शकत नाही. स्वभावामुळेच जर बंध झाला तर बंधाचा अभाव कधी होणारच नाही. ज्ञान दर्शनादि जे अप्रकट आहेत त्यांचा तर अभावच आहे. ज्याची उपस्थितीच नाही, जो हजरच नाही तो बंध कसा करेल? म्हणून ज्ञानावरण, दर्शनावरण आणि अंतराय कर्मांचा उदय नव्या बंधामध्ये निमित्त असू शकत नाही.

अघातिकर्माच्या विपाकाचे फळ तर बाह्य संयोग, शरीर, आयु इत्यादि रूपाने मिळते. ती सर्व परद्रव्यं आहेत आणि परद्रव्य हे बंधाचे कारण असू शकत नाही. आता राहता राहिले एकमेव मोहनीय कर्म. त्याचे दोन भेद आहेत-दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय.

दर्शनमोहनीयाच्या उदयामध्ये मिथ्यात्व म्हणजेच श्रद्धेची विपरीतता होते व चारित्रमोहनीयाच्या उदयामध्ये राग द्वेषाची उत्पत्ति होते. श्रद्धेच्या विपरीततेमुळे हा जीव स्वतःला जीव न मानता आठ कर्मांच्या उदयामुळे झालेल्या जीव व पुद्गल यांच्या भेसळ अर्थात सरसकट पर्यायालाच हा 'मी' आहे असे मानतो. अर्थात नामकर्माच्या निमित्ताने मिळालेले हे शरीर मी आहे, मी मनुष्य आहे, मी गोरा आहे, मी बांधेसूद आहे, मी बलवान आहे असे मानतो. गोत्रकर्मामुळे मिळालेल्या उच्च कुळामुळे मी उच्च

कुलवान आहे असे मानतो. आयुकर्मोदयाने जो या जीवनाचा कालावधी पडला त्यास मी दीर्घायुषि आहे, व्यायाम औषध पथ्य बरोबर पाळल्याने मी जिवंत राहिलो असे मानतो. सातावेदनीयाच्या निमित्ताने मिळालेले घरदार, पैसे इष्ट संयोग माझे आहेत व मी मोठया बुद्धिचातुर्याने ते मिळवलेले आहे असे मानतो.

मी खूप हुषार आहे, ट्युशन्स लाऊन शिकल्याने माझी बुद्धि वाढली असे मानतो. ज्ञानावरण कर्मामुळे होणाऱ्या हीनाधिकते एवढेच आपले ज्ञानसामर्थ्य मानतो. दर्शनावरण कर्मामुळे येणाऱ्या गाढ निद्रेमध्ये सुखबुध्दि मानतो. सातही तत्त्वांमध्ये विपरीत मान्यता ठेवतो, चारित्रमोहनीय कर्मामुळे रागद्वेष होतात त्यास आपला स्वभाव मानतो, जसे मी फार दयाळू आहे, अमुक  व्यक्ति फार तापट आहे वगैरे मानतो.

वरील सर्व गोष्टी कर्मोदयाने झालेल्या जीवाच्या व पुद्‌गलांच्या अवस्था आहेत त्या सर्वांची गोळाबेरीज करून त्या पर्यायाएवढाच 'मी' आहे असे जो जीव मानतो तो मिथ्यादृष्टि आहे, त्याची श्रद्धा विपरीत आहे.

कर्म सूक्ष्म असल्याने दिसू शकत नाहीत परंतु त्यांच्या उदयाच्या फलस्वरूप कार्य तर अनुभवास येते. या सर्वांना जाणणारा तर जीव स्वतःच आहे परंतु अरूपी असल्याने इंद्रियांद्वारे दिसत नाही, अनुभवास येत नाही. त्यामुळे कर्मांच्या या कार्यालाच आपले स्वरूप मानतो.

जीवाची सर्वात मोठी चूक म्हणजे त्याने 'स्व' चे स्वरूप विपरीत मानले. त्यामुळे या काल्पनिक 'स्व' साठी ज्या गोष्टी अनुकूल वाटतात त्यांच्याविषयी याला राग उत्पन्न होतो व ज्या गोष्टी प्रतिकूल वाटतात त्यांच्याविषयी याला द्वेष उत्पन्न होतो. नुसता एवढयावरच हा जीव थांबत नाही. त्या रागद्वेषांना, की जे क्षणिक विकार आहेत, त्यांना आपला स्वभाव मानतो, करण्यायोग्य मानतो, एका प्रकारचा राग सोडून दुसरा विशिष्ट राग करू इच्छितो आणि परस्पर उपदेशही असाच देतो.

अशाप्रकारे मोहनीयकर्माच्या उदयामुळे होणाऱ्या मिथ्यात्व व राग द्वेष यांच्या निमित्ताने नवा बंध होतो. तत्त्वार्थसूत्र नावाच्या

ग्रंथामध्ये सूत्र आहे की मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग हे बंधाचे हेतु आहेत. सर्वप्रथम मिथ्यात्वाचा अभाव केल्यानेच पुढील बंधाचे हेतुही क्रमाक्रमाने नष्ट होत जातात. परंतु मिथ्यात्व कायम ठेवून कितीही शुभराग केले तरी बंधाचा अभाव होत नाही.

मी अनंत ज्ञानादि गुणांचा पिंड आहे; ध्रुव, शुद्ध, स्वयंसिद्ध पदार्थ आहे अशाप्रकारे आपल्या शाश्वत अस्तित्वाचा व ध्रुवस्वभावाचा स्वीकार करून ज्ञानाची प्रकट पर्याय रागद्वेषांना जाणणे सोडून देऊन ध्रुवस्वभावाला जाणण्यात मग्न झाली असता स्वभावोत्पन्न सहज अतींद्रिय आनंदाची अनुभूति होते.

परंतु रागालाच जाणत राहिले व त्याला आपला स्वभाव मानत राहिले तर राग दुःखरूप असल्याने याला दुःखाचीच अनुभूति होत रहाते. हा जीव परद्रव्यांना दुःखाचे कारण मानून अधिकाधिक राग द्वेष करून अधिक दुःखी होतो.

अशाप्रकारे आज आपण आठ कर्मांची नावे तसेच त्यांचे घातिकर्म व अघातिकर्म असे भेद, या आठ कर्मांच्या उदयामुळे मिळणारे फळ, सात किंवा आठ कर्मांचा बंध निरंतर होतो, आठ कर्मांचा उदय निरंतर होतो परंतु मोहनीयकर्माच्या उदयामुळे होणाऱ्या मिथ्यात्व व राग द्वेषांचे निमित्त मिळाल्यानेच पुनश्च नव्या कर्मांचा बंध होतो, पाप केल्याने पाप कर्म बांधली जातातच परंतु पुण्य केल्यानेही पुण्य व पाप अशी दोन्ही प्रकारची कर्म बांधली जातात हे पाहिले.

तुम्हाला गृहपाठ देखील दिला आहे हे काही मी विसरलेले नाही. मोक्षमार्गप्रकाशक पृष्ठ क्रमांक ३२ ते ४४ वाचणे. दुसरा अध्याय पहिल्यापासून वाचलात तर अधिकच चांगले. पत्राद्वारे फार जुजबी-स्थूल कथन होऊ शकते, तुमची या विषयामधली उत्कंठा जागृत व्हावी व तुम्ही ग्रंथांचा अभ्यास करावा हाच मूळ उद्देश आहे.

कळावे,

**तुमची आई.**

# कर्म - स्थिति, आबाधाकाल व उदयकाल

पत्रांक ३ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २७ जुलै १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.


कर्मबंधाची व त्याच्या उदयाची ही कथा सुरस व चमत्कारिक वाटते व भीतिही वाटते असे तुम्ही म्हणता आहात. अग, भिण्याचे काहीच कारण नाही. ज्याप्रमाणे अंधाऱ्या खोलीत जायला मूल घाबरते, परंतु त्या खोलीमध्ये दिवा लाऊन तिला प्रकाशित केले असता त्या मुलाची भीतिही पळून जाते. तसेच जिनेन्द्र भगवंतांनी आपल्या केवलज्ञानाद्वारे समस्त वस्तुव्यवस्था जाणून जीवादि सहाही द्रव्यांच्या स्वरूपाचे कथन केले आहे. ते आचार्यांनी लिहिलेल्या आगम ग्रंथांद्वारे आपणास उपलब्ध आहे. आगमाच्या प्रकाशात जीवाचे, कर्मांचे, नोकर्म म्हणजे शरीर, मन, वाणी इत्यादिंचे स्वरूप, त्यांचा एकमेकांशी येणारा संबंध, परस्पर निमित्त नैमित्तिकपणा, त्यांच्या विविध अवस्था आपणास स्पष्टपणे लक्षात येऊ लागताच स्वतःच्या भिन्न चैतन्यमय अस्तित्वाचे भान आपणास होते व कर्मासंबंधीची आपली भीति नाहीशी होते.

कर्मांचा बंध व उदय निरंतर चालू असतो - जागृत अवस्थेमध्ये, झोपेत, बेशुध्दावस्थेत, एवढेच काय विग्रहगतिमध्ये देखील चालू रहातो असे समजल्यानंतर प्रश्न उठतो की विग्रहगति म्हणजे काय? मनुष्यगति, तिर्यंचगति, देवगति व नरकगति या चार गति व त्यांचा अभाव करून प्राप्त झालेली सिध्दगति तर सर्वांना ठाऊक आहे. मग ही कोठली नवी गति?


विग्रह म्हणजे देह, मरणानंतर नवीन देह धारण करण्यासाठी जीव परभवाकडे जे गमन करतो त्यास 'विग्रहगति' म्हणतात. विग्रह शब्दाचा दुसरा अर्थ होतो रोकणे - विरोध करणे. या विग्रहगतिमध्ये कर्मांचे ग्रहण व बंध होत असला तरी नोकर्मपुद्‌गलांचे म्हणजे शरीर, मन, वाणी संबंधीचे नोकर्मवर्गणांचे ग्रहण होत नाही त्यांचा निरोध होतो, त्यामुळे तिला विग्रहगति असे नाव पडले आहे.

आता विषय निघालाच आहे तर याबद्दल अधिक माहिती सांगते. यासंबंधी तत्त्वार्थसूत्र ग्रंथातील अध्याय २, सूत्र २५, २६, २७, २८, २९ व ३० यांच्यावरील 'अर्थप्रकाशिका' या टीकेमधून हा संदर्भ लिहीत आहे.

मरण झाल्यानंतर नवीन शरीर धारण करण्यासाठी जीव गमन करतो, त्याकाळी आकाशाच्या प्रदेशांच्या श्रेणीरूप पंक्तीमध्येच म्हणजे सरळ रेषेत गमन करतो. हे गमन ऊर्ध्व म्हणजे वरच्या दिशेस, अधो म्हणजे खालच्या दिशेस अथवा तिर्यक् म्हणजे आडव्या दिशेस म्हणजेच पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर दिशेस होते, परंतु तिरके म्हणजे विदिशांमध्ये म्हणजे आग्नेय, नैऋत्य, वायव्य, ईशान्य या उपदिशांमध्ये गमन होत नाही. चार मुख्य दिशांना गमन होऊ शकते. जसे बुध्दिबळातला हत्ती उभा किंवा आडवा सरळ चाल करतो परंतु उंटाप्रमाणे तिरका जात नाही. दुसरे एक उदाहरण पाहू—उभ्या व आडव्या धाग्यांनी बनलेला रुमाल पहा. त्यावर परस्पर विरुध्द कोनांपैकी एकीकडून दुसरीकडे जायचे झाले तर प्रथम धागा उभा पकडून सरळ जावे लागेल, नंतर ९० अंशात वळून पुन्हा सरळ गेले असता इच्छित पॉईंटवर जाता येईल. [ आकृती नं. १ ]



आकृती नं. १



आकृती नं. २

हे तर एका पातळीवर झाले. लोकाकाश तर घनस्वरूप आहे त्यामुळे वर किंवा खालीही जावे लागेल. त्यासाठी दोन वळणं (मोड) Turns घेणे आवश्यक आहे. चौरस ठोकळ्याप्रमाणे जर लोकाकाश असते तर अधिकाधिक दोन वळणं (मोड) घेऊन कोठेही गमन होऊ शकले असते. (आकृती नं.२) परंतु

लोकाकाशाचा आकार तर तुम्हाला माहीतच आहे. त्याचा पूर्व पश्चिम विस्तार वरपासून खालपर्यंत असमान आहे त्यामुळे टोकाकडच्या भागातून प्रथम मधल्या एक राजूच्या भागात यावे लागेल व वर गमन करून पुन्हा आवश्यकता असेल तर मोड घ्यावा लागेल व नंतर अजून एक वळण (मोड) घेऊन परभवासंबंधीच्या ठिकाणी पोहोचता येईल.

मरणानंतर संसारी जीवांचे परभव धारण करण्यासाठी हे जे गमन मोडसहित आहे त्यास विग्रहगति म्हणतात. कारण विग्रह म्हणजे मोडसहित असाही अर्थ होतो. यामध्ये बाणाप्रमाणे सरळ गति एका समयाची आहे तिला 'इषुगति' किंवा 'ऋजुगति' म्हणतात. एक मोड असेल तर त्यास दोन समय लागतात, त्यास 'पाणिमुक्ता' गति असे म्हणतात. ज्यामध्ये दोन मोड असतील त्या 'लांगलिका' गतिस तीन समय लागतात. लांगल म्हणजे नांगर. नांगराप्रमाणे यात दोन मोड असतात. तीन मोड असलेल्या 'गोमुत्रिका' गतिमध्ये चार समय लागतात. यापेक्षा अधिक काळ दुसऱ्या भवात जाण्यासाठी लागत नाही.

विग्रहगतिच्या या पहिल्या समयापासूनच नूतन आयुचा उदय प्रारंभ होतो. असे कधीच होत नाही की मेल्यानंतर दुसरा जन्म धारण करण्यापूर्वी आत्मा इतस्तत: भटकत राहिला आहे अथवा मरणानंतर घरातच अवतिभवति घुटमळत राहिला आहे.

पहा आपल्याला देशदेशांतरात फिरायला जायचे असेल तर कित्ती तरी विवंचना असतात - तिकिटं मिळाली पाहिजेत, व्हिसा, रहाण्याची जागा, पर्यटन स्थळांची माहिती, पैशाची सोय, खाण्यापिण्याची चिंता, चोरांचे भय—एक ना दोन, हजार भानगडी! परंतु जर एखाद्या जीवाला भवभवांतरामध्ये भटकायचे असेल तर त्याला घाबरण्याची काहीच जरूरी नाही. पहिल्या भवातच त्याचे पुढील भवाचे बुकिंग तयार असते. कोणता भव मिळणार, इंद्रियं किती, शरीर कसे, संयोग काय सर्व काही निश्चित होत असते. परंतु जर का या कर्मबंधनांचे व भवभ्रमणाचे भय वाटत असेल तर भवाचा अभाव करण्याचा विधि त्याला जिनागमाद्वारे शिकावा लागेल.

ज्यामध्ये मोड म्हणजे वळण (विग्रह) नाही त्यास अविग्रहगति म्हणतात. तिचा काल एक समयाचा आहे

त्यालाच ऋजुगति असेही नाव आहे. एकं समयामध्ये जीव अधिकाधिक चौदा राजू गमन करू शकतो. लोकाकाशाच्या खालच्या भागापासून वरच्या भागापर्यंतचे अंतर चौदा राजू आहे. एक पुद्‌गल परमाणुदेखील या प्रचंड वेगाने जाऊ शकतो. विग्रहगतिमध्ये एका दिशेने सरळ जाण्यासाठी एक समय लागतो. मग भले ते अंतर हातभर असो की चौदा राजू असो. पुद्‌गल सुध्दा अत्यंत मंद वेगाने एका समयात एक प्रदेश गमन करतो व अत्यंत जलद वेगाने एका समयात चौदा राजू गमन करतो.

आता विग्रहगतिमध्ये आहारक, अनाहारक यांचा काय नियम आहे ते पाहूया. ही माहिती पुढे आपण 'मार्गणा' शिकू त्यावेळी उपयोगी पडणार आहे.

तुम्ही म्हणाल - 'विग्रहगतिमध्ये तर शरीर नसते मग जीव आहार म्हणजे भोजन कसे काय बरे करत असेल?' अगं, आहार शब्दाचे अनेक अर्थ आहेत व आहारदेखील अनेक प्रकारचा आहे. आहार म्हणजे भोजन, आहार म्हणजे ग्रहण, आहार नावाची संज्ञा देखील आहे, आहार नावाची मार्गणा आहे, आहार नावाची वर्गणा आहे, आहार नावाची पर्याप्ति आहे.

आहार सहा प्रकारचा सांगितला आहे. मनुष्य व तिर्यंच तोंडाने भोजन ग्रहण करतात तो कवलाहार, हा एक प्रकार झाला. कर्मआहार, नोकर्मआहार, लेपआहार, ओजआहार, कवलाहार व मानसिकआहार असे आहाराचे एकूण सहा प्रकार आहेत. तुम्ही म्हणाल 'कोणी पैसे खातात तर कोणी शिव्या खातात हा कसला आहार?' आपण राजनीतिबद्दल थोडेच बोलत आहोत? असो.

आपण यापूर्वी पाहिले होते की कर्माचे ग्रहण हा जीव दरसमयाला करतच आला आहे. जोपर्यंत योग आहे अशा सयोगकेवली गुणस्थान या अरहंतदशेपर्यंत कर्मांचे ग्रहण म्हणजे कर्मआहार सतत चालू रहातो. अनादिपासून एक समयदेखील त्यात खंड पडत नाही.

परंतु शरीर, मन, वाणी वगैरे संबंधीचे पुद्‌गल परमाणु ग्रहण करणे यास 'नोकर्म आहार' म्हणतात. औदारिक, वैक्रियिक, आहारक ही तीन शरीरं तसेच सहा पर्याप्ति यांना योग्य अशा पुद्‌गल परमाणुंचे ग्रहण करणे यास आहार म्हणतात व असा

आहार करणाऱ्या जीवास आहारक म्हणतात. आहारपर्याप्ति, शरीरपर्याप्ति, इंद्रियपर्याप्ति, श्वासोच्छ्वासपर्याप्ति, भाषापर्याप्ति व मनपर्याप्ति अशा एकूण सहा पर्याप्ति आहेत. या विषयी सविस्तर माहिती पुढे येणारच आहे. असे ग्रहण ऋजुगतिवाल्यांना त्याच समयात होते त्यामुळे विग्रहगतिमध्ये देखील तो जीव आहारक रहातो. मरणानंतर एका समयात नव्या ठिकाणी पोहोचून शरीरासंबंधी परमाणुंचे ग्रहण तो करतो.

परंतु जो जीव एक वळण (मोड) घेऊन परभवाकडे जातो तो पहिल्या एका समयात अनाहारक असतो व दुसऱ्या समयात आहारक होतो. अनाहारक अवस्थेत नोकर्मआहार नसला तरी कर्मग्रहणरूप कर्मआहार चालूच असतो. दोन वळणं घेऊन पोहोचणारा विग्रहगतिवाला जीव दोन समय अनाहारक रहातो. तीन मोडवाला जीव तीन समय अनाहारक रहातो.

हा नोकर्मआहार ग्रहण करून जीव नवे शरीर धारण करतो, शरीर निर्माण होते त्यास जन्म म्हणतात. हॉस्पिटलमध्ये प्रसूति झाल्यावर बाळ जन्माला आले असे आपण म्हणतो, पण ती लौकिक भाषा आहे.

पहा बरं, एखादा जीव मेला असे आपण म्हणतो त्यावेळी नक्की काय होतं? जुन्या शरीराचे सर्व पुद्‌गल परमाणु सोडून जीव इतरत्र पराभवाकडे गमन करतो. जाताना शरीर, बायकामुले, जमीनजुमला, मित्रपरिवार, ऐश्वर्य, हुद्दा-अधिकार सर्व काही जेथल्या तेथे ठेऊन निघून जातो. तुम्ही विचाराल, 'काहीतरी घेऊन जात असेल ना?' हां हां, वरील सर्व गोष्टींसंबंधी मोह, राग, द्वेष करून उपार्जित केलेले - गोळा केलेले - सर्व कर्म सोबत घेऊन जातो. हे प्राप्त शरीर सोडून देऊन कार्माणशरीर व तेजसशरीर या दोन शरीरांसह जीव विग्रहगतिमध्ये जातो. विग्रहगतिच्या पहिल्याच समयापासून नव्या आयुचा उदय प्रारंभ होतो व जेवढी आयु बांधली असेल तेवढ्या काळापर्यंत दरसमयाला आयुकर्माचे परमाणु उदयास येत रहातात.


जरा शांतीने विचार केल्यास लक्षात येईल की मूल जन्मल्यावर हर्ष व कोणी मेल्यावर शोक आपण का बरं करतो? मरणाऱ्यासाठी शोक करतो, की आपल्या संयोगातली इष्टता संपली म्हणून शोक करतो, की इतर लोकांना काय वाटेल म्हणून

प्रदर्शनासाठी शोक करतो? या कषायांची निरर्थकता नाही का लक्षात येत? हां, कषाय देखील सार्थक आहेत परंतु केवळ कर्मबंधन करण्यातच ते सार्थक आहेत. वर्तमानकाळामध्ये असे शोकादि संक्लेश परिणाम करून जी कर्म बांधली जातात, त्यांच्या उदयामुळे पुन्हा तसेच प्रसंग भविष्यकाळी प्राप्त होतात.

दर समयाला नवीन कर्मांचा बंध होतो व स्थिति पूर्ण झाल्यावर ती सर्व एकदम उदयाला येतात असा जर तुमचा अंदाज असेल तर तो सपशेल चुकीचा आहे. उदाहरणार्थ - एखाद्याने १००० कर्मपरमाणु बांधले व त्याची १०० वर्षांची स्थिति असेल तर १०० वर्ष पूर्ण झाल्यावर १००० परमाणु एकदम एका समयात निघून जात असतील अशी कल्पना चुकीची आहे.

तर मग खरी गोष्ट काय आहे हा प्रश्न तुम्ही विचाराल. बंध झाल्यानंतर हे कर्मपरमाणु सत्तेमध्ये पडून रहातात, विशिष्ट काळापर्यंत उदयाला येत नाहीत त्यास 'आबाधाकाल' असे म्हणतात. आबाधाकाल संपताच त्या विशिष्ट कर्माचा उदयकाल प्रारंभ होतो. काही परमाणु पहिल्या समयात उदय होऊन ते निघून जातात. या खिरणाऱ्या परमाणुंच्या समूहाला 'निषेक' असे म्हणतात. दुसऱ्या समयात देखील एक निषेक निघून जातो - खिरून जातो - उदयास येतो. परंतु या निषेकातील परमाणु पहिल्या निषेकातील परमाणुंपेक्षा कमी असतात. तिसऱ्या समयात उदय होणाऱ्या निषेकात त्याहूनही कमी परमाणु असतात. अशाप्रकारे उत्तरोत्तर हीन प्रमाणात ही निषेकांची मांडणी - निषेकरचना होते. कर्माची जेवढी स्थिति बांधलेली असते त्या स्थितिच्या अंतसमयापर्यंत दर समयाला हे निषेक उदयाला येत राहातात.

आयुशिवाय इतर सात कर्मांची स्थिति



आयुव्यतिरिक्त इतर सात कर्मांच्या बाबतीत कर्मांच्या स्थितिमधून आबाधाकाल वजा जाता जो काळ उरतो तो उदयकाल आहे. उदयकालामध्ये प्रत्येक समयाला त्या विशिष्ट एका समयात बांधलेल्या कर्मांचा उदय सतत होत रहातो.

हे अजबच आहे नाही का? एका समयात जीवाने केलेल्या मोह, राग, द्वेष परिणामांच्या निमित्ताने बांधली गेलेली कर्म - अनंत परमाणु - त्यांचा उदय सतत शेकडो - हजारो - लाखो - सागरो वर्षांपर्यंत सतत होत रहातो. ही तर एका समयात बांधलेल्या कर्मांची गोष्ट झाली, अशी कर्म आपण दर समयात बांधत असतो त्यामुळे त्या त्या कर्मांचादेखील उदयकाल वर्षानुवर्षे चालतो.


वेगवेगळ्या वेळी बांधलेल्या ज्या ज्या कर्मांचा उदयकाल **(Maturity)** चालू असेल त्या त्या सर्व उदयांचे एकत्रित फळ आपणास मिळत रहाते. यातून आयुकर्माला आपण वगळले होते कारण आयुकर्माची जेवढी स्थिति असेल तेवढाच त्याचा उदयकाल असतो.

उदाहरणार्थ - एका माणसाने ६०व्या वर्षी पुढील भवाची १०,००० वर्षांची नरकायु बांधली. त्या माणसाचे सध्याचे आयुष्य ९० वर्षांचे आहे. चालू आयुला 'भुज्यमान' व नव्याने बांधलेल्या आयुला 'बध्यमान' आयु म्हणतात, हे पूर्वी सांगितले होते. ६०व्या वर्षांपासून ९० वर्षांपर्यंत भुज्यमान आयुचा उदय चालू रहातो. या आयुकर्माचा शेवटचा निषेक खिरताक्षणीच मरण होते व पुढच्याच समयाला विग्रहगतिपासूनच नव्या आयुकर्माचा उदयकाल प्रारंभ होतो. त्या जीवाने १०,००० वर्षांची नरकायु बांधली असेल तर सतत १०,००० वर्षांपर्यंत त्याच्या आयुचे निषेक खिरत रहातात.

यात प्रश्न असा पडतो की बध्यमान आयुमध्ये आबाधाकाल नसतो का? असतो, नवी आयु बांधल्यापासून वर्तमान आयु संपेपर्यंतचा जो काळ आहे तो नव्या आयुचा आबाधाकाल आहे. वरील उदाहरणामध्ये ९० वर्षांच्या आयुष्यवाल्या माणसाने ६०व्या वर्षी नवी नरकायु बांधली त्यामुळे ३० वर्ष हा नरकायुचा आबाधाकाल आहे कारण एका वेळी वर्तमान आयुचाच उदय

होऊ शकतो.

आयुकर्माची स्थिति = उदयकाल




विग्रहगतिच्या पहिल्या समयापासून नरकायुचा उदय चालू होतो. मरणापूर्वी ज्याला आपण मनुष्य म्हणत होतो तोच जीव आता नारकी म्हणून संबोधला जातो. हा उदय सतत १०,००० वर्ष चालू रहातो.

जीव एका वेळी भविष्यातल्या एकाच भवाची आयु बांधतो. पुढचा भव संपत आल्यानंतर त्यापुढच्या भवाची आयु बांधतो. सात कर्मांचा बंध निरंतर होतो पण आयुकर्माचा बंध कधी कधी होतो हे पूर्वी तुम्हाला सांगितले होते. त्याचे उदाहरण घेऊन समजावते.

वर्तमान - भुज्यमान आयुचे त्रिभाग करायचे म्हणजेच ३ भाग करायचे. त्यातील २ भाग आयु भोगल्यावर म्हणजे अंतिम भाग बाकी राहिला असता जो एक अंतर्मुहूर्ताचा काळ आहे, त्यावेळी नव्या आयुकर्माचा बंध होण्याची शक्यता असते. त्या काळास 'अपकर्ष' म्हणतात. त्यावेळी जर आयुबंध झाला नाही तर उरलेल्या आयुचा २/३ काळ संपल्यावर २रा अपकर्ष काळ येतो, त्याही वेळी आयु बांधली नाही तर ३रा अपकर्ष काळ असे अधिकाधिक ८ अपकर्ष येतात. या आठही वेळेस आयु बांधली गेली नाही तर मरणाच्या आधी अंतर्मुहूर्त काळात पुढील आयु बांधली जाते.

आयु बांधणे म्हणजे पुढील ज्या भवात जाणार आहे त्या आयुकर्माचे परमाणु येऊन त्यांचा बंध होणे. एक अंतर्मुहूर्त काळात एवढया साऱ्या परमाणुंचे ग्रहण होते. काही जीवांना एका अपकर्ष काळात बंध होतो, काहींना २ अपकर्ष काळात मिळून तर काहींना ३, ४, ५, ६, ७ किंवा ८ ही अपकर्षात मिळून हा आयुबंध होऊ शकतो पण अशा जीवांचे हे प्रमाण उत्तरोत्तर कमी असते.

६५६१ वर्ष आयु असलेल्या कर्मभूमीच्या मनुष्याचे ८ अपकर्ष कधी कधी येतील ते पाहूया. ही आयु जन्मापासून नव्हे पण गर्भापासून मोजावी लागेल, त्याहूनही अधिक सूक्ष्मतेने विचार केल्यास या मनुष्यायुची सुरुवात विग्रहगतिच्या १ल्या समयापासून झाली होती तेव्हापासून ही गणना करावी लागेल.

१ला अपकर्ष ६५६१ चा २/३ हिस्सा अर्थात ४३७४ वर्ष संपल्यावर व २१८७ वर्ष बाकी राहिली असता येतो तसेच

२रा अपकर्ष - ७२९ वर्ष बाकी राहिली असता,

३रा अपकर्ष - २४३ वर्ष बाकी राहिली असता,

४था अपकर्ष - ८१ वर्ष बाकी राहिली असता,

५वा अपकर्ष - २७ वर्ष बाकी राहिली असता,

६वा अपकर्ष - ९ वर्ष बाकी राहिली असता,

७वा अपकर्ष - ३ वर्ष बाकी राहिली असता,

८वा अपकर्ष - १ वर्ष बाकी राहिले असता,

कर्मभूमीच्या मनुष्याच्या व तिर्यंचाच्या पूर्ण आयुचे हे त्रिभाग पडतात. परंतु भोगभूमीच्या मनुष्य व तिर्यंचांची आयु ९ महिने बाकी उरली असता उरलेल्या ९ महिन्यांचे त्रिभाग पडतात व त्यामध्ये ८ अपकर्ष काळ होतात. देव व नारकी यांची ६ महिने आयु शेष राहिली असता आयुबंधास प्रारंभ होतो व त्यामध्ये त्रिभाग पडतात.

त्यामुळे अनेकजणं एकमेकांना उपदेश देतात की परिणाम चांगले ठेवा. आयुबंध कधी होईल याचा काय नेम? परंतु चांगल्या आयुच्या नादात मिथ्यात्व व रागद्वेष यांना कोणी लक्षातच घेत नाहीत. आयु हे सुखदु:खाचे कारण नसून मोह, राग, द्वेषच दु:खाचे मूळ आहे व त्यायोगे आठही कर्म बांधली जातात व बंध—उदयाचे हे चक्र अनादिपासून अनंतकाळापर्यंत चालूच रहाते.

किती स्थिति असताना किती आबाधाकाल असतो याचे प्रमाण आहे - १ कोडाकोडी सागर वर्षांची स्थिति असलेल्या

कर्मांमध्ये १०० वर्ष आबाधाकाल असतो. कोडाकोडीचा अर्थ आहे एक करोड गुणिले एक करोड. एक करोडमध्ये एकावर ७ शून्य असतात, कोडाकोडीमध्ये एकावर १४ शून्य असतात. एवढी सागर वर्ष अर्थात १ सागर वर्ष, २ सागर वर्ष, ३ सागर वर्ष असे मोजत मोजत १ कोडाकोडी वेळा सागर वर्ष होतील एवढी स्थिति. आयुकर्म सोडून इतर सात कर्मांमध्ये आबाधाकालाचे हे प्रमाण आहे.

हे तर काहीच नाही. तीव्र मिथ्यात्वापोटी जीव अधिकाधिक स्थितिवाले मिथ्यात्व (दर्शनमोहनीय) कर्म बांधतो तेव्हा त्याची ती उत्कृष्ट स्थिति ७० कोडाकोडीसागर वर्षांची पडते. ७००० वर्षांनी त्याचा उदयकाल प्रारंभ होतो म्हणजेच त्याचा आबाधाकाल ७००० वर्षांचा असतो व त्यानंतर सतत ७० कोडाकोडीसागर मधील उरलेल्या वर्षांपर्यंत दर समयाला त्या कर्मांचा उदय चालूच रहातो. एका समयाच्या मिथ्यात्व परिणामाचा हा प्रताप आहे, तर अनेक समयांमध्ये बांधलेल्या दर्शनमोहनीय कर्मांचे एकत्रित फळ कसे असेल याची कल्पनाच न करणे बरे.

सागर म्हणजे काय ते ऐकायची तयारी आहे? तुमचा महासंगणक आणलात तरी हे गणित समजणार नाही. थोडीशी झलक पहाच. यात सुध्दा अनेक बारकावे आहेत मी फक्त स्थूल कथनच करणार आहे.

१ योजन व्यासाचा व १ योजन खोल असा एक गोल खड्डा खणा. हे सारे कल्पनेतच करायचे बरं का! ४ कोसांचा १ योजन होतो. हा आपला साधा कोस किंवा योजन नाही, महायोजन आहे. हा खड्डा अति मुलायम अशा रोमखंडांनी ठासून भरावा, शिगोशिग भरू नये. रोमखंडाचा अर्थ आहे उत्तम भोगभूमीत जन्मलेल्या पहिल्या ७ दिवसांच्या मेंढयाचे जे केस आहेत त्या केसांचा अग्रभाग की ज्याचा दुसरा तुकडा होणार नाही. भोगभूमीच्या केसाचा अग्रभाग आपल्या कर्मभूमीच्या केसाच्या ४०९६व्या भागाएवढा पातळ असतो.

ही रोमांची संख्या काढण्याचे गणित आहे पण ते आपण वगळूया. ४५ अंक प्रमाण येवढी ही संख्या आहे. दर १००

वर्षांनी त्यातील एक रोमखंड काढत काढत जेव्हा हा खड्डा पूर्ण रिकामा होईल तेवढया कालावधीस एक व्यवहारपल्य म्हणतात. पल्य म्हणजे खड्डा-गर्त. याची उपमा देऊन हे प्रमाण समजाविले आहे म्हणून पल्य, सागर वगैरे हे उपमामानाचे प्रकार आहेत.

व्यवहार पल्याच्या रोमखंडांच्या प्रमाणास असंख्यात करोड वर्षांच्या समयांनी गुणले असता उद्धारपल्याचे रोमखंड होतात व त्यास असंख्यात वर्षांच्या समयांनी गुणले असता अद्धापल्याचे रोमखंड होतात. प्रत्येक पल्यास १० कोडाकोडीने गुणले असता त्या त्या नावाच्या सागराचे प्रमाण येते.

थोडक्यात म्हणजे

| | | |
|---|---|---|
| असंख्यात व्यवहार पल्य | = | १ उद्धार पल्य |
| असंख्यात उद्धार पल्य | = | १ अद्धापल्य |
| १० कोडाकोडी व्यवहार पल्य | = | १ व्यवहार सागर |
| १० कोडाकोडी उद्धार पल्य | = | १ उद्धार सागर |
| १० कोडाकोडी अद्धा पल्य | = | १ अद्धा सागर. |

अशा या अद्धासागर वर्षांमध्ये कर्माची स्थिति मोजली जाते. सागर म्हणजे लवण समुद्राची उपमा यास दिली आहे. देव व नारकी यांचे आयुष्य सागरो वर्षांचे असते, अधिकाधिक आयुष्य ३३ सागर वर्षांचे असते. मनुष्य व तिर्यंचांचे उत्कृष्ट आयुष्य भोगभूमीतल्या जीवांचे ३ पल्य एवढे असते.

त्यामानाने आपला हा मनुष्यभव किती अल्प आहे, नाही का? त्याचा १-१ समय मूल्यवान आहे. अनादिकाळापासून या जीवाने अनंत भव धारण केले पण स्वत:ला ओळखण्याचे कार्य केले नाही, राहून गेले. ते कार्य या भवातच करावयाचे आहे, नाहीतर अजून अनंत काळ भटकण्याची व चतुर्गतिमध्ये भरकटण्याची तयारी ठेवावी लागेल.

आत्ता पुण्य करू व स्वर्गात जाऊ म्हणजे तेथून तीर्थंकरांच्या समवशरणात जाता येईल असे म्हणणाऱ्यांचे कौतुक वाटते. जो जीव सध्याच्या फालतू संयोगांवरील लक्ष सोडून शास्त्राभ्यास करून पुरुषार्थ करत नाही, तो काय स्वर्गातल्या ऐश्वर्याला

सोडून त्यामागे लागणार आहे? काहीजणं विदेहक्षेत्रात जन्मण्याची स्वप्नं बघतात. ज्याला पुढच्या एका भवाची वांछा आहे त्याच्या अभिप्रायामध्ये अनंत भव करण्याची इच्छा दडून बसली आहे.

पंचमकाळातला भरतक्षेत्रातला जीव सम्यक्त्वासहित विदेह क्षेत्रात जन्मणार नाही, १ला नरक, देव, भोगभूमीचा मनुष्य किंवा तिर्यंच यांमध्ये त्याचा जन्म होईल. हां, मिथ्यात्व अवस्थेत मरून विदेहक्षेत्रातला मनुष्य होऊ शकेल परंतु तेही दुर्मिळच. याचा अर्थ असा की तो जीव या भवात मिथ्यात्वीच राहू इच्छितो.

हा जीव अनादिकाळापासून आजपर्यंत अनंतवेळा तीर्थंकरांच्या समवशरणात जाऊन आला आहे, अनंत वेळा बाह्य मुनिपद धारण करून सम्यक्त्वाच्या अभावाने अजूनही भवभ्रमणच करीत आहे.

सम्यक्त्वप्राप्तीची सर्व साधने - संज्ञी पंचेंद्रियपणा, ज्ञानाचा उघाड, कषायांची मंदता, जिनेन्द्रकथित सत्य उपदेश, या उपदेशाचे मर्म सांगणाऱ्या ज्ञानी जीवांचा सत्समागम वगैरे सारे काही मिळाले असतानाही जो भविष्याचे वायदे करतो त्याचा 'उद्या' कधीच उजाडत नाही. कायमसाठी हे कार्य पुढच्या भवासाठीच हा राखू इच्छितो.

असो, सागरामध्ये नव्हे पण सागराच्या विषयावरून आपण कोठल्या कोठे वहावत गेलो नाही का? परंतु भवसागरात मात्र वाहून न जाता त्याचा किनारा या भवातच गाठू असा दृढ संकल्प आपण करूया.

कळावे,

**तुमची आई**

या जीवाचे मुख्य कर्तव्य तर आगमज्ञान आहे. ते झाल्याने तत्त्वांचे श्रद्धान होते, तत्त्वांचे श्रद्धान झाल्याने संयमभाव होतो आणि त्या आगमामुळे आत्मज्ञानाची देखील प्राप्ति होते. त्यानंतर सहजच मोक्षाची प्राप्ति होते.

**मोक्षमार्गप्रकाशक**

# नोकर्म - बंध, स्थिति, उदय

पत्रांक ४ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २८ जुलै १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

सागराचे ग्राप व कर्मांचे गणित वाचून कंटाळा आला की काय? एखाद्याचा करोडो रुपयांचा व्यवहार रोज होत असेल तर त्याला कसा उत्साह वाटत असेल, ते ऐकणाराही विस्मयाने उल्हसित होतो. तुम्हाला करोडो व अब्जो या आकड्यांचेच एवढे आकर्षण असेल तर जिनागमाचा अभ्यास करा येथे तर साऱ्या गोष्टी असंख्यात, अनंत, पल्य, सागर इत्यादिमध्येच मोजल्या जातात. येथे तर अनंतामध्ये उलाढाल चालते.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे 'मला समजत नाही' असा किन्तुदेखील मनात आणू नका - असा विचारही करू नका. 'मला समजलं नाही' हे कोणाला समजले? तुम्हाला की शेजाऱ्याला? हे ज्याला समजले तोच तू स्वत: आहेस. आगमज्ञानदेखील समजेल; का नाही समजणार?

मी तर केवलज्ञानशक्तीने परिपूर्ण असा ज्ञानाचा घनपिंड आहे व त्यातून सादिअनंतकाळपर्यंत केवलज्ञानाच्या पर्याय निघणार आहेत. तरीदेखील मी ध्रुव तसाच्या तसा अनादिअनंत विराजमान आहे व रहाणार आहे हे लक्षात घेताच त्यापुढे या अल्पश्रुतज्ञानाची काय कथा? आपल्या स्वभावाचाच इन्कार करू नका. श्रुतज्ञानाची ही पर्याय देखील आपल्या ज्ञानस्वभावातूनच निघते - शास्त्र वाचनातून - शब्दातून ती निघत नाही. कारण जी पर्याय ज्या द्रव्याची आहे ते द्रव्यच त्याचा कर्ता आहे.

कर्माचे परमाणु किती येतात व किती प्रमाणात ते कसे उदयास येतात हा मोठा मनोरंजक विषय आहे. कर्मामध्ये जशी ही निषेकरचना होते, तद्वत शरीराच्या म्हणजे नोकर्माच्या बाबतीतही अशीच निषेकरचना होत असते.

आपण हे पाहिलेच होते की कोणी जीव मरून दुसऱ्या भवात जातो त्यावेळी विग्रहगतिमध्ये त्याला कार्माण व तेजस

शरीर असते. विग्रहगतिचा काळ अधिकाधिक ४ समयांचा असतो. त्यातला ऋजुगतिवाला जीव त्याच समयात आहार (नोकर्म आहार) ग्रहण करतो अर्थात शरीरासंबंधी अनंत पुद्‌गल परमाणुंना ग्रहण करतो. पाणिमुक्ता (१ मोड) वाले जीव पहिल्या समयात अनाहारक राहून दुसऱ्या समयात आहार ग्रहण करतात, लांगलिका (२ मोड) वाले जीव २ समय अनाहारक राहून तिसऱ्या समयात आहार ग्रहण करतात व गोमुत्रिका (३ मोड) वाले जीव ३ समय अनाहारक राहून चौथ्या समयात आहार ग्रहण करतात.

जीव या नोकर्मवर्गणांना ग्रहण करून त्यांना आपल्या शरीर, मन, वचन, श्वासोच्छ्‌वास इत्यादिरूप परिणमवितो. वर्गणांचे ५ प्रकार तुम्ही पूर्वीच शिकला आहात, आठवते ना? आहारवर्गणा, तेजसवर्गणा, भाषावर्गणा, मनोवर्गणा व कार्माणवर्गणा अशा त्या पाच वर्गणा आहेत. पुद्‌गलाच्या वर्गणा एकूण २३ जातीच्या आहेत. परंतु वरील ५ प्रकारच्या वर्गणाच जीव ग्रहण करतो व सोडतो. त्यापैकी कार्माणवर्गणेपासून कर्म बनते व इतर चार वर्गणांना नोकर्मवर्गणा असे नाव आहे, त्यापासून शरीर, मन, भाषा, श्वासोच्छ्‌वास, तेजस शरीर वगैरे बनते.

अगदी थोडक्यात आपण या वर्गणांबद्दल माहिती पाहूया. शक्तीच्या अंशांना 'अविभाग प्रतिच्छेद' म्हणतात. प्रत्येक परमाणु स्वत:च्या शक्तींनी-अनुभागांनी युक्त आहे, म्हणजेच त्यामध्ये अविभाग प्रतिच्छेद आहेत. म्हणून परमाणुलाच 'वर्ग' असे नाव देतात. ज्या ज्या परमाणुंमध्ये समान अविभाग प्रतिच्छेद आहेत, त्या त्या परमाणुंच्या समूहाला 'वर्गणा' म्हणतात. अर्थात एका विशिष्ट वर्गणेमधील सर्व परमाणुंमध्ये शक्तीचे अंश समान असतात.

ज्या वर्गणा औदारिक (मनुष्य व तिर्यंचांचे शरीर), वैक्रियिक (देव व नारकी यांचे शरीर) व आहारक (आहारक ऋद्धिधारी मुनींचे तीर्थवंदना किंवा समवशरणात गमन करण्यासाठी बनविलेले नवे शरीर) या तीन शरीररूप परिणमित होतात त्यांना आहारवर्गणा म्हणतात. जीव योगाद्वारे या वर्गणांना ग्रहण करून त्यांना शरीररूप परिणमित करतो. जीवाच्या या शक्तीस पर्याप्ति

म्हणतात. पर्याप्ति हा स्वतंत्र विषय आहे त्यावर पुढे चर्चा करूया.

ज्या वर्गणा तेजसशरीर रूपाने परिणमित होतात त्यांना तेजसवर्गणा म्हणतात. हे तेजसशरीर औदारिकादि शरीरांमध्ये कांति उत्पन्न करण्यात निमित्त आहे. ज्या वर्गणा शब्दरूपाने परिणमित होतात त्यांना भाषावर्गणा म्हणतात. ज्या वर्गणांद्वारे द्रव्यमनाची रचना होते त्यांना मनोवर्गणा म्हणतात.

या चार वर्गणांना नोकर्मवर्गणा व त्यांनी बनलेल्या शरीरास नोकर्मशरीर म्हणतात. ज्याप्रमाणे योगाद्वारे म्हणजे आत्म्याच्या परिस्पंदनाने-आत्मप्रदेशांच्या कंपनाने जीव कर्मांना ग्रहण करतो; त्याचप्रमाणे योगाद्वारे हा जीव शरीरादिसंबंधीच्या नोकर्मवर्गणाही ग्रहण करीत असतो, त्यामध्ये नामकर्माचा उदय निमित्तरूप असतो.

जन्मतःच मूल किती छोटे दिसते व वर्षभरात त्याची झपाट्याने वाढ झालेली दिसते. तुम्हाला वाटत असेल की तुम्ही तुमच्या मुलांना खाऊ पिऊ घालून मोठे केलेत, अन्न खाल्यामुळे शरीर टिकून आहे, अन्नाशिवाय कोणी जगू शकत नाही तर तो तुमचा गैरसमज आहे.

विग्रहगति संपताच पहिल्याच समयापासून दर समयी हा जीव अनंत नोकर्मवर्गणांचे पुद्‌गल परमाणु ग्रहण करीत असतो - अगदी शेवटच्या समयापर्यंत म्हणजे मरणाच्या समयीदेखील त्याचे हे ग्रहण चालू असते. अन्न पाण्याचे ग्रहण न करताही जीव वर्षानुवर्षे जगू शकतो. खरे नाही ना वाटत? अरहंत भगवान तर आहार-पाणी घेत नाहीत म्हणजेच त्यांना कवलाहार नसतो व अशा स्थितीत ते करोडो वर्ष जगतात हे कसे बरे? देव व नारकी यांचे आयुष्य अनेक सागर वर्षांचे असते. देवांना जेवढ्या सागर वर्षांचे आयुष्य असते तेवढी हजार वर्ष गेल्यावर त्यांना खाण्याची इच्छा होते त्यावेळी कंठातून अमृत झिरपून ते तृप्त होतात. नारकी देखील सागरों वर्ष अन्नपाण्याशिवाय जगतात.

याचे कारण हेच आहे की हे सर्व जीव दर समयाला नोकर्मवर्गणांचा आहार म्हणजे नोकर्मवर्गणांचे ग्रहण करीत असतात. विग्रहगतिचे १, २ किंवा ३ समय वगळून जन्माच्या

समयापासून मरणापर्यंत दर समयाला जीव नोकर्मआहार ग्रहण करत असतो.

तुम्हाला असे वाटत असेल की मूल मोठे होईपर्यंत नुसते नोकर्माचे ग्रहण होत असेल व त्यानंतर हळू हळू या वर्गणा सुटून जात असतील, तर तसे मुळीच नाही. कार्माणवर्गणांच्या निषेकरचनेप्रमाणे याही नोकर्मास आबाधाकाल असेल अशी शंकाही चुकीची आहे. मग नक्की होते तरी काय? ते आता आपण पाहू.

पहिल्याच समयात ग्रहण केलेल्या नोकर्मवर्गणांपैकी त्याच पहिल्या समयापासून या नोकर्मवर्गणांचे खिरणे-सोडून जाणेही चालू होते. अनंत नोकर्म पुद्‌गलांपैकी त्याच समयात अनेक परमाणु निघून जातात, दुसऱ्या समयात थोडे कमी, तिसऱ्यात थोडे कमी असे उत्तरोत्तर हीन प्रमाणामध्ये होत होत शेवटचे काही परमाणु मरणसमयी निघून जातात. नोकर्मामध्ये ही जी निषेकरचना होते त्यामध्ये आबाधाकाल असत नाही.

विग्रहगतिच्या शेवटच्या समयाला जीव नोकर्मआहार ग्रहण करतो तो त्याचा जन्मसमय असतो, तेव्हापासून आयुकर्माची जेवढी स्थिति असते तेवढीच स्थिति त्या नोकर्माची असते व उदयकालही त्या समयापासून मरणापर्यंत असतो. दुसऱ्या समयात जे अनंत परमाणु जीव ग्रहण करतो त्याची स्थिति उर्वरित आयुएवढी म्हणजे 'आयु - वजा १ समय' एवढी असते. १० वर्ष पूर्ण झाल्यावर त्या समयात जीव जे नोकर्मपुद्‌गल ग्रहण करेल त्याची स्थिति उर्वरित आयुएवढी असेल.

उदाहरणार्थ, ज्याचे ६० वर्षांचे आयुष्य असेल असा जीव १० वर्ष संपताच त्या समयाला जे नोकर्म पुद्‌गल ग्रहण करेल त्याची स्थिति ५० वर्षांची असेल व त्याचा उदय त्या समयापासून मरणाच्या म्हणजे अंतिम समयापर्यंत असेल. 'उर्वरित आयु' साठी 'गलितावशेष आयु' असा शब्द वापरण्यात येतो.

प्रत्येक समयाला जीव अनंत परमाणु ग्रहण करतो व अनंत परमाणु सोडतो, कारण वेगवेगळ्या प्रत्येक समयात बांधलेल्या नोकर्मांचा उदयकाल असल्याने त्यांची एकत्रित बेरीज केली

असता अनंतच भरते. हे मात्र नक्की आहे की ह्या नोकर्म वर्गणांच्या ग्रहणाचा समय वेगवेगळा असला तरी त्या प्रत्येकाची अंतिम मर्यादा एकच आहे ती म्हणजे आयुची मर्यादा होय. जेवढी आयु आहे म्हणजेच मरणाचा जो समय आहे तेवढीच सर्व नोकर्मांची अंतिम स्थिति आहे, त्याच समयाला सर्वच्या सर्व नोकर्मांचा उदय होऊन जीव व नोकर्म एकमेकांपासून वेगळे होतात व जीव नोकर्माला सोडून परभवाकडे गमन करतो.

याचा अर्थ लक्षात येतो का तुमच्या? की आयुची स्थिति निश्चित आहे त्यात एका समयाचीदेखील वृध्दि होत नाही, नोकर्म म्हणजेच या शरीराची स्थितिसुध्दा निश्चितच आहे. अंतिम समयापेक्षा एक समयदेखील अधिक ते जीवाच्या संयोगात राहूच शकत नाही. जीवच त्याला सोडून इतरत्र गमन करतो. त्यामध्ये डॉक्टर, वैद्य, मंत्र, तंत्र, हॉस्पिटल, रेस्पिरेटर, ओपनहार्टसर्जरी, इंद्र, नरेन्द्र, जिनेन्द्र, काहीही करू शकत नाहीत. अनेक लोक मरणाच्या भीतीने कुदेवादिकांच्या नादी लागून गृहित मिथ्यात्वाचे तीव्र पाप मात्र बांधून घेतात, तर कोणी दुसऱ्याला मरणाच्या दाढेतून खेचून मी वाचविले असा मिथ्याभिमान करतात. कोणी कोणाला मारू शकत नाही व कोणी कोणाला मरणापासून वाचवू शकत नाही; कारण कोणी दुसऱ्याला वा स्वत:ला आयुकर्म वाढवून देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे नोकर्माची स्थितिदेखील कमी किंवा अधिक करू शकत नाही. या जीवाला सर्वाधिक आकुलता-व्याकुलता स्वत:च्या किंवा नातलगाच्या मरणाच्या आशंकेनेच होत असते.

नोकर्माचे हे ग्रहण करणे व सोडणे आपल्या ज्ञानात येताच हेही कळते की शरीरातील प्रत्येक परमाणुची स्थिति निश्चित आहे. दर समयाला शरीराचे अनंत परमाणु नव्याने येतात व अनंत परमाणु सुटून निघून जातात. वैद्यक शास्त्राप्रमाणे देखील Regeneration व Degeneration सतत चालू असते.

स्वत:चे भिन्न अस्तित्व न ओळखता या नोकर्मरूप पुद्‍गलालाच 'मी' असे मानल्याने जीवाची दुर्दशा होत राहिली आहे. आपल्या प्रत्येकाची अनादिपासूनच्या प्रत्येक भवात हीच दुर्दैवी कहाणी वारंवार होत राहिली आहे. ऐकायची आहे ही

करुण कहाणी?

हा जीव कोठून तरी मरून इकडे आला, येताना आणली त्याने दोन शरीरं-एक कार्माण व एक तेजस. हे दोन्ही जीवाचे चांगलेच घनिष्ट सोबती आहेत. लाखो करोडो वर्षांपासून जीवाच्या संगतीत ते रहात आहेत. येथे जन्म घेताच जीवाला मिळाले आणखी एक शरीर, त्याचे नाव औदारिक शरीर. हा तर जीवाचा एकाच भवाचा साथीदार आहे. जन्मापासून मरणापर्यंतच फक्त साथ देतो.

कार्माण आणि तेजस शरीर तर जीवाला कधी दिसतच नाहीत, त्याच्या पहाण्यात तर हे औदारिक शरीरच आले. जीवाने स्वत:लाही कधी जाणले नव्हते, ओळखले नव्हते, स्वत:चे स्वरूपही कधी ऐकले नव्हते. साहजिकच या औदारिक शरीरालाच या जीवाने 'हा मी आहे' असे मानले. यालाच जीवाने आपले सर्वस्व दिले, यालाच 'स्व' मानले. जीवाने याच्यासाठी काय काय नाही केले?

आहारवर्गणेपासून बनलेल्या या पुद्‌गल परमाणुच्या राशीला जीवाने आपल्या मूर्खपणाने 'आत्मा' म्हणजे 'मी' असे मानले व या काल्पनिक स्वसाठी खराखुरा स्व आपले अस्तित्व गमावून-विसरून गुलामी करू लागला. रात्रंदिवस याची सेवाचाकरी, खाऊ पिऊ घालणे, न्हायला घालणे, सजवणे, रंगरंगोटी करणे, रोगादि झाले असता घाबरणे, त्याच्याच चिंतेत व्यग्र रहाणे आणि याला सोडून अन्य भवात जाण्याची वेळ येताच 'हाय मी मेलो' असे मानून महादु:खरूप परिणाम करणे अशी या जीवाची अवस्था झाली. जीवाच्या या मोह, राग, द्वेषरूप परिणामांमुळे नवीन कर्मांचा बंध होत राहिला व कर्मांची सत्ता कायमच राहिली.

शरीराचा यात काय दोष? जीवाचाच हा महामूर्खपणा होता. कर्मांनी या शरीराला कॉंट्रॅक्ट देऊन बोलावले आहे, ते आपल्या मर्जीने थोडेच आले आहे? त्याचे कॉंट्रॅक्ट पूर्ण होताच ते जीवाची संगत सोडून देते. कर्मच आहे खरा सूत्रधार की ज्याच्या हाती रिमोट कंट्रोल आहे! कर्म या जीवाला कधी दिसत नाही, कारण ते तर सूक्ष्म आहे.

जीव निरंतर मोह, राग, द्वेष करत रहातो व एकेका समयात अनंत कर्म परमाणु बांधले जातात, जीवाच्या प्रदेशात येऊन वास्तव्य करतात. मुक्काम ठोकतात. जुनी काही कर्म आपली स्थिति पूर्ण करून निघून जातात तरीदेखील कर्माची सत्ता अखंडपणे चालू रहाते. अनादिपासून सत्तेमध्ये असलेल्या कर्मामध्ये नित्य नवे कर्मपरमाणु येऊन मिळत रहातात व जुने काही परमाणु निघून जातात.

जर नुसते बंध होणे व सुटून निघून जाणे एवढ्यावरच भागले असते तर काही हरकत नव्हती. परंतु जीवाला सोडून जेव्हा ही कर्म जाऊ लागतात, तेव्हा ते जीवाला भेट देऊन जातात, फळ देतात, भाडं देतात. यालाच आपण कर्माचा उदय म्हणतो. आठ कर्म आपापल्या स्वभावानुसार वेगवेगळी फळं देतात हे आपण पूर्वी सविस्तर पाहिलेच आहे.

हे जीवा, तू जर असा विचार करीत असशील की, कर्म किती चांगले आहे की जे आपल्याला भेट देऊन-फळ देऊन निघून जाते. पहा आपल्या या सुंदर शरीराची रचना ते करते, आपल्याला सुखाची साधने उपलब्ध करून देते. तर मग मला असे म्हणावे लागेल की 'हे जीवा तुला काय म्हणावे? भोळा की खुळा? बा जीवा! जरा विचार तर कर. कर्म काही तुझ्यावर उपकार करीत नाहीत. त्यांना तर आपली सत्ता, आपली परंपरा कायम ठेवायची आहे. तू जर त्यांच्या फळामध्ये जोडला गेला नाहीस, त्यात हर्ष-विषाद-मोह केला नाहीस तर तू नवे कर्मही बांधणार नाहीस व असे होत होत कर्माची सत्ताच संपुष्टात येईल, कर्मांचा अभाव होईल व तू पूर्ण सुखी होशील.

हे जीवा, तुझा मूर्खपणा तर बघ! तू तर अमूर्तिक प्रदेशांचा पुंज, प्रसिद्ध ज्ञानादि गुणांचा धारक, अनादिनिधन वस्तु स्वतःच आहेस; परंतु या कर्म-नोकर्म वर्गणांच्या ढिगाऱ्याला तू स्व मानलेस. नामकर्माने आपले सारे कौशल्य पणास लाऊन तुझ्यासाठी हे शरीर, इंद्रियं इत्यादिरूप कारागृह बनविले, आयुकर्माने विशिष्ट काळासाठी तुला या कारागृहात बंदिस्त केले, मोहनीयकर्माने तुझ्यावर अशी मोहिनी घातली की तू त्या

कारागृहालाच-तुरुंगालाच आपले स्वरूप मानून बसलास.

कारागृह निर्माण झाले तेव्हा हर्षोल्हास केलास, दरवर्षी त्याचा वाढदिवस साजरा केलास व त्या कारागृहाच्या देखरेखीतच-त्याचा सांभाळ करण्यातच सारा काळ दवडलास. या कारागृहाची मोडतोड किंवा खराबी होताना पाहून डॉक्टरांना पैसे देऊन याची डागडुजी करविलीस आणि या कारागृहातून दुसऱ्या कारागृहात जायची वेळ आली तेव्हा रडून-आरडून एकच आकांत केलास.

हे जीवा! तू तर ज्ञानमय आहेस, केवलज्ञानस्वभावी आहेस या कारागृहाहून भिन्न आहेस; तरीदेखील याच्या इंद्रियरुपी छोट्याशा छिद्रातून तुला बाहेरचे थोडेसे ज्ञान झाले तर तेवढ्याशा अल्पज्ञानापुरते तू स्वत:ला मानलेस.

हा तर सारा पुद्‌गलाचा खेळ आहे. 'पुद्' म्हणजे जुळणे व 'गल' म्हणजे विखरणे. नावाप्रमाणेच जुळण्या-विखरण्याची ही क्रिया हे पुद्‌गल अचेतन, अज्ञानी असूनही सतत करत असते. हे जीवा, तू ज्ञानी-चेतन-बुद्धिमान असूनदेखील तूच असा मूर्ख निघालास की या पुद्‌गलाच्या नाचाला आपले मानून तू कधी हसतोस तर कधी रडतोस. यापासून भिन्न असे स्वत:चे अस्तित्व व स्वरूप तू जाणू इच्छित नाहीस. जणू तू आपली बुद्धि कोठे गहाण ठेवली आहेस.

हे जीवा, तुला वाटत असेल की जन्मापासून हे शरीर मी धारण केले आहे तर का नाही याला आपले मानू? का नाही वाढदिवस साजरा करू? त्यासाठी नदीचे उदाहरण पाहूया. आपल्या गावची नदी अनेक वर्षांपासून तशीच्या तशी वहात आहे. नदीरूपाने तर तीच आहे पण त्यातील जे पाणी आपण काल पाहिले होते ते आज शेकडो मैल दूरवर वहात गेले आहे आणि आज जी नदी आपल्याला दिसत आहे ते पाणी दुसऱ्या जागेहून आले आहे. परंतु प्रवाहरूपाने पाण्याचे अस्तित्व कायम असल्याने आपल्याला तीच ती नदी आहे असे वाटते.

बरोबर अशाचप्रकारे जन्मापासून हे मनुष्य शरीर आपणास

दिसत आहे. त्यामध्ये दर समयाला अनंत परमाणु येऊन मिळत आहेत व अनंत परमाणु दर समयाला सुटून जात आहेत. तरी देखील तेच ते शरीर कायम आहे असे आपल्याला वाटते.

अरे जीवा, या सर्वांमध्ये तोच तो कायम रहाणारा तर तू स्वत: आहेस. जीवाचा एक गुणही कमी-जास्त होत नाही किंवा जीव पुद्गलरूपदेखील परिवर्तित होत नाही. कोणतेही पुद्गल कायमसाठी जीवाबरोबर बांधले जात नाही. कर्माचा व नोकर्माचा प्रत्येक परमाणु आपापली स्थिति निश्चित करूनच जीवाशी संबंध जोडतो - बांधला जातो व स्वत:च्याच कारणाने सुटून इतरत्र जातो.

पुद्गल जीवाला आपले मानत नाही कारण त्यामध्ये श्रद्धा गुण नाही. पुद्गल जीवाला आपले किंवा स्व जाणत नाही कारण त्यामध्ये ज्ञान गुण नाही. पुद्गल जीवामध्ये मग्न होत नाही कारण त्यामध्ये चारित्र गुण नाही. पुद्गल दु:खी किंवा सुखी होत नाही कारण त्यामध्ये सुख गुण नाही.

परंतु हा जीव पुद्गलाला आपले किंवा स्व मानतो, ते त्याच्या श्रद्धा गुणामुळे नव्हे तर श्रद्धा गुणाच्या विपरीत अवस्थेमुळे म्हणजेच मिथ्यादर्शनामुळे मानतो. जीव पुद्गलाला आपले किंवा स्व जाणतो ते जाणणे ज्ञान गुणामुळे असले तरी विपरीत जाणणे हे मिथ्याज्ञानाच्या कारणाने होते. जीव स्वत:च पुद्गलामध्ये मग्न होतो ते चारित्र गुणाच्या विकारामुळे मग्न होतो.

मानणे, जाणणे, मग्न होणे हे जीवाचे वैशिष्ट्य आहे, पुद्गलामध्ये ते नाही. यांमध्ये जी विपरीतता आढळते जीव स्वत: ती चूक करतो व त्याच समयामध्ये मोहनीयकर्माची उदयरूप अवस्था आढळते. त्यामुळे कर्मावर आरोप करून उपचाराने म्हटले जाते की क़र्मामुळे हा विकार झाला. असे म्हणणे चुकीचे नाही परंतु तसेच मानले तर नुकसान जीवाचेच आहे.

कर्म स्वत: स्वत:च्या योग्यतेने बांधले जाते व उदयास येते. त्यावेळी जीव त्या कर्मफलामध्ये मग्न होतो - त्यामध्ये इष्टता

अनिष्टता मानून मोह, राग, द्वेष करतो. ही त्याची स्वत:ची चूक आहे, कर्म त्याला जोरजबरदस्ती करत नाही.

जीवाची ही चूकदेखील त्याच्या स्वत:च्याच कारणाने-योग्यतेने सुधारेल. कोणतेही कर्म त्यात आडकाठी आणत नाही, कोणतेही कर्म त्याला मदत करीत नाही. जीवाने पुद्‌गलाला स्व मानले होते त्याने स्वत:ला स्व मानावे, जीवाने पुद्‌गलाला स्व जाणले होते त्याने स्वत:ला स्व जाणावे, व या यथार्थ श्रद्धा व ज्ञानासह स्वत:मध्ये मग्न व्हावे. मग कसली इष्ट अनिष्टता व कसला रागद्वेष? मोह, राग, द्वेषच थांबला तर नव्या कर्माचा बंधसुद्धा थांबेल. याला 'संवर' असे म्हणतात.

हे जीवा, तुझे हे शहाणपण जागृत होताच कर्म आपला कारभार आटोपता घ्यायला सुरुवात करेल. कर्मांची स्थिति, अनुभाग कमी होऊ लागतील. जुनी कर्म आपली स्थिति कमी करून लवकर निघून जातील ही 'निर्जरा' होय.

हे जीवा, बस एकदा तू स्वत:चे स्वत:ला जाणलेस, मानलेस व त्यात मग्न झालास तर तुला अपूर्व आनंदाची प्राप्ति होईल. मग तर तुला वारंवार स्वत:ला निरखण्याची - स्वसन्मुख होऊन स्वानुभवाची ओढ लागेल. नंतर पुद्‌गलाच्या या नाचामध्ये तुला रस रहाणार नाही.

पुद्‌गलाचे - कर्म-नोकर्माचे तुझ्या संगती येणे जाणे अजूनही चालू राहील. तू त्याला जाणशील देखील, परंतु आता तू त्याला आपले मानणार नाहीस. पुद्‌गलाला पुद्‌गलरूपात जाणशील, मानशील, त्याला पररूप जाणशील मानशील. या पुद्‌गलास पाहून तुला थोडया प्रमाणात राग, द्वेष देखील होतील परंतु आता या रागद्वेषांचा स्वामी तू असणार नाहीस. रागद्वेषांना देखील तू पररूपाने जाणशील, आपल्या ज्ञानाचे ज्ञेय बनविशील. आपल्या स्वभावात त्यांना स्थान देणार नाहीस.

हे जीवा, आजपर्यंत शरीराची क्रिया करण्यात किंवा सोडण्यात तसेच शुभाशुभ राग करण्यात वा सोडण्यातच तू आपले कर्तव्य मानले होतेस, त्यातच धर्म होतो असे मानले होतेस. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर उपवासादि शरीराच्या क्रिया

करण्यात व पुण्य (शुभभाव) करण्यातच तू धर्म होतो असे मानले होतेस. आता तरी जागा हो! जेव्हा तुला स्वतःचे स्वरूप समजून घेण्याची जिज्ञासा जागृत होईल तेव्हा ते स्वरूप समजाविणाराही तुला सहज भेटेल. तुझी पात्रताच तुझा मार्ग सुगम करेल. अत्यंत रुचिपूर्वक तू स्वतःचे स्वरूप ऐकशील तर अवश्य ते तुझ्या लक्षात आल्याशिवाय रहाणार नाही.

कसे सहज वस्तुस्वरूप आहे पहा बरे! ज्ञानी आत्मानुभवी जीव आपल्या स्वभावात-शुध्दोपयोगात टिकू शकत नाही त्यावेळी त्याला दुसऱ्यांना स्वभावाबद्दल समजाविण्याचे विभाव (शुभभाव) येतात. समोरचा ऐकणारा पात्र जीव स्वभावाची रुचि करून स्वभावाचे लक्ष्य करतो तेव्हा स्वभावात स्थिर होताच त्याच्या स्वतःच्या विभावाचा नाश होतो, त्याला आत्मानुभव होतो.

हे जीवा! तू स्वतः समजण्याचा व स्वसन्मुखतेचा पुरुषार्थ करशील तरच संवर निर्जरारूप कार्य प्रगट होईल आणि मोक्षाकडे तू अग्रेसर होशील. हे भव्य! हेच एकमेव कार्य तुम्ही याच भवामध्ये करण्याचा निर्धार करा. तुमचे अविनाशी कल्याण होईल.

कळावे,

**तुमची आई.**

**कम्मे णोकम्मम्हि य अहमिदि अहकं च कम्मणोकम्मं ।**
**जा एसा खलु बुद्धी अप्पडिबुद्धो हवदि ताव ।।१९।।**

**समयसार**

**अर्थ** - जोपर्यंत मोह, राग, द्वेषरूप भावकर्म, ज्ञानावरणादि द्रव्यकर्म आणि शरीरादि नोकर्म यांच्यामध्ये हे मी आहे अशी आणि हे कर्म व नोकर्म माझे आहेत अशी बुद्धि आहे तोपर्यंत हा जीव अप्रतिबुद्ध आहे, अज्ञानी आहे.

# कर्म-नोकर्म निषेकरचना

पत्रांक ५ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २९ जुलै १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

तुम्हाला माहीतच आहे की ही लेखमाला मी प्रथम हिंदीमध्ये सुरू केली होती व 'सन्मति संदेश' मासिकात ती छापून येऊ लागली आहे. मोना, रीनाने हा लेख हिंदीमध्ये वाचल्यानंतर तिची प्रतिक्रिया तिने लेखाच्या मागे लिहून मला कळविली होती. ती तुला कळावी म्हणून लिहीत आहे.

''शेवटची दोन पाने वाचून मन अगदी गदगदून आले. तुझे हे बोल सदोदित (निदान वाचल्यावर काही दिवस) कानात गुंजत रहातात. कोणीतरी तळतळून सांगतय की आता तू 'स्व' ला ओळख.

सर्व काही अनुकूल संयोग (उत्तरोत्तर दुर्लभ गोष्टी) जुळून आले आहेत. या भवात जर मी मला ओळखलं नाही तर माझ्यासारखी दुर्दैवी मीच.

तुझ्या लेखांमुळे, प्रवचनांमुळे ही रुचि, हे परिणाम कायम टिकोत नि मी माझ्या ध्येयाला लवकर गाठो ही इच्छा.

पुन्हा एकदा - हे जे विचार येतात ते आस्रव आहेत आणि यांचाही मी कर्ता नाही, ज्ञाता आहे''

हे वाचून फारच समाधान वाटले. शास्त्रातले मर्म तुम्ही बरोबर ग्रहण करीत आहात हे जाणवले. रीना तर दर रविवारच्या दादांच्या क्लासवजा प्रवचनाला येत असते. गेल्या ७ जून १९९८ पासून आजपावेतो दीड तासांची ५५ लेक्चर्स झाली. मोना, तुझा हट्ट होता की 'रीया मोठी झाल्यावर तिला हे शास्त्रज्ञान कोण देणार ? म्हणून सिद्धांत प्रवेशिकेवरील ही सर्व प्रवचनं टेप करा.' त्याप्रमाणे टेपिंग चालूच आहे. त्यावरून आणखीही १० ते १२ जणांनी आपापले टेप्स करून घेऊन त्यांचेही सेट्स तयार आहेत व इतरांना ऐकण्यासाठीही ते देतात.

मोना, तू सुद्धा आम्हाला १०-१०, १५-१५ दिवस औरंगाबादला बोलावून क्लासेस अरेंज करतेस त्यामुळे तुमच्याबरोबर इतरही ३०-४० लोक लाभ घेतात.

या साऱ्या गोष्टींमुळे तुम्हा दोघींना स्वाध्यायाची खरोखरीच गोडी लागली आहे व शिकलेल्या गोष्टी तुम्ही बरोबर आत्मसात करीत आहात हे पाहून मोठे समाधान होत आहे.

आपण कर्म-नोकर्माचा बंध कसा होतो, त्याची स्थिति व उदयकाल आणि निषेकरचना वगैरे गोष्टी पाहिल्या. जीवामध्ये कर्म व नोकर्म यांना ग्रहण करण्याची जी शक्ति आहे त्यास 'भावयोग' म्हणतात याचे कारण जीवाच्या प्रदेशांचे कंपन होणे हे आहे त्यास 'द्रव्ययोग' म्हणतात, हे देखील आपण पाहिले.

जीव या कर्म-नोकर्माला ग्रहण करतो व कार्माण शरीर व नोकर्म शरीर तयार होते. तुम्ही सिद्धांत प्रवेशिकेमध्ये शिकला होतात की शरीरं ५ प्रकारची आहेत - औदारिक, वैक्रियिक, आहारक, तेजस व कार्माण शरीर. यापैकी पहिल्या चार शरीरांना 'नोकर्म शरीर' म्हणतात. यामध्ये नामकर्माच्या प्रकृतिचा उदय निमित्त आहे.

कार्माण शरीराप्रमाणे ४ शरीरं आत्म्याच्या गुणांचा घात करत नाहीत व गति इत्यादिरूप पराधीनही बनवित नाहीत म्हणून त्यांना नोकर्म (अकर्म किंवा ईषत् कर्म) असे नाव आहे. कार्माण शरीर नामकर्माच्या उदयाने आठ कर्मांचा स्कंध होतो ते कार्माण शरीर होय.

कर्म व नोकर्माची अधिकाधिक स्थिति किती बांधली जाते हे आज आपण पाहूया. याला उत्कृष्ट स्थिति असे म्हणतात. प्रत्येक जीवाला प्रत्येक समयी एवढी स्थिति बांधली जाईलच असे नाही.

वरील ५ शरीरांसंबंधीचे जेवढे परमाणु जीव एका समयात ग्रहण करतो त्यास 'समयप्रबद्ध' म्हणतात. परंतु त्यातील प्रत्येक शरीराचा समयप्रबद्ध वेगवेगळा आहे. औदारिक शरीरासंबंधीचा समयप्रबद्ध सर्वात अल्प आहे व अनुक्रमे उत्तरोत्तर शरीराच्या समयप्रबद्धातील परमाणुंची संख्या खूपच अधिक आहे. परमाणुंची संख्या वाढत जाते परंतु उत्तरोत्तर ही शरीरं सूक्ष्म सूक्ष्म

होत जातात. म्हणजेच औदारिक शरीर हे स्पर्शनेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय व चक्षुरिंद्रिय या चार इंद्रियांद्वारे जाणले जाऊ शकते कारण ते स्थूलशरीर आहे, परंतु तेजस शरीर स्पर्शनेंद्रिय व चक्षुरिंद्रियादिद्वारे जाणले जात नाही यामुळे ते औदारिक शरीरापेक्षा सूक्ष्म आहे. वास्तविक तेजस शरीरामध्ये औदारिक शरीरापेक्षा परमाणुंची संख्या अधिक असते. त्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक परमाणु कार्माण शरीरात असतात तरीदेखील ते कोणत्याही इंद्रियाद्वारे जाणले जाऊ शकत नाही. म्हणून कार्माण शरीर सर्वात सूक्ष्म आहे.

औदारिक शरीर मनुष्य व तिर्यंचांना असते. याची उत्कृष्ट स्थिति सर्वाधिक आयुवाल्या मनुष्य व तिर्यंचांनाच असणार. ती असते भोगभूमीतल्या जीवांची. त्यांची उत्कृष्ट स्थिति ३ पल्य आहे. वैक्रियिक शरीर देव व नारकी जीवांना असते त्या शरीराची उत्कृष्ट स्थिति ३३ सागर आहे.

आहारक शरीराची स्थिति अंतर्मुहूर्त आहे. याचे कारण सांगू शकाल? आहारक शरीराची व्याख्या आठवा बरं ! मुनि ६व्या गुणस्थानात असताना या शरीराची रचना होऊ शकते. ६ वे गुणस्थान आहे अंतर्मुहूर्ताचे म्हणजे एक अंतर्मुहूर्ताच्या आत आहारक शरीर बनणे व जिनालयाची वंदना करून किंवा तीर्थंकरांच्या निकट जाऊन पुनः परतून त्या शरीराचे परमाणु खिरून जाणे या सर्व गोष्टी घडतात.

तेजस शरीराची उत्कृष्ट स्थिति ६६ सागर आहे. कित्येक भवांपर्यंत याचा उदयकाल चालू रहात असतो.

कार्माण शरीराची सामान्यपणे उत्कृष्ट स्थिति सत्तर कोडाकोडी सागर आहे. विशेषपणे पाहिले असता ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय व अंतराय कर्मांची उत्कृष्ट स्थिति तीस कोडाकोडी सागर आहे. त्यामध्ये आबाधाकाल ३००० वर्षांचा राहील व उरलेला उदयकाल असेल. मोहनीयकर्माची सत्तर कोडाकोडी सागर, नाम व गोत्र कर्माची वीस कोडाकोडी सागर व आयुकर्माची उत्कृष्ट स्थिति ३३ सागर आहे. यापैकी आयुकर्माचा उदयकाल एका भवापुरता मर्यादित असतो व इतर कर्मांचा उदयकाल अनेक भवांपर्यंत कायम चालू रहातो.

यावरून आपल्याला ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे की अनिष्ट संयोगांना कंटाळून कित्येक जण आत्महत्या करतात किंवा दीर्घ रोगाने पीडित मनुष्यास दयामरण (?) द्यावे असे मत प्रदर्शित करतात तेव्हा ते हे विसरतात की कर्माचा उदय तर पुढील भवातही चालूच रहाणार आहे. आयु कर्माचे उरलेले सर्व निषेक एकदम खिरून - कदलीघात होऊन जीव विषभक्षण, शस्त्रघात वगैरेने मेला तरी त्याच्या असातावेदनीय कर्माचा उदय तर पुढील भवातही चालू रहाणार आहे.

मिथ्यात्वामुळे व तीव्र कषायांच्या आवेशामध्ये जीव सारासार विचारशक्ति गमावून आत्महत्येसारख्या प्रयत्नांनी अतिसंक्लेश परिणाम करून नरकगतिमध्ये गमन करतो.

ही कर्म व नोकर्माची उदयकालामध्ये जी निषेकरचना होते त्यामध्ये पहिल्याच समयात जो निषेक खिरतो त्यापेक्षा दुसऱ्या निषेकातील द्रव्य म्हणजे परमाणु संख्येने कमी असतात. क्रमाने ते कमी कमी होत जातात. याचे सम्पूर्ण गणित तसे फारच मोठे आहे परंतु समजण्यासाठी आपण काल्पनिक संख्या घेऊन ही निषेकरचना समजाऊन घेऊया. यातील पारिभाषिक नावे तुम्हाला नवीन वाटतील. परंतु यदाकदाचित तुम्हाला सम्यग्ज्ञान चंद्रिका जी गोम्मटसार वरील टीका आहे ती वाचाविशी वाटली तर या शब्दार्थांचा तुम्हाला उपयोग होईल.

यामध्ये 'गुणहानि' असा एक शब्द येतो. याचा अर्थ गुणित प्रमाणात (विशिष्ट पटीने) होणारी हानि. प्रत्येक निषेकात परमाणुंची संख्या घटत घटत जेव्हा निम्मी होते तेव्हा त्यास गुणहानि किंवा एक गुणहानि म्हणतात. ही गुणहानि होण्यास जेवढा काळ लागतो किंवा जेवढे समय लागतात त्यास 'गुणहानि आयाम' म्हणतात. आयामचा अर्थ काळाची लांबी असा होतो.

आपण हे पाहिले होते की निषेकातील परमाणुंची संख्या उत्तरोत्तर घटत घटत जाते व स्थितिच्या अंतिम समयी अंतिम निषेक खिरतो. उदयकालाच्या पहिल्या समयापासून अंतिम समयापर्यंत निषेकरचनेमध्ये किती वेळा गुणहानि होते; अर्थात परमाणुंची संख्या अर्धी, त्याच्या अर्धी, त्याच्याही अर्धी असे कितीवेळा होते ते मोजले असता त्यास 'नाना गुणहानि' असे

म्हणतात.

जसे एखाद्या कर्माचा उदयकाल ४८ समयांचा आहे असे आपण मानूया. जर ८ समयांमध्ये एक गुणहानि होत असेल तर ४८ समयांमध्ये नाना गुणहानिंची संख्या ६ होईल व गुणहानि आयाम ८ होईल. कर्माच्या स्थितिमधून आबाधाकाल वजा जाता उरते ती 'अवशेष स्थिति' किंवा 'उदयकाल' होय. आपण आता तीन शब्द शिकलो - गुणहानि, गुणहानि आयाम, नाना गुणहानि. जेव्हा दोन गुणहानि असे म्हटले जाईल तेव्हा गुणहानि आयाम जो आपण ८ समयांचा पाहिला होता त्यास दोनने गुणून २ x ८ =१६ होईल.

वर आपण नानागुणहानिचे प्रमाण पाहिले होते ते आहे ६. आता अन्योन्यअभ्यस्तराशि काढण्यासाठी जेवढया नानागुणहानि आहेत तेवढ्या वेळा (६ वेळा) २ ही संख्या लिहून परस्पर गुणावे. २ x २ x २ x २ x २ x २ = ६४ ही झाली 'अन्योन्यअभ्यस्त राशि'.

पहिल्या निषेकापासून अंतिम निषेकापर्यंतच्या सर्व परमाणुंची जी संख्या आहे तिला 'सर्वधन' (Total) असे म्हणतात.

या सर्वधनाला 'अन्योन्यअभ्यस्तराशि वजा १' या संख्येने भाग दिला असता अंतिम गुणहानिचे द्रव्य (परमाणुंची संख्या) येते.. समजण्यासाठी आपण सर्वधन ६३०० धरूया. त्यास (६४-१) म्हणजे ६३ ने भाग दिल्यास भागाकार १०० आला. १०० हे अंतिम गुणहानिचे द्रव्य - याचा अर्थ असा की शेवटच्या गुणहानिमध्ये १०० परमाणु आहेत.

आपण एकूण ६ गुणहानि पाहिल्या होत्या. शेवटच्या सहाव्या गुणहानित १०० परमाणु, पाचव्यात त्याच्या दुप्पट म्हणजे २०० परमाणु, चौथ्यात ४०० परमाणु, तिसऱ्यात ८०० परमाणु, दुसऱ्यात १६०० परमाणु व पहिल्या गुणहानिमध्ये ३२०० परमाणु असतील. बेरीज ६३०० झाली ना?

१ल्या गुणहानिमध्ये ३२०० परमाणु असतील हे लक्षात आले. पण ही गुणहानि तर ८ समयांची आहे व प्रत्येक समयाच्या निषेकात परमाणुंची संख्या घटत जाते. त्यासाठी


पहिल्या निषेकातील परमाणु किती व प्रत्येक समयी किती घट झाली हे आपण पाहूया.

८ समयांमध्ये ३२०० परमाणु खिरतात अर्थात सरासरी ४०० परमाणु खिरतात. ८ समयांमध्ये ८ निषेक खिरतात म्हणून गच्छ ८ आहे. प्रत्येक निषेकातील परमाणुंची संख्या क्रमशः घटत जाते. प्रत्येक वेळी जी घट होते त्यास 'चय' म्हणतात. 'चय' चे प्रमाण काढण्यासाठी 'गच्छ वजा एक' भागिले २ $\left[\frac{८-१}{२} = \frac{७}{२}\right]$ ही संख्या दोन गुणहानिमधून (१६ मधून) वजा केली असता साडे बारा $\left[\frac{२५}{२}\right]$ ही संख्या येते. या संख्येने वरील सरासरीस (मध्यधनास) भागले असता चयचे प्रमाण येते. $४०० \div \frac{२५}{२} = ४०० \times \frac{२}{२५} = ३२$ म्हणून पहिल्या गुणहानिमध्ये घटाचे म्हणजेच चयाचे प्रमाण ३२ आहे.

चय x २ गुणहानि = पहिल्या निषेकातील परमाणुंची संख्या. म्हणून ३२ x १६ = ५१२ ही पहिल्या निषेकातील परमाणुंची संख्या होईल. यासाठी दुसरीही पद्धत आहे. ती अशी -

सर्वधनास साधिक दीड गुणहानिने भागले असता (६३०० ÷ साधिक १२ = ५१२) पहिल्या गुणहानिच्या १ ल्या निषेकाच्या परमाणुंची संख्या आली. ती ५१२ आहे हे आपण पाहिले. या संख्येस दोन गुणहानिने भागले असता ५१२ ÷ १६ = ३२ हे 'चय' म्हणजे किती घट होते त्याचे प्रमाण आले. 'चय' म्हणजे Difference.

निषेकरचना





सर्वधन = ६३००

हा चय दुसऱ्या गुणहानिमध्ये अर्धा होतो. आपल्या गणितात तो ३२÷२ = १६ होईल. तिसऱ्या गुणहानित ८ होईल. अशाप्रकारे उत्तरोत्तर अर्धा अर्धा होत जाईल. मी तुम्हाला समजाविण्यासाठी आडव्या रेषेत समजाविले आहे. शास्त्रात समजाविताना नेहमी पहिला समय खालच्या बाजूला लिहितात व दुसरा समय वर, तिसरा समय त्याच्याही वर लिहितात.

निषेकाच्या या रचनेला त्रिकोण रचना असे नाव आहे व गोम्मटसार मध्ये त्याचे असे  चित्र दिले आहे. आपल्या आताच्या उदाहरणावरून आपण त्याकडे पाहूया.

निषेकांची त्रिकोण रचना




खालची उभी रेघ म्हणजे आबाधाकाल. या कालावधीत एकही परमाणु खिरत नाही - उदयास येत नाही. नंतर प्रत्येक समयात घटत्या संख्येने परमाणु उदयास येत रहातात.

यावरून हे लक्षात येते की जीवाने एक समयात जे अनंत कर्मपरमाणु अथवा नोकर्म परमाणु ग्रहण केले त्यातील प्रत्येक निषेकाची आपापली वेगवेगळी स्थिति आहे. आपण कर्माची स्थिति असे म्हणतो तेव्हा अंतिम निषेकाची ती स्थिति सांगत असतो. परंतु पहिल्या निषेकाची स्थिति तर आबाधाकाल + १ समय एवढी आहे.

पाचही शरीरांच्या प्रत्येक परमाणुची स्वतःची निश्चित स्थिति आहे. एवढी स्वतंत्रता पाहिल्यावर शरीराचा मी कर्ता, मी माझ्या इच्छेने बारीक किंवा जाड होते, मी मुलांना खाऊ पिऊ घालून धष्टपुष्ट बनविते असा आपला दुरभिमान किती व्यर्थ आहे

आपल्याला कित्येक रोगी असे दिसतात की जणू ते काही तासांचेच सोबती आहेत; तरीदेखील कित्येक महिने किंवा वर्ष जगतात व काही धडधाकट माणसे कोणतेही कारण नसताना क्षणात मरण पावतात. त्यावेळी आपले लक्ष बाह्य इतर निमित्तांकडे असते परंतु आयुकर्माची स्थिति व शरीराची स्थिति हेच खरे निमित्त आहे व जीवाची स्वतःची योग्यता हे उपादान आहे.

निमित्तामुळे कोठलेही कार्य होत नाही हे त्रिवार सत्य आहे. ज्ञान केवळ त्या निमित्तांना जाणते. अज्ञानीची दुहेरी चूक होते. नक्की निमित्त कोणते याचे ज्ञानही त्याला नाही म्हणून त्याचे ज्ञान खोटे व त्या निमित्ताने कार्य घडवून आणले ही त्याची श्रद्धाही खोटी आहे.

प्रत्येक कर्माची व नोकर्माची आपापली स्वतंत्र-वेगवेगळी निषेकरचना होते. एवढेच नाही, तर प्रत्येक समयात बांधलेल्या कर्म-नोकर्मांचा उदयकाल भिन्न भिन्न असतो व त्यांची निषेकरचनाही भिन्न भिन्न असते. भिन्न भिन्न समयी बांधलेल्या कर्मांच्या ज्या निषेकांचा उदय असेल त्या सर्वांचे मिळून फळ आपल्याला त्या एका विशिष्ट समयी मिळत रहाते. त्यामध्ये कधी तीव्र उदय तर कधी मंद उदय होत रहातो. कर्माचा उदय कधी एकसारखा रहात नाही म्हणून त्याला असमान म्हटले आहे.

प्रथमानुयोगातील अनेक कथांमध्ये व आपल्या भोवतालच्या अनेक व्यक्तींच्या जीवनामध्ये कर्मोदयाचे चढउतार आपणास दिसतात. पुण्य पापाचे हे फळ कर्मोदयानुसार मिळत रहाते. त्यामुळे अनुकूल परिस्थितीमध्ये स्वतःला महान समजणे व प्रतिकूल परिस्थितीत दीन समजणे चुकीचे होईल. जीव तर या दोन्ही संयोगांचा फक्त ज्ञाता आहे. पूर्वी मी पुण्य केले होते म्हणून पहा मी किती सुखी आहे असे जो मानतो, तसेच आता पुण्य करून चांगले संयोग मिळत राहोत असे जो मानतो तो पुण्य करण्याजोगे आहे, बंधन करण्याजोगे आहे असे मानतो; ही त्याची बंधतत्त्वासंबंधीची विपरीत मान्यता आहे.

जीवाने शुभभाव करून मोठ्या पुण्याचा संचय करून ठेवला असेल तर तो त्याच रूपात उदयाला येईल या भरवशावर राहू

नका. अजून तर आपण फक्त बंध, उदय, सत्ता एवढ्या तीनच अवस्था पाहिल्या आहेत. अग, सत्तेत असलेल्या कर्मांमध्ये देखील जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने उलथापालथ होत असते.

जसे एखाद्याने लाखो रुपये दान देऊन मंदिर बांधले. काही वर्षांनी त्याला गरिबी आली व जर त्याच्या मनात आले की अरेरे, उगाच मी एवढा पैसा दिला. एवढा पैसा आज माझ्याजवळ असता तर माझे असे हाल झाले नसते. असे किंवा दुसरे अशुभ भाव केल्याने पूर्वीची पुण्यकर्म पापरूपात परिवर्तित होऊ शकतात त्याला 'संक्रमण' असे म्हणतात.

कर्माच्या अशा दहा अवस्थांचे वर्णन शास्त्रात केले आहे. त्या अवस्था  अशा आहेत - १) बंध, २) सत्ता, ३) उदय , ४) उदीरणा, ५) उत्कर्षण, ६) अपकर्षण, ७) संक्रमण, ८) उपशम, ९) निधत्ति व १०) निकाचित.

ही दहा नावे पाठ करून टाका. सोपे आहे. छोटया छोटया अनेक मुलांनी हे पाठ करून दाखवले आहे.

कर्मांच्या अशा वेगवेगळ्या नावांनी घाबरून जायचे कारण नाही. कर्मांच्या या अवस्था केवळ जीवाच्या परिणामांचे प्रतिबिंब आहेत- किंवा थर्मामीटर आहे. जीवाच्या परिणामांचे वैचित्र्य यावरुन दिसून येते. जसे एखाद्या ग्रुप फोटोमध्ये कोणाचे डोळे झाकलेले असतील, कोणाचे तोंड आ वासलेले असेल, तर कोणाचे नाक मुरडलेले असेल. फोटो ही जरी कागदाची व रंगाची अवस्था असली तरी फोटो काढतेवेळी त्या त्या व्यक्तीने चेहरा कसा ठेवला होता याचे तो फोटो द्योतक आहे.

तसेच कर्माच्या या विविध अवस्था जीवाच्या परिणामांचे द्योतक आहेत. पहा बरं, एका समयात जीव मोह, राग, द्वेष करतो त्यामुळे काय काय होते ? एकतर जीव त्या समयातच दुःखी होतो कारण मोह, राग, द्वेष हेच दुःखाचे कारण आहे, दुसरे म्हणजे त्या परिणामांच्या निमित्ताने आठही कर्म बांधली जातात, जी भविष्यात उदयाला येऊन पुनः जीवाला विशिष्ट फळ देतात. तिसरे म्हणजे त्याच परिणामांमुळे सत्तेमध्ये पडलेल्या पूर्वी बांधलेल्या जुन्या कर्मांमध्ये देखील फेरबदल होत असतो.

कर्मांच्या उदयाकडेच पहात राहिले तर जीवाला मोह, राग , द्वेष होतच रहातील व नवी नवी कर्म सतत बांधली जातील. जीवाने स्वतःचे स्वरूप जिनेन्द्रकथित आगमाद्वारे जाणून जर कर्माच्या उदयाकडे दुर्लक्ष करून आपल्या स्वभावावर लक्ष केंद्रित केले, त्याचाच विचार, चिंतन, मनन व अनुभव केला तर मिथ्यात्व नष्ट होईल, राग—द्वेषांचा आंशिक अभाव होईल. मोक्षमार्गाला सुरुवात होईल. भेदज्ञान व आत्मस्थिरता करत करत हा जीव वीतराग होईल. त्यानंतर सर्वज्ञ होईल त्यानंतर उरलेली कर्मही खिरून जातील. नोकर्मदेखील आपली स्थिति पूर्ण करून खिरून जाईल व जीव द्रव्यकर्म, भावकर्म व नोकर्माने रहित अशा पूर्ण शुद्धस्वरूपामध्ये प्रकट होईल. हीच सिद्ध अवस्था आहे.

स्वभावाने मीही असाच शुद्धात्मा आहे व पर्यायातदेखील अल्पकाळातच सिद्ध होणार आहे असा ठाम विश्वास बाळगूया. आपण अवश्य यशस्वी होऊ.

कळावे,

**तुमची आई.**

जीवाला जोपर्यंत आत्मा आणि कर्म यांच्या एकत्वाचा भ्रम आहे, भेदविज्ञान नाही, तोपर्यंत मिथ्यात्व, अज्ञान, अविरति व योगरूप अध्यवसान विद्यमान आहेतच, त्यामुळे मोहरागद्वेषरूप आस्रवभाव होतात. आस्रवभावांनी कर्म बांधतात, कर्माच्या निमित्ताने शरीरादि नोकर्माचा लाभ होतो आणि नोकर्माने संसार होतो. परंतु ज्यावेळी त्याच जीवाला आत्मा आणि कर्म यांचे भेदविज्ञान होते, तेव्हा शुद्ध आत्म्याचा लाभ होतो. त्यामुळे मिथ्यात्वादि अध्यवसानांचा अभाव होतो, त्यामुळे मोहरागद्वेषरूप आस्रवभावांचा अभाव होतो, आस्रवाच्या अभावाने द्रव्यप्रत्यय नवीन कर्मबंधास निमित्त होत नाहीत, कर्माचे निमित्त नसल्यामुळे शरीरादि नोकर्म उत्पन्न होत नाहीत आणि नोकर्माचा अभाव झाल्याने संसाराचा अभाव होतो. हा संवरक्रम जाणावा.

**समयसार गाथा १९०, १९१, १९२ टीका.**

# जीव आणि कर्माची स्वतंत्रता

पत्रांक ६ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ३०जुलै१९९९.

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मुलींनो, चारी अनुयोगांचा सार वीतरागता आहे. प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग या चार अनुयोगांचे स्वरूप आपण विस्ताराने पूर्वी 'पत्रांद्वारे जैनतत्त्व परिचय' मध्ये शिकलो होतो. त्यावेळी मुख्यतः द्रव्यानुयोगाद्वारे आपण वस्तुचे स्वरूप पहाण्याचा प्रयत्न केला होता. आता करणानुयोगाचा आपला विषय चालू आहे.

कर्माचे एवढे सूक्ष्म विवेचन, त्याच्या दहा अवस्था, कर्माचा बंध व क्षय, कर्मातून मुक्त होण्याचा विधि या सर्व गोष्टी सर्वज्ञाशिवाय कोण बरे सांगू शकेल? कोणीही आपल्या कल्पनेतून हे लिहिलेले नाही.

तुम्ही म्हणाल - 'या सर्व गोष्टी जाणण्याची काय आवश्यकता आहे? यातील गणितं, कर्मांच्या अवस्था इत्यादि माहीत नसणाऱ्यालाही सम्यग्दर्शन तर होऊ शकेल.' आवश्यकतेचाच जर विचार करायचा म्हटले तर मी तुम्हाला असे विचारते की पोट भरायला ३-४ रोटल्या व दाळ, भात, भाजी पुरेशी आहे. मग रोज विविध पदार्थ का बरं बनविता? दोन जोड कपडयांनी आपली आवश्यकता पुरी होते, मग नित्य नवे कपडे-नवीन फॅशनचे व वेगवेगळ्या रंगांचे कशाला बरं घेता? रोज वर्तमानपत्र का वाचता? टि. व्ही. का बघता?

फक्त स्वाध्यायाच्याच बाबतीत हा प्रश्न उठत असेल तर आपली रुचि कोठे आहे याचा अंदाज येतो. हा प्रश्न ज्याने त्याने स्वतःला विचारावा, दुसऱ्याकडे बोट दाखवायची गरज नाही.

बाळांनो, आपले मन हे माकडासारखे चंचल आहे. त्याला नित्य नवे अवलंबन पाहिजे असते. आपण बातम्या वर्तमानपत्रामध्ये वाचतो व टी.व्ही. वर पहातो तेही आपली ज्ञानपिपासा कमी करण्यासाठीच करतो. कथा कादंबऱ्या व

टी. व्ही. सीरीयल पहाताना मोठ्या उत्सुकतेने आता पुढे काय होणार याची वाट बघतो किंवा अटकल लढवितो, त्यावर चर्चाही करतो. त्यावेळी आपल्याला हे माहीत असते की हे सारे काल्पनिक आहे. लेखकाच्या कल्पनेतून साकारलेल्या या गोष्टी आहेत व टी. व्ही. वर जी पात्र दिसताहेत त्या भूमिका पार पाडणारे नटही त्या भूमिकांहून भिन्न आहेत.

तरीदेखील रोजचे ३-४ तास किंवा अधिकही त्याच्याकडे डोळे लाऊन पात्रांच्या सुखदु:खाशी समरस होऊन आपणही राग द्वेष करतो व सुखी दु:खी होतो. शास्त्रीय भाषेत याला विकथा म्हटले आहे. प्रमादाचा तो एक भेद आहे. बंधाच्या कारणांमध्ये आपण प्रमाद हेही एक कारण पाहिले होते. परंतु याची आवश्यकता काय आहे असा प्रश्न आजपर्यंत कोणीदेखील स्वत:ला विचारला नसेल. या अनावश्यक गोष्टी करून कर्मबंधाचा दंड आपल्याला मिळतो म्हणून याला अनर्थदंड म्हणता येईल. असो तो विषय वेगळा आहे.

करणानुयोग वाचूनही आपल्याला वीतरागतेचीच प्राप्ति करावयाची आहे. सामान्य कथनापेक्षा सविस्तर वर्णनाने एखादी गोष्ट पटकन समजते. याला शास्त्रात म्हटलय की, '**सामान्य शास्त्रतो नूनं विशेषों बलवान भवेत्**' वीतरागता प्राप्त करण्याची ही पण एक कला आहे.

करणानुयोगाचा विषय सूक्ष्म आहे. त्याला मनाच्या एकाग्रतेची गरज असते. यामधली काही गणितं तर अशी आहेत की भल्याभल्यांना घाम फुटतो व मति चक्रावून जाते. परंतु तेच उत्साहाने समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास उपयोगाची सूक्ष्मता होते, विषय आपल्या लक्षात येतो. सम्यक्त्वाच्या कारणांच्या अपेक्षेने जे भेद सांगितले आहेत त्यातले एक 'बीज सम्यक्त्व' आहे. करणानुयोगातली जी बीजगणितं आहेत तेही सम्यक्त्वाचे कारण म्हटले आहे अर्थात उपयोगाच्या या एकाग्रतेतून स्वसन्मुख परिणामांद्वारे सम्यक्त्व होते.

गुणस्थान, मार्गणा, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, उपयोगाचे भेद वगैरेंचे जे यथार्थ व सविस्तर वर्णन जैन आगमात आढळते; तसे

इतरत्र कोठेच आढळत नाही. अन्यमती देखील मी आत्मा आहे, आत्मा शुद्ध आहे, अकर्ता आहे, अभोक्ता आहे असे म्हणतात व सर्वथा तसाच आहे असे मानतात. आपल्याला वाटते की अरे, आपल्या शास्त्रात पण असेच वाचले होते. परंतु हे लक्षात घ्या की जैन शास्त्रातील हे कथन निश्चयनयाचे कथन आहे व व्यवहार कथनामध्ये जीवाला शरीर, इंद्रिय, कर्म, गुणस्थान वगैरे किती किती असतात त्याचे वर्णन आढळते. परंतु अन्यमती इतर गोष्टींना जाणत नाहीत व 'ब्रम्ह सत् जगत मिथ्या' म्हणून परद्रव्यांचा व पर्यायांचा सर्वथा निषेध करतात.

सध्या अनेक लोकांमध्ये एक धोकादायक भ्रांति आढळते. टी. व्ही. वर किंवा सार्वजनिक ठिकाणी चालणारी अन्यमतींची प्रवचनं ऐकून त्यातून आपल्याला आवडेल तेवढेच घेऊया असे ते म्हणतात. ऐकण्यामुळे किंवा त्याचे ज्ञान झाल्याने आपले काहीही नुकसान होणार नाही. परंतु ज्याला यथार्थ-अयथार्थतेची ओळख नाही त्याच्या अभिप्रायामध्ये त्या व्यक्तिबद्दल व त्यांच्या उपदेशाबद्दल आदरभाव निर्माण होतो व तो फसू शकतो कारण ज्याला आपला खोटा माल खपवायचा असेल तो निव्वळ खोटा माल न दाखवता थोडा फार चांगला माल त्यात मिसळणारच. म्हणून खऱ्या खोट्याची ज्यांना पारख नाही त्यांच्या पदरी खोटा माल पडतो म्हणजेच विपरीत अभिप्राय घर करू लागतो. शास्त्रात यालाच अनायतन म्हटले आहे. कुदेव, कुगुरु, कुशास्त्र व त्यांचे प्रत्येकाचे सेवक (भक्त) अशाप्रकारे ६ गोष्टींचा आदर वाटणे, त्यांची स्तुती करणे हे ६ अनायतन आहेत, दोष आहेत व हे दोष असणाऱ्यांना सम्यक्त्व होऊ शकत नाही.

स्वरूपानुभव व भेदज्ञान यामध्ये उपयोग सतत टिकत नाही. सविकल्प दशेमध्ये उपयोग वारंवार पलटत रहातो. अशावेळी करणानुयोगाच्या अभ्यासाने या सर्व विशेष गोष्टी जाणल्याने आत्मगुण अधिक विकसित होतो. कारण सत्य गोष्टींचे ज्ञान होणे हा ज्ञानाचा विकासच आहे. त्यामुळे जीवासंबंधीचे आपले श्रद्धान दृढ होण्यास मदत मिळते. जीवाचे व कर्माचे सविस्तर वर्णन जाणल्याने 'स्व' कोण व 'पर' कोण याचे स्पष्ट चित्रण आपल्या मनःचक्षुंपुढे उभे रहाते व भेदज्ञानास पुष्टी मिळते.

मिथ्यादृष्टि, सम्यग्दृष्टि, व्रती, मुनि, अरंहत, सिद्ध इत्यादि सर्वांचे स्वरूप आपल्या ज्ञानात स्पष्टपणे झळकते त्यामुळे स्वत:मध्ये निर्णय घेण्याची पात्रता तयार होते. इतर लोकांचे पाहून देखादेखी कोणतीही धार्मिक गोष्ट करण्याची वृत्ती थंडावते. योग्य-अयोग्यतेचा निर्णय होतो. लोकांना दाखविण्यासाठी किंवा समाजाच्या भयाने काही करण्याची गरज उरत नाही. आपल्या अभिप्रायामध्ये दृढता वाढत जाते व लौकिक तसेच पारलौकिक भय नाहीसे होते.

पहा आपण आत्तापर्यंत जे काही थोडे फार शिकलो त्यामध्ये जीवाचे जीवन, मरण काय आहे ते पाहिले. जीव कायम राहून मरणानंतर १ ते ४ समयातच नवीन पुद्‌गल परमाणु गोळा करून नव्या शरीराची निर्मिती करतो त्यात विशिष्ट कर्म निमित्त असतात वगैरे गोष्टींचे ज्ञान झाल्यामुळे मरणासंबंधीचे भय कमी झाल्यासारखे नाही वाटत तुम्हाला?

अन्यमती मानतात की मनुष्य कर्म करतो व ईश्वर त्याचे फळ देतो. त्यांची ईश्वरासंबंधीची कल्पनाच चुकीची आहे. त्यांनी ईश्वराला तर 'ऑनररी सुपर सर्व्हंट' चा हुद्दाच बहाल केलाय जणूं ! तुम्ही पुण्य-पाप करा व ईश्वर त्याचा हिशोब ठेऊन तुम्हाला फळ देणार?

मुलींनो, कर्माची ही सारी व्यवस्था स्वयंचलित आहे - ऑटोमॅटिक आहे. जीवाच्या प्रत्येक समयाच्या सर्व राग, द्वेष, मोहाचे मोजमाप या कर्मांवरून लक्षात येते. खुनी, अपराधी आपल्या लौकिक कायद्यातून सुटू शकतील पण कर्मपाशातून सुटणार नाहीत. १ खून केला काय नि ४ खून केले काय एकदाच फाशी मिळणार असे म्हणणाऱ्यांना कर्माच्या कायद्याचे ज्ञान नाही. कर्माच्या या कायद्यात पळवाटा नाहीत, भ्रष्टाचारही नाही, वशिलेबाजी सुद्धा नाही.

तुम्ही म्हणाल, 'अरे वा! कर्म इतके बलवान असेल तर आता त्याचीच पूजा करावी लागेल. त्याला म्हणावे लागेल की बाबारे! आता तू मला सोड.' कोणी म्हणतात, 'अज्ञानातच आम्ही सुखी होतो. कर्माचे ज्ञान झाल्याने तर आम्हाला सतत कर्माची भिती वाटत रहाते.'

स्वतःचे स्वरूप नीट लक्षात न घेतल्यामुळे असे घोटाळे होत रहातात. म्हणून कर्मांच्या दहा अवस्थांपैकी इतर अवस्थांचे स्वरूप पहाण्यापूर्वी पुनः तुम्हाला आपले स्वतःचे स्वरूप व सामर्थ्य यांची आठवण करून द्यावीशी वाटते. प्रत्येकाने खालील प्रमाणे विचार करून स्वतःच स्वतःला बजावले पाहिजे की—

''बा जीवा! तू तर चेतन आहेस. तू अनादिअनंत आहेस, स्वयंसिद्ध आहेस - कोणी तुला नव्याने बनविलेले नाही, आपल्या ज्ञानादि अनंत शक्तींनी तू परिपूर्ण आहेस, तू स्वशक्तीनेच टिकून राहिला आहेस व स्वतःच्या परिणमन शक्तीद्वारे परिणमित देखील होत आहेस. अनंत गुणांची प्रत्येक पर्याय आपल्याच योग्यतेने आपल्या स्वकालामध्ये उत्पन्न होत आहे. प्रत्येक द्रव्य आपल्या स्वतःच्या पर्यायांचा कर्ता आहे; दुसरे द्रव्य या द्रव्याच्या पर्यायांचा कर्ता होऊ शकत नाही यावरुन हे सिद्ध होते की स्वभाव परिणमन - शुद्ध पर्याय असो की विभाव परिणमन - अशुद्ध पर्याय असो, त्याचा कर्ता ते विशिष्ट द्रव्यच आहे, अन्य द्रव्य नाही.

हे जीवा, तुझ्या जाणणेरूप पर्यायाचा कर्ता तू स्वतःच आहेस; ज्ञेयाच्या कारणाने हे ज्ञान झाले नसून तुझ्या आपल्या ज्ञानपर्यायाच्या योग्यतेने हे जाणणे होत आहे. तुझ्या चारित्रगुणाची ही जी रागद्वेषरूप पर्याय होत आहे, त्याचा कर्ता पण तू स्वतः आहेस, कोणतेही परद्रव्य तुला रागद्वेष करवित नाहीत. भगवंतांना पाहिल्यामुळे शुभराग झाला व वैऱ्याकडे पाहिले म्हणून द्वेष झाला असे वस्तुचे स्वरूप नाही.

हे जीवा! तू स्वतः तर अरूपी आहेस परंतु वर्तमानकाळी रूपी पुद्‌गलाला जाणत आहेस. पाचही इंद्रियांद्वारे जाणणारा तर तू स्वतः आहेस पण जाणण्यात येत आहेत स्पर्श, रस, गंध, वर्ण आणि शब्द. या तर साऱ्या पुद्‌गलाच्या पर्याय आहेत. म्हणून पुद्‌गल यांचा कर्ता आहे. परंतु तू शरीररूप पुद्‌गलामध्ये हा 'मी' असे मानून एकत्वबुद्धि केलीस. या पर्याय माझ्या आहेत असे मानून त्यांच्यामध्ये ममत्वबुद्धि केलीस. मीच यांचा कर्ता आहे असे मानून कर्तृत्वबुद्धि केलीस. पुद्‌गलांच्या पर्यायांना फक्त जाणत होतास तरीदेखील मी त्यांना भोगतो असे मानून भोक्तृत्वबुद्धि केलीस.

परपदार्थांमध्ये एकत्व, ममत्व, कर्तृत्व आणि भोक्तृत्वरूप ही जी तुझी विपरीत मान्यता आहे हेच मिथ्यात्व आहे - श्रद्धा गुणाची विभावपर्याय आहे. श्रद्धा गुणाची ही जी अतत्त्वश्रद्धानरूप पर्याय आहे ती सुद्धा तुझ्या स्वतःमुळेच आहे. कर्मांने तुला मिथ्यात्वरूप परिणमित केलेले नाही. तुला जर सम्यक्त्व प्राप्त करावयाचे असेल तर ती पर्यायदेखील तुझ्या करण्याने प्रकट होईल. दुसरे कोणी भगवान, गुरु, कर्म किंवा निमित्त तुला सम्यक्त्व प्रदान करणार नाहीत.

हे जीवा! तू पुद्‌गलाला जाणत असताना जाणण्याचे हे कार्य तुझ्या ज्ञान पर्यायामध्ये स्वतःमुळेच होत आहे, पुद्‌गलामुळे नव्हे. म्हणून तू तुझ्या ज्ञानपर्यायांचा कर्ता—भोक्ता आहेस, परद्रव्यांचा कर्ता—भोक्ता नाहीस.

परद्रव्यांना जाणत असतांना तू रागद्वेषरूप देखील परिणमित होत आहेस म्हणून रागद्वेषांचा देखील तू कर्ता भोक्ता म्हणता येईल. वास्तविक या रागद्वेषांमुळे तू दुःखी आहेस परंतु परपदार्थांना भोगल्यामुळे मी सुखी-दुःखी होतो असे तू मानतोस ते तुझे अज्ञान व मिथ्यात्व आहे.

कोणत्याही परपदार्थांने, परजीवाने, कर्मांने किंवा निमित्ताने कोणत्याही जीवाला आजपर्यंत सुखी किंवा दुःखी केलेच नाही, राग किंवा द्वेष उत्पन्न केलेच नाहीत. हे जीवा! स्वतःच्याच खोटया कल्पनेपोटी व अज्ञानापायी तू दुःखी आहेस. पूर्वी तू परद्रव्यांना सुखदुःखाचे तसेच रागद्वेषाचे कारण मानत होतास. शास्त्रस्वाध्याय केल्यानंतर आता तू कर्मांना रागद्वेषाचा कर्ता मानलेस, सुखदुःखाचे दातार मानलेस.

कर्मच मला संसारामध्ये भटकवित आहेत, कर्मच मला मोह, राग, द्वेष उत्पन्न करवित आहेत, तेच मला अज्ञानी बनवित आहेत, तेच मला सम्यक्त्व होऊ देत नाहीत, तेच मला चांगले संयोग देत आहेत इत्यादि मिथ्या कल्पना तू केल्यास. मला चांगले परिणाम करून चांगले कर्म बांधावयाचे आहे कारण ते कर्म मला चांगल्या गतिमध्ये घेऊन जाईल अशी मान्यता तू करून घेतलीस.

अरे बाबा! तू तर चेतन आहेस. तुझ्या शुद्ध अशुद्ध पर्याय तुझ्यामध्ये तुझ्या स्वतःच्या कारणाने होत आहेत. तुझ्या परिणामांच्या वेळी कर्मांमध्ये ज्या अवस्था बनतात, पलटतात त्यांचे ज्ञान करविण्यासाठी शास्त्रात त्यांचे वर्णन केले आहे. त्यांच्याशी तुझा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे, कर्ता-कर्म संबंध नाही.

हां, एवढे मात्र खरे आहे की, तुझ्या कोणकोणत्या परिणामांच्या समयी कर्माची कोणकोणती अवस्था नियमाने होत असते - हे समजावे म्हणून त्या दोन्हींच्या नावांमध्ये सादृश्य आहे. जसे, जीवाची अल्पज्ञानरूप पर्याय त्याच्या स्वतःमुळे प्रकट होते त्यावेळी ज्ञानावरण कर्माची क्षयोपशमरूप अवस्था असते व म्हणून त्या ज्ञानाला 'क्षयोपशम ज्ञान' म्हणतात. जीव जेव्हा स्वतः मोह, राग, द्वेषरूप परिणमन करतो तेव्हा मोहनीय कर्माची उदयरूप अवस्था आढळते म्हणून जीवाच्या रागादि भावांना 'औदयिक भाव' म्हणतात. जीव सर्वप्रथम जेव्हा सम्यक्त्व प्राप्त करतो त्यावेळी कर्मांमध्ये दर्शनमोहनीय आणि अनंतानुबंधी कर्मांची उपशमरूप अवस्था आढळते म्हणून जीवाच्या त्या भावांना 'औपशमिक सम्यक्त्व' म्हणतात.

जीव ज्यावेळी केवलज्ञानरूप पर्याय स्वतःमध्ये स्वतःच्या निजशक्तीने प्रकट करतो त्यावेळी कर्मांमध्ये सुद्धा त्याच्या स्वतःच्या कारणाने ज्ञानावरण कर्माचा क्षय आढळतो म्हणून जीवाच्या त्या ज्ञानपर्यायाला 'क्षायिक ज्ञान' असे म्हणतात. क्षायिक ज्ञान कर्मांच्या क्षयामुळे उत्पन्न झालेले नाही, तो तर जीवाचा स्वतःचा भाव - स्वभाव आहे. जीवाच्या स्वतःच्याच कारणाने ते प्रगट झाले आहे.

तद्वतच हे जीवा, तुझे हे जे वर्तमानकाळातले क्षायोपशमिक ज्ञान आहे-ज्ञानाचा जो उघाड आहे तो कर्माच्या क्षयोपशमाने उत्पन्न केलेला नाही, तुझ्या स्वतःमुळे-स्वभावातूनच उत्पन्न झालेला आहे.

कर्मांची मर्यादा त्यांच्या स्वतःमध्ये क्षयोपशम होण्यापुरतीच आहे, जीवाच्या भावांमध्ये ते कोणतीच ढवळाढवळ - फेरबदल करीत नाहीत. जीवसुद्धा स्वतःचे भाव करण्यापुरताच मर्यादित

आहे, कर्मांमध्ये काहीही उलथापालथ, बंध, उदय, उपशम, क्षयोपशम, क्षय इत्यादि करूच शकत नाही. जीव आणि कर्म दोन्हीही एकाच समयामध्ये आपापल्यामध्ये (स्वतःमध्ये) परिणमित होतात. जीवाच्या ज्या परिणामाच्या समयी कर्माची जी अवस्था नियमाने असतेच असते, त्या अवस्थेच्या नावावरुन जीवाच्या भावांना देखील तशीच नावे देण्यात आली आहेत, सांगितलेली आहेत.

जीवद्रव्याचे अस्तित्व कोणत्याही कर्माच्या निमित्ताने नाही, जीव तर स्वयंसिद्ध वस्तु आहे. अनंत गुणमय चैतन्यमय स्वभावाला कर्माची थोडीदेखील अपेक्षा नाही. अनादिपासून अनंत काळापर्यंत जीव स्वतःच्या स्वभावरूपाने कायम रहातो, त्यालाच पारिणामिक भाव म्हणतात. अनंत गुणमय स्वभाव वस्तुच्या स्वतःच्या कारणाने आहे, आहे आणि आहे - त्रिकाळ आहे, कोणत्याही कर्माच्या कारणाने किंवा कर्माच्या अभावामुळे नाही.

स्वभाव तर capacity आहे, ताकद आहे. विभावपर्याय असो किंवा पूर्ण विकसित स्वभावपर्याय असो ही परिपूर्ण ताकद अनादिअनंत रहाते म्हणजेच आदिरहित आणि अंतरहित सदैव विद्यमान असते. तिच्यामध्ये किंचितमात्र पण हानिवृद्धि होत नाही. अशीच्या अशीच सदैव होती, आता आहे व कायम राहील.

हे जीवा, तुझा स्वभाव अनंतज्ञानमय आणि अनंतसुखमय आहे तरीदेखील तू दुःखी का आहेस याचा कधी विचार केलास? तुझ्या स्वतःच्याच अज्ञानामुळे आणि मोहामुळे होणाऱ्या रागद्वेषादि विभावभावांमुळे तसेच त्या विभावभावरूप तू स्वतःला मानले आहेस त्यामुळे तू दुःखी आहेस. तू स्वतःला स्वभावरूप मान, विश्वास ठेव, अनंत ज्ञानींनी हीच गोष्ट सांगितली आहे.

अशा प्रकारच्या विश्वासासहित जे जीव आपल्या स्वरूपाचे ज्ञान करू लागले, स्वरूपामध्ये लीनता करू लागले त्यांचे मिथ्यात्व व अज्ञान तर दूर झालेच शिवाय त्यांची रागादिंची उत्पत्तिही कमी कमी होत गेली. अज्ञान अवस्थेमध्ये इष्ट वस्तुंच्या प्राप्तिमध्ये जो हर्ष अनुभवास येत होता त्यापेक्षा हे स्वभावोत्पन्न सुख वेगळ्याच जातीचे, अपूर्व सुख त्यांच्या अनुभवास आले.

याच सुखाचा अनुभव करत करत, स्वभावामध्ये अधिकाधिक लीनता करून ज्ञानी मोक्षमार्गावर अग्रेसर झाले व पूर्णतः स्वभावात लीन झाल्यानंतर त्यांना अनंत ज्ञान, अनंत सुख वगैरेची प्राप्ति झाली. जसा स्वभाव आहे तसाच पर्यायामध्ये प्रगट झाला. यालाच 'प्राप्त आहे त्याची प्राप्ति झाली' असे म्हणतात.''

मुलींनो, हे सारे आपण स्वतःलाच समजावयाचे आहे. दुसऱ्यांना समजावण्यात आपण सर्वजण फार हुषार असतो. 'लोका सांगे ब्रम्हज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' अशी आपली अवस्था होऊ नये म्हणून ही दक्षता घेतलेली बरी.

जीवाचे भाव व कर्माचा उदय अथवा अन्य अवस्था एकाच वेळी होत असल्याने जीवाचा भाव कोणता हे पाहिले असता कर्माच्या अवस्थेचे ज्ञान होऊ शकते; तद्वतच कर्माची कोणती अवस्था आहे ते पाहिले असता जीवाचे भाव लक्षात येतात. बेशुद्धावस्थेत, झोपेमध्ये, विग्रहगतिमध्ये, एकेंद्रियादि पर्यायांमध्ये रागद्वेष होत असतील का? असा प्रश्न तुमच्या मनात येईल. तेव्हा असा विचार करा की आठही कर्मांचा उदय तर निरंतर चालूच असतो. एक समयदेखील त्यांचा उदय थांबत नाही. त्याअर्थी वरील जीवांमध्येही रागादि औदयिक भाव चालूच असतात हे लक्षात येते.

आपल्याला वाटते एखादा जीव शुद्धोपयोगात असताना - आत्मध्यानात लीन असताना त्याला रागद्वेष पूर्णतः थांबलेले दिसतात. परंतु जोपर्यंत मोहनीयकर्माचा उदय विद्यमान आहे तोपर्यंत त्या जीवाचे अबुद्धिपूर्वक रागादिरूप परिणमन देखील चालूच असते. असे मानले नाही तर सम्यग्दर्शन होताच जीव पूर्ण वीतरागी झाला असता. हां, प्राथमिक अभ्यास करणाऱ्यांसाठी अशाप्रकारचे स्थूल कथन द्रव्यानुयोगामध्ये कधी कधी केले जाते परंतु त्याचा करणानुयोगाशी कोठेही विरोध नाही. करणानुयोगाद्वारे त्यातली सूक्ष्मता लक्षात आल्याने तर आनंदच वाटतो. मोक्षमार्गाचे स्वरूप अधिक स्पष्ट होते.

येथे एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की मोहनीय कर्माचा उदयच फक्त जीवाच्या मोह, राग, द्वेष परिणामांना सिद्ध करू शकेल परंतु साता वेदनीय किंवा असाता वेदनीय कर्माचा

उदय आहे म्हणून जीवाला मोह, राग, द्वेष परिणाम असतीलच असे नाही. तसे मानणे चुकीचे होईल. एखाद्या मुनिराजांवर उपसर्ग होत असेल तर तो त्यांचा असातावेदनीय कर्माचा उदय म्हणता येईल परंतु त्याच वेळी ते आत्मध्यानात लीन असल्याने अत्यंत अल्प असे अबुद्धिपूर्वक रागद्वेष विद्यमान असतील व त्यामध्ये त्यांच्या चारित्रमोहनीय कर्माचा (संज्वलन कषाय कर्माचा) उदय निमित्त असेल.

कर्माची व जीवाची अशी स्वतंत्रता लक्षात आल्यानंतर आता यापुढे आपण कर्माच्या काही अवस्थांचे ज्ञान करून घेणार आहोत. ते समजले असता कर्मबंधातून सुटण्याचा मार्गही आपल्या लक्षात येईल. या गोष्टी लक्षात येताच कर्म बलवान नाही, जीव मोक्षमार्ग प्रकट करण्यास स्वतःच समर्थ आहे हे लक्षात येईल. त्याबद्दल पुढील पत्रात चर्चा करूया.

कळावे,

**तुमची आई.**

तत्त्वनिर्णय न करण्यामध्ये कोणत्याही कर्माचा दोष नाही, तो तर तुझाच दोष आहे. परंतु तू स्वतः तर महंत राहू इच्छितोस आणि आपला दोष कर्माच्या माथी मारतोस. जिन आज्ञा मानली तर अशी अनीति होऊ शकत नाही. तुला विषयकषायरूपच रहावयाचे आहे म्हणून तू खोटे बोलत आहेस. मोक्षाची तुला खरोखरीच अभिलाषा असेल तर अशी खोटी बहाणेबाजी का करतोस? सांसारिक कार्यामध्ये आपल्या पुरुषार्थाने एखादी गोष्ट साध्य होत नाही असे पाहून तेथे पुरुषार्थपूर्वक जोरदार प्रयत्न करतोस आणि येथे मात्र हातपाय गाळून बसलास. पुरुषार्थ हरवून बसलास यावरून समजून येते की तू मोक्षाला तोंडदेखले उत्कृष्ट म्हणतोस; त्याचे स्वरूप ओळखून त्याला हितरूप जाणत नाहीस. त्याला हितरूप जाणले तर त्याकरीता प्रयत्न करणार नाही हे अशक्य आहे.

**मोक्षमार्गप्रकाशक. पृष्ठ ३११.**

# कर्म - उपशम, उदीरणा

पत्रांक ७ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ८ ऑगस्ट १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मुलींनो, जीव आणि कर्माची स्वतंत्रता पाहिल्यावर दोन प्रश्न तुम्ही विचारलेत. पहिला प्रश्न असा की, 'अशी स्वतंत्रता आहे, मग कर्माचे स्वरूप व अवस्था जाणण्याचे प्रयोजनच काय आहे? आम्हाला फक्त जीवाबद्दलच माहिती दे ना!' दुसरा प्रश्न असा होता की, 'कर्मामध्ये बंध, उदय, उदीरणा वगैरे सर्व अवस्था तर आम्ही जाणल्या, मग आता आम्ही कर्माचा उपशम करावा की उदीरणा करावी की उदयच राहू द्यावा?'

पहिल्या प्रश्नाचे उत्तर प्रथम पाहूया. जीवाने अनादिपासून स्वतःचे स्वरूपच ओळखले नाही. त्याला सतत कर्माच्या उदयाने प्राप्त शरीरादिमध्ये आत्मपणा, म्हणजे एकत्व, संयोगांमध्ये ममत्व, व ज्ञानादिकांच्या हीनतेएवढेच आपले ज्ञानादि, रागादि विभाव परिणामच आपला स्वभाव-असे वाटत आले आहे. आत्मज्ञानी संत जेव्हा त्याला उपदेश देतात की अरे जीवा, तू या सर्वांपासून भिन्न आहेस, तू स्वतः परमात्मा आहेस, केवलज्ञानादि सामर्थ्याचा धारक आहेस; तेव्हा हा जीव हसण्यावारी नेतो, सांगणाऱ्याची चेष्टा (टिंगल) करतो, विश्वास ठेवत नाही व या साऱ्या वरच्या पातळीवरच्या गोष्टी आम्हाला सांगू नका हो, आमच्या बौद्धिक पातळीप्रमाणे आमच्या लेव्हलच्या गोष्टी सांगा म्हणून सांगणाऱ्यालाच काय उपदेश द्यायचा हे शिकवितो.

कर्माचे स्वरूप, त्यांच्या बंधाचे कारण, उदयामध्ये होणाऱ्या जीवाच्या अवस्था, कर्मजन्य दुःख वगैरे गोष्टींचे सविस्तर वर्णन ऐकले असता त्यासंबंधीच्या आपल्या भ्रामक कल्पना नष्ट होतात. त्यासंबंधीचे आपले अज्ञान दूर होऊन आपल्या मिथ्या श्रद्धेमध्ये बदल पडू लागतो; विश्वास बसू लागतो, त्यासंबंधी आपण गंभीरतेने विचार करण्यास उद्युक्त होतो.

मूळ मुद्दा तर स्वतःच्या स्वरूपावर विश्वास ठेवण्याचा होता. शास्त्रामध्ये 'आज्ञासम्यक्त्व' हा सम्यक्त्वाच्या कारणाच्या अपेक्षेने एक सम्यक्त्वाचा प्रकार सांगितला आहे. जिनेन्द्र भगवंतांचा उपदेशच शिरोधार्य आहे, त्रिकाल सत्य आहे अशी खात्री असणारी साधी सुधी माणसं-ज्यांना शास्त्रातले बारकावे माहीत नाहीत परंतु ज्यांचा त्या उपदेशावर पूर्ण भरवसा आहे-ती माणसंही आत्मसन्मुखतेने सम्यग्दर्शनाची प्राप्ति करून घेतात.

शिवाय असं पहा, आत्मा ज्ञानमय आहे व ज्ञानाचा स्वभावच जाणण्याचा आहे. जो जाणतो तो सर्व काही जाणतो. स्वला देखील जाणतो व पराला देखील जाणतो. कर्माला परस्वरूपात आपण जाणत आहोत. जर आपल्या अभिप्रायामध्ये पराला जाणण्याचाच निषेध असेल तर आपण ज्ञानाचे स्वरूपच नष्ट करू पहातो, कारण ज्ञानाचा स्वभावच स्वपरप्रकाशक आहे. जसे, आरशाचा स्वभावच प्रतिबिंबित करणे (Reflectivity) हा आहे. तुम्ही मला एक आरसा आणून द्या परंतु फक्त एक अट आहे, तो आरसा असा हवा की त्यामध्ये प्रतिबिंब पडता कामा नये. आहे शक्य?

दुसरा प्रश्न असा होता की कर्माची कोणती अवस्था आम्ही करावयाची? उपशम करू की क्षय करू? तुमचा प्रश्न ऐकून मला प्रश्न पडला की मी हसू की रडू? सारं रामायण ऐकल्यावर कोणी विचारतो ना, की रामाची सीता कोण? तसे झाले. जीव आणि कर्माची स्वतंत्रता आपण एवढ्या विस्ताराने पाहिल्यानंतर त्याचे तात्पर्यच हे होते की जीव कर्माच्या एका परमाणुलादेखील पलटवू शकत नाही, दूर करू शकत नाही, जवळ आणू शकत नाही. कर्म असो की शरीर असो की अन्य पुद्गल परमाणु असो की अन्य जीव असो की कोठलेही अन्य द्रव्य असो; जीव कोणाचेही कधीही काहीही करत नाही, करूच शकत नाही. कोणतेही एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करू शकत नाही.

एखादा रोगी असेल तर त्याचे प्रयोजन औषध खाऊन बरे होणे हे आहे. त्याला त्या औषधासंबंधी ज्ञान असेल तर तो दृढ विश्वासाने ते औषध घेईल. वैद्यकीय विद्यार्थांना औषधांचे गुणधर्म, पोटात गेल्यावर त्यामध्ये होणाऱ्या विविध रासायनिक

प्रक्रिया, ते औषध कोणत्या स्वरूपात असर करते, किती वेळ असर रहातो, त्या औषधाचे शरीराबाहेर विसर्जन कोणत्या अवयवाद्वारे होते वगैरे शेकडो गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. अशा माहितगार वैद्यांना जरी रोग होऊन औषध घ्यायची पाळी आली तरी तेदेखील फक्त औषध खाण्याचेच काम करतात. पोटात गेल्यावर त्या औषधामध्ये आता मी कोणती रासायनिक क्रिया करू असा प्रश्न त्यांना पडत नाही.


त्याचप्रमाणे कर्माच्या अवस्थांचे फक्त ज्ञान करावयाचे आहे. कर्मांच्या विशिष्ट अवस्थांबाबत चिंता करण्याचे काहीच कारण नाही. या सर्व अवस्था जाणून पुरुषार्थ तर स्वतःमध्ये करावयाचा आहे. पुरुषार्थ करणे म्हणजे काही वजन उचलणे नाही. स्वतःच्या स्वतंत्रतेचे, स्वभावाचे ज्ञान करून तद्वत तत्त्वनिर्णय करणे हाच तर पुरुषार्थ आहे. कर्मांच्या अवस्थांचे ज्ञान तर झाले पण योग्य तत्त्वनिर्णय नसेल तर जीव अधिकच गर्भगळित होऊन जातो. अहो काय करणार? दर्शनमोहनीय कर्माचा उदय आहे म्हणून मिथ्यात्व परिणाम होतो आहे असे तो मानतो. जो जीव तत्त्वनिर्णयपूर्वक आत्म्यामध्ये एकाग्र होतो त्याच्या दर्शनमोहनीय कर्माचा उदय थांबून उपशम होतो-करावा लागत नाही.

अनेकजण निधत्ति व निकाचित कर्माचा बाऊ करतात. या तर कर्माच्या विशिष्ट अवस्था आहेत, त्याविषयीची चर्चा आपण नंतर करणारच आहोत. कर्माच्या अवस्था व जीवांचे परिणाम एकाच समयात होतात ते एकमेकांचे द्योतक आहेत, करणारे नाहीत. शिवाय तुम्हा आम्हाला कर्म जर दिसतच नाही तर त्याची अवस्था तुम्ही बदलणारच कशी हो?

जो जीव शास्त्राभ्यास, तत्त्वनिर्णय, भेदज्ञान, आत्मसन्मुखता, शुद्धात्म्याची भावना करेल त्याचा दर्शनमोह मंद पडेल, सर्व कर्मांची स्थिति घटेल, नवीन बंध कमी स्थितीचा होईल. आपण कर्मांची उत्कृष्ट स्थिति ७० कोडाकोडीसागर एवढी पाहिली होती ती कमी होऊन अंतःकोडाकोडीसागर म्हणजे १ कोडाकोडीसागरापेक्षा कमी होईल. हे सारे आपोआप होईल. तुम्हा आम्हाला कर्मामध्ये काहीदेखील उलथापालथ करावी लागणार नाही.

आता विषय निघालाच आहे तर दर्शनमोहनीय कर्माचा उपशम कसा होतो ते समजावते. वर सांगितल्याप्रमाणे पुरुषार्थ करणारा जीव जेव्हा आत्म्यामध्ये लीन होण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला करणलब्धि प्राप्त होते - तो करण परिणाम मांडतो - सम्यक्त्वप्राप्तीच्या पूर्वीचे विशुद्ध परिणाम प्रकट करतो त्यावेळी दर्शनमोहनीय कर्मामध्येसुद्धा धावपळ सुरु होते. पूर्वी आपण पाहिले होते की आठही कर्मांचा उदय सदैव चालू असतो. त्यापैकी सर्वप्रथम सम्यक्त्वप्राप्तीच्या वेळी जीव अंतरंगात लीन होतो तेव्हा आधीच मंद पडलेल्या दर्शनमोहनीय कर्माच्या उदयामध्ये काय घडते ते पाहूया.

करणलब्धिचे परिणाम एक अंतर्मुहूर्त रहातात त्यानंतर मिथ्यात्वकर्माचे जे निषेक (कर्म परमाणुंचा समूह) उदयाला येणार होते त्यापैकी काही निषेक लवकर उदयाला येतात व काही निषेक भविष्यातील निषेकांना जाऊन मिळतात व क्रमाने उदयाला येणाऱ्या दर्शनमोहनीयांच्या (मिथ्यात्वाच्या) निषेकांमध्ये अंतर (गॅप) तयार होते - त्यावेळी मिथ्यात्व नावाच्या कर्माचा उदय रहात नाही, उपशम होतो, त्याच वेळी चारित्रमोहनीय कर्मांपैकी अनंतानुबंधी कर्मदेखील उदयास येत नाही, भविष्यकाळात त्याचे निषेक पडून रहातात त्यांचा 'सदवस्थारूप उपशम' होतो.




अनादिपासून कर्मांचा बंध व उदय निरंतर चालू होता त्यामध्ये खिंडार पडते. सर्व कर्मांचा सरदार मिथ्यात्व नावाचे दर्शनमोहनीय कर्मच सर्वात आधी शस्त्र टाकून पसार होते. यासाठी जीवाला कर्मामध्ये काय करावे लागले?

जीव जेव्हा स्वतःमध्ये सम्यक्त्वाची पर्याय सर्व प्रथम प्रकट करतो तेव्हा समोर दर्शनमोहनीय व अनंतानुबंधी कषाय कर्मांचा

उपशम असतोच असतो. परंतु आधी कर्माचा उपशम झाला म्हणून जीवाला पुरुषार्थ न करताच सम्यक्त्व झाले असे कधीच होऊ शकत नाही. कर्माच्या अवस्थेवरुन या सम्यक्त्वाला 'औपशमिक सम्यक्त्व' असे नाव पडले आहे.


कर्माची ही उपशम अवस्था फक्त मोहनीय कर्मामध्येच होऊ शकते. दर्शनमोहनीय कर्माचा उपशम असेल तेव्हा जीवाला औपशमिक सम्यक्त्व असते व अकराव्या गुणस्थानात चारित्रमोहनीय कर्माचा उपशम होतो तेव्हा जीवाला औपशमिक चारित्र असते. लक्षात ठेवा, दर्शनमोहनीय कर्माचा उपशम असला तरी त्यावेळी इतर सर्व कर्मांचा उदय तर निरंतर चालूच रहातो.

कर्मांच्या ज्या दहा अवस्थांची नावे आपण पाहिली होती त्यापैकी बंध, सत्ता, उदय यांचे स्वरूप आपण पाहिले. उपशम बद्दलही आत्ताच चर्चा केली. आता उरलेल्या अवस्थांविषयी चर्चा करूया.

उदीरणा - उदयोन्मुख कर्म लवकर उदयास येणे यास 'उदीरणा' म्हणतात. त्याची शास्त्रोक्त व्याख्या अशी आहे, 'उदयावलिच्या बाहेरील निषेकांचे उदयावलिच्या निषेकांमध्ये येऊन मिसळणे व लवकर उदयास येणे यास उदीरणा म्हणतात'. याचा अर्थ नंतर पाहू, आधी उदाहरण देऊन समजावते.

रेल्वे स्टेशनवर तुम्ही तिकिटांच्या रांगेत उभ्या आहात, तुमचा पन्नासावा क्रमांक आहे. तेवढ्यात तुमची मैत्रीण तिसऱ्या क्रमांकावर आहे असे दिसले. तिनेही तुम्हाला बोलावून तिच्याबरोबर तुमचेही तिकिट काढले. याचा अर्थ असा की ठरलेल्या क्रमांकावरुन निघून तुम्ही आधीच क्रमांक लावलात. त्याचप्रमाणे ज्या कर्मांचा उदयकाल चालू आहे, त्या कर्मांचे निषेक आपापल्या निषेकरचनेप्रमाणे स्थिति पूर्ण करून उदयास येतात परंतु त्याच कर्माचे थोड्या वेळानंतरचे निषेक वेळेआधीच इतर निषेकांबरोबर उदयास येऊन फळ देतात त्यास उदीरणा म्हणतात. त्या निषेकांची स्थिति अधिक होती परंतु तेवढा वेळ न थांबता जे निषेक आधीच उदयास आले त्यांची उदीरणा झाली असे म्हणतात.

व्याख्येचा अर्थ आता पाहूंया. त्यामध्ये उदयावलि असा शब्द आला आहे. आवलि हे काळाचे माप आहे. एका तासात ६० मिनिटे व एका मिनिटात ६० सेकंद हे तर तुम्हाला माहीतच आहे. एका सेकंदात शेकडो आवलि असतात व एका आवलिमध्ये असंख्यात समय असतात. असंख्याताचे असंख्यात प्रकार आहेत त्यापैकी जघन्य युक्तासंख्यात एवढे समय एका आवलिमध्ये असतात.




आपण पूर्वी पाहिले होते की उदयकालामध्ये कर्मांची निषेक रचना झालेली असते. दर समयाला उदयाला येणारे निषेक एकावर एक रचून ठेवलेत अशी आपण कल्पना करूया. वर्तमानसमयापासून दर समयाला एक निषेक याप्रमाणे एक आवलि कालापर्यंत जे निषेक उदयाला येणार असतील त्यांना 'उदयावलि' असे म्हणतात.

उदयावलिमधल्या निषेकांचा उदय तर क्रमाने चालूच असतो परंतु त्या आवलिनंतर उदयास येणारे निषेक आपला क्रम सोडून उदयावलिच्या निषेकांबरोबर वेळेच्या आधीच उदयास येतात त्यास उदीरणा म्हणतात.

आपल्या नित्य परिचयाचे उदाहरण द्यायचे झाले तर आपण मुलांना जेवायला हाक मारतो तेव्हा त्यांना भूक नसते. पण अजून ४-५ मिनिटे होत नाहीत तोच मुलं ओरडू लागतात, मम्मी मला खूप भूक लागलीय, लवकर जेवायला दे ना! क्षुधा, तृषा एकाएकी लागते कारण असाताकर्माची उदीरणा (अथवा तीव्र उदय) होऊन तसे होते.

उदीरणा होऊन आयु कर्माचा 'कदलीघात' होऊ शकतो, माहीत आहे तुम्हाला?

कर्मभूमीतल्या मनुष्य व तिर्यंचांमध्ये आयुची उदीरणा होऊ शकते त्यास 'सोपक्रम आयुष्क' म्हणतात. यामध्ये भुज्यमान आयुचे उरलेले सर्व निषेक लवकर उदयास येऊन सर्व खिरून जातात त्यास 'अपवर्त' अथवा 'कदलीघात' असे म्हणतात. एखाद्या करोड पूर्व आयुकर्मवाल्या जीवाचे एक अंतर्मुहूर्तातच कदलीघात होऊन मरण होऊ शकते. विषभक्षण, अपघात, पाण्यात बुडून, रक्तस्त्राव होऊन असा मृत्यु ओढवू शकतो. आपण याला 'अकालमृत्यु' असेही म्हणतो.

देव, नारकी, भोगभूमीतील मनुष्य व तिर्यंच, चरमशरीरी (तद्भव मोक्षगामी जीव) यांच्या आयुकर्माची उदीरणा होऊ शकत नाही. त्यांना 'निरुपक्रम आयुष्क' म्हणतात. त्या आयुला 'अनपवर्त आयु' असेही म्हणतात.

तुम्ही विचाराल की जर ठरलेल्या आयुष्यापेक्षा लवकर मरण आले तर क्रमबद्धपर्याय कसा सिद्ध होईल? असा प्रश्न उठणे हे साहजिक आहे. याचा अर्थ तुम्ही विचार करत आहात, नुसतेच वाचत किंवा ऐकत नाही.

क्रमबद्धपर्यायाचा अर्थ आहे पर्यायांचा क्रम निश्चित आहे, त्यात कोणताही बदल होऊ शकत नाही. माळेमधल्या मोत्यांची आपापली सुनिश्चित जागा आहे. त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याच्या तिन्ही काळच्या सर्व अनंत पर्यायांचा क्रम सुनिश्चित आहे - इतर कोणीही त्यास निश्चित केलेले नाही - विशिष्ट पर्यायानंतर विशिष्ट पर्याय होण्याची योग्यतारूप धर्म त्या त्या द्रव्यातच विद्यमान आहे. ज्यामधून पर्याय प्रतिसमयाला निघत आहे अशा त्या द्रव्याकडे पाहूनच पर्यायांचा हा क्रम आपण निश्चित करू शकतो. एकाच पर्यायाकडे पाहून अनेक पर्यायांचा क्रम निश्चित होणार नाही, त्याचप्रमाणे दुसऱ्या द्रव्याची पर्याय पाहूनदेखील या द्रव्याच्या पर्यायांचा क्रम निश्चित आहे की नाही हे सांगता येणार नाही.

अनेकांचा इथेच घोटाळा होतो. विशिष्ट ठिकाणच्या कालद्रव्याची पर्याय अर्थात व्यवहारकालाकडे पाहून म्हणजेच परद्रव्याची पर्याय पाहून अनेक जण पर्याय व्हायची तेव्हा होईल, विशिष्ट वर्षाच्या विशिष्ट दिवशी विशिष्ट वाजता ही पर्याय

होणार असा निष्कर्ष काढतात. पर्यायाचा काळ निश्चित आहे असे जेव्हा म्हणतो तो तर त्या द्रव्याचा 'स्वकाल' आहे तो द्रव्यामध्ये आहे, व्यवहारकालामध्ये नाही.

आज ९ ऑगस्ट ९९, सकाळचे ११ वाजले आहेत. माझा लिहिण्याचा राग-ही जी चारित्रगुणाची विभाव पर्याय आहे तिचा स्वकाल आपण दिवसात आणि तासात मोजला तर कितीतरी घोटाळे होतील. हा मुंबईतल्या या ठिकाणचा व्यवहारकाल म्हणजे काल द्रव्याचा स्वकाल आहे. तुमच्या शोभा फै (आत्या) अमेरिकेत रहातात, त्यांच्याकडे ९ ऑगस्ट ९९ चे सकाळचे ११ वाजायला अजून १०॥ तास अवकाश आहे. पृथ्वीवरील प्रत्येक ठिकाणी ती वेळ त्यांच्या स्थानिक वेळेनुसार आधी किंवा नंतर येईल. त्यामुळे माझी पर्याय या व्यवहारकालामध्ये मोजण्यात काही अर्थ नाही. बरं, नुसतं सकाळी ११ वाजता म्हटलं तर रोजच ११ वाजतात, नुसतं ९ ऑगस्टला म्हटलं तर दरवर्षी ९ ऑगस्ट येतो. ९९ साली म्हटलं तर दर शंभर वर्षांनी ९९ साल येते, जसे १८९९, १९९९ वगैरे. १९९९ साली म्हटले तरी विक्रम संवत की वीर संवत की ईसवी सन वगैरे भानगडी आल्या. अजूनही खोलवर विचार केल्यास उत्सर्पिणीकाळ, अवसर्पिणीकाळ देखील विचारात घ्यावा लागेल. त्यापुढे जाऊन विशिष्ट कल्पकाळाबद्दल बोलावे लागेल.

विशिष्ट काळी माझी पर्याय होणार हे तर परद्रव्यसापेक्ष कथन आहे - कालद्रव्याच्या पर्यायाच्या अपेक्षेने कथन आहे. परद्रव्यांचीच सापेक्षता घ्यायची असेल तर इतरही अनंत परद्रव्यं आहेत. जसे आता माझ्यासमोर कागद आहे, हे विशिष्ट शरीर यासमयी माझ्या संयोगात आहे, त्याच्या हाताची विशिष्ट हालचाल चालू आहे, हातामध्ये पेनची अवस्था वर खाली होत आहे, त्यातील शाईच्या परमाणुंची अवस्था बदलत आहे, पेनमधून उतरुन कागदावर विशिष्ट आकारात त्यांची रचना होत आहे. माझ्या मनःचक्षुंसमोर तुम्ही दोघी आहात, तुम्हालाही समजून घेण्याची इच्छा आहे. एक ना दोन या सर्व अनंत द्रव्यांच्या आपापल्या पर्याय या समयाला विशिष्ट आहेत, त्या सर्व त्या त्या द्रव्यांचा 'स्वकाल' आहे. एकाच समयात

आढळणाऱ्या या गोष्टींचे ज्ञान करण्यासाठी अनुकूल वाटणाऱ्या गोष्टींना निमित्त असे म्हटले जाते.

परंतु त्यांना निमित्त म्हटले तरी माझी पर्याय माझ्या स्वकालाप्रमाणे माझ्या द्रव्यात होत आहे, निमित्तांची पर्याय हा निमित्तांचा स्वकाल आहे. प्रत्येक वस्तु आपल्या द्रव्य, क्षेत्र, काल, भावांमध्ये निबद्ध आहे. या स्वचतुष्टयाचा परचतुष्टयाशी सुतराम संबंध नाही. आपल्याला समंजण्यासाठी हे सारे परद्रव्यसापेक्ष कथन केले जाते.

शास्त्रात अकालमृत्यु असा शब्द आला तरीदेखील मरणाच्या पर्यायाचा तो स्वकालच आहे, त्याचे ते स्वकालमरणच आहे. काल सोडून इतर निमित्तांची आपण चर्चा करतो, त्यावेळी काल नाही तो अकाल म्हणून त्यास आपण अकालमरण असे नाव देतो.

कर्माचा उदय होणार की उदीरणा ही त्या कर्माची स्वतःची योग्यता आहे. कर्माची अवस्था म्हणजे पर्याय त्याच्या स्वतःच्या क्रमनियमित वेळीच होते. सहाही द्रव्यांच्या सर्व पर्याय क्रमबद्धच आहेत. ज्ञान त्यांना आगाऊ म्हणजे होण्यापूर्वी जाणू शकते; हे ज्ञानाचे स्वतःचे वैशिष्ट्य आहे, ज्ञानपर्यायाचे ते सामर्थ्य आहे. ज्ञानाने जाणले म्हणून त्या पर्यायाला तसेच व्हावे लागते अशी पराधीनता पर्यायामध्ये नाही. प्रत्येक द्रव्य, गुण आणि पर्याय स्वतःच्या योग्यतेने, स्वसामर्थ्याने विद्यमान आहे.

केवलीभगवंतांनी जाणलं असेल त्याप्रमाणे आम्हाला सम्यग्दर्शन ज्यावेळी व्हायचे असेल त्यावेळी होईल याचा खरा निर्णय कालद्रव्याच्या पर्यायाकडे पाहून होणार नाही, केवलज्ञानाच्या एका पर्यायाकडे पाहून होणार नाही, आपल्या विद्यमान श्रुतज्ञानाच्या पर्यायाकडे पाहून होणार नाही परंतु सर्वज्ञस्वरूपी अशा निजशुद्ध त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याकडे पाहून-त्यात लीन होऊन-त्याच्या श्रद्धापूर्वकच क्रमबद्धपर्यायाचा यथार्थ निर्णय होऊ शकेल.

प्रत्येक द्रव्याच्या तिन्ही काळाच्या सर्व पर्याय सर्वज्ञ भगवान केवलज्ञानाद्वारे प्रत्यक्ष जाणतात. आपण आपल्या ज्ञानाद्वारे

भगवंतांच्या सर्वज्ञतेचा निर्णय करतो त्यातच क्रमबद्धपर्यायाचा निर्णयही गर्भितच असतो. तसे मानले नाही तर सर्वज्ञ शब्दाला काही अर्थच उरणार नाही - सर्वज्ञताच धोक्यात येईल. जो सर्वज्ञाचे स्वरूप निश्चित करतो त्याची दृष्टि स्वत:च्या सर्वज्ञस्वभावावर आल्याशिवाय रहात नाही. म्हणूनच असे निश्चित होते की सम्यग्दृष्टि जीवालाच क्रमबद्धपर्यायाचा खरा निर्णय असतो.

स्वामिजींनी वारंवार म्हटले आहे की क्रमबद्धपर्यायाचा निर्णय करणाऱ्याची दृष्टि सर्वज्ञ स्वभावी निजपरमात्म्यावर गेल्याशिवाय रहात नाही, त्याशिवाय क्रमबद्धपर्यायाचा निर्णय यथार्थ होत नाही. पर्यायाच्या क्रमबद्धतेचा निर्णय पर्यायाकडे पाहून होत नाही, स्वद्रव्याकडे पाहून होतो. हा अज्ञानी भोळा जीव तर परद्रव्यांच्या पर्यायांकडे पहाण्यात लीन आहे व तोंडदेखले 'क्रमबद्धपर्यायामध्ये आहे तसे होईल' असे म्हणतो; हा त्याचा निर्णय यथार्थ नाही. त्याच्या मान्यतेमध्ये पर्यायांची पराधीनता आहे. परंतु क्रमबद्धपर्यायाचे यथार्थ ज्ञान करणारा ज्ञानी पर्यायांची स्वतंत्रता जाणतो.

मुलींनो, तुम्ही सुद्धा निजशुद्धात्म्याच्या प्रतीतिपूर्वक क्रमबद्धपर्यायाचा यथार्थ निर्णय कराल याची मला खात्री आहे.

कळावे,

**तुमची आई.**

जर कर्म स्वत: कर्ता होऊन प्रयत्नपूर्वक जीवाच्या स्वभावाचा घात करेल, बाह्य सामुग्री मिळवून देईल तर कर्माला चेतनपणादेखील पाहिजे आणि बलवानपणा देखील! परंतु असे तर असत नाही. हा तर सहजच निमित्त-नैमित्तिक संबंध आहे.

**मोक्षमार्गप्रकाशक पृष्ठ २५.**

# कर्माच्या उर्वरित अवस्था

पत्रांक ८ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ १०ऑगस्ट१९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

तुमची करणानुयोगासंबंधी रुचि जागृत होत आहे हे पाहून आनंद झाला. तुम्हाला माहीतच आहे की गेली २ वर्ष मी रोज सकाळी ८॥ ते १० गोम्मटसार जीवकाण्ड वरील टीका-सम्यग्ज्ञान चंद्रिका भाग १ शिकवत होते. कालच हा ग्रंथ शिकवून पूर्ण झाला. अरविंदभाई दोशींनी कबूल केले, 'भाभी, मी स्वतः इंजिनीयर, गणितात मी स्वतःला आजपर्यंत खूप हुषार समजत होतो. परंतु या ग्रंथातील गणितं स्वतः वाचूनही समजत नाहीत अशी आहेत.' या अरविंद काकांच्या सतत आग्रहामुळेच मी हा क्लास सुरू केला होता. जयपूर शिबिराहून परतल्यावर २६ ऑगस्टपासून आम्ही पुढचा भाग-कर्मकांड शिकण्यास घेणार आहोत.

मुलींनो, यातील सूक्ष्म विषय व गणितं शिकविताना अनेकदा वाटायचे की, तुम्ही दोघी व तुमच्यासारखा बुद्धिमान तरुण वर्ग समोर बसून शिकत असता तर किती बरे झाले असते. अग तुमचे मोठमोठे कॉम्प्युटर्स व कॅलक्युलेटर्स फेल होतील अशी तर ही गणितं आहेत - बुद्धीला आव्हान देणारी! ही गणितं सोडविल्यावर एक वेगळाच आनंद आपल्याला होतो.

अनेक जणांना हाच प्रश्न पडतो की, हे सारे शिकून आपल्याला काय फायदा होणार? एक तर त्यासंबंधीचे अज्ञान दूर होऊन जीव, कर्म व इतर अनेक गोष्टींचे स्वरूप आपल्याला स्पष्ट समजू लागते. या अभ्यासाने कषायांची मंदता होते व बुद्धीची प्रखरता वाढते. हाही एक उच्च प्रतीचा शुभभाव आहे व त्यामुळे सातिशय पुण्याचा बंध होतो.

कर्मांच्या अवस्थांचे ज्ञान होऊ लागल्यावर कर्माबद्दलची अज्ञानापोटी जी मिथ्याभ्रांति व भीति होती ती गळून पडते. सर्वज्ञ भगवंतांनी या सर्व गोष्टी प्रत्यक्ष स्पष्टपणे जाणल्या आहेत.

अवधिज्ञानी मुनींच्याही हे ज्ञानात येऊ शकते. मुनींनी आगमामध्ये (ग्रंथांमध्ये) या सर्व गोष्टी विस्ताराने लिहून ठेवल्या आहेत, हे आपणा अज्ञ लोकांवर महान उपकार आहेत. हे ग्रंथच आपले गुरु आहेत. नाहीतर सध्याच्या या काळात ज्ञानाचे हे भांडार आपल्याला कोणाजवळ शिकावयाला मिळाले असते? याचे जाणकार विद्वान असतील व आहेतही, परंतु आपल्या वेळेनुसार ते आपल्याला शिकविणार कसे?

सत्यमहाव्रतधारी मुनींनी परंपरेने चालत आलेल्या ज्ञानाचे ग्रंथरूपाने लिखाण केले आहे. ही परंपरादेखील सर्वज्ञापासून चालत आलेली आहे. सर्वज्ञांनी देखील प्रत्यक्ष जाणून कथन केलेले आहे. या कोणाच्या कल्पना नाहीत, असत्य तर नाहीच नाहीत. ज्यांना तत्त्वज्ञानाची रुचि नाही, त्याबद्दल काही माहिती नाही, सर्वज्ञाबद्दल श्रद्धा नाही, सर्वज्ञाचे स्वरूप ज्यांना माहीत नाही त्या लोकांना या सर्व थापा वाटतात; त्यांचा या गोष्टींवर विश्वास बसत नाही.

आपण आपल्या मनालाच विचारूया की, रोज वर्तमानपत्रातल्या बातम्यांवर आपण जेवढा विश्वास ठेवतो, त्याच्या काही अंशाने तरी या आगमशास्त्रावर विश्वास ठेवतो का? ज्या रुचीने रोज दैनिक (पेपर) वाचतो त्याच्या शतांश रुचीने तरी शास्त्र वाचतो का? महिनाभरात दैनिक व मासिक यांच्यासाठी जेवढे पैसे खर्च करतो तेवढे जिनवाणीवर खर्च करतो का? ते तर सोडा, रद्दी विकून आलेल्या पैशांएवढी रक्कम तरी दरमहा जिनवाणीच्या खरेदीवर लावतो का?

शेजाऱ्याचा पेपर उसना आणून वाचण्यात आपल्याला कमीपणा वाटतो. प्रत्येकाला स्वतःचा पेपर व तोही लवकरात लवकर हवा असतो. जिनवाणी वाचण्यासाठी एवढी तळमळ वाटते का? कुटुंबातील अनेक जणांमध्ये एक ग्रंथ पुरेसा वाटतो. आळीपाळीने ग्रंथ वाचण्याची उदारता (?) हा जीव दाखवतो.

एका कुटुंबातील प्रत्येकाचे कपडे वेगळे, कपाट वेगळे, खोली वेगळी, बँकेतील खाते वेगळे, धंदा-व्यवसाय वेगळा परंतु ग्रंथ मात्र सर्वांत मिळून एकच पुरे! तेवढाही असला तरी खूप झाले असे म्हणावयाची पाळी आली आहे!

स्वतःकडेच पहाण्यासाठी हे सारे प्रश्न उभे केले आहेत. दुनियाभरच्या खऱ्या खोट्या बातम्यांमध्ये आपल्याला किती रस आहे नि स्वतःचेच स्वरूप समजाविणाऱ्या ग्रंथांमध्ये आपल्याला किती रस आहे हे ज्याचे त्याने स्वतः तपासून पहावे - पडताळून घ्यावे.

'आम्ही खूप प्रयत्न करतो हो, पण सम्यग्दर्शन होत नाही, आमचा पुरुषार्थ कमी पडतो ना?' असे विचारणाऱ्यांना एकच उत्तर आहे, 'तुम्हाला अजून हवी तशी रुचि लागलेली नाही. 'रुचि अनुयायी वीर्य' असा सिद्धांत आहे.

मुलींनो, मला समजत नाही असे म्हणून या अभ्यासाकडे पाठ फिरवू नका, यापासून विमुख होऊ नका. सुरुवातीला काही शब्द नवे व अवघड वाटतात परंतु वरचेवर ऐकण्या वाचण्याने ते आपल्या सवयीचे होतात. दहा गोष्टी सांगितल्या त्यापैकी २-३ तरी समजतील ना? जेवढे ज्ञान होईल तेवढा आनंद वाटेल, तत्त्वज्ञानाची विशिष्ट दृष्टि तयार होईल. लौकिक संकटांची भीति नाहीशी होईल. जीवनातल्या अनेक गोष्टींबद्दल वाटणारे तीव्र रागद्वेषाचे परिणाम थंडावतील. मरणाबद्दलच्या भ्रांत कल्पनांचे व भयाचे निराकरण होईल.

लौकिक शिक्षणाने जीवन सुधारलेले व सुखावह झालेले आपण पहातो. हे तर लोकोत्तर शिक्षण आहे. याने जीवन, मरण व पुढचे भवदेखील सुधारतात, सुखावह होतात व भवाचा अभाव होऊन मोक्षाची प्राप्ति होते.

कर्माच्या दहा अवस्थांपैकी आपण बंध, सत्ता, उदय, उदीरणा व उपशम या अवस्थांबद्दल माहिती पाहिली. उरलेल्या अवस्थांबद्दल अगदी थोडक्यात माहिती पाहूया. कर्माबद्दल फक्त तोंडओळख करून द्यायचा माझा उद्देश होता, परंतु बरेच काही लिहिले गेले. आपल्याला अजून गुणस्थान, मार्गणा व जीवाच्या २० प्ररूपणा थोडक्यात पहावयाच्या आहेत.


तुम्हाला पूर्वीच सांगितले होते की, जीवाने कर्म बांधल्यानंतर ते उदयाला येईपर्यंत त्यात उलथापालथ होऊ शकते. ज्या स्वरूपात कर्म बांधले जाते त्याच रूपात उदयाला येईलच अशी खात्री देता येत नाही. जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने सत्तेमध्ये

पडलेल्या कर्मांमध्ये हे बदल घडून येतात. त्यापैकी उत्कर्षण व अपकर्षण या दोन अवस्था पाहूया.

उत्कर्षण म्हणजे वाढणे, अपकर्षण म्हणजे कमी होणे. प्रदेश व प्रकृतिमध्ये तर हानि-वृद्धि शक्य नाही. स्थिति व अनुभाग यांच्यामध्ये ही हानि-वृद्धि होते.

जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने सत्तेमधील कर्माची स्थिति व अनुभाग वाढणे यास 'उत्कर्षण' म्हणतात.

जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने सत्तेमधील कर्माची स्थिति व अनुभाग कमी होणे यास 'अपकर्षण' म्हणतात.




आपण पाहिलेच होते की शास्त्रश्रवण, तत्त्वचिंतन, तत्त्वनिर्णय, भेदज्ञान वगैरेमुळे कर्माची स्थिति घटून अंतःकोडाकोडी सागर इतकी होते. नवा बंधदेखील कमी स्थितिवाला होतो.

पूर्वी मी खूप पाप केले आहे व त्यामुळे बरीच पापकर्म बांधली आहेत म्हणून उगीचच शोक करत बसण्याची गरज नाही. केलेल्या दुष्कृत्यांबद्दल पश्चात्ताप जरी वाटत असला तरी त्याच्याच विचारात अश्रु गाळत बसणे शहाणपणाचे होणार नाही.

ही झाली स्थिति, अनुभागातील हानि-वृद्धि. आता प्रकृतिंमध्ये काय होऊ शकते ते पाहूया. कोणतीही मूलप्रकृति अन्य मूलप्रकृतिरूप होऊ शकत नाही. ज्ञानावरण वगैरे बदलून दर्शनावरण किंवा अन्य प्रकृतिरूप होऊ शकत नाही. तसेच, दर्शनमोहनीय बदलून चारित्रमोहनीय होऊ शकत नाही. चार आयुंपैकी एक आयु पलटून अन्य आयुरूपाने होऊ शकत नाही, मनुष्यायु पलटून देवायुरूप होऊ शकत नाही.

परंतु काही कर्मप्रकृति सजातीय अन्य प्रकृतिरूप होऊ शकतात, यास 'संक्रमण' असे म्हणतात. जसे, जीवाच्या विशुद्ध परिणामांच्या निमित्ताने पूर्वी बांधलेल्या असातावेदनीय कर्मप्रकृतिच्या परमाणुंचे संक्रमण होऊन ते सातावेदनीयरूप परिणमित होतात.

निधत्ति — ज्या कर्मप्रकृतिंमध्ये संक्रमण व उदीरणा होऊ शकत नाही, त्यांना 'निधत्ति' कर्म म्हणतात.

निकाचित — ज्या कर्मप्रकृतिंचे संक्रमण, उदीरणा, उत्कर्षण व अपकर्षण होऊ शकत नाही, त्या कर्मप्रकृतिंना 'निकाचित' कर्म म्हणतात. ती जशी बांधली आहेत तशीच उदयाला येतात. अर्थात त्यांचे फळ त्याच रूपात मिळते.

अनेक जाणकार लोकदेखील या निधत्ति निकाचित कर्माचा बाऊ करतात. ही कर्म आपल्याला भोगावी लागतात म्हणून एकदुसऱ्यांना भीति घालतात. अगं, ही कर्म काही पुरुषार्थ करण्यात आडकाठी आणत नाहीत. आपण खरोखरीच या कर्मांना वाईट समजतो का? याचाही विचार करूया.

चक्रवर्तीचे पद महान पुण्याच्या उदयामध्ये मिळते. हे पुण्य असे आहे की ते भोगावेच लागते. तसेच निधत्ति, निकाचित प्रकारचे पुण्यकर्मही भोगावेच लागते, त्यातून सुटका नाही. तुम्ही म्हणाल, 'हाश! एवढेच ना? पुण्य भोगावे लागते त्यात काही आमची हरकत नाही.' पहा बरं, पापकर्म भोगावेच लागेल म्हटले तर हा जीव घाबराघुबरा होतो व पुण्यकर्म भोगावे लागेल म्हटले असता खुश होतो. यावरुन बंधाला त्याने चांगले मानले. बंध तत्त्वासंबंधी ज्याची चूक होते त्याची सातही तत्त्वांमध्ये चूक होत असते.

आपली मनुष्यायु बदलून तिर्यंचायु होत नाही हे चांगले की वाईट? आयुकर्माचा कदलीघात होऊन लवकर मरण येत नाही हे आपण चांगले मानले की वाईट?

म्हणूनच कोठल्याही ऐकीव गोष्टींवर विश्वास न ठेवता ग्रंथांच्या आधारे, शास्त्रातील कथनाच्या आधारे त्या उक्तिमधील खरेखोटेपणा पडताळून पाहिला पाहिजे. आता तुम्ही ग्रंथांच्या

आधारे अभ्यास करावयाला शिकले पाहिजे. आपला हा पत्ररूप स्वाध्याय तर तुम्हाला रुचि उत्पन्न व्हावी म्हणून दाखवलेले सँपल आहे, नमुना आहे.

कर्माच्या या सर्व अवस्था जाणल्यानंतर तुम्हाला प्रश्न पडेल की, 'शास्त्रामध्ये कर्माचा क्षय होतो, क्षयोपशम होतो असे कथन तर वारंवार येते, परंतु या दहा अवस्थांमध्ये तर त्यांचा उल्लेखही नाही.'

अगं, कर्माचा क्षय होणे याचा अर्थ आहे कर्माचे अकर्मरूप होणे. कार्माणवर्गणांचे कर्म बनते. हे कर्म पुनः कार्माणवर्गणारूप किंवा अन्य पुद्‌गल परमाणुरूप होते तेव्हा त्यास कर्माचा नाश झाला असे म्हणण्यात येते. अर्थात कर्माचा उदय झाला असता ते कर्म आपली कर्मरूप अवस्था बदलून कार्माणवर्गणारूप होते. त्या कार्माणवर्गणा, आहेत तेथेच जीवप्रदेशांमध्ये पडून रहातात किंवा अन्य ठिकाणी जातात, परंतु आता त्यांचा जीवाशी कोणताही निमित्त नैमित्तिक संबंध उरत नाही.

म्हणून कर्माच्या उदय या अवस्थेमध्ये क्षय अंतर्गत आहे. कर्माची निर्जरा असाही शब्द वारंवार वाचण्यात येतो. कर्माची स्थिति पूर्ण होताच कर्म निघून जाते परंतु त्याचवेळी त्याचे फळ जीवास मिळते त्यास 'उदय' म्हणतात. जीव त्यामध्ये सुखी दुःखी झाला तर त्यास कर्माचा उदय (अनुभाग उदय) म्हणतात. परंतु जीव जर त्यामध्ये जोडला गेला नाही, शुद्धोपयोगात राहिला तर त्याने कर्माचे फळ स्वीकारले नाही म्हणून अनुभाग उदय झाला नाही परंतु स्थितिउदय, प्रकृतिउदय व प्रदेशउदय तर झाला, कर्म तर अकर्मरूप झाले म्हणून त्यास 'निर्जरा' असे म्हणण्यात येते.

काही लोक दुःखाच्या प्रसंगामध्ये शांतिपूर्वक ते दुःख सहन करतात, त्यात त्रागा, शोक करीत नाहीत यास 'अकामनिर्जरा' म्हटले आहे. निर्जरा तर होते परंतु मोक्षमार्गामध्ये ही निर्जरा काही कामाची नाही, म्हणून त्यास अकामनिर्जरा म्हटले आहे. परंतु आत्मलीनतेद्वारे अर्थात शुद्धोपयोगाद्वारे जी निर्जरा होते ती संवरपूर्वकची निर्जरा आहे, त्यास 'सकामनिर्जरा' म्हणतात. या

संवर व निर्जरा दोन्हींना मोक्षमार्ग म्हटले आहे.

निर्जरा अन्य दोन प्रकारांनी देखील सांगितली जाते, - सविपाक निर्जरा व अविपाकनिर्जरा. विपाक म्हणजे कर्माचे फळ. अनुभाग उदय होऊन अर्थात कर्माचे फळ देऊन निर्जरा होणे 'सविपाक निर्जरा' होय आणि कर्माचे फळ न देताच खिरून जाणे 'अविपाक निर्जरा' होय. अविपाक निर्जरा व सकामनिर्जरा समानार्थी आहेत.

आता प्रश्न उरला क्षयोपशम काय आहे यासंबंधीचा. यामध्ये कर्माच्या तीन अवस्था गर्भित आहेत - क्षय, उपशम व उदय. उदय न होणे अर्थात उदयाचा अभाव तो 'क्षय'. कर्माची उदीरणा होऊन ते उदयास न येणे-सत्तेत पडून रहाणे तो 'उपशम'. पूर्णपणे आवरण घालणाऱ्या म्हणजेच सर्वघाति प्रकृतिंचा वर्तमानकाळात उदय न होणे, भविष्यकाळात सत्तेमध्ये पडून रहाणे व त्यांचे अर्धवट आवरण घालणाऱ्या अर्थात देशघाति कर्मरूपाने उदयास येणे यास 'क्षयोपशम' म्हणतात. ज्ञान, दर्शन, वीर्य वगैरेंचा घात करणाऱ्या ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय वगैरे कर्मांचा क्षयोपशम होतो, अर्थात ही कर्म त्या त्या गुणांचा पूर्णरूपाने घात करू शकत नाहीत- त्यांच्यावर पूर्ण आवरण घालू शकत नाहीत. थोड्या प्रमाणात का होईना हे गुण पर्यायामध्ये प्रकट असतातच.

कर्माच्या उदय, उपशम, क्षयोपशम व क्षय या अवस्था असतात त्याच वेळी जीवाचे जे भाव असतात त्यास अनुक्रमे औदयिक, औपशमिक, क्षायोपशमिक व क्षायिक भाव असे संबोधण्यात येते. जीवाचे परिणमन जीवामध्ये होते व कर्माचे परिणमन कर्मामध्ये होते, हे आपण पूर्वी पाहिलेच आहे.

कर्माच्या कोणत्याही अपेक्षेने रहित असा जीवाचा जो भाव आहे त्यास 'पारिणामिक' भाव असे म्हणतात. या परमपारिणामिक भावाच्या आश्रयानेच अर्थात यामध्ये मीपणा स्थापित करून यालाच ज्ञानाचे ज्ञेय, श्रद्धेचे श्रद्धेय व ध्यानाचे ध्येय बनवून जीवास सम्यग्दर्शनाची प्राप्ति होते, त्यामध्ये स्थिरतेद्वारे मोक्षमार्गावर अग्रेसर होऊन पूर्ण स्थिरतेद्वारे सर्व

कर्मांचा क्षय होऊन निष्कर्म अशा मोक्षदशेची प्राप्ति होते. जीव पर्यायामध्ये शुद्ध स्वरूपात विराजमान होतो.

कर्मांचा अभाव झाल्यावर नोकर्म किंवा भावकर्म असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अनंत काळ हा जीव शुद्ध स्वरूपात-सिद्ध अवस्थेमध्ये अव्याबाध अनंत सुखाचा आस्वाद घेत रहातो.

मुलींनो, कर्मासंबंधीचे अज्ञान असतांना कर्म बलवान आहे असा गैरसमज होता. परंतु त्याच्या अवस्थांचे ज्ञान झाले असता हे लक्षात येते की, जीवच बलवान आहे. अनादिपासून अनंतानंत कार्माणवर्गणांचे ग्रहण केले व सोडले, परंतु माझ्या स्वभावात यत्किंचितदेखील फरक पडला नाही; मी स्वयंसिद्ध, अकृत्रिम, परिपूर्ण, सदैव ज्ञानदर्शनमय विराजमान आहे.

मुलींनो, कर्माच्या अवस्थांचे ज्ञान करून कर्मनिरपेक्ष अशा स्वतःच्या परमपारिणामिक भावाचा - स्वभावाचा आश्रय घेऊन आपणही द्रव्यकर्म, भावकर्म व नोकर्म यांनी रहित अशी सिद्ध अवस्था लवकरच प्राप्त करूया, अशा मंगलभावनेने हे कर्मपुराण येथेच थांबवते.

कळावे,

**तुमची आई.**

ज्ञायक स्वभावाची दृष्टि म्हणा अथवा क्रमबद्धपर्यायाचा निर्णय म्हणा अथवा मोक्षमार्गाचा पुरुषार्थ म्हणा तिन्ही एकाच वेळी असतात. सर्वज्ञाच्या केवलज्ञानाचा निर्णय आणि स्वतःच्या ज्ञानामध्ये तशा सर्वज्ञतेचे सामर्थ्य आहे याचा निर्णय ज्ञानस्वभावाच्या सन्मुखतेमध्ये एकदम होतो. अक्रमरूप अखंड ज्ञायकस्वभावी द्रव्याच्या दृष्टिशिवाय पर्यायाच्या क्रमबद्धतेचे यथार्थ ज्ञान होत नाही.

**ज्ञानस्वभाव ज्ञेयस्वभाव पृ. ११५**

# 'गुणस्थानादि जाणण्याचे प्रयोजन'

पत्रांक ९ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २८ ऑगस्ट १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

आम्ही जयपूर शिबिराहून २५ तारखेस परतलो. शिबिरामुळे मध्यंतरी पत्रलिखाण लांबणीवर पडले. लिखाण जरी केले नाही तरी माझे चिंतन मनन तर सतत चालूच असते. स्वतःलाच संबोधून मी अनेक प्रकारांनी स्वतःच्या दोषांचे अवलोकन करण्याचा प्रयत्न करते. 'हे जीवा' असे म्हणून मी मलाच अनेक गोष्टी शिकवित असते. त्यातील काही विचार मी येथे मांडत आहे, तुम्ही सुद्धा त्यावर विचार करावा असे वाटते. तुमच्याकडेही माझ्या मुली अशा दृष्टीने न पहाता जीव या दृष्टीने पाहून हे संबोधन करत आहे.

'हे जीवा, तू ज्ञान आणि आनंदाचा घनपिंड आहेस तरी देखील तू दुःखी का आहेस याचा कधी विचार केला आहेस का? दुसऱ्याच्या संयोगांकडे पाहून तू देखील संयोगांना गोळा करण्यात प्राप्त आयुष्य खर्ची घातलेस, तरीदेखील तू आकुलितच राहिलास. ही आकुलता हेच दुःख आहे. हे दुःख रागद्वेषादि शुभाशुभ भावांमुळेच आहे. तुझा स्वभाव तर त्रिकाल ज्ञान आनंद स्वरूप आहे, यास्तव तुझे प्राप्त ज्ञान स्वभावाला जाणण्यात लीन होईल तर त्यात अवश्य आनंदाची अनुभूति होईल. परंतु तेच ज्ञान शुभाशुभ भावांना जाणण्यामध्ये अडकून राहील तर त्यांचे दुःखरूप वेदन करेल.'

तुम्ही म्हणाल, 'काय करणार? आम्हाला स्वतःचे ज्ञान नाही'.

'हे ज्ञायक! सम्पूर्ण विश्वाला जाणणाऱ्या सर्वज्ञ शक्तियुक्त हे जीवा! मी स्वतःलाच जाणू शकत नाही असे तुझे कथन तुला हास्यास्पद नाही का वाटत? तुला दुनियेला जाणण्यामध्ये रस आहे, रुचि आहे म्हणून एक क्षणभरदेखील स्वतःकडे वळण्याचा तू प्रयत्नदेखील करीत नाहीस. तुझी प्रत्येक समयाची ज्ञानाची पर्याय तुझ्या स्वतःमध्ये होत आहे, तुझ्या सर्व असंख्यात

प्रदेशांमध्ये होत आहे परंतु तुला ज्ञायकाचा-जाणणाऱ्याचा भरवसा नाही, फक्त ज्ञेयाचाच आहे. ज्ञेयामधूनच मला ज्ञान होत आहे असे मानून परज्ञेयांकडेच तू आशाळभूतपणे पहात आहेस. हा वेडेपणा तू कधी सोडशील?

तू खऱ्या देव, गुरु, शास्त्राचा आश्रय घेतलास हे फार चांगले झाले परंतु तू तेथेच अडकून राहिलास. देव, शास्त्र व गुरुकडून तुला उपदेश मिळाला की 'तू स्वतःच भगवान आहेस - स्वतःकडे पहा.' परंतु तू असा भाबडा निघालास की शास्त्रामुळे ज्ञान होते असे मानून त्यातच संतुष्ट होऊन बसलास. मी २५-३० वर्षांपासून शास्त्राभ्यास करत आहे म्हणून बढाया मारू लागलास.

शास्त्रांमध्ये आत्म्याची म्हणजे स्वतःची महिमा ऐकून स्वतःकडे वळायचे सोडून तू दुसऱ्यांना आत्म्याची महिमा सांगण्यास प्रारंभ केलास. अशाप्रकारे ऐकणाऱ्यांची व ऐकविणाऱ्यांची फौज उभी राहिली. प्रचार प्रसार करण्यात तू एवढा मग्न झालास की यालाच आपल्या दुर्लभ मनुष्यपर्यायाची इतिकर्तव्यता मानलीस. लोकांनीही अभिनंदन पत्रं बहाल केली व तू फुग्याप्रमाणे मानकषायाने फुगून स्वतःला मोठा मानू लागलास.

यामध्ये एक बारीकशी उणीव एवढीच राहून गेली की ज्या आत्म्याची महिमा तू गुणगान करून दुसऱ्यांना ऐकवत होतास तो आत्मा मी स्वतःच आहे असे खऱ्या अंतःकरणाने तू मानायला हवे होतेस. तसे मानले असतेस तर तुझा उपयोग दुसऱ्या कोणी तुला न शिकविता, स्वसन्मुख झाला असता, तू स्वतःला ज्ञायकरूपामध्ये ओळखले असतेस व त्याचक्षणी आनंदाचे भांडार तुला गवसले असते.

त्यानंतर देखील तुझे शिकणे-शिकविणे चालूच राहिले असते परंतु आता तू त्याला आपले कर्तव्य मानले नसतेस, त्यातली तुझी कर्तृत्वबुद्धि-कर्तव्यबुद्धि नष्ट झाली असती, आकुलता कमी झाली असती.'

मुलींनो, गुणस्थान मार्गणास्थान इत्यादि संबंधीचे थोडेसे तरी ज्ञान आवश्यक आहे. अध्यात्मग्रंथ वाचून द्रव्यानुयोगाप्रमाणे

जाणणे तर अतिआवश्यकच आहे. परंतु ते वाचणारा जर करणानुयोगाचा निषेध करीत असेल तर त्या द्रव्यानुयोगाच्या पक्षपाती व्यक्तिसाठी पं. टोडरमलजींनी 'सूक्ष्माभासबुद्धि' असे संबोधन वापरले आहे.

अशा जीवांना उद्देशून म्हणावेसे वाटते की, ''समयसार तर तू वाचून टाकलास. गुणस्थान-मार्गणास्थान मी नाही - मी तर एक ज्ञायकभाव आहे असे सांगणारी गाथादेखील तू पाठ केलीस. तुला जर कोणी विचारले की हे गुणस्थान-मार्गणास्थान काय भानगड आहे की ज्याच्यापासून तू भिन्न आहेस? यावर तू उत्तर देशील की,'कोणास ठाऊक? मी तर द्रव्यदृष्टिवाला आहे. करणानुयोगाशी मला काही प्रयोजन नाही.' बा जीवा! तुझी अशी मान्यता असेल तर तू स्वतःलाच फसवित आहेस. यांचे स्वरूप तुला माहीत नाही तर तू कसे म्हणू शकतोस की मी यांच्यापासून भिन्न आहे?''

सम्पूर्ण जिनवाणी चार अनुयोगांमध्ये गुंफलेली आहे, विभाजित आहे व चारही अनुयोगांचे सार वीतरागता आहे. कुठल्याही अनुयोगाचा निषेध करणे म्हणजे जिनवाणीचा निषेध करणे ठरेल व जिनवाणीचा निषेध हा जिनेन्द्र भगवंतांचा निषेध ठरेल. जो सर्वज्ञाचा निषेध करतो तो सर्वज्ञस्वरूपी अशा निजशुद्धात्म्याचा निषेध करतो. स्वतःच्या अस्तित्वाचाच निषेध करणारा जीव धर्म कसा बरे प्रकट करू शकेल?

जिनवाणी तर स्याद्वाद मुद्रित आहे अर्थात भिन्न भिन्न अपेक्षांनी वस्तुचे (द्रव्यांचे) वर्णन करून अशाप्रकारे आपल्याला समजाविण्यात आले आहे की आपण कोठे काही गफलत-घोटाळा करणार नाही.

कर्म, गुणस्थान, मार्गणा वगैरेंचे ज्ञान शास्त्रात आपल्याला सांगण्यात आले आहे. कारण त्यामुळे जीवाच्या संयोगातील अन्य द्रव्यांचे, निमित्तांचे, जीवाच्या विभिन्न पर्यायांचे यथार्थ ज्ञान आपणास होते. जीवाची व कर्मादि परद्रव्यांची भिन्नता यामुळे स्पष्टपणे लक्षात येते. परंतु जो जीव या सर्व शास्त्रांना निरर्थक मानतो व फक्त मी शुद्ध, बुद्ध, ज्ञाता, दृष्टा आहे असे म्हणत

बसतो त्याचे मत वेदांताप्रमाणे एकांती होईल. वेदांतामध्येदेखील आत्मा अनादिअनंत, अविनाशी, ज्ञाता, दृष्टा, अकर्ता, अभोक्ता आहे असे प्रतिपादन केले आहे. परंतु ते आत्म्याला सर्वथा तसे मानतात. आत्मा सत् आहे व जगामध्ये इतर सर्व गोष्टी असत् म्हणजे भ्रम आहे-माया आहे, असे त्यांचे मत आहे. पर्यायाला ते मानतच नाहीत.

धर्म प्रकट करण्याचे कार्य व मोक्ष प्रकट करण्याचे कार्य तर पर्यायामध्ये होत असते. पर्यायाला मानलेच नाही तर मग उपदेश देखील काय कामाचा? आपली अवस्था म्हणजे भूमिका कोणती आहे हे ओळखणारा जीवच वरच्या भूमिकेत जाण्याचा प्रयत्न करेल. म्हणून जीवाच्या पर्यायांचे व संयोगांचे ज्ञान आवश्यक आहे.

ज्या जीवाला जीव म्हणजे काय, अन्य द्रव्य म्हणजे काय वगैरे स्व तसेच परासंबंधी नितांत अज्ञान आहे, अशा जीवाला सुरुवातीला जीवाची ओळख करून देण्यासाठी परद्रव्यांच्या सापेक्षतेने समजाविण्यात येते. मनुष्यदेहधारी जीव, पाच इंद्रियवाला जीव, त्रसकायिक जीव वगैरे कथनाद्वारे जीव ज्या ज्या संयोगात आढळतो, त्याचे ज्ञान करवून जीवाचे अस्तित्व व स्थान निश्चित केले जाते. जीवाचा जीवपणा-जीवत्व कायम रहाण्यासाठी देह, इंद्रिय, कर्म वगैरे कोणत्याही परद्रव्याची किंचितदेखील अपेक्षा किंवा आवश्यकता नाही. परंतु समजण्यासाठी व समजाविण्यासाठी दृश्य गोष्टींचे, अर्थात पुद्गलांचे, परपदार्थांचे व रागादिंचे स्वरूप सांगण्यात येते; कारण त्या गोष्टी आपल्या माहितीच्या आहेत-अनुभवातल्या आहेत. त्यांच्यामार्फत जीवाचे अनुमान करविले जाते.

एक आई आपल्या मुलाला म्हणते की जा रे बेटा, स्वयंपाक घरातून मीठ घेऊन ये. मुलाला मीठ कसे असते याची माहिती नव्हती व ते कोठे ठेवले आहे याचाही त्याला पत्ता नव्हता. त्याला जर सांगितले असते की मीठ मिठासारखे आहे, मीठ मिठामध्ये आहे तर त्याला काहीच बोध झाला नसता. म्हणून आई त्याला सांगते की बेटा ते समोरचे कपाट उघड. त्यामध्ये खालच्या फळीवर उजव्या कोपऱ्यात काचेची बरणी आहे त्यात मीठ आहे.

ते पांढरे आहे. परंतु हे बघ, त्याच्या बाजूच्याच बरणीमध्ये मिठाप्रमाणेच पांढरी दिसणारी वस्तु आहे, ती पिठीसाखर आहे. हे मीठ चाखून पहाशील तर खारट आहे.

मुलाला बरोबर समजले व त्याने मीठ शोधून काढले. ज्यावेळी त्याला मीठ मिळाले व ते मीठच आहे असे त्याने लक्षणाद्वारे ओळखले तेव्हा त्याच्या लक्षात आले की मीठ तर मिठामध्ये आहे. बरणी, फळी, कपाट, स्वयंपाकघर सर्व काही आपापल्या जागी आहे परंतु मिठाची प्राप्ति झाल्यानंतर आता त्यांच्याशी काही प्रयोजन उरले नाही. मिठाचे स्थान निश्चित करण्यासाठी त्यांना जाणणे जरूरी होते-प्रयोजनभूत होते; आता त्यांना जाणत रहाण्याची आवश्यकता नाही.

प्रयोजन तर मिठाला जाणण्याचे होते. मिठाला जाणले, ओळखले तरच या इतर गोष्टींना जाणणे कार्यकारी ठरेल. परंतु जर अन्य सर्व वस्तुंना जाणले पण मिठालाच नाही जाणले तर त्या इतर वस्तुंचे ज्ञान काही कार्यकारी नाही.

त्याचप्रमाणे जिनवाणी माता अज्ञ जीवांना त्यांच्या स्वतःची अर्थात जीवाची ओळख करून देण्यासाठी सर्वप्रथम त्या जीवाला शोधायचे कोठे यासाठी चौदा मार्गणांचे व वीस प्ररूपणा यांचे सविस्तर वर्णन करते. गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, उपयोग व चौदा मार्गणा अशा या वीस प्ररूपणा आहेत. यामध्ये परद्रव्यांच्या सापेक्ष कथन आहे तसेच जीवाच्याही अवस्थांचे वर्णन आहे. त्यांच्याद्वारे जीवाची सत्ता निश्चित केल्यानंतर लक्षणाद्वारे शुद्ध जीवस्वरूपाचा अर्थात निजशुद्धात्म्याचा अनुभव करण्याचा उपदेश दिला जातो.

जर जीवाने गुणस्थान मार्गणास्थानादि जाणून नंतर त्यांचे लक्ष सोडून स्वतःला जाणले तरच वरील सर्व गोष्टींना जाणणे कार्यकारी होईल, सार्थकी लागेल. तुम्ही विचाराल,'या सर्वांचे लक्ष सोडावयाचेच होते तर प्रथम त्यांचे लक्ष करविलेच कशासाठी? आम्ही मुळातच यांना जाणणे सोडून देऊ.'

अगं, ज्यांचे व्यवहार ज्ञान जिनमतानुसार यथार्थ नाही त्यांचे निश्चय जीवासंबंधीचे ज्ञान यथार्थ होण्याची सुतराम शक्यता

नाही. सम्यग्दृष्टि जीवांनाही करणानुयोगाच्या या अभ्यासाने त्या विषयाचे विस्तारपूर्वक ज्ञान झाल्याने श्रद्धा सुदृढ-अधिक बळकट होण्यास मदत होते.

लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन समाजात अनेक प्रकारची बुवाबाजी चाललेली आपण पहातो. गृहस्थावस्थेत राहून स्वतःला आचार्य व भगवान म्हणविणारे महाभागही आपल्याला आढळतात. गुणस्थानांच्या अभ्यासाने मोक्षमार्गाचे स्वरूप, देव व गुरु यांचे स्वरूप स्पष्टपणे आपल्या ज्ञानात येते. आपल्या स्वतःच्या भूमिकेचा अर्थात आपण कोणत्या गुणस्थानात आहोत याचा निर्णय स्वतःचा स्वतःला करता येतो.

तुम्ही म्हणाल, 'प्रस्तावनाच एवढी लांबलचक लिहिलीस, त्यापेक्षा विषयाला सुरुवात केलीस तर बरे होईल? तुमचे म्हणणेही योग्यच आहे. आता पुढील पत्रामध्ये आपण गुणस्थानासंबंधी थोडीफार माहिती करून घेऊया.

कळावे,

**तुमची आई.**

आता द्रव्यानुयोगाच्या पक्षपातीला संबोधतात की, 'हे सूक्ष्माभासबुद्धि! तू म्हणतोस ते खरे आहे परंतु स्वतःची अवस्था पहावी. जर स्वरूपानुभवामध्ये व भेदविज्ञानामध्ये उपयोग निरंतर रहात असेल तर का बरे अन्य विकल्प करावेत? तेथेच स्वरूपानंदसुधारसाचा आस्वाद घेत संतुष्ट रहावे. परंतु खालच्या भूमिकेमध्ये तर उपयोग तेथे सतत टिकत नाही. उपयोगाला अनेक अवलंबनांची गरज आहे. म्हणून ज्यावेळी तेथे उपयोग लागणार नाही त्यावेळी गुणस्थानादि विषयी अधिक जाणण्याचा अभ्यास करावा.

**सम्यग्ज्ञानचंद्रिका**

# गुणस्थान-सामान्य चर्चा

## (सम्यक्त्व प्राप्तिची पात्रता, प्रक्रिया व स्वरूप)

पत्रांक १० ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ३१ ऑगस्ट १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

गुणस्थानासंबंधी तुमची उत्सुकता पाहून माझाही उत्साह द्विगुणित झाला आहे. अरविंदकाकादेखील रोज चौकशी करतात की, 'भाभी, किती लिहून झाले? लवकर पूर्ण करा. आपल्याला पुस्तक लवकरात लवकर छापावयाचे आहे.'

सर्वप्रथम गुणस्थान काय आहे हे पाहूया. राजस्थान, हिंदुस्तान, पाकिस्तान हे शब्द तर आपल्या परिचयाचे आहेत. त्याप्रमाणे गुणांच्या समूहाला गुणस्थान म्हटले आहे की गुणांच्या स्थानांना म्हणजे भेदांना गुणस्थान म्हटले आहे? असा प्रश्न कदाचित तुमच्या मनात उभा राहील. गुणस्थान नेमके आहे तरी काय? द्रव्य आहे, गुण आहे की पर्याय आहे?

द्रव्य तर नाही कारण सहा द्रव्यांमध्ये या नावाचे कोणतेही द्रव्य नाही. गुणही नाही कारण गुणाची व्याख्या तुम्हाला माहीतच आहे की, जो द्रव्याच्या संपूर्ण भागात व त्याच्या संपूर्ण अवस्थांमध्ये रहातो त्यास गुण म्हणतात. गुणस्थानं तर बदलत असतात व गुणस्थानांचा अभाव करून गुणस्थानातीत अशी सिद्ध अवस्था प्रकटते, म्हणून ते गुण नाहीत.

नाव जरी गुणस्थान असले तरी ही पर्यायांची स्थानं म्हणजे भेद आहेत. जीवाच्या पर्यायांच्या असंख्यात अवस्था असल्या तरी ढोबळमानाने त्यांचे चौदा भेद कथन केले गेले आहेत. जीवामध्ये तर अनंत गुण व त्या प्रत्येकाच्या पर्याय आहेत परंतु त्यातील श्रद्धा आणि चारित्र गुणांच्या अवस्थांमध्ये-पर्यायांमध्ये जी तरतमता आढळते त्यानुसार तसेच योगाच्या अपेक्षेने देखील या गुणस्थानांना चौदा गुणस्थानांमध्ये विभाजित केले आहे.

गुणस्थानाची शास्त्रोक्त परिभाषा अशी आहे, 'मोह आणि योग यांच्या निमित्ताने जीवाच्या श्रद्धा आणि चारित्र गुणांच्या

होणाऱ्या तारतम्यरूप अवस्थांना गुणस्थान असे म्हणतात.'

हे जीवाच्या पर्यायांचे भेद आहेत, अन्य द्रव्याच्या पर्यायांचे नाहीत. जीवामध्ये देखील अनंत गुणांपैकी फक्त श्रद्धा आणि चारित्र गुणांच्या पर्यायानुसार हे गुणस्थानांचे भेद पडले आहेत. सिद्ध जीव गुणस्थानातीत आहेत व सर्व संसारी जीव कोणत्या ना कोणत्या गुणस्थानात आढळतातच. आपल्याला गुणस्थानाच्या अभ्यासात प्रवेश करावयाचा आहे, गुणस्थानात नव्हे. कारण आपण प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या तरी गुणस्थानात आहोतच.

अनादिकाळापासून सर्व जीव सुरुवातीला मिथ्यात्व गुणस्थानात असतात. हे पहिले गुणस्थान होय. याचा प्रथम क्रमांक आहे म्हणून याला चांगले मानू नका. हे तर बादशाही (राजेशाही) गुणस्थान आहे येथे मोहराजाचा हुकुम चालतो. या जीवांची जिनेन्द्रकथित प्रयोजनभूत तत्त्वांसंबंधी विपरीत मान्यता असते. यालाच अतत्त्वश्रद्धान म्हणतात. प्रयोजनभूत तत्त्वांसंबंधी सविस्तर चर्चा आपण पूर्वीच्या पुस्तकात सात लेखांद्वारे केलीच आहे, लक्षात आहे ना?

मिथ्यात्व गुणस्थानातील जीव प्राप्त शरीरातच 'हा मी आहे' असे मानतो, खऱ्या देव, गुरु, शास्त्राचे स्वरूप तो जाणत नाही, कुलपरंपरेने तो त्यांना मानतो व त्यांची पूजा, भक्ति करतो, शुभराग म्हणजे पुण्यकार्य केल्याने मोक्षाची प्राप्ति होईल असे तो मानतो. कित्येक जीव कुदेव, कुगुरु, कुशास्त्राचे सेवन करतात अर्थात त्यांची भक्ति, पूजा, आदर करतात त्यांच्या उपदेशावर विश्वास ठेवतात. त्यांना गृहीत मिथ्यात्व होते.

काही जीव अरहंतांची भक्ति, पूजा करतात परंतु बाह्य प्रतिमेमध्ये व त्यांच्या शरीरादिकातच त्यांना पूज्यभाव वाटतो, अरहंतांच्या आत्मिक गुणांना, त्यांच्या वीतरागतेला व सर्वज्ञस्वरूपाला ते जीव ओळखत नाहीत. असे लोक मंदिरामध्ये किंवा तीर्थक्षेत्री जातात परंतु मूर्तीचा पाषाण, बाह्य आकार, चेहरा, विभूति व चमत्कारयुक्त अतिशय सहित गोष्टी यांच्यावरच त्यांचे लक्ष व रुचि असते.

कित्येक जीव बाह्य दिगंबर वेषालाच मुनींचे स्वरूप मानतात परंतु त्यांना मुनींच्या अंतरंग स्वरूपाचे-अकषाय भावाचे-वीतरागतेचे ज्ञान नसते. आगमकथित म्हणजे शास्त्रात सांगितल्याप्रमाणे योग्य आचरण अर्थात २८ मूलगुण पाळणाऱ्या व ज्यांच्यामध्ये तीन कषाय चौकडींच्या अभावपूर्वक वीतरागता आहे अशांनाच मुनि म्हटले जाते, याचे त्या जीवाला ज्ञान नसते. जे असे नाहीत अशा व्यक्तिकडून खऱ्या मोक्षमार्गाचा उपदेश मिळणे शक्य नाही, त्यांना मानण्या-पूजण्याने मिथ्यात्व पुष्ट होते व मिथ्यात्वातून सुटण्याचा रस्ताच बंद होतो.

मिथ्यात्वी जीवाची प्रयोजनभूत सात तत्त्वांसंबंधीची मान्यता विपरीत असते. त्याला परद्रव्यांमध्ये एकत्वबुद्धि, ममत्वबुद्धि, कर्तृत्वबुद्धि व भोक्तृत्वबुद्धि असते. निमित्त-उपादानासंबंधी यथार्थ ज्ञान नसल्याने त्याची निमित्ताधीन दृष्टि असते. शरीराश्रित क्रियांना तो आपले कार्य मानतो व रागभावामध्ये एकत्व करतो.

शास्त्राभ्यास करूनदेखील काही जीवांचे मिथ्यात्व सुटत नाही. काहीजण शुभकार्य—देवपूजा, दया, दान, स्वाध्याय करून संतुष्ट होतात परंतु त्यांचा शुद्धात्म्याच्या रुचिपूर्वक आत्मसन्मुखतेचा पुरुषार्थ होत नाही, कारण अजूनही मान्यतेमध्ये कोठेतरी खोट-उणीव राहून जाते. काहीजण शुद्धात्म्याच्या विकल्पांमध्येच संतुष्ट होऊन स्वतःला पर्यायामध्येदेखील शुद्ध मानतात. या दोन्ही प्रकारच्या जीवांना तत्त्वज्ञानातली मेखच समजत नाही. निश्चयनय आणि व्यवहारनय यांच्या कथनातील संतुलन व मर्म त्यांना गवसत नाही.

अनादिकाळापासून एकामागून एक असे अनंत भव आपण धारण केले. प्रत्येक भवामध्ये प्राप्त पर्यायाएवढेच आपण स्वतःला मानले. म्हणून प्रवाहाच्या अपेक्षेने मिथ्यात्वाला अनादिपासून आहे असे म्हटले आहे. पं. दौलतरामजींनी छहढालेमध्ये म्हटले आहे,

**'मोह महामद पियो अनादि, भूल आपको भरमतवादि'**

मिथ्यात्वाचे असे वर्णन ऐकून घाबरावयाचे काहीच कारण नाही. मिथ्यात्वाचा अभाव करून सम्यक्त्व प्राप्तीचा उपाय

आपल्याला जिनवाणीद्वारे उपलब्ध आहे. सर्वप्रथम सम्यक्त्व प्राप्तीची योग्यता कोणत्या जीवामध्ये असते ते पाहूया. चारही गतीतील संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त भव्य जीव मिथ्यात्वाचा अभाव करून सम्यक्त्वाची प्राप्ति करू शकतो. याचा अर्थ असा आहे की, एकेंद्रियांपासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंतचे सर्व जीव नियमाने मिथ्यात्व गुणस्थानातच असतात व त्यांना सम्यक्त्वप्राप्तीची योग्यतादेखील नसते. संज्ञी म्हणजे मनसहित पंचेंद्रिय जीवांमध्येदेखील पर्याप्त असणे आवश्यक आहे. पर्याप्त म्हणजे पूर्ण, अपर्याप्त म्हणजे अपूर्ण.

पर्याप्तिविषयक माहिती नंतर येईलच त्यावेळी अधिक स्पष्टता होईल. अपर्याप्त जीव श्वासाच्या अठराव्या भागात मरतात. अत्यंत अल्प आयुचे ते धारक असतात. नोकर्म वर्गणांचे ग्रहण केले तरी त्यापासून शरीरादि बनविण्याचे त्यांचे कार्य पूर्ण होत नाही, अपुरेच रहाते.

अशा संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्तक जीवाला ज्ञानाचा एवढा उघाड असतो की, तो आपल्या स्वरूपासंबंधीचा उपदेश ग्रहण करतो, मनाद्वारे त्यावर विचार करतो, तत्त्वनिर्णय करतो, देव-गुरु-शास्त्र, मोक्षमार्ग याविषयी परीक्षाप्रधानी होऊन निर्णय करतो. शास्त्रामध्ये सम्यक्त्वप्राप्तीच्या कारणांमध्ये व प्रक्रियेमध्ये पाच लब्धिचे स्वरूप कथन केले आहे. त्यांची नावे अशी आहेत - १) क्षयोपशम लब्धि, २) विशुद्धिलब्धि, ३) देशनालब्धि, ४) प्रायोग्यलब्धि व ५) करणलब्धि.

फक्त ज्ञानाचा उघाड असणे अर्थात बुद्धि तीक्ष्ण असणे यास क्षयोपशमलब्धि असे म्हणत नाहीत, त्याला ज्ञानाचा क्षयोपशम म्हणतात. परंतु हे प्राप्त ज्ञान तत्त्वज्ञान शिकण्याकडे लावणे यास 'क्षयोपशमलब्धि' म्हटले आहे.

सम्यक्त्व प्राप्तीच्या योग्यतेमध्ये दुसरी आवश्यकता आहे कषायांची मंदता असण्याची. अष्टमूलगुणांना धारण करून अन्याय, अनीति व अभक्ष्यभक्षण यांचा त्याग करून सदाचारी जीवन जगणारा जीव यासाठी पात्र आहे. याला 'विशुद्धिलब्धि' म्हटले आहे. कषायांच्या तीव्रतेमध्ये जिनवाणीचा उपदेश जीवांना

रुचत नाही, पटत नाही, कळत नाही, खरं तर जीव त्या उपदेशाकडे वळतही नाही. गृहीत मिथ्यात्वाचा अर्थात कुदेव, कुगुरु, कुशास्त्राचा त्यागदेखील आवश्यक आहे.

अशा पात्र जीवाला ज्ञानी जीवाकडून उपदेश मिळतो. यास 'देशनालब्धि' म्हटले आहे. मात्र उपदेश ऐकणे देशनालब्धि नाही. आत्म्याच्या स्वरूपाचे कथन जो रुचिपूर्वक ऐकतो व त्यानुसार आगमकथित प्रयोजनभूत सात तत्त्वांचे ज्ञान करून जो तत्त्वनिर्णय करतो त्यानेच उपदेश ग्रहण केला असे म्हटले जाईल. जसे रोहितला तुम्ही सांगितलेत की जा बेटा, एक ग्लासभर पाणी घेऊन ये. हे ऐकून त्याने पाणी आणले तर आपण म्हणू की रोहितने आपले ऐकले. नुसते कानाने ऐकणे व त्यानुसार न वागणे यास आपण लौकिकात देखील ऐकणे म्हणत नाही.

देशनालब्धिनंतर प्रायोग्यलब्धि असते. जीव तत्त्वज्ञानाच्या अभ्यासपूर्वक तत्त्वनिर्णय करू लागतो. आगमामध्ये जसे आत्म्याचे वर्णन आहे त्यानुसार आपल्या ज्ञानामध्ये नक्की करतो. वारंवार आत्म्यासंबंधी विचार करतो. हीच 'प्रायोग्यलब्धि' होय.

या चार लब्धि प्राप्त करणाऱ्या जीवाला सम्यक्त्व होईलच असे नाही. भव्य व अभव्य दोन्ही प्रकारच्या जीवांना या चार लब्धि प्राप्त होऊ शकतात. परंतु ज्याला सम्यक्त्व होते त्याला चार लब्धिनंतर करणलब्धिचे परिणाम होतात व त्यानंतर त्यास सम्यक्त्वाची प्राप्ति होते. कर्माची उपशम ही अवस्था शिकताना आपण यासंबंधी चर्चा केली होती. करणलब्धिमध्ये जीवाला कर्मामध्ये काहीच करावे लागत नाही. यापूर्वी जो तत्त्वनिर्णय केलेला आहे त्याद्वारे जेव्हा शुद्धात्म्याची तीव्र रुचि जागृत होते, आत्म्याची महिमा सर्वोत्कृष्ट वाटू लागते, संपूर्ण जगापेक्षा निजशुद्धात्मा महान वाटू लागतो तेव्हा उपयोग स्वसन्मुख होतो, हीच 'करणलब्धि' होय. यानंतर तो स्वतःला ज्ञायकस्वरूपात जाणू लागतो, त्याला अतींद्रिय आनंदाची अनुभूति होते.

हे सारे कार्य जागृत अवस्थेमध्ये साकार उपयोगाद्वारे (ज्ञानोपयोगाद्वारे) होते. झोपेमध्ये, बोलताबोलता, परसन्मुख उपयोगामध्ये आत्म्याची अनुभूति - सम्यग्दर्शनाची प्राप्ति होणार नाही.

तुम्ही विचाराल की आम्हाला सम्यक्त्व प्राप्त करावयाचे आहे त्यासाठी आता आम्ही काय काय करावयास हवे ते सांग.

हे पहा, संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त मनुष्य तर तुम्ही आहातच. शुद्धात्म्याची रुचिही तुम्हाला आहे, यावरुन तुम्ही भव्य आहात हेही दिसून येते. पद्मनंदी आचार्यांनी त्यांच्या पद्मनंदी पंचविंशतिका ग्रंथामध्ये म्हटले आहे की, जो शुद्धात्म्याची चर्चा वार्ता अत्यंत प्रीतिचित्ताने ऐकतो तो निश्चितच भव्य आहे व भविष्यात निर्वाण प्राप्त करण्यास पात्र आहे. तुमची ही रुचि तुमच्या मंदकषायांची द्योतक आहे. जिनेन्द्रकथित उपदेशही तुम्हाला मिळाला आहे व मिळत आहे.

सर्वात महत्वाचे कार्य आहे खऱ्या देव, गुरु, शास्त्रांचा यथार्थ निर्णय करणे. कुदेव, कुगुरु, कुशास्त्र, अर्थात गृहीत मिथ्यात्वाचा सर्वथा त्याग करणे, मद्य, मांस, मध व पाच उदुंबर फळांचा त्याग करणे यालाच अष्टमूलगुण धारण करणे असे म्हणतात, नीतियुक्त सदाचारी जीवन व्यतीत करत अध्यात्म शास्त्रांच्या अभ्यासाने आत्मस्वभावाचा निर्णय करणे, दिवसातून थोडावेळ एकांतामध्ये चिंतन मनन करणे, शास्त्रस्वाध्यायाद्वारे अथवा चिंतनाद्वारे शुद्धात्म्याची महिमा आणून स्वसन्मुख उपयोग करणे. खरं तर उपदेशाच्या भाषेमध्ये हे करा व ते करा असे येते परंतु ज्याला आत्म्याची रुचि व लगन (धुन) लागली आहे त्याला विकल्पात्मक भूमिकेनंतर विकल्प सुटून निर्विकल्प अवस्था सहज प्राप्त होते, त्यासाठी काही करावे लागत नाही.

मला काहीतरी केले पाहिजे, विशिष्ट शुभभाव केला पाहिजे, विकल्प केला पाहिजे, विकल्प सोडला पाहिजे इत्यादि 'केले पाहिजे' हा जो अभिप्राय आहे तो चुकीचा आहे. मी कोण याचा यथार्थ निर्णय झाल्यानंतर ही 'करू करू' ची भावना नाहीशी होते.

जीवाला सर्वप्रथम सम्यक्त्वाची प्राप्ति होते त्यावेळी औपशमिक सम्यक्त्व प्राप्त होते. हा जीव पहिल्या मिथ्यात्व गुणस्थानातून चौथ्या 'अविरत सम्यक्त्व' गुणस्थानात येतो. त्याच्या श्रद्धा गुणाची मिथ्यादर्शन ही अवस्था पलटून सम्यग्दर्शन ही अवस्था येते.

चौथ्या गुणस्थानाचे नाव अविरत म्हणजे अव्रत सम्यक्त्व असे आहे. या गुणस्थानातील जीवांना सम्यक्त्व तर आहे परंतु कोणतीही विरति म्हणजे व्रत नाही. पाच इंद्रियं व मन यांच्या विषयांपासून हा जीव विरत झालेला नाही-मागे हटला नाही त्याचप्रमाणे षट्कायिक जीवांच्या हिंसेपासूनदेखील विरत झालेला नाही. याला शास्त्रीय भाषेत ६ प्रकारचा इंद्रियसंयम व ६ प्रकारचा प्राणीसंयम नाही असे म्हणतात. यापासून जीव विरत नसला तरीदेखील त्याचे यांमध्ये स्वच्छंद प्रवर्तन असत नाही.

येथे चारित्र गुणाच्या पर्यायामध्ये अनंतानुबंधी कषायाचा अभाव आहे परंतु अजून अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान व संज्वलन कषाय विद्यमान आहेत. या जीवांना कधी कधी शुद्धोपयोग होतो. यांना खऱ्या देव, गुरु, शास्त्रांविषयी भक्तीचा राग असतो, जिनेन्द्रकथित प्रयोजनभूत सात तत्त्वांची यांना प्रतीति असते, स्व आणि पर यांचे भेदज्ञान तसेच आत्म्याची प्रतीति कायम असते.

यांच्या बाह्य आचरणामध्ये काही परिवर्तन दृष्टीस पडत नाही, तरीदेखील त्यांच्या अंतरंगामध्ये जमीन अस्मानाचा फरक पडलेला असतो. यांच्या विपरीत अभिप्रायाचा नाश झालेला असतो, यांना आत्मानुभूति झालेली असते, यांना निरंतर भेदज्ञान चालू असते, यांनी स्वतःला स्व स्वरूपामध्ये स्वीकार केलेला असतो व पराला हे पर जाणतात, यांना राग म्हणजे कषाय तर विद्यमान असतात परंतु त्या रागाचा स्वामीपणा त्यांना रहात नाही, रागाचा राग रहात नाही.

या जीवांना खऱ्या देव, गुरु, शास्त्राच्या भक्तीचे, प्रभावनेचे परिणाम येतात परंतु त्यावेळी देखील स्वभावसन्मुखतेची भावना व ओढ कायम असते. भक्ति, स्वाध्याय, अध्ययन, अध्यापन वगैरेद्वारे देखील हे जीव स्वभावाचाच रस पुष्ट करत असतात व या सर्व गोष्टी सोडून स्वभावामध्ये अंतर्मग्न होण्याची प्रवृत्ती देखील यांची होत रहाते.

चारही गतीतील जीव सम्यक्त्व प्राप्त करू शकतात असे आपण पाहिले होते. संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त तिर्यंच, मनुष्य, देव अथवा नारकी पहिल्या गुणस्थानातून चौथ्या गुणस्थानात येऊ शकतात. मरणानंतर अन्य भवामध्ये देखील चौथे गुणस्थान

कायम रहाते अर्थात सम्यक्त्व कायम रहाते.

सम्यग्दृष्टि जीवाला निरंतर भेदज्ञानाचा अभ्यास असतो. तो सांसारिक कार्यांमध्ये संलग्न होतो तरीदेखील त्याला स्वतःची प्रतीति सदैव कायम रहाते. तुम्ही म्हणाल की शुद्धोपयोगाचा काळ तर अतिशय अल्प आहे. त्यानंतर जीव शुभोपयोगामध्ये व अशुभोपयोगामध्ये जाणारच. त्यावेळी त्याचे सम्यक्त्व कसे बरे टिकते?

हे पहा, जेव्हा सर्वात प्रथम सम्यक्त्वाची प्राप्ति होते तेव्हा ती नियमाने शुद्धोपयोग अवस्थेमध्येच होते परंतु शुद्धोपयोगानंतर त्या जीवाचे सम्यक्त्व नष्ट होत नाही. स्वतःचा भिन्न अनुभव घेतल्यानंतर, स्वतःला ओळखल्यानंतर त्याचा स्वतःमध्येच स्वपणा कायम रहातो, शुभभाव किंवा अशुभभाव चालू असताना देखील त्याची ही प्रतीति नष्ट होत नाही. हे कसे शक्य आहे हे आपण एका उदाहरणाद्वारे पाहूया.

ज्याप्रमाणे एखादा फिल्म अभिनेता फिल्मशूटिंगच्या वेळी भिकाऱ्याचा अभिनय करत असेल तर त्यावेळी तो खराखुरा भिकारीच वाटतो, तरीदेखील तो स्वतःचे खरे नाव, स्वरूप, अस्तित्व विसरत नाही. स्वतःचे स्वरूपच तो विसरला तर जाऊन भिकाऱ्याप्रमाणे रस्त्यावर भटकेल, उपाशी राहील, भीक मागत फिरेल परंतु असे काहीदेखील होत नाही. अभिनय करण्याचे तर त्याला करोडो रुपये मिळत असतात. भिकाऱ्याच्या वेषात भीक मागण्याचे कार्य करताना तर तो प्रत्यक्ष दिसत आहे तरीदेखील त्याच क्षणी त्याला स्वतःच्या मोठेपणाची, महिमेची पूर्ण खात्री आहे, प्रतीति आहे.

यासाठी त्याला स्वतःचे नाव घोकत बसावे लागत नाही, त्याला वरचेवर स्वतःसंबंधी विकल्प करावे लागत नाहीत की अरे मी तर अमुक अभिनेता आहे. अभिनेता घरी असो की अभिनय करीत असो, स्वतःच्या स्वरूपाचे भान त्याला निरंतर कायम असते.

त्याचप्रमाणे ज्याने आत्म्याचा अनुभव केला आहे त्याला आपल्या स्वरूपाची-ज्ञायकपणाची प्रतीति सतत चालू रहाते. मग भले तो स्वतःला जाणत असो की पराला जाणत असो अर्थात तो

शुद्धोपयोगात असो, शुभोपयोगात असो की अशुभोपयोगात असो त्याला वारंवार स्वतःच्या स्वरूपाविषयी घोकंपट्टी करावी लागत नाही, सतत 'मी ज्ञायक आहे', 'मी शुद्ध आहे' असे विकल्प करावे लागत नाहीत. सहजरीतीने स्वतःमध्ये स्वपणा कायम टिकून रहातो.

सम्यग्दृष्टि जीवाला अजूनही राग विद्यमान असला तरी तो रागाचा स्वामी असत नाही, रागाबद्दल त्याला रागद्वेष असत नाहीत, रागाची महिमादेखील त्याला नसते. अधिकाधिक उच्च प्रतीचे शुभराग त्याला आपोआप येतात परंतु त्यामध्ये त्याला दुःखरूप वेदन अनुभवास येते. हां, एवढे मात्र खरे आहे की मिथ्यात्व अवस्थेशी तुलना केली असता रागाच्या काळामध्येदेखील त्याची आंशिक निराकुलता टिकून रहाते.

या जीवाला सतत अशी भावना असते की मी स्वतःच्या स्वभावाचे अधिकात अधिक अवलंबन घेऊन अधिक आत्मस्थिरता प्राप्त करावी, आत्म्यातच रममाण व्हावे.

ज्याला आत्म्याचा अनुभव झाला आहे अशा जीवाला शुद्धोपयोगाचीच ओढ लागते. स्वरूपस्थिरता होत नसेल त्यावेळी शुद्धात्म्यासंबंधीचे, आगमासंबंधीचे, सहा द्रव्य, सात तत्त्व यासंबंधीचे, कर्म, गुणस्थान इत्यादिचे, त्रिलोकरचना वगैरे आगमोक्त गोष्टींसंबंधीचे विचार, त्यांचा अभ्यास, त्याविषयी शिकणे व शिकविणे चालू रहाते.

दिवसेंदिवस त्याची सांसारिक कार्याबद्दलची उदासीनता वाढत जाते, सत्समागमाची रुचि वाढत जाते, अध्ययन अध्यापन विशेष रीतीने होऊ लागते. देव, गुरु, शास्त्र यांच्याविषयी त्याला अत्यंत बहुमान वाटत असतो, त्यांची भक्ति तो करतो.

सम्यग्दर्शन प्राप्त होते तेव्हा जीव पहिल्या गुणस्थानातून चौथ्या गुणस्थानात येतो हे आपण पाहिले. मिथ्यात्व गुणस्थानातून काही जीव इतरत्रही गमन करतात, जसे काहीजण पहिल्यातून पाचव्या गुणस्थानात तर काही सातव्या गुणस्थानात जाऊ शकतात. पाचव्या गुणस्थानात जाणाऱ्या जीवाची पात्रता अशी आहे की, त्याने बुद्धिपूर्वक अणुव्रते ग्रहण केलेली असली पाहिजेत. अर्थात सम्यक्त्वाच्या पात्रतेच्या इतर गोष्टी ज्या आपण

पूर्वी पाहिल्या होत्या त्या तर आवश्यक आहेतच.

पहिल्या गुणस्थानातून सातव्या गुणस्थानात जाणाऱ्या जीवांना वरील पात्रतेच्या जोडीला दिगंबर मुनिदीक्षा घेणे अर्थात आगमनानुसार २८ मूलगुणांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. याला शास्त्रामध्ये द्रव्यलिंग असे म्हणतात. द्रव्यलिंग धारण केल्याशिवाय भावलिंग म्हणजे सातव्या गुणस्थानाएवढी वीतरागता अर्थात अंतरंग मुनिपणा होऊ शकत नाही.

चौथ्या गुणस्थानानंतर जीव पुढील गुणस्थानात कसा जातो हे आपण पुढील पत्रात पाहूया.

तुम्ही म्हणाल १ल्यानंतर ४थ्या, ५व्या व ७व्या गुणस्थानाची चर्चा केली. २ऱ्या, ३ऱ्या व ६व्या गुणस्थानाला का बरे वगळले?

औपशमिक सम्यक्त्वाच्या काळात यदाकदाचित अनंतानुबंधी कषायाचा उदय झाला तर जीव सम्यक्त्वातून भ्रष्ट होतो त्यावेळी त्याला २रे 'सासादन सम्यक्त्व' हे गुणस्थान प्राप्त होते. त्या गुणस्थानात १ समय ते ६ आवलि (१ आवली = असंख्यात समय) एवढा अल्पकाळ राहून तो जीव नियमाने मिथ्यात्व गुणस्थानात जातो.

सम्यक्त्व प्राप्तिनंतर काही जीवांची श्रद्धा डळमळते. मिथ्यात्वसहित असा वेगळाच मिश्र परिणाम त्यांचा असतो. त्यावेळी सम्यग्मिथ्यात्व नावाच्या दर्शनमोहनीय कर्माच्या प्रकृतिचा त्यांना उदय असतो. अशा जीवांचे ३रे मिश्र अर्थात सम्यग्मिथ्यात्व गुणस्थान असते. याचाही काळ अल्प म्हणजे अंतर्मुहूर्त असतो. त्यानंतर जीव १ल्या किंवा ४थ्या गुणस्थानात जातो.

६वे गुणस्थान मुनींचे शुभोपयोगाचे गुणस्थान आहे व ७वे शुद्धोपयोगाचे गुणस्थान आहे. मुनि सतत ६व्या-७व्या गुणस्थानात असतात. ७व्यातूनच ६व्या गुणस्थानात येतात. याची चर्चा पुढे येईलच. सध्या येथेच विराम घेते.

कळावे,

**तुमची आई.**

# गुणस्थान आरोहण - देशविरत गुणस्थान

पत्रांक ११ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २ सप्टेंबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

गुणस्थानासंबंधीचे हे सर्व ज्ञान आपल्याला आगमाच्या आधारे प्राप्त झालेले आहे व हे आगम जिनेन्द्र भगवंतांच्या दिव्यध्वनीद्वारे परंपरेने आचार्यांना प्राप्त होऊन त्यांनी लिहून ठेवले आहे. जिनेन्द्र भगवंतांनी वस्तुस्वरूप आपल्या केवलज्ञानाद्वारे प्रत्यक्ष जाणून मगच त्याचा उपदेश दिला आहे.

आचार्यांनी व अनेक गृहस्थांनी आगमज्ञानाच्या आधारे स्वसन्मुखता करून आत्म्याचा अनुभव केला व अन्य जीवांना त्याचा उपदेश दिला. आपण एखाद्या वक्त्याकडून हा उपदेश ऐकतो तेव्हा तो नुसता त्याचाच उपदेश नसून आगम ग्रंथांचा उपदेश असतो, आचार्यांचा उपदेश असतो, भगवंतांचा उपदेश असतो. वक्ता जर आत्मज्ञानी असेल तर तो उपदेश विशेष कार्यकारी ठरतो.

सम्यग्दृष्टि जीव देखील आत्म्याच्या स्वरूपाचा जो उपदेश देतो तो आगमाच्या आधारेच देतो. शुद्धोपयोगामध्ये काही त्याला आत्म्याचे अनंत गुण किंवा असंख्यात प्रदेश दिसत नाहीत. आगमानुसार ज्ञान झाल्यानंतर स्वरूपामध्ये एकाग्र झाले असता निर्विकल्प अतींद्रिय आनंदाचा अनुभव त्यास येतो. आत्मस्वरूपाबद्दल व मोक्षमार्गाबद्दल तो निःशंक असतो - त्यास पूर्ण खात्री असते.

मुलींनो, अध्यात्माचा अभ्यास करणाऱ्यांनी आपला विवेक जागृत ठेवण्याची खूपच आवश्यकता आहे. गुणस्थान शिकल्यानंतर हे लक्षात घ्यावयास हवे की ४थे, ५वे गुणस्थान हे गृहस्थांचे गुणस्थान आहे. मुनींचे गुणस्थान ६वे—७वे व वरचे असते. अरहंतांचे १३वे व १४वे गुणस्थान असते.

यापैकी देव, गुरु (मुनि) व शास्त्र हेच वंदनीय, पूजनीय, अष्टद्रव्यांनी पूजा करण्यायोग्य आहेत. गृहस्थ सम्यग्दृष्टि असला तरी तो मुनिप्रमाणे पूजनीय नाही. हां, त्यांचा विद्यागुरु म्हणून योग्य तो आदर, सत्कार नमस्कारादि करणे योग्य आहे. परंतु आपल्या अभिप्रायामध्ये जर आपण अशा व्यक्तीला देवापेक्षा व आचार्यांपेक्षा उच्च मानत असलो तर ती आपली विवेकहीनता होईल. आजकाल अशा काही विकृति आढळत आहेत व व्यक्तिपूजेचे स्तोम अनेकजण माजवत आहेत. परंतु त्यामुळे आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहोत, आपल्या सम्यक्त्वप्राप्तिमध्ये अडथळा येत आहे हे त्यांना समजत नाही.

देवगतितील देवही ४थ्या गुणस्थानाच्या वर जाऊ शकत नाहीत. म्हणून सौधर्म इंद्र, लौकांतिकदेव पुढच्याच भवात मोक्षाला जाणारे असले तरी आपण त्यांची पूजा करत नाही.

गुणस्थानांच्या अभ्यासाने निश्चय आणि व्यवहार यांचा आपल्या बुद्धिद्वारे समन्वय साधला जातो, त्यांच्यामधील सुमेळ आपल्या लक्षात येतो. कोणत्या गुणस्थानातील जीवाचे आचारविचार कसे असतात याचे ज्ञान होते. येथे एक गोष्ट नीट लक्षात घ्या की केवळ त्या आचारांचे-व्रतांचे पालन केल्याने गुणस्थान बदलत नाही. परंतु अंतरंगातील वीतरागता वाढल्याने वरची वरची गुणस्थाने प्राप्त होतात.

सम्यक्त्वाची प्राप्ति भेदज्ञानपूर्वक आत्मस्थिरतेद्वारे होते त्याचप्रमाणे वरच्या वरच्या गुणस्थानांची प्राप्तिदेखील अर्थात ५व्या, ७व्या एवढेच काय पण १३व्या सयोगकेवली गुणस्थानापर्यंतच्या गुणस्थानांची प्राप्तिदेखील अधिकाधिक आत्मस्थिरतेद्वारेच होते. म्हणूनच आत्मख्यातिमध्ये म्हटले आहे.

**''भावयेत् भेदविज्ञानम् इदम् अच्छिन्नधारया ।**
**तावत् यावत् परात् च्युत्वा ज्ञानं ज्ञाने प्रतिष्ठते'' ॥१३०॥**

अर्थ लक्षात यावा म्हणून श्लोकातील संधींची फोड करून लिहिले आहे. या श्लोकाचा अर्थ आहे की, सम्यक्त्व प्राप्त झाल्यानंतरही भेदविज्ञान अखंडपणे तोपर्यंत करत रहावे, त्याची

भावना तोपर्यंत करावी की जोपर्यंत ज्ञान परभावापासून च्युत होऊन पूर्णरूपाने ज्ञानस्वभावात कायम स्थिर रहात नाही. आत्मस्थिरतेद्वारे सम्यग्ज्ञानाची प्राप्ति होते व आत्मस्थिरतेद्वारेच केवलज्ञानाचीही प्राप्ति होते. मोक्षमार्गाची सुरुवात, मोक्षमार्ग व मोक्ष हे सारे अंतरंगातच आत्मस्थिरतेद्वारे होत असते. बाह्य आचरण व व्रतादि मला मोक्षमार्गाची लवकर प्राप्ति करून देतील अशी मान्यता मिथ्यात्व आहे.

याचे कारण असे की शरीराश्रित क्रिया या तर परद्रव्याच्या म्हणजे अचेतनाच्या क्रिया आहेत त्या मला मोक्षमार्ग प्रकट करण्यात कशा बरे कार्यकारी होतील? उलट त्या माझ्या क्रिया आहेत ही विपरीत मान्यता सम्यक्त्वप्राप्तिमध्ये बाधक आहे. तसेच व्रतादि करण्याचे जे शुभभाव-जो राग होतो आहे तो तर चारित्रगुणाचा विभाव आहे. तो माझा स्वभाव नाही व त्या पर्यायाएवढा मी नाही. मी तर त्रिकाल शुद्ध ध्रुव अभेद आहे. राग साधक आहे म्हणून तो करण्यायोग्य आहे असे मानणे व करणे, तसेच राग बाधक आहे म्हणून त्याला हटविण्याचा प्रयत्न करणे या दोन्ही गोष्टींमध्ये दृष्टि तर रागावरच रहाते व त्यामुळे स्वभाव गौण होतो.

परंतु स्वभावाला मुख्य करून त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्यामध्ये मीपणा स्थापन करून जेव्हा आत्म्यामध्ये एकाग्रता होते त्यावेळी सम्यक्त्वाची प्राप्ति होते. त्यावेळी देखील रागाची विद्यमानता व देह आपापल्या योग्यतेनुसार असतातच परंतु त्यावर आता दृष्टि नसते, त्यांच्याबद्दल स्वामित्वभाव किंवा एकत्व रहात नाही. अहो, शुभभाव सोडून काय स्वच्छंदी व्हायचे काय असा प्रश्न अनेकांना पडतो.

ज्याला शुद्धात्म्यामध्ये एकत्व होते त्याच्या पर्यायात स्वच्छंदता रहात नाही. त्याला तर अधिक उच्च कोटीचे शुभभाव येतात. स्वसन्मुख परिणामांमध्ये जी विशुद्धता आहे ते तर सर्वोत्कृष्ट शुभभाव आहेत. ते सहज होतात. मला अमुक राग सोडून तमुक राग करावयाचा आहे अशी रागविषयक कर्तृत्वबुद्धि त्याला रहात नाही.

सम्यग्दर्शनाच्या प्राप्तिनंतर चौथ्या गुणस्थानातील जीवाची जशी-जशी आत्मस्थिरता वाढत जाते तशी-तशी पंचेंद्रिय व मन यांच्या विषयांबाबत त्याला अरुचि वाढत जाते, त्याला दयेचे परिणाम येतात, स्वतःच्या हातून अन्य जीवांची विराधना-हिंसा होऊ नये यासाठी तो दक्षता घेतो-प्रयत्नशील रहातो. पाच पापांपासून तो परावृत्त होण्याचा प्रयत्न करतो. आपल्याकडून हिंसा, असत्य, चोरी, कुशील होणार नाही, परिग्रह सीमित राहील याबाबत तो बुद्धिपूर्वक प्रयत्न करतो. हा जीव अणुव्रतं धारण करतो याचा अर्थ असा की चरणानुयोगाच्या श्रावकाचार ग्रंथांच्या उपदेशानुसार आगमसंमत व्रतांचा प्रतिज्ञापूर्वक अंगिकार करतो. पाच अणुव्रतं, तीन गुणव्रतं व चार शिक्षाव्रतं यांचे स्वरूप जाणून त्या व्रतांचे पालन करतो. या जीवाला द्रव्यलिंगी श्रावक किंवा व्रती असे म्हणतात.

असा द्रव्यलिंगी श्रावक शुद्धोपयोगात लीन होऊन त्याची आत्मस्थिरता वाढते त्यावेळी दोन कषाय चौकडींच्या अभावपूर्वक वीतरागता वाढते, त्यावेळी त्याला देशविरत नावाच्या पाचव्या गुणस्थानाची प्राप्ति होते.

हे लक्षात घ्या की द्रव्यलिंगी श्रावक झाल्याशिवाय भावलिंगी श्रावक अर्थात पाचवे गुणस्थान प्राप्त होऊ शकत नाही त्याचप्रमाणे केवळ व्रतांचे ग्रहण करण्यानेही पाचवे गुणस्थान प्राप्त होऊ शकत नाही.

ज्याच्या अंतरंगामध्ये सम्यग्दर्शनसहित दोन कषाय चौकडींचा (अनंतानुबंधी व अप्रत्याख्यान कषाय चौकडींचा) अभाव असतो व ज्याने बाह्यत: व्रतं धारण केलेली आहेत त्यालाच पाचवे गुणस्थान असते.

पाचव्या गुणस्थानातील जीवांचे वाढत्या वीतरागतेबरोबर परिणामांचे अनेक भेद आढळतात. त्यांचे स्थूलमानाने अकरा भेद सांगितले आहेत व ते अकरा प्रतिमा या नावाने ओळखले जातात. श्रावकाचार ग्रंथांमध्ये याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. 'वीतराग विज्ञान पाठमाला' या पुस्तकात 'श्रावकाच्या अकरा प्रतिमा' नावाचा धडा आहे तो तुम्ही अवश्य वाचा.

पाच अणुव्रतांच्या ग्रहणपूर्वक आत्मस्थिरता वाढते व सम्यग्दर्शनाची दृढता होते त्यास दर्शनप्रतिमा म्हणतात. केवळ देवदर्शन करण्याचा नियम पाळणे ही दर्शनप्रतिमा नाही. पूर्वी सांगितलेल्या १२ व्रतांच्या ग्रहणपूर्वक आत्मस्थिरता अधिक वाढते ती दुसरी व्रतप्रतिमा आहे. जेवढी आत्मस्थिरता वाढेल तेवढे बाह्यत: पुढील प्रतिमेसंबंधी व्रते अंगिकार करण्याचे भाव सहज होत जातात.

या अकरा प्रतिमांची नावे क्रमश: अशी आहेत. १) दर्शनप्रतिमा २) व्रतप्रतिमा ३) सामायिकप्रतिमा ४) प्रोषधप्रतिमा ५) सचित्तत्यागप्रतिमा ६) रात्रिभोजनत्यागप्रतिमा (दिवामैथुन त्यागप्रतिमा) ७) ब्रह्मचर्यप्रतिमा ८) आरंभत्यागप्रतिमा ९) परिग्रहत्यागप्रतिमा १०) अनुमतित्यागप्रतिमा ११) उद्दिष्टआहारत्यागप्रतिमा.

अकराव्या प्रतिमाधारी श्रावकाचे दोन भेद आहेत. क्षुल्लक व ऐलक. क्षुल्लक दोन वस्त्रधारी असतात व ऐलक एक वस्त्रधारी असतात. ते मुनिसंघामध्ये रहातात.

वरच्या वरच्या प्रतिमेमध्ये अहिंसा अधिक पाळली जाते, पाप परिणाम घटत जातात तरीदेखील महाव्रतांचे पालन होऊ शकत नाही म्हणून या गुणस्थानाला विरताविरत अथवा संयमासंयम असेही म्हणतात.

हे पाचवे देशविरत गुणस्थान फक्त कर्मभूमीच्या मनुष्य व तिर्यंच (संज्ञी पंचेंद्रिय) या दोन गतीतील जीवांनाच होऊ शकते. भोगभूमीतील मनुष्य किंवा तिर्यंच तसेच देव व नारकी यांना चौथे गुणस्थान प्राप्त करण्याची योग्यता असली तरी पाचवे गुणस्थान त्यांना प्राप्त होऊ शकत नाही. तेवढी अधिक आत्मस्थिरता करण्याची त्यांची पर्यायगत योग्यता नसते.

लौकिकामध्ये आपण पहातो की व्रतवैकल्यं, दयादानादि, पूजायात्रादि करणाऱ्यांना धार्मिक मानले जाते. बाह्य त्यागाचीच लोकांना महिमा वाटते. त्यालाच व्रत—संयम नाव दिले जाते. कोणत्या गुणस्थानात कोणत्या प्रकारचे शुभ किंवा अशुभ भाव होऊ शकतात हे जाणल्यानंतर आपल्या लक्षात येते की

कषायांची मंदता (शुभभाव) किंवा कषायांची तीव्रता (अशुभभाव) यावर गुणस्थान अवलंबून नाही, यावर ते अनंतानुबंधी आहेत की अप्रत्याख्यान आहेत हे अवलंबून नाही. या कषायांच्या जातीच वेगळ्या आहेत.

मिथ्यात्व गुणस्थानातला एखादा जीव अति मंद कषायी, समाधानी वृत्तीचा, पापभीरू, व्रतादिक पाळणारा असू शकेल. याउलट पाचव्या गुणस्थानातील एखादा जीव व्यापारादि उद्यम करताना दिसेल, युद्धही करेल, मुलंबाळं, स्त्री-परिवार त्याला असेल, सांसारिक कामे करतानादेखील तो आढळेल. बाह्य आचरणावरून त्याच्या गुणस्थानाचे अनुमान आपण करू शकणार नाही.

परंतु येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की विशिष्ट बाह्य आचरण नसेल तर विशिष्ट गुणस्थान असू शकणार नाही हे मात्र निश्चितपणे सांगता येईल. जसे ज्याला बाह्यत: अणुव्रतं नाहीत तो ५व्या गुणस्थानात असू शकणार नाही. ज्याला आगमोक्त द्रव्यलिंग नाही अर्थात् नग्नत्व आदि २८ मूलगुण नाहीत त्याला ६वे, ७वे किंवा वरची गुणस्थाने असू शकणार नाहीत. याचा अर्थ असा की कोणी वस्त्रसहित स्वत:ला मुनि म्हणवून घेत असेल तर ते तीन काळात कधीही खरे असणे शक्य नाही.

वस्त्रसहित जेव्हा ६वे-७वे गुणस्थान होऊ शकत नाही तेथे अरहंतांचे १३वे १४वे गुणस्थान कसे बरे शक्य आहे? स्त्री पर्यायातील जीव पंचम गुणस्थानापर्यंतचा पुरुषार्थ करू शकतात त्यापुढील नाही म्हणून स्त्रीला मुनिपद, अरहंत अवस्था व मोक्षपद त्याच पर्यायात प्राप्त होणे शक्य नाही. भविष्यकाळात पुरुष पर्याय प्राप्त करून तो जीव मोक्ष प्राप्त करू शकतो.

आहार ही संज्ञा (वासना) ६व्या गुणस्थानापर्यंतच असते. ७व्या पासून तिचा अभाव असतो तर १३व्या गुणस्थानातील अरहंतांना कवलाहार मानणे किती चुकीचे आहे, हे लक्षात येईल. वस्त्रसहित मुनिपणा मानणे, स्त्रीपर्यायात मोक्ष होतो असे मानणे, केवलीला कवलाहार असतो असे मानणे हे तर महान मिथ्यात्व आहे, शास्त्रात याला गृहीत मिथ्यात्व म्हटले आहे. प्रथम गृहीत मिथ्यात्व सुटल्याशिवाय अगृहीत मिथ्यात्व सुटू शकत नाही.

वर कषायांच्या जाति म्हटले होते त्याचे थोडक्यात स्वरूप पाहूया. जे कषाय सम्यक्त्व होऊ देत नाहीत, त्यामध्ये बाधा आणतात ते अनंतानुबंधी कषाय आहेत. अनंतानुबंधी कषाय व मिथ्यात्व यांची हातमिळवणी आहे. ते एकमेकांना पूरक आहेत. जे कषाय किंचितदेखील त्याग म्हणजेच अणुव्रतं होऊ देत नाहीत त्यांना अप्रत्याख्यान कषाय म्हणतात. ते कषाय सम्यक्त्वास काही बाधा आणू शकत नाहीत. चौथ्या गुणस्थानात अप्रत्याख्यान कषायांचा उदय असल्याने सम्यक्त्व जरी चालू राहिले तरी अणुव्रतं धारण करण्याचे परिणाम होत नाहीत.

जे कषाय महाव्रतं धारण करण्यात बाधारूप आहेत त्यांना प्रत्याख्यान कषाय म्हटले आहे. पाचव्या गुणस्थानात प्रत्याख्यान कषाय असल्याने मुनिव्रत धारण करण्याचे भाव होत नाहीत. जे कषाय यथाख्यात चारित्र होऊ देत नाहीत त्यांना संज्वलन कषाय म्हणतात. ६व्या गुणस्थानात संज्वलन कषायांचा तीव्र उदय असतो त्यामुळे तेथे २८ मूलगुण पालन करण्याचे भाव - शुभोपयोग असतो. ७व्या गुणस्थानात संज्वलन कषायांचा मंद उदय असतो त्यावेळी जीव शुद्धोपयोगात असतो.

आपण जेव्हा अनंतानुबंधीचा उदय म्हणतो तेव्हा इतर तीन कषाय चौकडी पण विद्यमान असतात. अप्रत्याख्यानाचा उदय आहे म्हणतो तेव्हा बाकीच्या दोन कषाय चौकडी सुद्धा असतात व प्रत्याख्यानाचा उदय आहे असे म्हणतो तेव्हा संज्वलन कषाय चौकडी देखील असते.

देशविरत या पाचव्या गुणस्थानात आपण ज्या अकरा प्रतिमा पाहिल्या त्यामध्ये पहिल्या प्रतिमेपासून अकराव्या प्रतिमेपर्यंत उत्तरोत्तर वीतरागता वाढत जाते व कषायांची मंदता होत जाते. हे सारे कार्य अंतरंगातील वाढत्या आत्मस्थिरतेद्वारे होते: शुद्धोपयोगात रहाण्याचा काळ वाढत जातो तद्वत वारंवार शुद्धोपयोग होत रहातो. हा जीव वरच्या गुणस्थानात कसा जातो अर्थात मुनि कसा बनतो हे आपण पुढच्या पत्रात पाहूया.

कळावे,

**तुमची आई**

# मुनींची गुणस्थाने

पत्रांक १२ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ३सप्टेंबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

पाचव्या गुणस्थानातील क्षुल्लक, ऐलक वगैरे संबंधीचे विवेचन आपण पाहिले. हा जीव मुनि कसा बनतो हे आता आपण पाहूया.

हा जीव वारंवार शुद्धोपयोगात जातो, स्थिरता अधिक काळ टिकते. दिगंबर मुनिदीक्षा घेण्याचे भाव त्याला येतात. असा जीव नग्न दिगंबर मुनिदीक्षा अंगिकार करतो. प्रतिज्ञेपूर्वक पाच महाव्रतं धारण करतो. तो जीव २८ मूलगुण पालन करण्याची प्रतिज्ञा करतो. ते २८ मूलगुण अशा प्रकारचे आहेत:— पाच महाव्रतं, पाच समिति, पाच इंद्रियविजय, सहा आवश्यक व सात शेष गुण.

अहिंसामहाव्रत, सत्यमहाव्रत, अचौर्यमहाव्रत, ब्रम्हचर्य महाव्रत, परिग्रहत्यागमहाव्रत अशी ही पाच महाव्रतं आहेत. चरणानुयोगामध्ये या सर्व व्रतांचे व मूलगुणांचे सविस्तर वर्णन आहे. समितिचा अर्थ होतो प्रवृत्ति. प्रमादरहित यत्नाचारपूर्वक प्रवृत्ति मुनिंसाठी आवश्यक आहे. मुनि जीवनामध्ये मुनींची प्रवृत्ति आहारविहारादि क्रिया अशाप्रकारे केल्या जातात की ज्यायोगे अहिंसा महाव्रत पाळले जाते. ईर्यासमिति, भाषासमिति, एषणासमिति, आदाननिक्षेपणसमिति व प्रतिष्ठापनसमिति अशा पाच समिति आहेत.

ईर्यासमिति म्हणजे जे स्थान प्रासुक आहे, जीवरहित आहे अशा ठिकाणी चालणे, चार हात जमीन पाहून चालणे. भाषासमिति म्हणजे हित-मित-प्रिय वचन बोलणे. दुसऱ्याची निंदा करणे, अपशब्द बोलणे, टाकून बोलणे याचा त्यांना भावही येत नाही. जे दर अंतर्मुहूर्तात शुद्धोपयोगात जातात त्यांच्या वाणीमध्येही शुद्धात्म्याचीच कथा वार्ता असते. दुनियेतल्या इतर गोष्टी बोलण्यात त्यांना रस नसतो.

एषणासमिति आहारासंबंधी आहे. मुनि जो आहार ग्रहण क़रतात तो आहार ध्यान व स्वाध्यायाच्या सिद्धीसाठी शरीराच्या स्थिरतेसाठी करतात. जिव्हा इंद्रियाच्या लोलुपतेसाठी करत नाहीत. शास्त्रोक्त विधीप्रमाणे श्रावकाकडून नवधाभक्तिपूर्वक आहार दिला जातो त्यावेळी ४६ दोष व ३२ अंतराय यांना टाळून मुनि निर्दोष आहार ग्रहण करतात. आपण देशविरत गुणस्थानामध्ये उद्दिष्टत्याग प्रतिमा पाहिली होती. ते जीवदेखील त्यांच्या उद्देशाने (त्यांच्यासाठी) बनविलेला आहार ग्रहण करीत नाहीत व त्यांच्यासाठी बनविलेल्या वसतिकेमध्ये रहात नाहीत. त्यामध्ये हिंसेची अनुमोदना हा दोष त्यांना लागतो.

हे तर मुनि आहेत त्यांनादेखील उद्दिष्ट आहाराचा त्याग असतो. आदाननिक्षेपण समितिमध्ये मुनि आपल्या डोळ्यांनी पाहून, तपासून व पिंछीने प्रमार्जन करून कोणतीही वस्तु - शास्त्र, कमंडलू वगैरे उचलतात व ठेवतात. प्रतिष्ठापन समितिचा अर्थ आहे हरितकायरहित व त्रसकायरहित स्थानावर शरीराच्या मलमूत्रांचे क्षेपण करणे.

स्पर्शनेंद्रियविजय, रसनेंद्रियविजय, घ्राणेंद्रियविजय, चक्षुरिंद्रियविजय व कर्णेंद्रियविजय असे पाच प्रकारचे इंद्रिय विजय सांगितले आहेत त्यामध्ये मुनि पाचही इंद्रियांना स्वत:च्या काबूत ठेवतात. वश करतात. इंद्रियांच्या विषयात ते आसक्त नसतात, त्यामध्ये त्यांना रागही नसतो तद्वत द्वेषही नसतो.

मुनिंचे षट् आवश्यक मुनिजीवनामध्ये प्रमाद येऊ देत नाहीत, मुनींना आपल्या कर्तव्याप्रति दक्ष ठेवतात. आवश्यक कर्तव्याला 'आवश्यक' म्हटले आहे. त्यांची नावे अशी आहेत. १) सामायिक २) चतुर्विंशतिस्तव ३) वंदना ४) प्रतिक्रमण ५) प्रत्याख्यान व ६) कायोत्सर्ग. उरलेल्या सात मूलगुणांना शेष सात गुण म्हटले आहे. ते याप्रकारचे आहेत: —

१) केशलोच २) वस्त्रत्याग - नग्नत्व ३) अस्नान अर्थात स्नानत्याग ४) भूमिशयन ५) अदन्तधोवन ६) स्थितिभोजन - उभ्या उभ्या करपात्रामध्ये आहार घेणे. ७) एक भक्त - दिवसातून एक वेळा आहार ग्रहण करणे.

मुनींच्या आचारासंबंधी अनेक नियम असतात व

मुनिसंघामध्ये त्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. अगं, आपण पहातो की सैनिकी-शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींनाही अतिशय शिस्त व कडक कायदे पाळावे लागतात, त्यात त्यांना कष्ट होतात. परंतु मुनिजीवन हे कष्टदायक जीवन नव्हे. सम्यग्दृष्टि जीव सतत आत्मिक आनंद उपभोगत असतो. या जीवांना इंद्रिय विषयांमध्ये रसच उरलेला नसतो, देह व राग यांपासून आपल्या ज्ञानआनंदमय भिन्न अस्तित्वाचे भान यांना सदैव टिकून असते त्यामुळे मुनियोग्य क्रियांमध्ये त्यांना कष्ट किंवा जबरदस्ती नसते.

अशाप्रकारे २८ मूलगुणांचे निरतिचार पालन करणारा जीव जेव्हा स्वसन्मुखता करतो, शुद्धोपयोगात जातो - त्याची आत्मिकस्थिरता वाढून ३ कषाय चौकडींचा अभाव होतो त्यावेळी ७वे अप्रमत्त गुणस्थान प्राप्त होते. ७व्या गुणस्थानाचा - शुद्धोपयोगाचा काळ अल्प आहे. एक अंतर्मुहूर्त आहे नंतर जीव नियमाने ६व्या गुणस्थानात येतो, हा शुभोपयोगाचा काळ आहे. यामध्ये अध्ययन, अध्यापन, आहार विहारादि क्रिया होतात. पुन्हा अंतुर्मुहूर्तात ७वे गुणस्थान प्राप्त होते. असे निरंतर ६वे-७वे गुणस्थान प्राप्त होत रहाते. आचार्य, उपाध्याय व साधु सदैव ६व्या-७व्या गुणस्थानात झुलत असतात.

मुनि असो वा व्रती श्रावक असो, अंतरंगातील वीतरागता व गुणस्थान काही बाह्यत: दिसत नाही. शिवाय परिणामांमध्ये चढ उतार होत असतात व सापशिडीच्या खेळाप्रमाणे वरच्या गुणस्थानातून खालच्या गुणस्थानात व पुन्हा पुरुषार्थ करून वरच्या गुणस्थानात गमनागमन चालू असते.

म्हणून मुनींचे गुणस्थान व सम्यक्त्व यांची परीक्षा करणे हे आपले कर्तव्य नाही. मुनिव्रत-२८ मूलगुण यथार्थ रीतीने आहेत की नाही याची परीक्षा श्रावकाला करता येते. एवढेच नव्हे तर अशी परीक्षा करूनच त्या मुनींना योग्य आहारदान, त्यांची भक्तिपूजा करणे हे श्रावकाचे कर्तव्य आहे.

परंतु जेव्हा देव, गुरु, शास्त्र यांच्या स्वरूपाचा निर्णय आपण करतो तेव्हा द्रव्यलिंगपूर्वक भावलिंग प्रकट केलेले ६व्या - ७व्या गुणस्थानात झुलणारे जीवच मुनि आहेत, भावलिंगी संत आहेत असा यथार्थ निर्णय आपण करावयास हवा.

हे ६वे-७वे तसेच वरची सर्व गुणस्थाने एकमात्र मनुष्यगतीतल्या जीवांनाच होऊ शकतात, तीदेखील पुरुषांनाच प्राप्त होत असतात.

६व्या - ७व्या गुणस्थानात झुलणारा एखादा जीव अंतरंगात अधिक स्थिर होऊन परिणाम अधिक निर्मल करतो त्यावेळी वाढत्या वीतरागतेबरोबर त्याला वरचे वरचे गुणस्थान प्राप्त होते. ८वे, ९वे, १०वे ११वे किंवा ८वे, ९वे, १०वे व १२वे गुणस्थान त्या जीवाला प्राप्त होते. या चार गुणस्थानांना श्रेणीची गुणस्थाने असे म्हणतात किंवा मुनींनी श्रेणी मांडली असेही म्हणतात.

यामध्ये दोन प्रकारांनी श्रेणी मांडली जाते. एक उपशमश्रेणी व दुसरी क्षपकश्रेणी. उपशमश्रेणीमध्ये चारित्रमोहनीय कर्माच्या २१ प्रकृतिंचा उपशम होतो व ११वे उपशांतमोह गुणस्थान प्राप्त होते. क्षपकश्रेणीमध्ये त्या कर्मांचा क्षय होतो, व १२वे क्षीणमोह गुणस्थान प्राप्त होते.

अशाप्रकारे ६व्या गुणस्थानापासून १२व्या गुणस्थानापर्यंत ही सर्व मुनींचीच गुणस्थाने आहेत. तसं पाहिलं तर अरहंत भगवंतांनादेखील महामुनि म्हटले आहे.

उपशमश्रेणीवाला जीव ११व्या गुणस्थानात एक अंतर्मुहूर्त रहातो व उपशम काळ संपला की १०व्यात, तेथून ९व्यात, तेथून ८व्यात व नंतर ७व्यात व त्यानंतर ६व्या गुणस्थानात क्रमाने येतो नंतर सामान्यपणे ६वे-७वे गुणस्थान चालू रहाते.

क्षपकश्रेणीवाला जीव १०व्या गुणस्थानाच्या अंतिम समयात चारित्रमोहनीय कर्माचा क्षय करून १२व्या गुणस्थानात जातो. दर्शनमोहनीय कर्माचा तर पूर्वीच क्षय झालेला असतो. म्हणून १२व्या गुणस्थानात मोहनीय कर्माची सत्ताच रहात नाही, परंतु अन्य तीन घाति कर्मांची सत्ता व उदय असतो.

१२व्या गुणस्थानाच्या अंती या ३ घातिकर्मांचा पूर्ण क्षय करून जीव १३व्या गुणस्थानात जातो. १२व्या गुणस्थानात पूर्ण वीतरागी झालेला जीव १३व्या गुणस्थानात क्षायिक ज्ञान प्राप्त केल्याने सर्वज्ञ बनतो, त्याला सयोगकेवली गुणस्थान म्हटले

आहे. त्यांना अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतसुख व अनंतवीर्य या अनंतचतुष्टयाची प्राप्ति होते.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की ७व्या गुणस्थानातील जीव स्वरूपामध्ये लीन होता, त्यानंतर श्रेणी मांडताना त्या जीवाने विशेष स्वरूपस्थिरता केली व वीतरागता वाढली त्या स्वरूपस्थिरतेद्वारेच वीतरागता व स्वरूपस्थिरतेद्वारेच सर्वज्ञता-केवलज्ञान प्राप्त झाले. वीतरागता व सर्वज्ञता स्वभावात होती ती प्रकट झाली, कोठून बाहेरून आली नाही. त्यानंतर अनंत काळपर्यंत या स्वभावपर्याय होतच रहातात.

स्वभावाची महिमा काय बरं वर्णावी? वस्तु व वस्तुचा स्वभाव तर अनादिअनंत आहे, स्वयंसिद्ध आहे, परिपूर्ण आहे, असहाय आहे अर्थात त्याला कोणाच्या सहाय्याची जरूरी नाही, अमर्यादित म्हणजे असीम आहे.

अरहंतांनी जसा स्वभाव आहे तशी पर्याय प्रकट केली परंतु त्यांचा स्वभाव तर त्यांच्या स्वतःच्या द्रव्यात अनादिकालापासून विद्यमान होता. बा जीवा, तू देखील अशा स्वभावाने परिपूर्ण आहेस. आत्ता या क्षणी तू अरहंतासमान स्वभावमय आहेस. बस, फक्त त्या स्वभावाकडे पहाण्याची गरज आहे अर्थात आपले प्रकट ज्ञान स्वभावसन्मुख करून जाणण्याची आवश्यकता आहे. ज्यासमयी तू स्वतःला जाणशील त्याच समयापासून हे जीवा तुझा मोक्षमार्ग प्रारंभ होईल, तुला आत्मानंदाचा अनुभव होईल, सम्यग्दर्शन प्रकट होईल, अरहंत सिद्ध बनण्याची तुझी प्रक्रिया सुरू होईल.

हे जीवा, ज्या मार्गाला तू आजपर्यंत कष्टदायक मानले होतेस तो मार्ग म्हणजे तर एक महान आनंदयात्रा आहे. सतत वाढत्या आनंदाबरोबर तू अनंत सुखाकडे वाटचाल करशील, अग्रेसर होशील. एकवेळा तू स्वतःच्या चैतन्यगुंफेमध्ये डोकावून बघ तर खरे! आनंदाच्या निधानाचा वर्षाव होईल!!

अरहंत अवस्थेमध्ये १३वे सयोगकेवली व १४वे अयोगकेवली ही दोन गुणस्थाने आहेत. नावावरून लक्षात येते की ही केवलीची गुणस्थाने आहेत. १ल्या गुणस्थानापासून १२व्या गुणस्थानापर्यंतच्या जीवांना अल्पज्ञ किंवा छद्मस्थ असे म्हणतात.

ज्ञानाच्या पूर्ण विकसित अवस्थेला केवलज्ञान अथवा क्षायिक ज्ञान म्हणतात. त्यांच्या ज्ञानावरण कर्माचा पूर्ण क्षय झालेला असतो.

छद्म म्हणजे झाकलेला, आवरण सहित. ज्यांना ज्ञानावरण कर्माचा सद्भाव म्हणजे आवरण आहे त्या जीवांना छद्मस्थ म्हणतात.

१३व्या व १४व्या गुणस्थानाच्या नावात योग हा शब्द आला आहे. सयोग म्हणजे योगसहित व अयोग म्हणजे योगरहित. सयोग हा शब्द अंत्यदीपक आहे अर्थात १ल्या गुणस्थानापासून १३व्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत सर्व जीव योगसहित आहेत. आत्मप्रदेशांचे सकंप होणे यास योग म्हटले आहे व योगाचे कंपन थांबणे यास अयोग म्हटले आहे.

पूर्वी कर्माचा बंध कसा होतो हे आपण शिकलो होतो. आत्मप्रदेशांच्या कंपनामुळे अर्थात योगामुळे कर्म व नोकर्म आत्म्याकडे आकृष्ट होतात. याचा अर्थ असा की जोपर्यंत योगाच्या कंपनाचा सद्भाव आहे तोपर्यंत कर्माचे ग्रहण तसेच नोकर्माचे ग्रहण चालू रहाते. कवलाहार नसतानादेखील अरहंत अवस्थेमध्ये जीव लाखो करोडो वर्षांपर्यंत जिवंत रहातो, कारण तेथे नोकर्म वर्गणांचे ग्रहण सतत चालू असते.

अरहंतांचे शरीर परमऔदारिक शरीर असते. जीव जेव्हा १२व्या गुणस्थानात येतो त्या समयापासून १२व्या गुणस्थानाच्या अंतर्मुहूर्तकालापर्यंत त्याच्या शरीराच्या आधारे रहाणारे बादर निगोद जीव निघून जातात व १३व्या गुणस्थानाच्या प्रथम समयात औदारिक शरीर परमऔदारिक बनते.

तीर्थंकरांची व काही अरहंतांची दिव्यध्वनी खिरते, भव्य जीवांना त्यांच्याकडून मोक्षमार्गाचा उपदेश प्राप्त होतो. त्यांचा विहारदेखील होतो. परंतु त्या जीवांना आहार म्हणजे भोजन असत नाही हे आपण पूर्वीच पाहिले आहे. अरहंत अवस्थेमध्ये कोणताही उपसर्ग उरत नाही, होत नाही.

केवलज्ञानाच्या प्राप्तिबरोबरच १३वे गुणस्थान सुरु होते. त्यांच्या आयुष्याचा १ अंतर्मुहूर्त बाकी राहीपर्यंत हे १३वे गुणस्थान चालू रहाते. पाच लघुस्वर - अ, इ, उ, ऋ, ऌ यांचा उच्चार करण्यास जेवढा वेळ लागेल तेवढा लघुअंतर्मुहूर्त काळ

१४व्या गुणस्थानाचा आहे. या गुणस्थानात अघाति कर्मप्रकृतिंपैकी ८५ प्रकृतिंची सत्ता असते. त्यांचा नाश होऊन जीव पूर्णरूपाने कर्मविरहित होतो. शरीराचे परमाणु विखरून जातात. जीव त्याच एका समयात ऊर्ध्वगमन करून लोकाकाशाच्या वरच्या टोकाला जाऊन विराजमान होतो. अनंतकाळापर्यंत तेथेच रहातो.

सर्व गुणांच्या स्वभावपर्याय होत रहातात, जीव आपली पूर्ण शुद्ध अवस्था प्राप्त करतो. सिद्ध भगवान गुणस्थानातीत होतात.

मुलींनो, आपलेही स्वरूप सिद्धसमानच आहे. हे स्वरूप-स्वभाव तर विद्यमान आहे, प्राप्त आहे. आपल्याला प्राप्त आहे त्याची प्राप्ति पर्यायात करावयाची आहे. सिद्ध भगवंतांचे स्वरूप जाणून त्यांच्या एवढाच आपण आपला स्वभाव मानला पाहिजे. परंतु आपण आजपर्यंत स्वतःला सिद्धापेक्षा अधिक मानत आलो होतो.

खरे नाही ना वाटत? अनेकजण म्हणतात, 'अहो आम्ही तर स्वतःला सिद्धापेक्षा हीन मानले आहे व तुम्ही तर अधिकची वार्ता करत आहात, हे कसे बरे?'

सिद्ध व आपला स्वभाव यांची समानता आहे. आपण स्वभावाला जाणले नाही तोपर्यंत आपण काय काय मानले ते पहा. सिद्ध एकटे आहेत, आपण स्वतःला मुलंबाळं, परिवार यांच्या सहितचे मानले. सिद्ध शरीररहित आहेत, आपण स्वतःला शरीरसहित किंवा शरीरालाच मी मानले. सिद्ध रागरहित आहेत, आपण स्वतःला रागवाला मानले, कषायसहित मानले. सिद्ध कर्मरहित आहेत, आपण स्वतःला कर्माशी व त्याच्या उदयाशी एकमेक मानले. सिद्ध परद्रव्यांचा अकर्ता आहेत, आपण स्वतःला परद्रव्यांचा कर्ता मानले. सिद्ध परद्रव्यांचा अभोक्ता आहेत, आपण स्वतःला परद्रव्यांचा व इंद्रियविषयांचा भोक्ता मानले. सिद्ध केवलज्ञानी आहेत, आपण स्वतःला प्रकट ज्ञानाएवढेच मानले. सिद्ध गुणस्थानातीत आहेत आपण स्वतःला गुणस्थानरूप मानले, मी मिथ्यादृष्टि असे मानले.

पर आणि पर्याय हे ज्ञानात येतात, त्यांची विद्यमानता आहे परंतु जेव्हा स्वभावाचे ज्ञान करून घेऊन त्या त्रिकाली ध्रुव एकरूप स्वभावामध्ये एकाग्र होण्यासाठी ज्याविशिष्ट दृष्टिने

स्वत:कडे पाहिले जाते त्या दृष्टिला एकमात्र स्वभावच दृष्टिस पडतो, अन्य सर्व गोष्टी त्या दृष्टीमध्ये-त्याच्या विषयात असत नाहीत.

म्हणूनच या सर्व गोष्टींचे सर्वांगीण ज्ञान झाल्यानंतर स्वशुद्धात्म्याची दृष्टि करण्यासाठी समयसार ग्रंथामध्ये ५६व्या गाथेत म्हटले आहे की, हे वर्णापासून गुणस्थानापर्यंतचे सर्व भाव व्यवहारनयाने जीवाचे म्हटले असले तरी खरं पहाता अर्थात निश्चयनयाच्या मताप्रमाणे त्यातील एकदेखील जीवाचा नाही.

हे वर्णादि २९ भाव कोणते आहेत हे समयसार गाथा ५० ते ५५ मध्ये सांगितले आहे. तुम्ही स्वत: समयसारमध्ये हे वाचावे असे मला वाटते. तरीदेखील माझे पक्के व्हावे यासाठी मी येथे लिहित आहे.

जीवाला वर्ण नाही, गंध नाही, रस नाही, स्पर्श नाही, रूप नाही, शरीर नाही, संस्थान नाही, संहनन नाही, जीवाला राग नाही, द्वेष नाही, मोह नाही, प्रत्यय (आस्रव) नाहीत, कर्म नाहीत, नोकर्म देखील नाहीत. जीवाला वर्ग नाहीत, वर्गणा नाहीत, स्पर्धक नाहीत, अध्यात्मस्थान नाहीत, अनुभागस्थानदेखील नाहीत. जीवाला योगस्थान नाहीत, बंधस्थान नाहीत, उदयस्थान नाहीत, मार्गणास्थान नाहीत. जीवाला स्थितिबंधस्थान नाहीत, संक्लेशस्थान नाहीत, विशुद्धिस्थान नाहीत. जीवाला संयमलब्धिस्थान नाहीत, जीवस्थान नाहीत अथवा गुणस्थानदेखील नाहीत.

तुम्ही म्हणाल हे नाही, ते नाही तर काय आत्मा शून्यस्वरूप आहे की काय? आचार्य अमृतचंद्र समयसार कलश ३७ मध्ये म्हणतात की वर्णादि हे सर्व भाव या आत्म्याहून भिन्न आहेत म्हणून अंतर्दृष्टीने पहाणाऱ्याला हे काहीही दिसत नाहीत. फक्त एक सर्वोत्कृष्ट तत्त्वच दिसते - केवळ एक चैतन्यभावस्वरूप अभेदरूप आत्माच दिसतो.

आपणही आपल्या स्वशुद्धात्म्याची दृष्टि करूया.

कळावे,

**तुमची आई.**

# गुणस्थान-विभाजन
# गमनागमन व काळ

पत्रांक १३ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ६ सप्टेंबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

आपण स्थूल रूपाने वेगवेगळ्या गुणस्थानांचे स्वरूप पाहिले. आता सर्व गुणस्थानांचे एकाच वेळी वेगवेगळ्या अपेक्षांनी मूल्यमापन करूया.

१४ गुणस्थानांची नावे आतापर्यंत तुम्हाला पाठ झाली असतील; नसतील तरी आता करा. ती नावे अशी आहेत. १) मिथ्यात्व. २) सासादन सम्यक्त्व. ३) सम्यग्मिथ्यात्व. ४) अविरत सम्यक्त्व. ५) देशविरत. ६) प्रमत्तविरत. ७) अप्रमत्तविरत. ८) अपूर्वकरण. ९) अनिवृत्तिकरण. १०) सूक्ष्मसांपराय. ११) उपशांतमोह. १२) क्षीणमोह. १३) सयोगकेवली. १४) अयोगकेवली.

प्रथम मोह आणि योगाच्या मुख्यतेने गुणस्थानांचे विभाजन पाहूया.

(१) पहिली चार गुणस्थाने दर्शनमोहनीय कर्माच्या सद्भाव किंवा असद्भावाच्या अपेक्षेने आहेत. त्यापैकी पहिल्या गुणस्थानात दर्शनमोहनीय कर्माच्या मिथ्यात्व प्रकृतिचा उदय असतो, तिसऱ्या गुणस्थानात सम्यग्मिथ्यात्व प्रकृतिचा उदय असतो, चौथ्या गुणस्थानात सम्यक्प्रकृतिचा उदय असतो किंवा या तीनही प्रकृतिंचा उपशम किंवा क्षय असतो. दुसऱ्या गुणस्थानात दर्शनमोहनीय कर्माचा उदय, उपशम, क्षय, क्षयोपशम पैकी कुठलाच भाव नसल्याने दर्शनमोहाच्या अपेक्षेने पारिमाणिक भाव म्हटले असले तरी त्यावेळी अनंतानुबंधीचा उदय असतो.

(२) पाचव्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानापर्यंत आठ गुणस्थानं चारित्रमोहनीय कर्माच्या सद्भाव-असद्भावाच्या मुख्यतेने आहेत. पाचव्या गुणस्थानात अनंतानुबंधी व अप्रत्याख्यान या दोन कषाय कर्मांचा अभाव आहे परंतु

प्रत्याख्यान व संज्वलन व इतर नोकषाय कर्म यांचा सद्भाव आहे. ६व्या गुणस्थानात ३ कषायांचा अभाव व संज्वलन कषाय कर्माचा तीव्र उदय आहे.

७व्या गुणस्थानात संज्वलनाचा मंद उदय आहे.

८व्या गुणस्थानात संज्वलनाचा मंदतर उदय आहे.

९व्या गुणस्थानात संज्वलनाचा मंदतम उदय आहे.

१०व्या गुणस्थानात केवळ सूक्ष्म लोभाचा उदय आहे.

११व्या गुणस्थानात चारित्रमोहनीय कर्माच्या २१ प्रकृतिंचा (अप्रत्याख्यानावरण ४, प्रत्याख्यानावरण ४, संज्वलन ४, व नोकषाय ९ यांचा) उपशम आहे.

१२व्या गुणस्थानात वरील सर्व २१ प्रकृतिंचा क्षय आहे.

(३) १३वे गुणस्थान योगाच्या सद्भावाच्या मुख्यतेने आहे.

(४) १४वे गुणस्थान योगाच्या असद्भावाच्या मुख्यतेने आहे.

आता अन्य भिन्नभिन्न अपेक्षांनी गुणस्थानांचे वर्गीकरण पाहूया.

(५) अविरत व विरत यांच्या अपेक्षेने :—

१ ते ४ ही सर्व चार गुणस्थानं अविरतच आहेत.

५वे गुणस्थान विरताविरत आहे. ६व्या गुणस्थानापासून वरील सर्व गुणस्थानवर्ती जीव विरत आहेत.

(६) अज्ञानी आणि ज्ञानी यांच्या अपेक्षेने :—

पहिली तीन गुणस्थानं अज्ञानी जीवांची आहेत. ४थ्या गुणस्थानापासून १४व्या गुणस्थानापर्यंत सर्व जीव ज्ञानी अर्थात सम्यग्ज्ञानी आहेत.

(७) अल्पज्ञ व सर्वज्ञ यांच्या अपेक्षेने :—

१ ते १२ गुणस्थानवर्ती जीव अल्पज्ञ आहेत, १३व्या व १४व्या गुणस्थानातील जीव सर्वज्ञ आहेत. ही दोन गुणस्थानं केवलीची आहेत.

(८) श्रावकाच्या अपेक्षेने :—

४थे व ५वे या दोन गुणस्थानवर्ती जीवांना श्रावक म्हणतात.

(९) गुरु अर्थात मुनींच्या अपेक्षेने :—

१. प्रमत्त-अप्रमत्त गुरु :— ६व्या-७व्या गुणस्थानात झुलणारे भावलिंगी संत.

२ श्रेणीमध्ये आरूढ गुरु:— ८व्या पासून १२व्या गुणस्थानातील गुरु.

३ परमगुरु:— १३व्या व १४व्या गुणस्थानातील जीव अर्थात अरहंत परमात्मा.

(१०) श्रेणीच्या अपेक्षेने :—

उपशमश्रेणीवाले जीव:— ८व्या, ९व्या, १०व्या व ११व्या उपशामक गुणस्थानतले मुनि. ११व्या नंतर हे नियमाने क्रमश: परत ६व्यापर्यंत येतात.

क्षपकश्रेणीवाले जीव:-- ८ व्या, ९व्या, १०व्या व १२व्या क्षपक गुणस्थानातले मुनि.

(११) प्रमत्त व अप्रमत्त भावाच्या अपेक्षेने : —

१ ते ६ गुणस्थानं प्रमत्तभावसहित आहेत.

७व्या पासून १४व्या पर्यंत सर्व गुणस्थानात अप्रमत्तभाव आहे.

(१२) योग आणि अयोग याच्या अपेक्षेने : —

१ ते १३ गुणस्थानं योगसहित आहेत. सयोगी आहेत व फक्त १४व्या गुणस्थानातील जीव अयोगी आहेत.

(१३) रागी आणि वीतरागी या अपेक्षेने : —

१) १ ते ३ गुणस्थानांमध्ये फक्त रागी जीवच आहेत, मोक्षमार्गाचे विराधक आहेत. तेथे वीतरागभाव जराही नाही.

२) ४थ्या पासून १०व्या गुणस्थानापर्यंत वीतरागतेबरोबर राग देखील आहे परंतु क्रमाने वीतरागता वाढत जाते व राग घटत जातो.

३) ११व्या, १२व्या, १३व्या व १४व्या गुणस्थानातील जीव पूर्ण वीतरागी आहेत.

११व्या, व १२व्या गुणस्थानातील जीवांना वीतराग छद्मस्थ म्हटले आहे.

१३व्या व १४व्या गुणस्थानातील जीवांना वीतराग सर्वज्ञ म्हटले आहे.

(१४) सुख व दु:ख यांच्या अपेक्षेने :—

मिथ्यादर्शन, अज्ञान व असंयम हे दु:खाचे कारण आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे विभाजन होईल.

१) १ ते ३ गुणस्थानवर्ती जीव नियमाने दु:खी आहेत.

२) ४ ते १० गुणस्थानवर्ती जीव काही प्रमाणात सुखी व काही प्रमाणात दु:खी आहेत. जेवढी वीतरागता तेवढे सुख आहे व जेवढा राग बाकी असेल तेवढे दु:ख आहे.

३) ११ व १२ गुणस्थानवर्ती जीव पूर्ण वीतरागी असल्याने पूर्ण सुखी आहेत.

४) १३ व १४ गुणस्थानवर्ती जीव अनंतसुखी आहेत कारण त्यांना केवलज्ञान अर्थात अनंतज्ञान तसेच अनंतवीर्य आहे व सुखदेखील अनंतरूप परिणमित आहे.

(१५) बहिरात्मा, अंतरात्मा व परमात्मा यांच्या अपेक्षेने :—

१) १ ते ३ गुणस्थानं बहिरात्म्याची आहेत.

२) ४ ते १२ गुणस्थानं अंतरात्म्याची आहेत.

३) १३ व १४ गुणस्थानं परमात्म्याची आहेत.

(१६) अशुभोपयोगी, शुभोपयोगी व शुद्धोपयोगी यांच्या अपेक्षेने : —

१) १ ते ३ गुणस्थानवर्ती जीव मुख्यत: अशुभोपयोगी आहेत.

२) ४ ते ६ गुणस्थानवर्ती जीव मुख्यत: शुभोपयोगी आहेत. ४थ्या व ५व्या मध्ये कधी कधी शुद्धोपयोग होतो म्हणून ते गौणरूपाने शुद्धोपयोगी आहेत.

३) ७ ते १४ गुणस्थानवर्ती जीव शुद्धोपयोगी आहेत.

(१७) धार्मिक, अधार्मिक या अपेक्षेने :—

१) १ ते ३ गुणस्थानं - अधार्मिक जीवांची आहेत कारण धर्म म्हणजे मोक्षमार्ग अजून प्रकट झालेला नाही.

२) ४ ते १४ गुणस्थानं - धार्मिक जीवांची आहेत.

(१८) मिथ्या व सम्यक् चारित्र यांच्या अपेक्षेने :

१) १ ते ३ गुणस्थानांमध्ये मिथ्याचारित्र आहे.

२) ४ ते १४ गुणस्थानांमध्ये सम्यक्चारित्र आहे.

यावरून लक्षात येते की बाह्यव्रतांचा स्वीकार केल्यानंतर देखील जोपर्यंत आत्मानुभव होत नाही तोपर्यंत त्या जीवाला सम्यक्चारित्र होऊ शकत नाही.


अशा आणखीही अपेक्षा लागू शकतात. या सर्वांचा अभ्यास केला असता आपल्याला गुणस्थानांचे व मोक्षमार्गाचे स्वरूप नीटपणे समजते. या सर्व अपेक्षा 'गुणस्थान विवेचन' नावाच्या ब्र. यशपाल जैन यांच्या पुस्तकातून उद्धृत केल्या आहेत. ते पुस्तक अवश्य वाचा त्यामध्ये सविस्तर वर्णन आहे.

आता थोडक्यात गमनागमनाविषयी विचार करूया. जीवाचे परिणाम सतत एकसदृश रहात नाहीत. सम्यक्त्वप्राप्तिनंतर देखील जीव पुन्हा खालच्या गुणस्थानात येऊ शकतो व परत पुरुषार्थ करून पुन्हा वरच्या गुणस्थानात जाऊ शकतो. १ल्या गुणस्थानातून जीव ४थ्या गुणस्थानामध्ये जाऊ शकेल. व्रत धारण केलेला द्रव्यलिंगी श्रावक असेल व तो अधिक पुरुषार्थ करेल तर ५व्या गुणस्थानात जाऊ शकेल. एखादा द्रव्यलिंगी मुनि पुरुषार्थ करून एकदम ७व्यात, ५व्यात किंवा ४थ्यात जाऊ शकेल. सादि मिथ्यादृष्टि अर्थात जो एकदा सम्यक्त्व प्राप्त करून पुन्हा मिथ्यात्वात आला आहे असा सादि मिथ्यादृष्टी जीव ३ऱ्या गुणस्थानात जाऊ शकेल.

**१ल्या गुणस्थानाचे गमनागमन:–**

गमन—पहिल्या गुणस्थानातून ४थ्या, ५व्या, ७व्या गुणस्थानात व ३ऱ्या गुणस्थानात जाऊ शकेल.


आता पहिल्या गुणस्थानामध्ये जीव कोणकोणत्या गुणस्थानातून येतो ते पाहूया. ६व्यातून, ५व्यातून, ४थ्यातून, ३ऱ्यातून, २ऱ्यातून येऊ शकेल. आपण आकृतिद्वारे हे पाहू या.




**२ऱ्या गुणस्थानाचे गमनागमन : –**

गमन एकमात्र मिथ्यात्व गुणस्थानात होते.

आगमन ६व्या, ५व्या, ४थ्या तून जो औपशमिक सम्यक्त्वी आहे त्याचे होते.









**३ऱ्या गुणस्थानाचे गमनागमन :–**

३ऱ्यातून गमन १ल्यात किंवा ४थ्यात होते.

३ऱ्यामध्ये आगमन ६व्यातून, ५व्यातून, ४थ्यातून किंवा १ल्यातून होते.





**४थ्या गुणस्थानाचे गमनागमन : —**

गमन - ७व्यात, ५व्यात, ३ऱ्यात, २ऱ्यात किंवा १ल्यात होते.


आगमन - ६व्यातून, ५व्यातून, ३ऱ्यातून, १ल्यातून होते.

उपशम श्रेणीवाला जीव, ५व्या, ६व्या, ७व्या गुणस्थानातला जीव मरण झाले असता लगेच ४थ्या गुणस्थानात येतो.

गमन





आगमन





**५व्या गुणस्थानाचे गमनागमन :-**

द्रव्यलिंगी मुनि ५व्यातून ७व्यात गमन करतो. ५व्यातून पडून जीव ४थ्यात, ३ऱ्यात, २ऱ्यात किंवा १ल्या गुणस्थानात गमन करतो. आगमन ६व्यातून, ४थ्यातून किंवा १ल्यातून होते.

गमन





आगमन





**६व्या गुणस्थानाचे गमनागमन :-**

गमन - ७व्यात आणि खालच्या सर्व गुणस्थानांमध्ये होऊ शकते - ५व्यात, ४थ्यात, ३ऱ्यात, २ऱ्यात, व १ल्यात. आगमन एकमात्र ७व्या गुणस्थानातूनच होते.

गमन





आगमन




## ७व्या गुणस्थानाचे गमनागमन :–

गमन - श्रेणी मांडतांना ८व्या मध्ये, अन्यतः ६व्यात गमन होते.

आगमन - १ल्यातून, ४थ्यातून, ५व्यातून, व ६व्यातून होते. १ल्या, ४थ्या व ५व्यातून ७व्यात येणाऱ्या जीवास द्रव्यलिंगी मुनि असणे आवश्यक आहे. ६व्यातले तर स्वतः भावलिंगी मुनि आहेत. आगमन ८व्या उपशामक गुणस्थानातून देखील होते.









## ८व्या गुणस्थानाचे गमनागमन :–

गमन - ८व्यातून ९व्या गुणस्थानात होते. उपशामक जीव श्रेणी उतरून परत ७व्यात जातो. मरण झाल्यास ४थ्यात जातो. उपशामकाचे श्रेणी चढताना ८व्याच्या पहिल्या भागात मरण होत नाही.

आगमन - ७व्या सातिशय अप्रमत्तमधून होते. उपशमश्रेणी उतरताना ९व्यातून देखील आगमन होते.








### ९व्या गुणस्थानाचे गमनागमन :-

गमन - ९व्यातून १०व्या मध्ये होते. उपशामक जीव श्रेणी उतरताना ९व्या तून ८व्यात गमन करतो मरण झाल्यास ४थ्यात गमन करतो.

आगमन - ८व्यातून ९व्यात होते. उपशम श्रेणी उतरताना १०व्यातून देखील आगमन होते.









### १०व्या गुणस्थानाचे गमनागमन :-

क्षपक श्रेणीमध्ये गमन - १०व्यातून १२व्यात होते. क्षपक श्रेणीत मरण होत नाही.


आगमन - ९व्यातून १०व्यात होते. उपशमश्रेणीमध्ये गमन १०व्यातून ११व्यात होते किंवा उतरताना ९व्यात गमन होते, आगमन ९व्यातून किंवा ११ व्यातून होते. उपशामकाचे मरण झाल्यास ४थ्या गुणस्थानात गमन होते.




### ११व्या गुणस्थानाचे गमनागमन :-


हे फक्त उपशमश्रेणीचेच गुणस्थान आहे. येथून गमन खाली १०व्यात होते व आगमनही १०व्यातूनच होते. मरणोपरांत ४थ्यात.



### १२व्या गुणस्थानाचे गमनागमन :–

हे फक्त क्षपक श्रेणीतील गुणस्थान आहे. गमन १३व्या गुणस्थानात होते, आगमन १०व्या गुणस्थानातून होते.


गमन व आगमन




### १३व्या गुणस्थानाचे गमनागमन :–

गमन - १४व्या गुणस्थानात, आगमन - १२व्या गुणस्थानातून होते.


गमन व आगमन




### १४व्या गुणस्थानाचे गमनागमन :–

१४व्या गुणस्थानातून जीव गुणस्थानातीत सिद्ध परमेष्ठी होतो. १४व्यात आगमन १३व्यातून होते.

गमन व आगमन




गमनागमन पाहिल्यानंतर आता गुणस्थानांचा काळ पाहूया. विशिष्ट गुणस्थानात जीव अधिकाधिक किती काळ राहू शकतो यास 'उत्कृष्ट काळ' म्हणतात व कमीत कमी राहिला तर किती काळ राहतो यास 'जघन्य काळ' म्हणतात. येथे सादि, अनादि वगैरे शब्दांचे अर्थ पाहूया.

**अनादि** - ज्याला आदि म्हणजे सुरुवात नाही.

**अनंत** — ज्याला अंत म्हणजे शेवट नाही.

**सादि** - स + आदि म्हणजे ज्याला कधीतरी सुरुवात होते.

**सांत** - स + अंत म्हणजे ज्याला अंत आहे.

यामध्ये ४ प्रकार संभवतात. अनादिअनंत, अनादिसांत, सादिअनंत, सादिसांत, आता एका जीवाच्या अपेक्षेने काळ पाहूया.

**१ल्या मिथ्यात्व गुणस्थानाचा काळ** - अभव्य जीवाच्या अपेक्षेने अनादिअनंत आहे. दूरानुदूर भव्य म्हणजे पात्रता असताना देखील जो अनंत काळानंतरही मोक्षाला जाणार नाही त्याच्या मिथ्यात्वाचा काळही अनादिअनंत आहे. जो जीव सम्यक्त्व प्राप्त करतो त्याच्या मिथ्यात्व गुणस्थानाचा काळ अनादिसांत आहे.

मिथ्यात्व गुणस्थानाचा सादि मिथ्यादृष्टिच्या अपेक्षेने विचार केला असता सादिसांत उत्कृष्ट काळ किंचित् न्यून अर्धपुद्‌गल परावर्तन आहे. व जघन्य काळ एक अंतर्मुहूर्त आहे.

**२ऱ्या सासादन गुणस्थानाचा काळ** - उत्कृष्ट सहा आवलि व जघन्य काळ एक समय आहे.

**३ऱ्या सम्यग्मिथ्यात्व गुणस्थानाचा काळ** - यथायोग्य अंतर्मुहूर्त आहे त्यामध्ये जघन्य, उत्कृष्ट, मध्यम असे भेद नाहीत.

**४थ्या अविरत सम्यक्त्व गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक अंतर्मुहूर्त व उत्कृष्ट साधिक तेहतीस सागर आहे.

**५व्या देशविरत गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक अंतर्मुहूर्त व उत्कृष्ट काळ मनुष्यामध्ये १ करोड पूर्व वर्षांमधून गर्भकालसहित ८ वर्ष व एक अंतर्मुहूर्त वजा जाता जो काळ राहील तेवढा. व तिर्यंचामध्ये सम्मूर्च्छन तिर्यंचाच्या अपेक्षेने १ करोड पूर्व वर्षांमधून १ अंतर्मुहूर्त वजा जाता उरलेला काळ. पहा बरं, मनुष्याला ५वे गुणस्थान ८व्या वर्षानंतर प्राप्त होऊ शकते. तिर्यंचाला जन्मानंतर एक अंतर्मुहूर्तानंतर प्राप्त होऊ शकते.

**६व्या प्रमत्तविरत गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक समय. कसा ते पाहू या. एखादे मुनिराज ७व्या अप्रमत्त गुणस्थानातून ६व्यात आले व तेथे १ समय व्यतीत होताच त्यांना

मरण आले तर ६व्या गुणस्थानाचा जघन्य काळ १ समय राहील. उत्कृष्ट काळ यथायोग्य एक अंतर्मुहूर्त असतो. त्यानंतर ते नियमाने ७व्यामध्ये शुद्धोपयोगात जातात, जर गेले नाहीत तर मुनिपद सुटून खालची गुणस्थानं प्राप्त होतात. जघन्य व उत्कृष्ट मधील सर्व भेद मध्यमकाळाचे असतात.

**७व्या अप्रमत्तविरत गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक समय. ६व्यातून ७व्यात जाणारा किंवा ८व्या उपशमश्रेणीतून उतरताना ७व्यात एक समय व्यतीत करून मरण आल्यास ७व्याचा जघन्य काळ १ समय राहील. लक्षात ठेवावे की सर्वप्रथम सम्यक्त्व प्राप्तिसह ७वे गुणस्थान येते तेव्हा प्रथमोपशम सम्यक्त्वी जीवास मरण येत नाही. ७व्याचा उत्कृष्ट काळ यथायोग्य एक अंतर्मुहूर्त आहे.

**८व्या अपूर्वकरण गुणस्थानाचा काळ** - यथायोग्य अंतर्मुहूर्त आहे. परंतु जघन्य १ समय काळ आहे. उपशमश्रेणी चढताना ८व्याच्या पहिल्या भागात मरण येत नाही. परंतु उपशमश्रेणी उतरताना ९व्यातून ८व्यात येताच १ समयानंतर मरण झाल्यास ८व्याचा जघन्य काळ १ समय असतो. लक्षात असू द्या, क्षपक श्रेणीत मरण येत नाही.

**९व्या अनिवृत्तिकरण गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक समय. उपशमश्रेणी चढताना किंवा उतरताना ९व्यात १ समय राहून मरण आल्यास जघन्य काळ १ समय होईल. उत्कृष्ट काळ यथायोग्य अंतर्मुहूर्त असतो.

**१०व्या सूक्ष्म सांपराय गुणस्थानाचा काळ** - जघन्य १ समय. उपशमश्रेणी चढताना किंवा उतरताना १०व्या गुणस्थानात येऊन १ समय राहून मरण आल्यास १०व्याचा काळ १ समय राहील. उत्कृष्ट काळ - यथायोग्य अंतर्मुहूर्त असतो.

**११व्या उपशांतमोह गुणस्थानाचा काळ** -जघन्य एक समय - मरणाच्या अपेक्षेने. उत्कृष्ट काळ यथायोग्य अंतर्मुहूर्त. मध्यमकाळाचे सर्व भेदही मरणाच्या अपेक्षेने समजावेत.

**१२व्या क्षीणमोह गुणस्थानाचा काळ** - एक अंतर्मुहूर्त आहे. या क्षपक श्रेणीच्या गुणस्थानात मरण नाही.

**१३व्या सयोगकेवली गुणस्थानाचा काळ** - जघन्य एक अंतुर्मुहूर्त - त्यानंतर १४व्यात गमन होते. १३वे गुणस्थान प्राप्त झाल्यानंतर जेवढी आयु बाकी असेल त्यातून १४व्या गुणस्थानाचा एक अंतर्मुहूर्त काळ वजा जाता शेष काळ १३व्या गुणस्थानाचा काळ आहे. उत्कृष्ट काळ कोणाला असतो ते पाहूया. कर्मभूमीच्या मनुष्यालाच मुनिपणा व श्रेणीची गुणस्थाने व सिद्धपद प्राप्त होऊ शकते. या जीवाची उत्कृष्ट आयु १ करोडपूर्व वर्षांची असू शकते. (८४ लाख वर्ष गुणिले ८४ लाख वर्ष = १ पूर्व. १ करोड x १ पूर्व = १ करोड़ पूर्व = १ पूर्व कोटी)

१३व्याचा उत्कृष्ट काळ - १ करोड पूर्व वर्षांमधून गर्भकालसहित आठ वर्ष व आठ अंतर्मुहूर्त वजा जाता उरलेला काळ. मुनिदीक्षा धारण करण्यासाठी व ६वे ७वे गुणस्थान प्रकट करण्यासाठी कमीत कमी वय गर्भसहित ८ वर्षांचे आवश्यक आहे. त्यानंतर ८ अंतर्मुहूर्तात जीव १३ वे गुणस्थान प्राप्त करून मोक्षाला जाण्याचा पुरुषार्थ करू शकतो.

**१४व्या अयोगकेवली गुणस्थानाचा काळ** - एक अंतर्मुहूर्त जो पाच ऱ्हस्व स्वरांच्या (अ, इ, उ, ऋ, लृ) उच्चारणकाळाएवढा असतो. कमी अधिक असत नाही.

एका जीवाच्या अपेक्षेने आपण वर काळ पाहिला. नाना जीवांच्या अपेक्षेने काही गुणस्थाने निरंतर म्हणजे सदासर्वदा विद्यमान असतात. त्या गुणस्थानात कोणी जीव नाही असे १ समय देखील होऊ शकत नाही. ती गुणस्थानं आहेत—१ले, ४थे, ५वे, ६वे, ७वे, १३वे. ज्याप्रमाणे मिथ्यात्व गुणस्थानामध्ये जीव अनंतकाळापर्यंत रहाणारच त्याचप्रमाणे ४,५,६ व ७ ही मोक्षमार्गाची गुणस्थानं तसेच १३ वे अरहंत अवस्थेतील गुणस्थान यांचा एक समयमात्र देखील लोप होत नाही. सर्वज्ञाचा अभाव कधी होत नाही. मोक्षमार्गाचा उपदेश कधी बंद पडत नाही. धर्म प्रकट करणाऱ्या जीवांचा कधी लोप होत नाही. विदेहक्षेत्रात तर ते सदैवच विद्यमान असतात, इतरत्र जेथे काळाचे उत्सर्पिणी, अवसर्पिणी आदि भेद पडतात तेथे काही काळासाठी

काही क्षेत्रामध्ये लोप होऊ शकतो. त्यामुळे घाबरण्यासारखे काहीच नाही. मिथ्यात्वातून सम्यक्त्वप्राप्ति व नंतर मोक्षप्राप्ति असा प्रवाह सदैव कायमच रहातो. एकतर्फी मार्ग-वन वे ट्रॅफिक असल्याने मोक्षानंतर पुन्हा संसारात व गुणस्थानात यावे लागत नाही.

सर्वच जण मोक्षाला गेल्यावर या संसारात रहाणार कोण व या संसाराची काय दुर्दशा होईल? अशी चिंता करण्याचे कारण नाही. संसाररुचिवाले देखील कायम रहातील. अनंत काळानंतर देखील सिद्धांपेक्षा संसारी जीव अनंतपटींनीच रहातील.

यास्तव संसाराची चिंता न करता, स्वत:चे स्वरूप लक्षात घेऊन स्वरूपस्थिरतेद्वारे अर्थात आत्म्यात एकाग्रता करून आपण गुणस्थान आरोहण करून थोड्याच भवांमध्ये गुणस्थानातीत होऊया.

कळावे,

**तुमची आई.**

ऐक! धनसंपत्ति जी आहे ती विनाशीक आहे, भयसंयुक्त आहे, पापाने उत्पन्न होणारी आहे, नरकादिचे कारण आहे आणि हे जे शास्त्राभ्यासरूप ज्ञानधन आहे ते अविनाशी आहे, भयरहित आहे, धर्मरूप आहे, स्वर्ग-मोक्षाचे कारण आहे. म्हणून महंत पुरुष तर धनादिकाला सोडून शास्त्राभ्यासच करतात. आणि तू पापी! शास्त्राभ्यास सोडून धन पैदा करण्याची प्रेरणा देतोस. तर तू अनंत संसारी आहेस.

**सम्यग्ज्ञानचंद्रिका**

# जीवसमास

पत्रांक १४ **॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥** ९ सप्टेंबर१९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

आपण संसारी जीवांचे गुणस्थानांमध्ये वर्गीकरण करून त्या गुणस्थानांचे स्वरूप पाहिले. गुणस्थानाला 'संक्षेप' व 'ओघ' अशीही नावे आहेत. तसेच 'सामान्य' हे देखील नाव गुणस्थानासाठी वापरतात. ज्याअर्थी गुणस्थानाला संक्षेप व सामान्य म्हटले आहे त्याअर्थी विस्तार व विशेष या नावांनी ओळखले जाणारे देखील जीवांचे वर्गीकरण असले पाहिजे. त्याला 'मार्गणा' असे म्हणतात. 'मार्गणा'साठी 'विस्तार', 'आदेश' व 'विशेष' ही नावे वापरतात.

आचार्यांनी जीवाचे वर्णन अनेक प्रकारांनी केलेले आहे. त्याला 'प्ररूपणा' असे म्हणतात. एकून २० प्ररूपणा आहेत त्याचे स्थूलमानाचे दोन भेद आहेत. गुणस्थान व मार्गणास्थान.

खरं पाहता मार्गणा चौदा आहेत परंतु त्यामध्ये जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा व उपयोग या पाच प्ररूपणा सामिल करून सर्वांना मार्गणास्थान असे म्हणण्याची पद्धत आहे.

या वीस प्ररूपणांबद्दल आपण स्थूल चर्चा करणार आहोत. यांच्याविषयीची माहिती झाल्यानंतर जीवासंबंधीच्या ज्या अनेक भ्रामक कल्पना आपण बाळगत असतो, त्या दूर होतात. यासंबंधी अधिक विस्तारात न जाता आवश्यक तेवढीच जुजबी माहिती आपण घेणार आहोत. समजा अधिक जाणण्याची रुचि उत्पन्न झाली तर चांगलेच आहे. शास्त्रभांडार उपलब्ध आहेच.

आम्ही सकाळी आता कर्मकांडाचा स्वाध्याय सुरू केला आहे. सुरुवातीला पीठिका व जीवकांडात काय शिकलो याची उजळणी-सूचनिका आहे. त्या दिवसाची माझी कॅसेट ऐकून रीना तुला जीवकांड शिकावेसे वाटले असे तू म्हणालीस. जीवकांडामध्ये या वीस प्ररूपणांसंबंधीच सर्व विवेचन आहे.

वीस प्ररूपणांमधली पहिली प्ररूपणा गुणस्थान आहे. त्याबद्दल आपण माहिती घेतलीच आहे. आज जीवसमास या

दुसऱ्या प्ररूपणेबद्दल चर्चा करूया.

आपले प्रत्येकाचे आज अस्तित्व आहे. प्रत्येक जीवाला 'मी आहे' अशी स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव व खात्री असते, ते कोणी शिकवावे लागत नाही. ज्यामध्ये अस्तित्व असते असा पदार्थ - असे द्रव्य त्रिकाळ अस्तित्ववान असते. त्याचे अस्तित्व कधी नाहीसे होत नाही. अस्तित्व गुणाच्या चर्चेत आपण हे सारे विस्ताराने शिकलोच आहोत.

मी आज आहे, कालही होते. सध्या मी मनुष्यपर्यायात आहे, यापूर्वी अन्य पर्यायात होते. त्यापूर्वी आणखी इतर कोणत्यातरी पर्यायात होते. अशा रीतीने अनादिकाळापासून आपणा प्रत्येकाचे अस्तित्व कायम आहे. अनंतानंत भवांमध्ये फिरत फिरत आज आपण येथे आलो आहोत.

बा जीवा, या भवाभवातून भटकण्याचा, या भ्रमंतीचा तुला कंटाळा नाही का आला? अनादिकाळापासून मोहनिद्रेमध्ये तू निद्रिस्त आहेस, झोपला आहेस. जाग बाबा जाग, आता तर तुझी जागे होण्याची वेळ आली आहे. तू आजपर्यंत कोठे कोठे जन्ममरण करून आलास ते ऐक तरी खरे!

हे जीवा, जोपर्यंत प्राप्त शरीराहून भिन्न असे स्वत:चे स्वरूप तू ओळखणार नाहीस, स्वत:चा विश्वास, स्वत:चे ज्ञान व स्वत:मध्ये एकाग्रता करणार नाहीस तोपर्यंत तुला वेगवेगळ्या शरीरांचा संयोग होत राहील. तुझ्या शुभाशुभ भावांच्या फलस्वरूप तू चार गतींमध्ये भटकत रहाशील.

जीव अनंत आहेत. त्यापैकी फारच थोड्या सजीवांना - जीवाच्या पर्यायांना आपण जाणतो. केवलज्ञानीशिवाय अन्य कोणीही या सर्व जीवांचे व त्यांच्या पर्यायांचे स्पष्ट ज्ञान करू शकत नाही. सर्वज्ञांनी स्वत: जाणून जीवाच्या या विविध योनिंचे व जातींचे वर्णन केले आहे. या समस्त संसारी जीवांचे काही विशिष्ट समान धर्माच्या अपेक्षेने वर्गीकरण करता येते - ग्रुप्स करता येतात.

जसे, उपयोग अर्थात चेतना लक्षणाद्वारे पाहिले असता त्यात सर्व जीव गर्भित होतील, त्रस व स्थावर भेद केले असता दोन भेद म्हणजे दोन स्थानं होतील. द्वींद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतच्या

जीवांना 'त्रस' म्हणतात. पृथ्वीकायिकादि पाच प्रकारच्या एकेंद्रियांना 'स्थावर' म्हणतात. यांचेच एकेंद्रिय, विकलेंद्रिय, सकलेंद्रिय असे भेद केले असता जीवसमासाची तीन स्थानं होतील. विकलेंद्रियामध्ये द्वींद्रिय, त्रींद्रिय व चतुरिंद्रिय जीव गर्भित आहेत त्यांना विकलत्रय असेही म्हणतात.

आत्ता आपण तीन स्थानं पाहिली, शास्त्रामध्ये विभिन्न अपेक्षांनी भेद करत करत क्रमाने एक एक वाढत जाता एकोणीस स्थानं सांगितली आहेत. त्यांचेही अनेक उपभेद सांगितले आहेत.

जसे हे स्थानांचे भेद आहेत तद्वतच योनिंचे भेद, देहाच्या अवगाहनांचे भेद, कुलभेद यांच्या अपेक्षेने जीवसमासाचे वर्णन केले आहे. या सर्वांच्या विस्तारात न जाता सामान्यपणे चौदा जीवसमास सांगितले आहेत त्यांचे स्वरूप आज आपण पाहूया.

जीवाच्या संयोगात जो देह आहे व त्याच्या ज्ञानाचा जो उघाड आहे त्याच्या अपेक्षेने अर्थात इंद्रियांच्या अपेक्षेने जीवांचे भेद केले आहेत. येथे द्रव्येंद्रिय व भावेंद्रिय (ज्ञानाचा उघाड) हे दोन्ही गर्भित आहेत. एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत जीव आढळतात. त्यापैकी एकेंद्रियांमध्ये सूक्ष्म व बादर असे दोन भेद आहेत व पंचेंद्रियांमध्ये संज्ञी - मनसहित व असंज्ञी-मनरहित असे दोन भेद आहेत. या सर्वांची संख्या सात झाली या सर्वांचे पर्याप्त व अपर्याप्त असे दोन दोन भेद केले असता त्यांची संख्या चौदा होते. ती अशी :—

१ एकेंद्रिय - सूक्ष्म
२ एकेंद्रिय - बादर
३ द्वींद्रिय
४ त्रींद्रिय
५ चतुरिंद्रिय
६ पंचेंद्रिय - असंज्ञी
७ पंचेंद्रिय - संज्ञी

— पर्याप्त
— अपर्याप्त

एकेंद्रिय जीवांना एकच स्पर्शनइंद्रिय असते. यांचे पाच प्रकार आहेत. पृथ्वीकायिक, जलकायिक, वायुकायिक, अग्निकायिक व वनस्पतिकायिक. काया म्हणजे शरीर. पृथ्वी ज्यांचे शरीर आहे त्यांना पृथ्वीकायिक जीव म्हणतात. जल ज्यांचे

शरीर आहे त्यांना जलकायिक जीव म्हणतात असे सर्वांचे समजावे.

तुम्हाला वाटेल की एक मोठा जलाशय एक जलकायिक जीव असेल, एक विशाल पर्वत एक पृथ्वीकायिक जीव असेल, प्रचंड आग एक अग्निकायिक जीव असेल व मोठा वृक्ष एकच वनस्पतिकायिक जीव असेल; परंतु असे नाही. या सर्व एकेंद्रिय जीवांची अवगाहना म्हणजे साईझ अतिशय छोटा आहे. अंगुलाच्या असंख्यातव्या भागाएवढी ही अवगाहना आहे. बोटाच्या-तर्जनीच्या रुंदीला 'अंगुल' असे म्हणतात.

पाण्याच्या एका थेंबामध्ये असंख्यात जलकायिक जीव असतात. पाण्यात जे अन्य त्रस जीव आढळतात त्यांची चर्चा नाही बरं चालली! जो अग्नि आपल्याला दिसतो त्यात असंख्यात अग्निकायिक जीव असतात. थोड्याशा मातीत असंख्यात पृथ्वीकायिक जीव रहातात. नुसती मातीच नाही तर पत्थर, वाळू, रत्न, माणिक, हिरे, खाणीतील धातु हे सर्व पृथ्वीकायिकाचेच भेद आहेत.

ज्या हिऱ्यामाणिकांचं, सोन्याचं आपल्याला एवढं आकर्षण वाटतं त्यांच्या स्वरूपाचा कधी विचार केलाय? खाणीतील कोळसा असो की हिरे माणिक असोत सर्व एकेंद्रिय जीव आहेत. खाणीतून काढल्यावर त्यातून जीव निघून जातो तेव्हा उरते ते त्या जीवांचे कलेवर. आपण पंचेंद्रिय जीव बुद्धिने स्वत:ला महान समजतो परंतु आपल्या संयोगातील या देहावर - या कलेवरावर एकेंद्रियांची कलेवरं धारण करतो व दिमाखाने त्यांचे प्रदर्शन करत फिरतो. अन्य भोळेभाबडे - अज्ञानी जीवदेखील त्यांच्याकडे पाहून ईर्षा करतात. आपल्या बुद्धिचे हे दिवाळे निघाले आहे यात शंका नाही.

या पाचही प्रकारच्या एकेंद्रियांना स्थावरकाय किंवा स्थावर जीव म्हणतात. त्यांना स्थावर नावाच्या नामकर्माचा उदय असतो. या सर्वांचे सूक्ष्म व बादर असे दोन दोन भेद आहेत. प्रथम सूक्ष्म जीवांचे वैशिष्ट्य पाहूया. सूक्ष्म आणि बादर या नामकर्माच्या प्रकृति आहेत. सूक्ष्म नामकर्माच्या उदयाने जे जीव उत्पन्न होतात त्यांना सूक्ष्म जीव असे म्हणतात. हे सूक्ष्म जीव वज्र, अग्नि,

जल, पर्वत, मेरु वगैरेंनी अडवले-रोकले जाऊ शकत नाहीत तसेच अग्नि वगैरेंनी मारले जाऊ शकत नाहीत-त्यांचे कदलीघाताने मरण होत नाही, आपली आयु पूर्ण करून आयुच्या अंतीच ते मरतात. ते जीव अन्य जीवांना मारत नाहीत व अन्य जीव त्या जीवांना मारू शकत नाहीत - त्यांची हिंसा करू शकत नाहीत. ते कोणाच्याही आधाराशिवाय रहातात तसेच अन्य जीवांनादेखील आधार देत नाहीत.

याचा अर्थ असा होतो की सूक्ष्म जीव मारण्याने मरत नाहीत, कापल्याने कापले जात नाहीत, अग्निद्वारे जळत नाहीत, वाऱ्याने उडत नाहीत. सर्व पर्वत, भिंती, शरीरादिंमधून आरपार गमन करतात. सूक्ष्म जीव लोकाकाशात सर्वत्र (वातवलयांसहित सर्वत्र) ठसोठस भरलेले आहेत. लोकाकाशाचे असे कोणतेही क्षेत्र नाही की जेथे सूक्ष्म निगोदिया (निगोद) जीव, सूक्ष्म अग्निकायिक, सूक्ष्म पृथ्वीकायिक, सूक्ष्म जलकायिक, सूक्ष्म वायुकायिक जीव ठसोठस भरलेले नाहीत.

आता बादर जीवांचे वैशिष्ट्य पाहूया. बादर नामकर्माच्या उदयामुळे जीव बादर होतात. ज्यांचे शरीर प्रतिघात युक्त आहे त्यांना बादर जीव म्हणतात व ज्यांचे शरीर अन्य पुद्गलांद्वारे प्रतिघात रहित (अटकांव रहित) असते त्यांना सूक्ष्म जीव म्हणतात. बादर जीव लोकाकाशात सर्वत्र आढळत नाहीत. आठ पृथ्वींच्या व अन्य जीवांच्या आश्रयाने बादर जीव रहातात. सूक्ष्मचा अर्थ आकाराने लहान असे नाही. सूक्ष्म जीवांचे शरीर सूक्ष्म असते अर्थात ते शरीर कोणाला अडवू किंवा रोकू शकत नाही तसेच इतर कोणी त्याला अडवू किंवा रोकू शकत नाही. भिंतीतून, लोखंडाच्या गोळ्यातूनही ते आरपार जाऊ शकते. जसे काचेमधून प्रकाशाचा किरण आरपार जातो. हे उदाहरण आहे व यातील प्रकाश व काच या दोन्ही गोष्टी स्थूल आहेत. हे सूक्ष्म जीव कोणत्याही आधाराशिवाय रहातात. सूक्ष्म हा भेद केवळ एकेंद्रियातच आढळतो. द्वींद्रियादि सर्व जीव बादरच आहेत.

बादर पृथ्वीकायिक, बादर जलकायिक वगैरे जीव पृथ्वी वगैरेच्या आधारे रहातात परंतु पाचही प्रकारचे सूक्ष्म जीव संपूर्ण

लोकाकाशामध्ये रहातात. आपल्याला वाटते घरात आपण ४-५ च माणसे रहातो परंतु सर्वत्र हे ५ प्रकारचे सूक्ष्म एकेंद्रिय जीव आहेतच. सध्याच्या तुम्हा लोकांना समजायला अवघड नाही. तुमच्या मुलांना ताप आला व निदान झाले नाही की डॉक्टर्स हमखास सांगत असतील की अहो हा व्हायरल फीवर आहे - व्हायरस नावाच्या जंतुमुळे झाला आहे. आपण पण त्यावर लगेच भरवसा करतो - विश्वास ठेवतो.

आजकाल आपल्याला सर्वज्ञापेक्षा डॉक्टरवर अधिक भरवसा आहे. डॉक्टरने सांगितलेले पथ्यपाणी व औषध अत्यंत काटेकोरपणे घेतले जाते, कारण आहे देहामधली एकत्वबुद्धि! देहाला 'मी' असे मानल्यानंतर देहाला अनिष्टकारक अशा सर्व गोष्टी आपण टाळतो. परंतु मी जीव आहे हे समजल्यानंतर मला कोणत्या गोष्टी अनिष्टकारक आहेत याचा विचार करतो का? हे आपल्या मनाला विचारुन पहा बरं!

सर्वज्ञ भगवंतांनी प्रत्यक्ष जाणून सांगितले की कंदमुळं वगैरे वनस्पतींमध्ये निगोद जीव रहातात. कांदा, बटाटा, लसूण वगैरेमध्ये अनंत जीव रहातात व हे पदार्थ खाण्यामध्ये हिंसा होते, परंतु ते ऐकून अनेकजण म्हणतात - कोणी पाहिलंय? आता विषय निघालाच आहे तर 'निगोद' ही काय भानगड आहे? या प्रश्नाचे उत्तर पाहूया.

देहधारी जीवांमध्ये प्रत्येक शरीर व साधारण शरीर असे दोन भेद आहेत. एका शरीरामध्ये एक जीव रहातो व त्या शरीराचा उपभोग घेतो त्यास 'प्रत्येक जीव' किंवा 'प्रत्येक शरीर जीव' असे म्हणतात. ज्या ठिकाणी एका शरीरामध्ये अनंत जीव रहातात. त्याला 'साधारण जीव' किंवा 'साधारण शरीर जीव' असे म्हणतात. हे एकच शरीर अनंत जीवांमध्ये साधारण अर्थात समान म्हणजे कॉमन असते. या शरीराला निगोद शरीर म्हणतात व त्यातील जीवांना 'निगोद' किंवा 'निगोदिया' जीव म्हणतात.

या जीवांना शरीरच समान असते असे नाही, तर त्यांचा जन्म एक समयात, मरण एक समयात, आयु समान, श्वासोच्छ्वास समान असतो. यांच्या पर्याप्ति समान असतात. एका समयात जन्मणारे विशिष्ट वेळी मरतात परंतु दर समयाला

वेगवेगळे अनंत जीव सतत उत्पन्न होतच रहातात, मरणही चालूच रहाते. परंतु असे असले तरी ते निगोदशरीर मात्र टिकून रहाते, असंख्यात सागर वर्षांपर्यंत टिकणारी निगोद शरीरं देखील आहेत.

एका निगोद शरीरात अनंत जीव रहातात त्याअर्थी हे शरीर भले मोठे असेल अशी शंकाही मनात आणू नका. यांचा आकार अतिशय छोटा आहे. ऐकायची तयारी आहे? केवलज्ञानगम्य या गोष्टी आहेत, त्रिवार सत्य आहेत. या गोष्टींवरचा अविश्वास हा सर्वज्ञावरचा अविश्वास आहे. अरहंत सिद्ध सर्वज्ञ आहेत. ज्यांचा त्यांच्यावर विश्वास नाही त्यांनी णमो अरहंताणं, णमो सिद्धाणं म्हणणे हे निव्वळ ढोंग होईल.

हां, तर ऐका. एका सुईच्या टोकावर बटाट्याचा (किंवा कोणत्याही कंदमुळाचा) जेवढा भाग राहील त्यामध्ये असंख्यात **स्कंध** असतात. एकेका स्कंधामध्ये असंख्यात **अंडर** असतात. एकेका अंडरमध्ये असंख्यात **आवास** असतात. एकेका आवासामध्ये असंख्यात **पुलवि** असतात व एकेका पुलविमध्ये असंख्यात **देह** म्हणजे औदारिक शरीर - निगोद शरीर असतात. एवढ्यावरच थांबू नका, एकेका निगोद शरीरामध्ये अनंत जीव असतात. किती अनंत असतात माहीत आहे?

दर सहा महिने व आठ समयांमध्ये ६०८ जीव मोक्षाला जातात - सिद्ध होतात. या हिशोबाने अनादिकाळापासून अनंत काळापर्यंत अनंत जीव सिद्ध होतात. त्याला सिद्धराशी म्हणतात. या सिद्धराशीच्या अनंतानंतगुणे जीव १ निगोदशरीरात रहातात. याचा अर्थ असा की एक निगोद शरीरात जेवढे जीव रहातात त्याच्या अनंताव्या भागाच्या अनंताव्या भागाएवढे जीव देखील तीन काळात सिद्ध होणार नाहीत.

असे सूक्ष्म निगोद तर संपूर्ण लोकाकाशात ठसोठस भरलेले आहेतच. बादर निगोद देखील अन्य कशाच्या तरी आधाराने रहातात, ते कोठे रहातात हे आता पाहूया. हे निगोद जीव ज्या प्रत्येक शरीराच्या आधाराने रहातात त्या प्रत्येक शरीरास 'प्रतिष्ठित प्रत्येक' म्हणतात. जेव्हा निगोद त्यात रहात नाहीत तेव्हा 'अप्रतिष्ठित प्रत्येक' म्हणतात.

मला माहीत आहे की यावरून तुमचे अनेक प्रश्न उठतील की हे निगोद किती इंद्रियवाले जीव आहेत? एकेंद्रिय असतील तर सर्व एकेंद्रियांमध्ये ते असतात का? जर आपल्याही शरीराच्या आधारे रहात असतील तर असे कोणी जीव आहेत का की ज्यांच्या शरीरात निगोद जीव आढळत नाहीत? या सर्वांचे उत्तर पाहूया.

निगोद अर्थात साधारण जीव हे वनस्पतिकायिक जीव आहेत. प्रत्येक व साधारण असे दोन प्रकार फक्त वनस्पतिकायिक जीवांमध्येच असतात. वनस्पति सोडून अन्य एकेंद्रिय अर्थात पृथ्वीकायिक, जलकायिक, वायुकायिक व अग्निकायिक जीव प्रत्येक शरीरवाले आहेत. तसेच द्वींद्रियां पासून पंचेद्रियांपर्यंत सर्व जीव प्रत्येक शरीरवालेच आहेत.

सर्वच प्रत्येक शरीराच्या आधारे साधारण शरीर आढळत नाहीत, त्यांना अप्रतिष्ठित प्रत्येक म्हणतात. पृथ्वी आदि चार प्रकारच्या जीवांचे अर्थात पृथ्वी, जल, अग्नि व वायु यांचे शरीर, केवलीचे शरीर, आहारक शरीर, देवांचे शरीर, नारकींचे शरीर ही सर्व शरीरं निगोदरहित आहेत. उरलेल्या सर्व जीवांची शरीरं बादर निगोद जीवांनी युक्त म्हणजे प्रतिष्ठित आहेत. ते याप्रमाणे - सप्रतिष्ठित प्रत्येक वनस्पति, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, पंचेंद्रिय तिर्यंच व वर नमूद केलेल्या जीवांव्यतिरिक्त अन्य मनुष्य या सर्वांच्या शरीरांमध्ये निगोद असतात.

द्वींद्रियादिकांच्या शरीराला मांस ही संज्ञा आहे. व यामध्ये निरंतर अनंत जीवांचे जन्ममरण चालू असते. याचसाठी मांसभक्षणामध्ये अनंत जीवांची हिंसा होते. परिणामांमध्ये क्रूरता व खाण्याची तीव्र हाव असल्याशिवाय कोणी मांसाहार करणार नाही. वनस्पति खाण्यात मांसाहाराचा दोष नसला तरी ज्याठिकाणी निगोद रहातात अशा वनस्पतिंना अनंतकाय म्हटले आहे व त्यांच्या भक्षणाने अनंत जीवांची हिंसा होते.

मुलींनो, आपण सर्वांनी अनादिपासून अधिकाधिक काळ तर या निगोद अवस्थेमध्येच घालवला आहे. सूक्ष्म निगोद किंवा बादर निगोदातच निरंतर जन्ममरण करत करत असंख्यात

उत्सर्पिणी व अवसर्पिणी अर्थात असंख्यात कल्पकाळ तर त्यातच घालवला. निगोदात किंवा अन्य एकेंद्रिय पर्यायामध्ये निरंतर जन्ममरण करत करत असंख्यात पुद्‌गलपरावर्तन काळ गेला. हे सारे आपण विसरुन गेलो.

बा जीवा, तू अजूनही जागा झाला नाहीस, स्वतःचे स्वरूप ओळखले नाहीस तर याच पर्यायांमध्ये तुला परत जावे लागेल की जेथे तू अनंत काळ राहून आला आहेस. ही अशी अवस्था आहे की येथे जीव आहेत असे मानायला देखील कोणी तयार होत नाही. एकेंद्रियातून निघून द्वीद्रिंयादि पर्यायांमध्ये जन्म मिळणे उत्तरोत्तर दुर्लभ आहे. मनुष्यपर्याय तर महान दुर्लभ आहे. येथपर्यंत येऊन तू परत फिरू नकोस. भौतिक विषयांच्या चमचमाटामध्ये आपल्या चैतन्य चित्‌चमत्काराकडे दुर्लक्ष करू नकोस.

द्वींद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतच्या जीवांना त्रसकायिक किंवा त्रस म्हणतात. द्वींद्रिय जीवांना स्पर्शनेंद्रिय व रसनेंद्रिय ही दोन इंद्रियं असतात. शंख, कवडी, आळी, हे द्वींद्रिय जीव आहेत. त्रींद्रिय जीवांना स्पर्शन, रसना व घ्राण ही तीन इंद्रियं असतात. मुंगी, किडे वगैरे त्रींद्रिय जीव आहेत. चतुरिंद्रिंय जीवांना स्पर्शन, रसना, घ्राण व चक्षु अशी चार इंद्रियं असतात. भुंगा, माशी, पतंग वगैरे चतुरिंद्रिय जीव आहेत. देव, नारकी, मनुष्य व पंचेंद्रिय तिर्यंच हे पंचेंद्रिय जीव आहेत. त्यांना स्पर्शन, रसना, घ्राण, चक्षु व कर्ण अशी पाच इंद्रियं असतात.

पंचेंद्रिय जीवांमध्ये संज्ञी अर्थात मनसहित व असंज्ञी अर्थात मनरहित असे दोन भेद आहेत. हे दोन भेद फक्त पंचेंद्रिय तिर्यंचांमध्येच आढळतात. देव, नारकी व मनुष्य संज्ञी पंचेंद्रियच असतात.

संज्ञी जीवांना नाव घेऊन बोलावले तर समजते, उपदेश ग्रहण करणे, स्मरण, विचार आदि कार्य मनाद्वारे होते. सर्कशीमध्ये आपण प्राण्यांना ट्रेन केलेले पहातो ते सर्व संज्ञी पंचेंद्रियच आहेत. या सर्व जीवांचे पर्याप्त व अपर्याप्त असे भेद करून चौदा जीवसमास होतात. पर्याप्तिविषयक अधिक माहिती पुढच्या लेखात येणारच आहे.

शास्त्राभ्यासाची प्रेरणा देताना पं. टोडरमलजी सम्यग्ज्ञान चंद्रिकेच्या पीठिकेमध्ये म्हणतात की -

''एकेंद्रियांपासून असंज्ञी पंचेद्रियांपर्यंत मनच नाही, नारकी वेदनापीडित, देव विषयासक्त, मनुष्यांमध्ये सुद्धा अनेक कारणं मिळाली तर शास्त्राभ्यास होतो. मुळात मनुष्यपर्याय मिळणे हेच द्रव्य, क्षेत्र, काल व भाव अपेक्षेने महादुर्लभ आहे.

द्रव्य अपेक्षेने मनुष्य जीव सर्वात थोडे - अल्प म्हणजे संख्यात आहेत, अन्य जीव असंख्यात आहेत, निगोदादि एकेंद्रिय जीव अनंत आहेत.

क्षेत्र अपेक्षेने मनुष्यक्षेत्र छोटे आहे - अडीच द्वीपप्रमाण आहे. एकेंद्रियांचे क्षेत्र-रहाण्याचे ठिकाण संपूर्ण लोकाकाशाएवढे आहे, देव व नारकी कित्येक राजूप्रमाण क्षेत्रात रहातात.

काल अपेक्षेने मनुष्यपर्यायात रहाण्याचा काल अल्प आहे. कर्मभूमीच्या अपेक्षेने काही करोड पूर्व आहे, एकेंद्रिय पर्यायात असंख्यात पुद्गल परावर्तन एवढा आहे, इतर पर्यायात काही पल्य प्रमाण आहे.

भाव अपेक्षेने ज्या परिणामांनी मनुष्यपर्याय प्राप्त होते असे न अति तीव्र, न अतिमंद परिणाम होणे दुर्लभ आहे. शास्त्राभ्यासाला कारणभूत अशी कर्मभूमीतील पर्याप्त मनुष्यपर्याय मिळणे अतिदुर्लभ आहे.

त्यात देखील उत्तम रहाणी, उच्चकुल, पूर्ण आयु, इंद्रियांचे सामर्थ्य, निरोगीपणा, सुसंगति, धर्मरूप अभिप्राय व बुद्धिची प्रबलता हे उत्तरोत्तर महादुर्लभ आहे''

मुलींनो, या सर्व उत्तरोत्तर महादुर्लभ गोष्टी आपल्याला प्राप्त आहेत, त्यासाठी काही करायची गरज नाही. या मनुष्यभवाची दुर्लभता लक्षात आल्यावर त्याची सार्थकता करणे हे आपल्या हाती आहे. आपण योग्य मार्गावर आहोतच त्यावर अग्रेसर होण्याचा अधिक पुरुषार्थ करूया.

कळावे,

**तुमची आई.**

# पर्याप्ति प्ररूपणा

पत्रांक १५ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ ११ सप्टेंबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

जीवसमासाचे वर्णन व भेद वाचून जीवांच्या अनंत संख्येची व केवलज्ञानाच्या अनंत शक्तीची तुम्हाला थोडीतरी जाणीव झाली असावी. तुम्ही विचाराल जीवसमास जाणल्याने आपल्याला काय लाभ होतो?

अनंत जीव कोणकोणत्या पर्यायांमध्ये रहातात हे आपल्याला समजते. आपणही आजपर्यंत कोठे कोठे जन्म-मरण, जन्म-मरण करत या मनुष्यपर्यायात आलो आहोत याचे ज्ञान होते. निरंतर चालू असलेल्या या जन्ममरणाच्या भवचक्राचे भय वाटू लागते व यातून सुटण्याचा मार्ग काय याबद्दल विचार करण्यास आपण प्रवृत्त होतो. संसाराच्या या भयाला 'संवेग' असे म्हटले आहे.

आपल्या प्राप्त मनुष्यपर्यायाची दुर्लभता लक्षात आल्यावर आपला वेळ विनाकारण वाया घालवत आहोत याची जाणीव होते व लवकरात लवकर स्वतःला ओळखण्याचे कार्य हाती घेतले जाते.

आपल्याप्रमाणेच चैतन्यगुणधारी अन्य अनंत जीव कोठे कोठे आयुष्य कंठत आहेत याचे ज्ञान झाल्यावर आपल्यामुळे त्यांना इजा तर पोहोचणार नाही ना?, दुःख तर होणार नाही ना? त्यांना मरण तर येणार नाही ना? याबाबत आपण दक्षता घेऊ शकतो. सहजच असे कोमल परिणाम होतात. आपण याच पर्यायांमध्ये भ्रमण करून आलो आहोत व आपल्या अनंत भवांचे माता-पिता-पुत्र-परिवार यापैकी कोणी ना कोणी सर्वत्र विद्यमान आहेत हे ध्यानात येताच प्रमादामुळे - निष्काळजीपणामुळे होणारी हिंसा आपण टाळू शकतो. त्याबद्दल जागरुक रहातो.

मिथ्यात्व अवस्थेत स्वच्छंदीपणाने हिंसा होते त्यापासून जीव विरत होत नाही. ४थ्या गुणस्थानात तो अविरत असला तरी त्याबद्दल त्या जीवाला खेद वाटतो. ५व्या गुणस्थानातील जीव त्रसहिंसेचा त्यागी असतो पण स्थावर जीवांच्या हिंसेचा त्याला

त्याग होत नाही. मुनींना मात्र सर्व त्रस व स्थावर जीवहिंसेचा त्याग असतो. मन, वचन, कायेद्वारे कृत, कारित, अनुमोदनेने देखील ते हिंसेचा भाव अथवा हिंसा करत नाहीत.

जर जीव कोणकोणत्या पर्यायात व कोठे रहातात याची माहिती नसेल तर त्यांच्या हिंसेपासून आपण परावृत्त कसे होणार? पृथ्वी, अग्नि, वायु, जल व वनस्पति हे जीव आहेत हे फारच थोड्या लोकांना माहीत आहे व सांगितले तरी फारच थोड्या लोकांचा त्यावर विश्वास बसतो. वृक्ष, वेली, गवत वगैरेंमध्ये जीव आहे हे समजते परंतु वृक्षापासून तुटलेल्या फांद्या, पाने, फुले व फळे यामध्ये देखील अनेक प्रत्येक वनस्पतिकायिक जीव रहातात त्यामुळे हे सारे सचित्त आहे हे आपणास माहीत नसते. अत्यंत कोवळी पाने, फुले, छोटी छोटी फळे सप्रतिष्ठित असतात व जेव्हा पानांमध्ये शिरा उत्पन्न होतात, फळं-फुलं तोडली असतां 'समभंग' होत नाही, म्हणजे समान तुकडे न होता वेडेवाकडे तुटते, तंतु रहातात त्यावेळी ते अप्रतिष्ठित होतात - त्यात निगोद जीव आढळत नाहीत. जीवसमासाचा अभ्यास झाल्याने खाण्यापिण्यासंबंधीचा आपला विवेक जागृत होतो.

चरणानुयोगामध्ये आचरणाच्या दृष्टीने उपदेश दिलेला असतो. खाण्यापिण्याबाबत नियम घालून दिलेले असतात, पदार्थांच्या मर्यादा सांगितलेल्या असतात. विशिष्ट मर्यादेपर्यंत ते पदार्थ भक्षण करण्यास योग्य असतात त्यानंतर त्या पदार्थांमध्ये जीवांची उत्पत्ति होत असते. ही उत्पत्ति आपोआप होते. अगं, औषधांवर देखील Expiry Date मुदत संपण्याची तारीख लिहिलेली असते. त्यानंतर ती औषधे आपण बिलकुल वापरत नाही. अन्नाच्या बाबतीतही अशी मर्यादा पाळणे अत्यावश्यक आहे.

निर्जंतुक केलेले पदार्थ हवाबंद - पॅकबंद केले तरी काही काळाने त्यामध्ये जीवांची उत्पत्ति होते; याचे कारण आहे जीवांची सम्मूर्च्छन प्रकाराने जन्म होण्याची विशिष्ट तऱ्हा. या प्रकाराने जन्म घेणारे जीव सं म्हणजे समंतात् = आसंमतातून अर्थात भोवतालच्या पुद्‌गलातून काही परमाणुंचे ग्रहण करून आपल्या शरीररूपाने धारण करतात. या जीवांना जन्म देण्यासाठी मातापित्यांची गरज लागत नाही. एकेंद्रियांपासून चतुरिंद्रियांपर्यंत

सर्वच जीव सम्मूर्च्छन जन्मवाले असतात. पंचेंद्रिय तिर्यंचांमध्ये काही सम्मूर्च्छन तर काही गर्भज असतात. मनुष्य गर्भज असतात, तसेच सम्मूर्च्छनही असतात.

सम्मूर्च्छन मनुष्य कर्मभूमीतल्या आर्यखंडातील स्त्रियांच्या काख वगैरे ठिकाणी उत्पन्न होतात. हे जीव लब्धि अपर्याप्त असतात व अति अल्प काळात मरण पावतात. श्वासाच्या अठराव्या भागात मरतात. एक श्वास म्हणजे निरोगी तरूण मनुष्याच्या नाडीच्या दोन ठोक्यातील अंतर. एक मिनिटात ७८ श्वास होतात म्हणजे साधारणपणे पाऊण सेकंदाच्या (३/४ सेकंदाच्या) १८व्या भागात म्हणजे १/२४ सेकंदात या जीवांचा हा मनुष्यभव संपतो.

सर्व अपर्याप्त जीवांचे आयुष्य एवढे अल्प असते. याला क्षुद्रभव असेही म्हणतात. एखाद्या जीवाला लागोपाठ क्षुद्रभव मिळत राहिले तर एका अंतर्मुहूर्तामध्ये (४८ मिनिटांमध्ये १ समय कमी) ६६३३६ भव होतात. यातील एकेंद्रियांचे भव ६६१३२ आहेत, द्वींद्रियांचे ८०, त्रींद्रियांचे ६०, चतुरिंद्रियांचे ४० व पंचेंद्रियांचे २४ भव असू शकतात. त्यामध्ये असंज्ञी पंचेंद्रिय तिर्यंचांचे ८ व संज्ञी पंचेंद्रिय तिर्यंचांचे ८ व सम्मूर्च्छन मनुष्यांचे ८ भव असतात.

करणानुयोगातील या सविस्तर व सूक्ष्म वर्णनाने आपण थक्क होतो. हा सर्व विषय केवलज्ञानगम्य आहे व केवली भगवंतांच्या उपदेशानेच आपल्याला ज्ञात झालेला आहे.

पर्याप्त व अपर्याप्त जीवांचे स्वरूप काय आहे हे समजण्यासाठी आपण पर्याप्ति म्हणजे काय यासंबंधी थोडी माहिती घेऊया.

पर्याप्तिचा अर्थ आहे कार्यरूप शक्ति. या पर्याप्तिंच्या शक्तींनी जो पूर्ण होतो त्यास पूर्ण अथवा पर्याप्त म्हणतात, जो या शक्तींनी अपूर्ण रहातो त्यास अपूर्ण अथवा अपर्याप्त म्हणतात. यामध्ये पर्याप्त किंवा अपर्याप्त नामकर्माचा उदय निमित्त आहे.

एकूण सहा पर्याप्ति आहेत त्या अशा - १) आहार पर्याप्ति २) शरीर पर्याप्ति ३) इंद्रिय पर्याप्ति ४) श्वासोच्छ्वास पर्याप्ति

५) भाषा पर्याप्ति ६) मन पर्याप्ति.

या सहा पर्याप्तिंपैकी एकेंद्रिय जीवांना पहिल्या चार पर्याप्ति असतात, भाषा व मन पर्याप्ति त्यांना नसते. द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय व असंज्ञी पंचेंद्रियांमध्ये पाच पर्याप्ति असतात, त्यांना मन पर्याप्ति नसते. संज्ञी पंचेंद्रियांमध्ये सहाही पर्याप्ति असतात.

ज्या अर्थी या पर्याप्तिंची वेगवेगळी नावे आहेत, त्याअर्थी त्यांचे कार्यही भिन्न भिन्न असणार हे उघड आहे. त्यांचे स्वरूप आपण क्रमवार पाहूया.

तुम्हाला माहीतच आहे की जीव एका ठिकाणी मरून दुसऱ्या ठिकाणी उत्पन्न होतो, अर्थात एक शरीर सोडून इतरत्र गमन करतो व तेथे नवे पुद्‌गल स्कंध ग्रहण करतो, यांना आपण पूर्वी नोकर्मवर्गणा असे म्हटले होते. शरीर, मन, भाषा, श्वासोच्छ्‌वासासंबंधी हे परमाणु जीव ग्रहण करतो. या परमाणुंना 'खलरूप' व 'रसरूप' परिणमविण्याची आत्म्याची शक्ति तयार होते, तिला 'आहार पर्याप्ति' म्हणतात.

खल व रस भागरूप परिणमित झालेल्या या पुद्‌गल स्कंधांमध्ये खलरूप पुद्‌गलांना हाडे, चामडी इत्यादि स्थिर अवयवरूप परिणमविण्याची व रसरूप पुद्‌गलांना रक्त, वीर्य इत्यादि द्रव अवयवरूप परिणमविण्याची अशी जी शक्ति तिला 'शरीर पर्याप्ति' म्हणतात.

जीवामध्ये जो ज्ञानाचा उघाड असेल, जेवढी इंद्रियवाला जीव असेल त्याला तेवढी द्रव्येंद्रिय असतात. त्या द्रव्येंद्रियांच्या ठिकाणचे जे आत्मप्रदेश असतात त्यांच्याद्वारे त्या त्या इंद्रियांच्या विषयांचे ग्रहणरूप म्हणजे जाणणेरूप जी उपयोगाची शक्ति उत्पन्न होते, तिला 'इंद्रिय पर्याप्ति' म्हणतात. जसे, नाक हे द्रव्येंद्रिय आहे व त्या ठिकाणच्या आत्म्याच्या प्रदेशांमध्ये सुगंध-दुर्गंध जाणण्याची उपयोगरूप शक्ति असते त्यास इंद्रिय पर्याप्ति म्हणतात.

आहार वर्गणारूप पुद्‌गल स्कंधांना श्वासोच्छ्‌वासरूप परिणमविण्याची जी शक्ति, ती 'श्वासोच्छ्‌वास पर्याप्ति' आहे.

भाषा वर्गणारूप पुद्‌गल स्कंधांना भाषारूप परिणमविण्याची जी शक्ति, ती 'भाषा पर्याप्ति' आहे.

मनोवर्गणारूप पुद्गल स्कंधांना द्रव्यमनरूप परिणमविण्याची शक्ति तसेच गुणदोषांचा विचार, स्मरण, उपदेश ग्रहण करणे वगैरे रूप भावमनाला परिणमविण्याची जी शक्ति, ती 'मन पर्याप्ति' आहे.

या सर्व पर्याप्तिंची सुरुवात एकाच समयात होते परंतु पूर्णता क्रमाक्रमाने होते. प्रत्येक पर्याप्तिस एक अंतर्मुहूर्त लागतो व सर्वांना मिळून देखील एक अंतर्मुहूर्त लागतो. दुसरी शरीर पर्याप्ति पूर्ण होण्यापूर्वी 'निर्वृत्ति अपर्याप्त' म्हणतात. निर्वृत्ति म्हणजे निष्पत्ती. त्यानंतर या जीवांना पर्याप्त म्हणतात. या जीवांना पर्याप्त नावाच्या नामकर्माचा उदय असतो.

परंतु लब्धि अपर्याप्त जीवांना अपर्याप्त नामकर्माचा उदय असतो. अपर्याप्त एकेंद्रियांना, अपर्याप्त विकलेंद्रियांना व अपर्याप्त संज्ञी जीवांना अनुक्रमे चार, पाच व सहा पर्याप्ति सुरु तर होतात परंतु एकही पर्याप्ति पूर्ण होत नाही, जीव श्वासाच्या अठराव्या भागातच मरण पावतो.

याचा अर्थ असा होतो की पर्याप्त जीवांमध्ये व अपर्याप्त जीवांमध्ये पर्याप्ति समान असतात परंतु पर्याप्त जीवांच्या त्या पर्याप्ति पूर्ण होतात व अपर्याप्त जीवांच्या पूर्ण होत नाहीत.

देव, नारकी, भोगभूमीतले जीव पर्याप्तच असतात. सर्व गर्भज जीव पर्याप्तच असतात. निर्वृत्ति अपर्याप्त जीवदेखील नियमाने पर्याप्त होतात. परंतु लब्धि अपर्याप्त जीव एकदेखील पर्याप्ति पूर्ण होण्यापूर्वीच मरण पावतात.

या पर्याप्ति एक अंतर्मुहूर्तातच पूर्ण होतात व आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत या शक्ति कायम रहातात, त्यांचे पुद्गल स्कंधांना शरीर, मन, भाषा, श्वासोच्छ्वास वगैरे रूप परिणमविण्याचे कार्य देखील आयुष्यभर चालूच असते.

मुलींनो, पर्याप्तिंचे हे वर्णन वाचून मी जीव म्हणजे मोठा शक्तिमान आहे, पुद्गलांना परिणमविण्याची पहा माझ्यात ताकद आहे असा खोटा भ्रम करून घेऊ नका. प्रत्येक द्रव्याचे प्रत्येक परिणमन स्वतंत्रपणे त्या त्या द्रव्यात त्याच्या स्वतःच्या योग्यतेने होत असते. निमित्त-नैमित्तिक संबंध दाखवणारी ही शास्त्रकथनं

वाचून त्या दोन्हीमध्ये कर्ता-कर्म संबंध मानण्याची आपली चूक होत नाही ना? याची आपण खबरदारी घेतली पाहिजे.

मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथामध्ये पं. टोडरमलजींनी म्हटलं आहे, ''अनादिनिधन वस्तु भिन्न भिन्न आपल्या आपल्या मर्यादेसह परिणमित होतात, कोणीही कोणाला परिणमवित नाही. दुसऱ्याला परिणमित करण्याचा भाव निगोद आहे.''

येथे शक्ति हा जो शब्द वापरला आहे त्याचा अर्थ स्वभावरूप शक्ति किंवा जीवाचा गुण किंवा धर्म असा होत नाही. जीव व कर्माचा एकमेकांशी बंध अनादिपासूनच आहे व कर्माच्या उदयामध्ये जीवाच्या अवस्था कशा होतात याचे हे वर्णन आहे. स्वतःलाच शरीररूपी बंधनात अडकवून घेणारी ती शक्ति कशी बरे असू शकेल?

पर्याप्तिनी युक्त झालेल्या या जीवांचे जे कार्य सुरु होते त्यास 'प्राण' असे म्हटले आहे. याचा खुलासा आपण पुढील पत्राद्वारे करूया.

कळावे,

**तुमची आई.**

बा जीवा ऐक! तुझे परिणाम तर स्वरूपानुभवामध्ये प्रवर्तन करीत नाहीत आणि विकल्प आहेत असे म्हणून जर तू गुणस्थानादि भेदांचा विचार केला नाहीस तर तू 'इतो भ्रष्ट ततो भ्रष्ट' होऊन अशुभोपयोगामध्येच प्रवर्तन करशील. त्यामुळे तुझे अकल्याणच होईल.

अरे! सामान्यपणे तर वेदांतादि शास्त्राभासामध्ये सुध्दा जीवाचे स्वरूप शुद्ध म्हटलेले आहे. तेथे विशेष जाणल्याशिवाय यथार्थ-अयथार्थाचा निश्चय कसा होईल बरे? म्हणून गुणस्थानादि विशेष जाणल्याने जीवाच्या शुद्ध, अशुद्ध व मिश्र अवस्थांचे ज्ञान होईल. अशा वेळी निर्णय करून यथार्थाचा अंगिकार करावा. म्हणून विशेष जाणावे.

**सम्यग्ज्ञानचंद्रिका.**

# प्राणप्ररूपणा

पत्रांक १६ **॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥** ३० सप्टेंबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

पर्यूषण पर्वानिमित्त आम्ही उभयता सोलापूर येथे गेलो होतो हे तुम्हाला माहीतच आहे. त्यामुळे पत्रलिखाण खूपच लांबणीवर पडले. सोलापूर येथे मी प्रवचनासाठी हा करणानुयोगाचा विषय मोक्षमार्गप्रकाशकाच्या दुसऱ्या अधिकाराच्या आधारे घेतला होता.

कर्माचा बंध, उदय, सत्ता, कर्माचे प्रकार, त्यांचे कार्य, निषेकरचना, जीवसमास, पाच परावर्तन, मार्गणा वगैरे अनेक विषयांवर चर्चा केली. सोलापूरचा समाज स्वाध्याय करणारा आहे, त्यांनी या विषयाचे स्वागत केले. असो.

पर्याप्तिच्या चर्चेनंतर 'प्राण' या विषयावर - प्ररूपणेवर आज आपण माहिती घेऊया. प्राणी हा शब्द आपल्या परिचयाचा आहे. प्राणवाला तो प्राणी. सजीवांना प्राणी असे म्हणण्यात येते. मराठीत वाक्प्रचार आहे, 'माझं बाळ म्हणजे माझा जीव की प्राण आहे'. जीव अर्थात प्राण. मरण झाले असता आपण म्हणतो ना की अरे याचा प्राण गेला अर्थात जीव गेला.

चैतन्य भावप्राणास धारण करतो तो जीव आहे. चेतना म्हणजे ज्ञान दर्शनरूप शक्ति. या चेतनेलाच प्राण असे म्हटले आहे. जेथे चैतन्यव्यापार थंडावतो तेथे इंद्रियं, शरीर असूनदेखील चेतनेच्या अभावी प्राण गेला असा आपण निष्कर्ष काढतो.

जीव सदैव भावप्राणांनी सहितच असतो, प्राणविरहित कधीही होत नाही. आपले जीव हे नाव कसे पडले याचा कधी विचार केलाय का तुम्ही? जो जगत आहे, पूर्वी जगत होता व भविष्य काळात जगत राहील तो जीव आहे. जो स्वतः 'जीवन' आहे त्याला भले मरणाची चिंता कशी असेल? पण काय दुर्दैव पहा, हा जीव असा खुळा आहे की मरणाच्या भीतीनेच मरायला टेकला आहे.

शरीराशिवाय मी कसा काय बरं राहू शकेन? मला जगण्यासाठी हवा, पाणी, अन्न वगैरेची गरज आहे व

त्यांच्यामुळे माझे अस्तित्व टिकून आहे असे हा जीव मानत आला आहे.

बा जीवा! सिद्ध भगवान जीव आहेत की नाही? ते तर अनंत काळापर्यंत अशरीरी रहातात तरीदेखील अनंतसुखी आहेत, अनंतज्ञानी आहेत. हे जीवा! तू देखील अशरीरीच आहेस. तुझी सत्ता, तुझे अस्तित्व तुझ्यामध्ये आहे, तुझ्या स्वतःमुळे ते कायम आहे. चैतन्यमय आहे. शरीराचे अस्तित्व भिन्न आहे, अचेतन आहे.

तू तर एक जीवद्रव्य, चेतना गुणाचा धारक, अरूपी, संकोच विस्तारवाला असंख्यात प्रदेशी आहेस व हे शरीर तर अनंतानंत पुद्‌गल परमाणुंचा पिंड आहे जे अचेतन आहे, रूपी आहे, जुळण्या-विखरण्याच्या क्रियेने युक्त आहे, निरंतर अनंत परमाणु येत व जात आहेत. बाबारे! या अचेतनाच्या संयोगाला तू स्वतःचे जीवन मानलेस. या शरीराच्या संयोगाला मी जन्मलो व वियोगाला मी मेलो असे मानलेस. साऱ्या दुनियेचा निर्णय करणारा हा शहाणा स्वतःबद्दल कधी विचार करण्यासाठी तयार नाही.

शरीराच्या उपस्थितीत देखील जाणण्याचे काम तर जीव स्वतःच करतो, इंद्रियं तर अचेतन, पुद्‌गल आहेत. परंतु जाणण्याच्या काळी त्यांची निमित्तरूप उपस्थिती असते. इंद्रिय, मन, वचन, काय, श्वासोच्छ्‌वास इत्यादिंच्या कार्याला 'द्रव्यप्राण' असे म्हणतात.

हे द्रव्यप्राण किती आहेत व कोणत्या जीवांना किती प्राण असतात ते आपण पाहूया.

एकूण दहा प्राण आहेत - पाच इंद्रियप्राण - १) स्पर्शन २) रसना ३) घ्राण ४) चक्षु ५) श्रोत्र. तीन बलप्राण - १) मनोबल २) वचनबल ३) कायबल. एक श्वासोच्छ्‌वासप्राण व एक आयु प्राण असे दहा प्रकारचे कार्य म्हणजे व्यापार 'द्रव्यप्राण' आहेत व इंद्रियावरणाच्या क्षयोपशमाने होणारी चैतन्य परिणति 'भावप्राण' आहे.

द्रव्यप्राणाच्या उत्पन्न होण्याला आपण जन्म व त्यांचा नाश होण्याला आपण मरण म्हणतो. संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त जीवांना हे दहा प्राण असतात. अपर्याप्त अवस्थेत श्वासोच्छ्‌वास प्राण

नसतो, वचनबल प्राण नसतो व मनबलप्राण देखील नसतो. त्यामुळे संज्ञी पंचेंद्रिय जीवांना अपर्याप्त अवस्थेमध्ये फक्त सातच प्राण असतात.

असंज्ञी पंचेंद्रियांना पर्याप्त अवस्थेत एक मनबलप्राण वगळता नऊ प्राण असतात व अपर्याप्त अवस्थेमध्ये वचनबलप्राण व श्वासोच्छ्वास प्राण वगळता सात प्राण असतात.

चतुरिंद्रिय पर्याप्तांना आणखी एक श्रोत्रेंद्रियप्राण वगळता आठ प्राण व अपर्याप्तांना सहा प्राण असतात.

त्रींद्रिय पर्याप्तांना आणखी एक चक्षुरिंद्रियप्राण वगळता सात प्राण व अपर्याप्तांना पाच प्राण असतात. द्वींद्रियांमध्ये आणखी एक घ्राणइंद्रियप्राण वगळता पर्याप्तांमध्ये सहा व अपर्याप्तांमध्ये चार प्राण असतात.

एकेंद्रियांमध्ये एक स्पर्शनइंद्रियप्राण, कायबलप्राण, श्वासोच्छ्वासप्राण व आयुप्राण असे चारच प्राण पर्याप्तांमध्ये असतात. त्यांच्यात वचनबलप्राण नसतो. एकेंद्रियाच्या अपर्याप्तांमध्ये श्वासोच्छ्वास वगळता तीनच प्राण आढळतात.

१३व्या सयोगकेवली गुणस्थानामध्ये ज्ञान क्षायिक होते त्यामुळे तेथे क्षायोपशमिक ज्ञानरूप द्रव्येंद्रियप्राण व मनबलप्राण नसतो त्या जीवांना वचन, श्वासोच्छ्वास, कायबल व आयु हे चारच प्राण असतात. पुढे पुढे याच १३ व्या गुणस्थानात वचनबलाचा अभाव झाल्याने तीन व अखेरीस श्वासोच्छ्वासाचा अभाव झाल्याने दोनच प्राण उरतात.

१४ व्या गुणस्थानात एकमात्र आयुप्राण असतो. त्यांना कायबलप्राण नसतो.

अशाप्रकारे संसारी जीवांना द्रव्यप्राण संभवतात. सिद्ध भगवान तर भावप्राणांनी युक्त अनंत काळ जगत रहातात. आपणही सर्व जीव भावप्राणांनी युक्त आहोत त्यामुळे द्रव्यप्राणाच्या नाशाला आपला नाश मानून व्यर्थ शोक करणे योग्य नाही.

द्रव्येंद्रिय तर काही जाणत नाहीत. भावेंद्रिय म्हणजे क्षयोपशमरूप ज्ञानाचा जो उघाड आहे तो देखील जीवाचा स्वतःचा आहे, ती त्याची स्वयंसिद्ध शक्ति आहे. कर्माने काही ज्ञान उत्पन्न नाही केले. जीवाच्या स्वतःच्या योग्यतेनुसार

पर्यायामध्ये ज्ञानाची हीनाधिकता होत आहे व त्यावेळी कर्मामध्ये ज्ञानावरण व वीर्यांतरायाचा क्षयोपशम विद्यमान आहे. परंतु जीवाने आपले ज्ञान कर्माच्या क्षयोपशमामुळेच होते असे मानले.

जीवाला जेवढी भावेंद्रिय असतील तेवढे इंद्रियप्राण असतात. पंचेंद्रियांना पाच इंद्रियप्राण असतात. त्यामुळे आंधळ्या, बहिऱ्या मनुष्याला देखील पंचेंद्रिय जीव असेच म्हणतात. पर्याप्त व अपर्याप्त अवस्थेतील जीवांना इंद्रियप्राण समान असतात.

बलप्राणांपैकी कायबलप्राण एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत सर्वांना असतो. वचनबलप्राण द्वींद्रियांपासून संज्ञी पंचेंद्रियांपर्यंत सर्वांना असतो. परंतु मनबलप्राण फक्त संज्ञी पंचेंद्रियांनाच असतो. अपर्याप्त अवस्थेतील द्वींद्रियादिकांना हे वचनबल व मनबलप्राण असत नाहीत. अपर्याप्त अवस्थेमध्ये कायबलप्राण असतो.

आयुप्राण सर्वच जीवांमध्ये आढळतो. यामध्ये आयुकर्माच्या उदय निमित्त असतो.

श्वासोच्छ्वास प्राण सर्व पर्याप्त जीवांमध्ये असतो, अपर्याप्त जीवांमध्ये नसतो. सर्व प्राण्यांना प्राणवायुची गरज असते हे आपणास माहीतच आहे. बंद जखमेत वाढणारे ॲनेरोबिक बॅक्टेरिया (प्राणवायु शिवाय वाढणारे जंतु) बहुधा हे अपर्याप्त असावेत नाही का?

अन्यमती एकेंद्रियांना जीव मानत नाहीत. हल्लीच्या वैज्ञानिकांनी सिद्ध केल्यानंतर वनस्पतिमध्ये जीव आहे असे मानण्यास लोक तयार झाले आहेत. तुम्ही प्रश्न विचाराल - 'अग्निमध्ये जीव आहे की नाही? प्राण आहे की नाही?' अग्नितील इंद्रियप्राण, कायबलप्राण व आयुप्राण या बाबतीत तर आपल्याला काही समजू शकत नाही. परंतु जळणारी मेणबत्ती काचेच्या भांड्यात ठेवून ते बंद केले असता थोड्या वेळात ती विझलेली आपल्याला दिसते. प्राणवायुच्या अभावाने अग्नि विझतो यावरुन श्वासोच्छ्वास प्राण सिद्ध होतो. प्राणवायु शिवाय तर जल, वायु आणि पृथ्वी देखील 'मृत' होते. यावरुन हे सर्व एकेंद्रिय जीव आहेत हे सिद्ध होते.

तुम्ही विचाराल - 'पर्याप्ति व प्राणांमध्ये काय अंतर आहे? दोन्हींमध्ये इंद्रिय, भाषा, मन व श्वासोच्छ्वास ही नावे समानच

आढळतात'. चांगला प्रश्न आहे. ऐका, पर्याप्ति तर जीवाच्या शक्तीच्या पूर्णतेस म्हणतात. त्या शक्तिअनुसार जे कार्य होते त्यास प्राण म्हणतात. पर्याप्ति कारण आहे, प्राण हे कार्य आहे. त्या दोन्हींमध्ये कारण—कार्य संबंध आहे.

जसे, आत्म्याच्या ठराविक प्रदेशांमध्ये पदार्थांना जाणणेरूप (वर्णादि ग्रहणरूप) क्षयोपशमरूप शक्तीची पूर्णता होणे ही इंद्रियपर्याप्ति आहे व त्या इंद्रियांद्वारे पदार्थांचे ग्रहणरूप (जाणणे रूप) कार्य चालू रहाणे यास इंद्रियप्राण म्हणतात.

भाषावर्गणेला वचनरूप परिणमित करण्याच्या शक्तीची पूर्णता होणे ही भाषापर्याप्ति आहे व जीवाकडून भाषावर्गणेला वचनरूप परिणमविण्याचा जो व्यापार होतो तो वचनबलप्राण आहे.

असेच मन व श्वासोच्छ्वास या बाबतीतही जाणावे.

आता तुमच्या लक्षात आलेच असेल की चैतन्य व्यापार ही जीवाची निजशक्ति आहे. जीव त्यापासून कधीही भिन्न होत नाही. ते तर जीवाचे लक्षण आहे. तरीदेखील शरीराच्या संयोग वियोगाला उपचाराने जन्म मरण असे नाव देण्यात येते, जीवाच्या ज्ञानाच्या उघाडाप्रमाणे तो किती इंद्रियवाला आहे हे कथन करण्यात येते. प्राप्त पर्यायात किती प्राण आहेत हे कथन निमित्ताचे ज्ञान करविण्यासाठी केलेले कथन आहे. हे व्यवहार कथन ऐकले तरी उपादानाची दृष्टि कधीही सोडता कामा नये.

निमित्ताचे ज्ञान केले नाही तर ज्ञान अर्धवट-अपूर्ण राहील. निमित्त असतच नाही असे जाणले तर ज्ञान खोटे होईल व निमित्ताने कार्य होते असे मानले तर श्रद्धा खोटी ठरेल.

आगमज्ञान हे तर प्रमाणज्ञान आहे. त्यात उपादान निमित्त वगैरे सर्वांची चर्चा व स्वरूप सांगितले आहे. आगमाद्वारे वस्तुचे सर्वांगीण स्वरूप आपल्या ध्यानात येते. द्रव्यानुयोगाद्वारे या संयोगाहून जीव स्वतंत्र व भिन्न आहे हे समजते. हे सारे यथार्थ जाणून त्रिकाली अभेद ध्रुव निज कारणपरमात्म्यावर आपली दृष्टि एकाग्र केली असता त्याची प्राप्ति सुलभ आहे. जो प्रत्यक्ष विराजमान आहे त्याची दृष्टि केली असता हा 'स्व' भगवान आत्मा का नाही भेटणार? अवश्य पर्यायामध्ये प्रकट होईलच.

कळावे,

**तुमची आई.**

# संज्ञा–प्ररूपणा
# गति, इंद्रिय, काय–मार्गणा

पत्रांक १७ **।।ॐ नमः सिद्धेभ्यः।।** १ ऑक्टोबर१९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

जीवाचा चैतन्य व्यापार हा त्याचा भावप्राण आहे हे आपण गेल्या पत्रात पाहिले. या प्राणाची पर्वा न करता आपण रात्रंदिवस कशाच्या मागे धावत आहोत, कोणत्या सुखाकडे डोळे लाऊन बसलो आहोत याचा विचार करण्याचीही आज कोणाला फुरसत नाही. एक धावतो म्हणून दुसरा धावतो व दुसरा धावतो म्हणून तिसरा धावतो अशी परिस्थिति सर्वत्र दिसत आहे.

मुलींनो, आपल्या घरात पैशाचा हिशोब ठेवण्याची पद्धत तुमच्या आजोबांनी पूर्वीच आपणा सर्वांना लावली होती, ती परंपरा आजही आम्ही पाळतो व तुम्हालाही लहानपणापासून तशी शिस्त लावलेली आहे. पैसे कोठे वायफट खर्च होत नाहीत ना? याबाबत आपण दक्ष असतो. नळातून पाणी विनाकारण वहात असेल, वाया जात असेल तरी देखील आपण काळजीपूर्वक नळ बंद करतो. पैशाचे व पाण्याचे मोल आम्हाला बरोबर उमजले आहे परंतु आपल्या प्राणाची किंमत म्हणजे चैतन्याचे मोल काही आम्हाला समजलेले नाही.

आपला चैतन्य उपयोग आपण कोठे कोठे लावत आहोत, तो विनाकारण वाया तर जात नाही ना? याची दक्षता तर सोडाच, त्यासंबंधीचा विचारही कधी आपल्या मनाला शिवत नाही.

शास्त्रामध्ये तीन प्रकारची चेतना सांगितलेली आहे - १) कर्मफलचेतना, २) कर्मचेतना व ३) ज्ञानचेतना.

एकेंद्रियादि पर्यायांमध्ये हा जीव दु:खी आहे, त्या दु:खांना दूर करण्यासाठी काही उपायदेखील करत नाही. कर्माच्या फलामध्ये स्वत:ला सुखी-दु:खी अनुभव करतो. अशावेळी त्या जीवांची चेतना फक्त सुखदु:खाचे वेदन करण्यातच गुंतलेली असल्याने तिला कर्मफलचेतना असे म्हणतात.

जो जीव या दु:खांचे निवारण करण्यासाठी व सुखाच्या

प्राप्तिसाठी अज्ञानवश रागद्वेषादि करतो, परद्रव्यांना परिणमवू पहातो आणि मानतो देखील की मी परिणमवू शकतो; परंतु अन्य द्रव्यांच्या पर्याय पालटण्यात असमर्थ होत असल्याने राग, द्वेष करतो. हे त्याचे भावकर्म आहे व ज्ञान अर्थात चेतना त्यातच गुंतून राहिल्यामुळे व त्या रागादिंना आपला स्वभाव मानल्याने तो जीव कर्मचेतनावाला आहे असे म्हटले जाते.

राहता राहिली ज्ञानचेतना. जो जीव कर्माच्या उदयामध्ये होणारे सुखदुःख, तसेच रागादि भाव यांच्यापासून आपल्या ज्ञानाला भिन्न अनुभवतो, त्रिकाली ज्ञायक स्वभावात - जाणणाऱ्या तत्त्वामध्ये ज्ञानाला जोडतो व अभेदरूपाने स्वतःला ज्ञायकरूप अनुभव करतो, तो जीव ज्ञानचेतनेचा धारक आहे.

चौथ्या गुणस्थानापासूनच जीव ज्ञानचेतनेचा धारक होतो. ४थ्या, ५व्या गुणस्थानामध्ये कर्मचेतना व कर्मफलचेतना असली तरी ती वेदन अपेक्षेने आहे, त्या जीवांना त्याचा स्वामीपणा असत नाही. मुनींना ज्ञानानंद स्वरूप परिणति सतत विद्यमान असल्याने ज्ञानचेतनेचे धारक म्हटले आहे. ही अध्यात्म अपेक्षा आहे.

परंतु आगम अपेक्षेने जोपर्यंत रागादि विद्यमान आहेत तोपर्यंत त्याप्रमाणात कर्मचेतना आहे व ज्या प्रमाणात रागादि आहेत त्याप्रमाणात दुःखाची अनुभूति असल्याने कर्मफलचेतनाही आहे.

हे जीवा, अनादिकाळापासून तू अनंत भवांमध्ये भटकत फिरलास. आता वर्तमानकाळाचा हा एक भव तू या कामासाठी लाव - स्वतःला ओळख. बघ तुझे भवभ्रमण मिटेल.

या संसारातील विविध अवस्था, पुण्य पापाचे खेळ, रागादिकांची तीव्रता, परस्पर ईर्षा, द्वेष, धनसंपत्तीच्या मागे वेड्यासारखी धाव—हे सारे पाहून तुला याचे भय नाही का वाटत? दुःख नाही का भासत?

शास्त्रात असे कथन येते की, पंचम काळातील जीवांच्या परिणामांचे वर्णन ऐकून चतुर्थ काळातील कित्येक जीवांना वैराग्य उत्पन्न झाले व त्यांनी सम्यग्दर्शनाची प्राप्ति करून घेतली. परंतु याच परिणामांमध्ये रात्रंदिवस मग्न राहून आम्ही आनंद मानत आहोत, भविष्याकडे आशेने डोळे लाऊन बसलो आहोत - धन्य

आहे आमची!

हे जीवा! अनंत भवांमधील उलटे संस्कार तुला या एका भवामध्ये पुसून टाकावयाचे आहेत - मिटवावयाचे आहेत. तुझ्या पुरुषार्थाचा हा अवसर आला आहे, संधी प्राप्त झालेली आहे.

स्वतःच्या चैतन्य स्वरूपाचा स्वीकार करून, अंतर्मुख होऊन त्यात एकाग्रता करताच आपल्या अविनाशी पदाची प्राप्ति आपणास होते.

मुलींनो, तुम्ही म्हणाल, 'आईला अधूनमधून हे काय होत असते? चालू विषय सोडून भलतीकडेच गाडी वळते.' अगं, करण्यासारखे एकमेव एवढेच आहे. करणानुयोग समजाविण्याचा हा बहाणा आहे. याच्यामार्फत वीतरागता हेच एकमेव प्रयोजन आहे.

असो. गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण या जीवाच्या प्ररूपणा आपण पाहिल्या. आता 'संज्ञा' ही प्ररूपणा पाहून आपण मार्गणांच्या अभ्यासाला लागूया.

आहार, भय, मैथुन आणि परिग्रह यांच्या निमित्ताने जी वांछा - वासना उत्पन्न होते, तिला 'संज्ञा' असे म्हणतात. या संज्ञांनी बाधित-पीडित झालेले जीव विषयांचे सेवन करून देखील, इहलोकी व परलोकी त्या विषयांची प्राप्ति किंवा अप्राप्ति झाली असता महादु:खी होतात. वांछाच सर्व दु:खांचे मूळ कारण आहे.

अन्नादिक खाद्यपदार्थ पहाणे, आठवणे, त्याची चर्चा ऐकणे, पोट रिकामे होणे, भूक लागणे ही आहार संज्ञेची बाह्य कारणे आहेत. असातावेदनीय कर्माचा तीव्र उदय किंवा उदीरणा हे अंतरंग कारण आहे. ही संज्ञा प्रमत्त गुणस्थानापर्यंतच आढळते, ७व्या अप्रमत्त गुणस्थानापासून हिचा अभाव असतो.

भीतिदायक प्राणी-भूत वगैरेंना पहाणे, त्यांच्या गोष्टी ऐकणे, आठवणे, स्वत: शक्तिहीन होणे ही भयसंज्ञेची बाह्य कारणे आहेत. भय नोकषाय नावाच्या कर्माचा तीव्र उदय हे अंतरंग कारण आहे. भयाने पळून जाणे, लपणे वगैरेरूप वांछा होणे ही भयसंज्ञा आहे.

कामसेवनाची वांछा ही मैथुनसंज्ञा आहे. गरिष्ट भोजन करणे,

कामोत्तेजक गोष्टी ऐकणे, कुशील व्यक्तींच्या सहवासात रहाणे ही बाह्यकारणे आहेत व वेद नोकषाय कर्माची उदीरणा हे अंतरंग कारण आहे.

धनधान्यादिक परिग्रह जमविण्याची, वाढविण्याची वांछा ती परिग्रह संज्ञा आहे. बाह्य परिग्रह पहाणे, त्याची चर्चा ऐकणे, लोभी परिग्रही अन्य व्यक्तींचा सहवास ही बाह्य कारणे आहेत व लोभ कषायाची उदीरणा हे अंतरंग कारण आहे.

या अन्य तीन संज्ञादेखील ७व्या गुणस्थानानंतर उपचार मात्र आहेत. त्यांचे कार्य दिसत नाही, केवळ त्या त्या कर्मांचा उदय आढळतो. ९ व्या गुणस्थानात प्रथम भागात भय संज्ञा जाते, दुसऱ्या भागात मैथुनसंज्ञा जाते. सूक्ष्म लोभ १०व्या गुणस्थानात असल्याने तोपर्यंत परिग्रह संज्ञा असते.

अशा रीतीने संज्ञा ही प्ररूपणा आपण पाहिली. आता मार्गणा या विषयावर चर्चा करूया.

जीवद्रव्य अरूपी असल्याने दिसत नाही. सिद्धजीव कर्म व शरीर यांनी रहित शुद्ध दशेत लोकाकाशाच्या शिखरावर-लोकाग्री विराजमान आहेत, ते तर आपल्याला दिसत नाहीत. आगमामध्ये तर जीवाचे वर्णन आढळते. जीव स्वतःचे स्वतःला ज्ञानाद्वारे जाणू शकतो परंतु अन्य जीवांना पाहू शकत नाही. अशा परिस्थितिमध्ये जीवांना शोधायचे कोठे? कोठे शोधले असता जीव आढळतात याची माहिती आपल्याला मार्गणांद्वारे मिळते.

ज्यांच्याद्वारे जीवाची माहिती मिळते अथवा ज्यांच्यामध्ये जीव आढळतात त्या मार्गणा होत. मार्गणा म्हणजे अन्वेषण-शोध. या मार्गणांमध्ये आपणाला जीवाचा शोध घेता येतो.

काही विवक्षित लक्षणांद्वारे, संयोगाद्वारे, शरीराद्वारे, इंद्रियांद्वारे किंवा अन्य विविध अपेक्षांद्वारे सर्व संसारी जीवांचे विभाजन - वर्गीकरण करण्यात येते. जसे, देशाच्या अपेक्षेने मनुष्यांचे वर्गीकरण केल्यास कोणी भारतीय, कोणी जपानी, कोणी अमेरीकन इत्यादि विभाजन होईल. तेच व्यवसायाच्या अपेक्षेने विभाजन केल्यास कोणी डॉक्टर, कोणी इंजिनियर, कोणी व्यापारी तर कोणी व्यवसायरहित, कोणी शेतकरी तर कोणी कामगार असतील. अपेक्षा बदलली की एका ग्रुपमधील माणसांचे

फिरुन अन्य ग्रुपमध्ये विभाजन होते.

स्त्री-पुरुषांच्या अपेक्षेने कोणी स्त्रिया आहेत, तर कोणी पुरुष आहेत. वयाच्या अपेक्षेने कोणी बालक आहेत, कोणी तरुण आहेत तर कोणी वृद्ध आहेत. बुद्धीच्या अपेक्षेने कोणी बुद्धिमान आहेत तर कोणी मतिमंद आहेत, अन्य काहीजण साधारण बुद्धिवाले आहेत. धनाच्या अपेक्षेने पहाता कोणी श्रीमंत आहेत तर कोणी गरीब आहेत.

याचप्रमाणे चौदा मार्गणांच्या द्वारे - चौदा भिन्न भिन्न अपेक्षांच्या द्वारे जीवांचे वेगवेगळे विभाजन करण्यात येते. एका मार्गणेतील—एका ग्रुपमधील जीव अन्य मार्गणेच्या अपेक्षेने वेगवेगळ्या ग्रुपमध्ये सामील होतात. जसे डॉक्टर असेल तो भारतीय असेल किंवा अमेरिकन, स्त्री असेल किंवा पुरुष, जवान असेल किंवा वृद्ध, परंतु बालक नसेल.

प्रथम या चौदा मार्गणांची नावे पाहूया. नंतर क्रमाने त्यांचे स्वरूप पहाता येईल. १) गतिमार्गणा २) इंद्रियमार्गणा ३) कायमार्गणा ४) योगमार्गणा ५) वेदमार्गणा ६) कषायमार्गणा ७) ज्ञानमार्गणा ८) संयममार्गणा ९) दर्शनमार्गणा १०) लेश्यामार्गणा ११) भव्यमार्गणा १२) सम्यक्त्वमार्गणा १३) संज्ञीमार्गणा १४) आहारमार्गणा.

**१) गतिमार्गणा :–**

गतिमार्गणेमध्ये सर्व संसारी जीव गतिंच्या अपेक्षेने चार गतिंमध्ये आढळतात. १) नरकगति २) तिर्यंचगति ३) मनुष्यगति व ४) देवगति. गति नामक नामकर्माच्या उदयाने जीव त्या त्या पर्यायामध्ये उत्पन्न होतो. यापैकी नरक, मनुष्य व देव या गतिंमधील जीव संज्ञी पंचेंद्रिय आहेत परंतु तिर्यंच गतिमध्ये एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतचे सर्व प्रकार आढळतात. बालबोध पाठमालेमध्ये 'गति' नावाच्या धड्यात तुम्ही विस्ताराने शिकलाच आहात.

**२) इंद्रियमार्गणा :–**

इंद्रियमार्गणेचा विचार करताना प्रथम इंद्रिय म्हणजे काय ते पाहूया. द्रव्येंद्रिय तर आपण पहातो, आपण त्यांच्याशी परिचित आहोत. इंद्रियं दोन प्रकारची आहेत १) भावेंद्रिय व २)

द्रव्येंद्रिय. लब्धि आणि उपयोग दोन्ही मिळून भावेंद्रिय होते.

मतिज्ञानावरणाच्या क्षयोपशमाने इंद्रियांच्या विषयांना जाणण्याची जीवाची जी शक्ति ती 'लब्धि' आहे व विषय जाणण्याचे जे प्रवर्तनरूप कार्य अर्थात व्यापार तो 'उपयोग' आहे. ज्याप्रमाणे एखाद्या मुलाला ऐकण्याची शक्ति तर आहे परंतु त्याचा उपयोग इतरत्र कोठे खेळण्यात किंवा पहाण्यात लागला असेल तर त्याला मारलेली हाक ऐकू येत नाही. असाही कोणी असेल की जो जाणू इच्छितो परंतु क्षयोपशमरूप शक्ति नसेल तरी तो जाणू शकणार नाही. म्हणून लब्धि आणि उपयोग दोन्ही मिळून विषयाचे ज्ञान होते.

द्रव्येंद्रिय तर शरीरातील विशिष्ट ठिकाणची रचना - चिन्ह आहे. निर्वृत्ति आणि उपकरणरूप द्रव्येंद्रिय आहे. ज्या प्रदेशांनी जाणले जाते त्यांना निर्वृत्ति म्हणतात व त्याच्या निकटवर्ती जे आहे ते उपकरण होय.

पूर्वी आपण जीवसमासामध्ये जीवांचे एकेंद्रियादि भेद पाहिले होते. इंद्रियांच्या अपेक्षेने एकेंद्रिय, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय व पंचेंद्रिय असे सर्व संसारी जीवांचे पाच भेद पडतात.

**३) कायमार्गणा:-**

कायमार्गणेमध्ये काया अर्थात शरीराच्या अपेक्षेने सर्व संसारी जीवांचे भेद पाडले आहेत. 'षट्काय जीवांची हिंसा टाळावी' असे शास्त्रवचन तुम्ही वाचले असेल. हे 'सहा काय' कोणते आहेत ते माहीत आहे का? एक त्रस काय व उरलेले पाच स्थावरकाय.

पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक व वनस्पतिकायिक हे पाच स्थावर किंवा स्थावरकाय जीव आहेत. त्यांना स्थावर नामकर्माचा उदय असतो. द्वींद्रियांपासून संज्ञी पंचेंद्रियांपर्यंत सर्व जीवांना त्रस किंवा त्रसकायिक जीव म्हणतात. त्यांना त्रस नामकर्माचा उदय असतो.

देव, नारकी, मनुष्य व द्वींद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतचे तिर्यंच हे त्रस जीव आहेत.

पृथ्वीकायिकामध्ये पृथ्वी, माती, वाळू, पत्थर, हिरे, माणिक, रत्न सर्व येतात. जलकायिकांमध्ये विहिरीचे पाणी, झरे, नदी

वगैरेचे पाणी, दंव, धुके वगैरेचे पाणी यांचा समावेश होतो. वायुकायिकांमध्ये घनोदधिवात, घनवात, तनुवात हे जीव येतात. अग्निकायिकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अग्नि-ठिणगी, आग, विस्तव, वीज, इलेक्ट्रिक करंट वगैरे आहेत.

हे तर सर्व बादर स्थावर जीव आहेत. त्यांचा समुदाय आपल्या डोळ्यांना दिसतो. या सर्व पाच स्थावरांचे सूक्ष्म जीव संपूर्ण लोकाकाशात ठसोठस भरलेले आहेत. ते डोळ्यांना तर दिसत नाहीतच, पण अन्य वस्तुंद्वारे ते अडवले जात नाहीत, ते अन्य शरीरांना रोकत-अडवत नाहीत व ते कशाच्याही आधाराविना रहातात. हे तर पूर्वी सांगितलेच होते - आठवते ना?

या प्रत्येक स्थावरामध्ये तीन तीन भेद आहेत. पृथ्वीच्या उदाहरणावरून पाहूया. पृथ्वीजीव, पृथ्वीकायिक जीव व पृथ्वीकाय.

जो जीव पूर्व पर्याय सोडून पृथ्वीकायिकामध्ये जन्म घेण्यासाठी विग्रहगति मध्ये जोपर्यंत रहातो तोपर्यंत त्याला पृथ्वीजीव म्हणतात. जेव्हा तो जीव पृथ्वीरूप शरीर धारण करतो तेव्हा त्याला पृथ्वीकायिक जीव म्हणतात. तो जीव मेल्यानंतर त्याचे शरीर रहाते त्यास पृथ्वीकाय म्हणतात.

हे तीनही भेद ज्यामध्ये आहेत असा चौथा सामान्यरूप पृथ्वी असाही भेद शास्त्रात काही ठिकाणी सांगितलेला आहे. असे हे चार चार प्रकार सर्व पाचही स्थावर जीवांमध्ये आढळतात.


वनस्पतिकायिकांचे अनेक भेद उपभेद आपण पूर्वी जीवसमासात पाहिलेच होते. येथे थोडक्यात पुन्हा उजळणी करूया.

वनस्पतिकायिक जीवांचे मुख्य दोन भेद आहेत - प्रत्येक वनस्पति व साधारण वनस्पति. प्रत्येक वनस्पतिचा अर्थ आहे एका शरीरात एक जीव व साधारण वनस्पतिचा अर्थ आहे एका शरीरात अनंत जीव यालाच निगोद म्हणतात. त्यांचे शरीर एक, श्वासोच्छ्वास एक, जन्म एकावेळी, मरण एकावेळी, आयु समान, पर्याप्ति समान असतात वगैरे गोष्टी आपण पूर्वी पाहिल्याच आहेत.

प्रत्येक वनस्पति हे बादर एकेंद्रिय जीव आहेत. त्यांचे सप्रतिष्ठित अर्थात प्रतिष्ठित आणि अप्रतिष्ठित असे दोन भेद

आहेत. ज्या प्रत्येक वनस्पतिच्या आधारे साधारण वनस्पतिकायिक जीव रहातात त्यांना प्रतिष्ठित किंवा सप्रतिष्ठित प्रत्येक वनस्पति म्हणतात. उदाहरणार्थ, झाडांची अत्यंत कोवळी छोटी छोटी पाने की ज्यांमध्ये शिरा दिसत नाहीत, अतिशय छोटी फळं, काकडी वगैरे की, जी तोडली असता समभंग होतो.

हीच पाने, फळे थोडी मोठी होतात तेव्हा त्यांच्यामध्ये शिरा दिसतात, तोडले असता समभंग होत नाही व तंतु चिकटून रहातात त्यावेळी समजावे की आता तेथे निगोद म्हणजे साधारण वनस्पति जीव रहात नाहीत. अशा वेळी त्या प्रत्येक वनस्पतिला अप्रतिष्ठित प्रत्येक वनस्पति म्हणतात. सप्रतिष्ठित व अप्रतिष्ठित दोन्ही प्रकारच्या वनस्पतिंमध्ये पर्याप्त व अपर्याप्त असे दोन दोन भेद आढळतात.




अशाप्रकारे प्रत्येक वनस्पतिचे हे चार भेद आपण पाहिले. आता साधारण वनस्पति म्हणजे निगोदाचे भेद पाहूया. निगोद हे नाव शास्त्रात आपण अनेक ठिकाणी वाचतो पण त्याचा अर्थ अनेक जणांना माहीत नसतो. साधारण वनस्पति म्हणजे निगोदाचे सूक्ष्म व बादर असे दोन मुख्य भेद आहेत. दोन्हींमध्ये नित्यनिगोद व इतरनिगोद असे दोन्ही प्रकारचे जीव आढळतात.

नित्य निगोदाचा अर्थ असा आहे की जे जीव अनादिकाळापासून आजपर्यंत निरंतर-सतत निगोद पर्यायामध्येच जन्म-मरण करत आलेले आहेत, दुसऱ्या कोणत्याच पर्यायात त्यांनी एकदाही जन्म घेतलेला नाही.

इतर निगोद त्या जीवांना म्हटले आहे की जे जीव निगोद पर्यायातून निघून अन्य एकेंद्रियांमध्ये किंवा त्रस पर्यायामध्ये जन्म घेऊन काही काळ त्यामध्ये जन्ममरण करून परत फिरून निगोद पर्याय धारण करून सध्या निगोदामध्येच जन्म मरण करत आहेत.

या सर्वांचे पर्याप्त व अपर्याप्त असे भेद होतात. निगोद म्हटले की एका श्वासात अठरा वेळा जन्म मरण असे अनेकांना


वाटते. ते फक्त अपर्याप्त निगोदाच्या बाबतीत खरे आहे. एवढेच काय, एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतचे सर्वच लब्धि अपर्याप्तक जीव एवढे अल्पायुषि असतात. पर्याप्ति प्ररूपणेमध्ये आपण पाहिले होते की असे जीव निरंतर क्षुद्रभव करत राहिले तर एका अंतर्मुहूर्तामध्ये ६६३३६ भव होतात. केवळ एकेंद्रियांचे ६६१३२ क्षुद्रभव होतात.

त्यामध्ये पृथ्वी, जल, वायु, अग्नि व साधारण वनस्पति यांचे प्रत्येकाचे सूक्ष्म व बादर असे दोन दोन भेद केले असता दहा व प्रत्येक वनस्पतिचा एक याप्रमाणे अकरा प्रकारचे एकेंद्रिय आहेत. ६६१३२ ÷ ११ = ६०१२. अर्थात एकेक प्रकारच्या एकेंद्रियात लागोपाठ ६०१२ क्षुद्रभव एका अंतर्मुहूर्तात होऊ शकतात.

साधारण वनस्पति (बादर) अर्थात बादर निगोद जीव फक्त प्रत्येक वनस्पतिच्याच आधारे रहातात असे नाही. द्वींद्रियांपासून पंचेंद्रिय तिर्यंचांच्या शरीराच्या तसेच मनुष्य शरीराच्या आधारेही ते रहातात. याला अपवाद आहे केवलीच्या शरीराचा व आहारक शरीराचा. १२व्या गुणस्थानामध्ये बादर निगोद राशी औदारिक शरीरातून निघून जाते व १३व्या गुणस्थानात परम औदारिक शरीर बनते.

पृथ्वीकाय, जलकाय, अग्निकाय, वायुकाय यांच्या आधारेदेखील बादर निगोद रहात नाहीत. देव व नारकींच्या वैक्रियिक शरीरामध्ये देखील निगोद रहात नाहीत. बादर निगोद असे म्हणण्याचे कारण असे की सूक्ष्म निगोद तर सर्वत्र रहातात. त्यांना कोणत्याही आधाराची गरज नसते.

साधारण वनस्पतिंचे भेद खालीलप्रमाणे आपण पाहिले.



अशाप्रकारे प्रत्येक वनस्पतिचे चार व साधारण वनस्पतिचे आठ भेद आपण पाहिले.

हे जीवा, या सर्व पर्यायांमध्ये अनादिपासून आजपर्यंत अनंत काळ तू जन्ममरण करण्यात घालविला आहेस. तुला स्मरत नाही म्हणून काय झाले? या सर्व पर्याय पार करून अत्यंत दुर्लभ अशी मनुष्यपर्याय तुला प्राप्त झाली आहे परंतु त्याची तुला किंमत नाही. जर अजूनही तुला स्वतःच्या कल्याणाची गोष्ट सुचत नसेल अथवा कोणी सांगितले असता रुचत नसेल तर या अशा पर्यायांमध्ये पुन्हा परत जाणे निश्चित आहे असे समज.

क्षुद्रभवांमध्ये सम्मूर्च्छन मनुष्याचाही समावेश होतो. एक अंतर्मुहूर्तात निरंतर असे ८ भव मिळू शकतात. काय फायदा अशा मनुष्यभवाचा?

त्यांची तर गोष्ट सोडा. परंतु मुलींनो, हे जीवांनो, तुम्ही तर आता पर्याप्त मनुष्य आहात, ज्ञानाचा एवढा उघाड आहे, खरे देव, गुरु, शास्त्र व त्यांचा यथार्थ उपदेश तुम्हाला मिळालेला आहे. असे असूनही जर तुम्ही स्वतःचा आत्मस्वभाव व स्वतःचे आत्मवैभव पाहिले नाही अर्थात जाणले नाही तर तुम्हाला देखील या मनुष्यभवाचा काय फायदा झाला?

एखाद्याने शुभभाव केले तरी त्याला एखादा भव स्वर्गाचा मिळेल. तेथे गेल्यावर ऐश्वर्य-भोग भोगण्याची इच्छारूप पाप करून तसेच तीव्र ईर्षा व आकुलता करून तो जीव पृथ्वीकायिकादि एकेंद्रियात उपजेल व परत भवभ्रमण करीत राहील.

हे जीवा, दुनियादारीमध्ये स्वतःला तू इतका शहाणा समजतोस, तुला ही साधी स्वतःच्या फायद्याची गोष्ट कळत कशी नाही?

मला खात्री आहे तुम्ही यावर जरूर विचार कराल!

बाकी पुढील पत्री.

कळावे,

**तुमची आई.**

# योग, वेद, कषाय, ज्ञान व संयम मार्गणा

पत्रांक १८ ॥ॐ नमः सिद्धेभ्यः॥ २ऑक्टोबर१९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मार्गणा या विषयावर आपण चर्चा करीत आहोत. १४ मार्गणांपैकी आपण गतिमार्गणा, इंद्रियमार्गणा व कायमार्गणा यांच्यासंबंधी चर्चा केली. आज योगमार्गणेबद्दल चर्चा करूया.

**४) योगमार्गणा:-**

प्रथम योग म्हणजे काय ते पाहूया.

संसारी जीव अनादिपासूनच कर्मसहित आहे व तो निरंतर नवीन नवीन कर्मांचा बंध करीत असतो, तसेच शरीरासंबंधीच्या नोकर्म वर्गणा देखील ग्रहण करतो. कर्म-नोकर्म वर्गणांना, कर्म नोकर्म रूप परिणमविण्याची आत्म्याची जी शक्ति आहे तिला 'भावयोग' म्हणतात. त्या आत्म्याच्या प्रदेशांचे चंचलरूप होणे - सकंप होणे - चलनरूप होणे यास 'द्रव्ययोग' म्हणतात.

ज्याप्रमाणे अग्निच्या संयोगाने लोखंडामध्ये जाळण्याची शक्ति उत्पन्न होते त्याप्रमाणे अंगोपांग व शरीर नामकर्माच्या उदयाने भाषावर्गणा, मनोवर्गणा, आहारवर्गणा यांचे जे स्कंध येतात, तेव्हा त्यांच्याशी संबंध जोडल्यामुळे म्हणजेच त्यांचे अवलंबन घेतल्यामुळे जीवाच्या प्रदेशांमध्ये कर्म-नोकर्माचे ग्रहण करण्याची शक्ति-सामर्थ्य अर्थात योग उत्पन्न होतो.

मनाचे व वचनाने अवलंबन घेऊन तसेच शरीराचे अवलंबन घेऊन जीव मनाद्वारे जाणण्याविषयी, बोलण्याविषयी व शरीराच्या हालचालीविषयी प्रयत्नरूप प्रवृत्ति करतो त्यावेळी आत्मप्रदेशांच्या चंचलतेने नवे नवे नोकर्म स्कंध येऊन मिळतात. यालाच आपण मन, वचन, काय योग म्हणतो.

पहा बरं, एखादा कसरतपटू-व्यायामपटू असेल तर त्याचे शरीरही भक्कम दिसते. ज्या अवयवांचा तो अधिक वापर करतो ते अवयव अधिक बळकट व मोठे दिसतात. याचा अर्थ असा की योगाद्वारे त्या त्या स्कंधाचा अधिक संचय होतो. आपण काही काळ एखादा स्नायु वापरला नाही तर तो सुकून जातो -

Disuse Atrophy होते. पोलिओ झालेला पाय वापरात नसल्याने त्या पायाचे स्नायु बारीक रहातात. असा हा कारणकार्य संबंध लावला तर व्यवहारातील अनेक गोष्टींचा उलगडा आपणास होऊ शकतो.

तीन प्रकारचे योग संभवतात - मनोयोग, वचनयोग व काययोग. योगाचा सद्भाव १३व्या गुणस्थानापर्यंत आढळतो, १४व्या गुणस्थानात योगाची चंचलता पूर्णपणे मिटते, तेथे योगाचा अभाव होतो. त्यांना अयोगकेवली असे म्हणतात.

संज्ञी पंचेंद्रियांना तीनही योग असतात. ज्यांना मन नाही परंतु वचन आहे अशा द्वींद्रियांपासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंतच्या जीवांना वचनयोग व काययोग असतो. ज्यांना मन व वचन दोन्हीही नाही अशा एकेंद्रिय जीवांना फक्त काययोगच असतो. विग्रहगतिमध्ये योग आहे की नाही अशी तुम्हाला शंका येणे उचित आहे. त्या जीवांना कार्माणकाययोग असतो.

याचा अर्थ असा होतो की अनादिकाळापासून संसारी जीव एक समय देखील कधी योगविरहित झालेले नाहीत. जे जीव अरहंत होतात त्यांना १४ व्या गुणस्थानाच्या पहिल्या समयापासून योगाचा अभाव होतो अर्थात त्यांचे कर्म-नोकर्माचे ग्रहण थांबते.

जीवाला एका समयात एकच योग असतो. मनोयोग चालू असेल तर इतर दोन योग नसतात, वचनयोग किंवा काययोग चालू असेल तर उरलेले दोन योग असत नाहीत. हे कसे शक्य आहे असा प्रश्न उठणे स्वाभाविक आहे. कारण आपण तर एकाच वेळी मनाचे, वचनाचे व शरीराचे कार्य होताना प्रत्यक्ष पहातो. याचे कारण असे आहे की दुसऱ्या योगाचे जे संस्कार राहतात त्यामुळे त्या त्या योगांची क्रिया एकावेळी होताना दिसते.

जीव बोलण्याची क्रिया करताना वचनयोगात असेल तर तो योग पालटून मनोयोग सुरू होतो परंतु पूर्वीच्या वचनयोगाच्या बलाने ती बोलण्याची क्रिया चालू रहाते. सर्कशीमध्ये आपण पहातो ना की दोनच हातांनी ५-५, ६-६ चेंडू हवेत उडवत ठेवण्याची कला त्या कलाकारांना अवगत असते. तसेच हे योगाचे पलटणे इतक्या वेगाने होते की मन, वचन व काय या तिन्हीच्या क्रिया एकाच वेळी चालू रहातात, त्यात खंड पडत नाही.

मनोयोगाचे चार, वचनयोगाचे चार व काययोगाचे सात प्रकार आहेत. सत्य, असत्य, उभय व अनुभयरूप जे पदार्थ

असतात त्यांना जाणण्याची जीवाची प्रवृत्ति होते तेव्हा त्या चार प्रकारचे मनोयोग संभवतात, त्या पदार्थांचे कथन करण्याची जीवाची प्रयत्नरूप प्रवृत्ति होते तेव्हा चार प्रकारचे वचनयोग संभवतात.

हे सत्य असत्य प्रकार पदार्थांमध्ये कसे संभवतात त्याचे उदाहरण पाहूया. पाण्याला पाणी जाणणे हे सत्य आहे कारण त्या पाण्याने तहान भागवता येते. मृगजळाला पाणी जाणणे हे असत्य आहे कारण त्याने स्नान, पानादिक क्रिया करता येत नाहीत. कमंडलूला घट जाणणे हे उभय आहे. कमंडलूमध्ये घटाप्रमाणे पाणी भरता येते म्हणून सत्य; परंतु कमंडलूचा आकार घटासारखा नाही म्हणून असत्य, याप्रकारे उभय जाणावे. ज्या पदार्थाचा विशेष निर्णय होत नाही म्हणून जो सत्य नाही व सामान्यपणे तर जो जाणला गेला म्हणून जो असत्यही नाही, त्याला अनुभय असे म्हणतात.

अशा रीतीने मनोयोगाचे सत्य, असत्य, उभय व अनुभय असे चार प्रकार व वचन योगाचेही असेच चार प्रकार आढळतात. केवली भगवंतांना सत्य व अनुभय वचनयोग सांगितला आहे. याचे कारण-दिव्यध्वनी अनक्षरात्मक असल्याने अनुभय व श्रोत्यांच्या कानावर पडल्यानंतर अक्षरात्मक होऊन त्यांचे संशयादिक दूर करते म्हणून सत्यवचनरूप आहे.

केवली भगवंतांना मनोयोग आहे असे जे कथन आहे ते उपचाराने मनोयोग म्हटले आहे. छद्मस्थ जीवांना मनोयोगपूर्वक वचन व्यापार आढळतो म्हणून केवलींना देखील उपचाराने मनोयोगाचा सद्भाव आहे असे म्हटले जाते.

काययोगाचे सात प्रकार पुढील प्रमाणे आहेत - १) औदारिक काययोग २) औदारिक मिश्र काययोग ३) वैक्रियिक काययोग ४) वैक्रियिक मिश्र काययोग ५) आहारक काययोग ६) आहारक मिश्र काययोग ७) कार्माण काययोग.

यापैकी त्या त्या शरीराच्या अपर्याप्त अवस्थेमध्ये मिश्र काययोग असतो. विग्रहगतिमध्ये कार्माण काययोग असतो.

मनुष्य व तिर्यंचांमध्ये औदारिक काययोग व औदारिक मिश्र काययोग असतो. देव व नारकीमध्ये वैक्रियिक काययोग व वैक्रियिक मिश्र काययोग असतो. आहारक शरीरधारी मुनींना आहारक व आहारक मिश्र काययोग असतो.

अशा रीतीने मनाचे ४, वचनाचे ४ व कायेचे ७ असे १५ प्रकारचे योग आपण पाहिले. पूर्वी कर्म व नोकर्माचा बंध कसा होतो हे शिकताना आपण योगामुळे प्रकृतिबंध व प्रदेशबंध होतो हे विस्ताराने पाहिले होते.

आता वेदमार्गणा काय आहे ते पाहूया.

**५) वेदमार्गणा :-**

नामकर्माच्या उदयाने पुरुष, स्त्री किंवा नपुंसकरूप शरीर तयार होते त्यास 'द्रव्यवेद' म्हणतात व परस्पर अभिलाषा युक्त मैथुन संज्ञेचा धारक जीव भाववेदवाला जीव आहे.

बहुतांशी जीवांना समान वेद असतो अर्थात जसा द्रव्यवेद असतो तसाच भाववेद असतो. देव, नारकी व भोगभूमीतील मनुष्य व तिर्यंचांना द्रव्य व भाव वेद समान असतात, द्रव्यपुरुषवेद असेल तर भावपुरुषवेदच असतो. कर्मभूमीच्या मनुष्य तिर्यंचांमध्ये समान किंवा असमान वेद असू शकतात.

वेदमार्गणेच्या अपेक्षेने जीवांचे वर्गीकरण केल्यास वेदसहित जीव व वेदरहित-अपगतवेदी-अवेदी जीव असे दोन भाग करता येतात. ९व्या गुणस्थानात वेदाचा अभाव होतो तोपर्यंत जीव सवेदी आहेत त्यानंतर अपगत वेदी आहेत. ही भाववेदाची अपेक्षा आहे. द्रव्यपुरुषवेदी जीवच ६व्या गुणस्थानात किंवा वरच्या गुणस्थानात आढळतो तर द्रव्यस्त्रीवेदी ५व्या गुणस्थानाच्यावर जाऊ शकत नाही.

एकेंद्रियांपासून चतुरिंद्रियांपर्यंत सर्व जीव नपुंसकवेदीच असतात. सर्व नारकी जीव नपुंसकवेदी असतात. देवांमध्ये तसेच भोगभूमीतील मनुष्य व तिर्यंचांमध्ये स्त्री व पुरुष हे दोनच वेद आढळतात. कर्मभूमीच्या मनुष्य व तिर्यंचांमध्ये तीनही प्रकारचे वेद आढळतात.

९ व्या गुणस्थानाच्या ५ भागांपैकी सवेद भागापर्यंत वेदाचा सद्भाव आहे. ९ व्याचे बाकी भागवाले, १०वे, ११वे, १२वे, १३वे व १४वे गुणस्थानवाले जीव अपगतवेदी आहेत.

**६) कषायमार्गणा :-**

आता कषायमार्गणा या विषयी चर्चा करूया. कषायमार्गणेमध्ये सर्व संसारी जीवांना दोन भागात विभागले जाईल - कषायसहित जीव व कषायरहित जीव. १० व्या गुणस्थानापर्यंत कषायसहित जीव आहेत व ११, १२, १३ व

१४व्या गुणस्थानातले जीव कषायरहित-पूर्ण वीतरागी आहेत.

कषायसहित जीवांमध्ये देखील क्रोधवाले, मानवाले, मायावाले व लोभवाले असे चार प्रकारचे विभाजन करण्यात येते. एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत चारही प्रकारचे कषाय आढळतात. ९व्या गुणस्थानात क्रमाने क्रोध, मान, माया यांचा अभाव होऊन लोभ कषाय उरतो. १०व्या गुणस्थानात सूक्ष्म लोभ असतो व १०व्याच्या अंती त्याचाही अभाव होतो.

सामान्यपणे कषाय शब्द वापरला जातो व त्याचे विशेष अपेक्षेने चार प्रकार - जातिभेद सांगितले आहेत ते असे - १) अनंतानुबंधी २) अप्रत्याख्यान ३) प्रत्याख्यान ४) संज्वलन.

अनंतानुबंधी क्रोधादिक तत्त्वार्थश्रद्धानरूप सम्यक्त्वाचा घात करतात कारण अनंत संसाराचे कारण जे मिथ्यात्व त्याच्याशी हे संबंध स्थापित करतात.

अप्रत्याख्यान क्रोधादिक देशचारित्राचा घात करतात. ते थोडादेखील त्याग म्हणजे अणुव्रतं होऊ देत नाहीत.

प्रत्याख्यान क्रोधादिक महाव्रतरूप सकल चारित्राचा घात करतात. व महाव्रतांचे परिणाम होऊ देत नाहीत.

संज्वलन क्रोधादिक यथाख्यात चारित्ररूप पूर्ण वीतरागता होऊ देत नाहीत.

या सर्व कषायांचे मंद तीव्रतेच्या अपेक्षेने असंख्यात लोक प्रमाण भेद पडतात.

**७) ज्ञानमार्गणा :-**

आता पाहूया ज्ञानमार्गणा. काय तुम्ही म्हणू शकता की काही जीव ज्ञानसहित असतील व काही ज्ञानरहित? बिलकुल नाही. सर्व जीव ज्ञानसहितच असतात. ज्ञान हा तर जीवाचा स्वभाव आहे. कोणताही पदार्थ कधीही स्वभाव विरहित होत नाही.

ज्ञानाची प्रकट पर्याय कोणती आहे या अपेक्षेने ज्ञानमार्गणेचे विभाजन होईल. मति, श्रुत, अवधि, मनःपर्यय व केवल हे पाच सम्यक् ज्ञान आहेत आणि कुमति, कुश्रुत व विभंग हे तीन मिथ्याज्ञान आहेत.

मति, श्रुत, अवधि व मनःपर्यय हे क्षायोपशमिक ज्ञान आहेत तर केवलज्ञान हे क्षायिक ज्ञान आहे.

१ल्या व २ऱ्या गुणस्थानात कुमति व कुश्रुत हे दोन मिथ्याज्ञान असतात. कुअवधि म्हणजे विभंगज्ञानही या जीवांना

असू शकते. देव व नारकी जीवांना भवप्रत्यय अवधिज्ञान असते. मनुष्य व तिर्यंचांमध्ये गुणप्रत्यय अवधिज्ञान असू शकते. एकेंद्रियांपासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंत नियमाने कुमति व कुश्रुत हे दोनच प्रकार आढळतात.

३ऱ्या गुणस्थानात मिश्र ज्ञान असते.

४थ्या पासून १२व्या गुणस्थानापर्यंत मति व श्रुतज्ञान तसेच काही जीवांना अवधिज्ञान असते. ६व्या ते १२व्या गुणस्थानातील काही मुनींना मनःपर्ययज्ञान देखील असते. अशाप्रकारे काही मुनींना वरील चार ज्ञान असू शकतात.

१३व्या, १४व्या गुणस्थानात केवलज्ञान असते. हे पूर्ण विकसित क्षायिक ज्ञान आहे. त्याचा एकच प्रकार असतो त्यात भेद असत नाहीत. परंतु क्षायोपशमिक ज्ञानामध्ये विषयाच्या अपेक्षेने तसेच ज्ञानाच्या क्षयोपशमाच्या अपेक्षेने अनेक भेद-उपभेद पडतात, त्याचे सविस्तर वर्णन शास्त्रामध्ये दिले आहे.

**८) संयममार्गणा :–**

यामध्ये जीवांचे सात भेद आहेत. त्यापैकी संयमाविना असे असंयमी जीव, आंशिक संयम व आंशिक असंयम असे संयमासंयमी जीव व संयमी जीव असे मुख्य तीन भेद असतात. संयमी जीवांमध्येदेखील पाच प्रकारचे संयमवाले जीव आहेत.

१ ते ४ गुणस्थानातले जीव असंयमी आहेत.

५ व्या गुणस्थानातले जीव देशसंयमी म्हणजे संयमासंयमी आहेत.

६ व्या गुणस्थानापासून १४ व्या गुणस्थानातले जीव संयमी आहेत.

सम्यक् प्रकारे यम म्हणजे नियम तो संयम होय. ६ ते ९ गुणस्थानांमध्ये सामायिक व छेदोपस्थापना संयम असतो. परिहार विशुद्धि संयम ६ व्या व ७ व्या गुणस्थानात आढळतो. १० व्या गुणस्थानात सूक्ष्मसांपराय नावाचा संयम असतो तर ११ ते १४ गुणस्थानांमध्ये यथाख्यात संयम असतो.

अशाप्रकारे आज आपण योगमार्गणा, वेदमार्गणा, कषायमार्गणा, ज्ञानमार्गणा व संयममार्गणा या आणखी पाच मार्गणांचे स्वरूप पाहिले. बाकीच्या मार्गणांविषयी पुढच्या पत्रामध्ये चर्चा करूया.

कळावे,

**तुमची आई.**

# दर्शन, लेश्या, भव्य, सम्यक्त्व, संज्ञी, आहार मार्गणा व उपयोग प्ररूपणा

पत्रांक १९ **।।ॐ नमः सिद्धेभ्यः।।** ३ ऑक्टोबर १९९९

प्रिय रीना व मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

चौदा मार्गणांपैकी आठ मार्गणांचे स्वरूप आपण पाहिले. ९वी दर्शनमार्गणा आहे.

**९) दर्शनमार्गणा :–**

चेतनेचे ज्ञान व दर्शन असे दोन भेद पडतात. त्यापैकी दर्शन गुणाच्या पर्यायाच्या अपेक्षेने दर्शन मार्गणेचे विभाजन होते. दर्शन शब्दाचा अर्थ पहाणे असा होतो. बाह्य पदार्थांचे जाति, क्रिया, गुण, प्रकार इत्यादि विशेष न करता स्वतःचे व इतर पदार्थांचे फक्त सामान्यरूप सत्तामात्र ग्रहण करणे, सामान्य सत्तावलोकन करणे यास 'दर्शन' म्हणतात.

शास्त्रामध्ये सम्यग्दर्शन किंवा मिथ्यादर्शन असा शब्द येतो तेथे दर्शन शब्दाचा अर्थ श्रद्धा असा आहे. तो अर्थ येथे अभिप्रेत नाही. चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधिदर्शन व केवलदर्शन असे दर्शनाचे चार भेद आहेत.

चक्षु अर्थात नेत्रांद्वारे जे सामान्य ग्रहण किंवा चक्षु इंद्रियाच्या विषयाचे प्रकाशन त्याला चक्षुदर्शन म्हणतात. नेत्र वगळता इतर चार इंद्रियं व मन यांच्या विषयाचे प्रकाशन ते अचक्षुदर्शन आहे. परमाणुपासून महास्कंधापर्यंतचे जे मूर्तिक द्रव्य त्यांना प्रत्यक्ष 'पहाणे' - 'सत्तामात्र अवलोकणे' त्यास अवधिदर्शन म्हणतात. व लोक अलोकामधील समस्त द्रव्यांना सत्तामात्र पहाणे, स्वपर सत्ता अवलोकन करणे यास केवलदर्शन म्हणतात.

एकेंद्रियांपासून त्रींद्रियांपर्यंत फक्त अचक्षुदर्शन असते कारण त्यांना चक्षु इंद्रिय नसते. चतुरिंद्रियांना व संज्ञी-असंज्ञी पंचेद्रियांना चक्षुदर्शन व अचक्षुदर्शन दोन्ही असतात. संज्ञी पंचेंद्रिय अवधिज्ञानी जीवांना अवधिदर्शन देखील असते. १३व्या व १४व्या गुणस्थानामध्ये अरहंतांना केवलदर्शन असते. आपण येथे फक्त संसारी जीवांचे विभाजन पहात असल्याने येथे सिद्धांना वगळून इतर जीवांसंबंधी कथन करत आहोत.

**१०) लेश्यामार्गणा:-**

लेश्यामार्गणेसंबंधी विवेचन करताना प्रथम लेश्या म्हणजे काय याचा विचार करूया. लेश्या दोन प्रकारच्या असतात - द्रव्यलेश्या व भावलेश्या. यापैकी शरीराच्या वर्णाला 'द्रव्यलेश्या' म्हणतात. कषायांनी अनुरंजित-रंगलेली योगांची प्रवृत्ति तिला 'भावलेश्या' असे म्हणतात.

मन, वचन कायरूप योगांची जी प्रवृत्ति आहे ती कषायांनी अनुरंजित होते तिला 'लेश्या' असे म्हणतात. कर्माचा बंध कसा होतो हे पहाताना आपण शिकलो होतो की योगामुळे प्रकृतिबंध व प्रदेशबंध होतो आणि कषायांमुळे स्थितिबंध व अनुभागबंध होतो. यावरून सिद्ध होते की लेश्यांमुळे चारही प्रकारचा बंध होतो.

कषायांचा सद्भाव फक्त १०व्या गुणस्थानापर्यंतच असतो. तर मग त्यानंतरच्या गुणस्थानात लेश्या आहेत की नाही अशी शंका येणे स्वाभाविक आहे. कषाय नसला तरी निव्वळ योगाचा सद्भाव ११, १२ व १३व्या गुणस्थानात असतो त्यामुळे तेथे उपचाराने - भूतपूर्वन्यायाने लेश्या आहे असे म्हटले जाते. ११, १२ व १३व्या गुणस्थानात उपचाराने शुक्ल लेश्या सांगितलेली आहे. १४वे गुणस्थान हे अयोगी गुणस्थान आहे, तेथे योग देखील नसतो म्हणून त्या गुणस्थानात लेश्या देखील नसते.

संक्लेश म्हणजे तीव्र कषाय-अशुभ भाव व विशुद्धि म्हणजे मंद कषाय—शुभभाव. संक्लेशाकडून विशुद्धीपर्यंत कषायांचे अनेक प्रकार आढळतात. त्यांनी युक्त लेश्यांना ६ नावे दिलेली आहेत - १) कृष्ण २) नील ३) कपोत ४) पीत (तेजो) ५) पद्म ६) शुक्ल. या सर्वांचे असंख्यात लोकप्रमाण भेद आहेत. यापैकी कृष्ण, नील व कपोत या तीन अशुभ लेश्या आहेत. व पीत, पद्म व शुक्ल या तीन शुभ लेश्या आहेत.

१ ते ४ गुणस्थानांमध्ये सहाही लेश्या आढळतात.

५व्या पासून ७व्या गुणस्थानापर्यंत पीत, पद्म व शुक्ल या तीन शुभ लेश्या आढळतात. ८व्या पासून १३व्या गुणस्थानापर्यंत फक्त एक शुक्ल लेश्या असते.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ३ अशुभ लेश्या पहिल्या ४ गुणस्थानांमध्ये आढळतात. पीत व पद्म लेश्या १ ते ७ गुणस्थानात असतात व शुक्ललेश्या १ ते १३ गुणस्थानामध्ये असते. लेश्यारहित असे १४ वे गुणस्थान आहे.

प्रत्येक लेश्येचे जघन्य, मध्यम व उत्कृष्ट असे भेद केले असता लेश्यांचे अठरा अंश होतात, त्याशिवाय आयुबंधास

योग्य असे आठ मध्यम अंश आहेत.

असे लेश्यांचे एकूण २६ अंश शास्त्रात सांगितले आहेत. लेश्येचे हे जे आठ मध्यम अंश आहेत ते अपकर्ष काळामध्ये संभवतात. आगामी भवाची आयु या अपकर्ष काळामध्ये बांधली जाते. आयुबंधास योग्य परिणाम या अपकर्ष काळामध्येच होतात असा सहज निसर्ग नियम आहे.

आयुबंध या आठ अंशांच्या वेळी होत असला तरी मरणाच्या वेळी इतर लेश्या असू शकतात. कोणत्या लेश्येसह मरणारा जीव कोठे उत्पन्न होतो-कोठे जन्म घेतो याचे ठराविक नियम आहेत. थोड्याशा अभ्यासानंतर कोणत्या जीवांना कोणत्या लेश्या असतात व कोणत्या लेश्येमध्ये मरण झाल्यास जीव कोठे जन्म घेतो या गोष्टी आपल्या लक्षात येऊ शकतात. अभ्यासाने कोठलीही गोष्ट सोपी वाटते, नाही का?

**११) भव्यमार्गणा :-**

यामध्ये संसारी जीवांचे भव्य व अभव्य असे दोन भेद आढळतात. भव्य शब्दाचा अर्थ आहे 'होण्यायोग्य'. अनंत चतुष्टयरूप स्वरूपाची प्राप्ति होण्याची ज्यांच्यामध्ये शक्ति आहे ते भव्य आहेत. अर्थात भव्य जीव रत्नत्रय - सम्यग्दर्शन-सम्यग्ज्ञान-सम्यक्‌चारित्राची प्राप्ति करून मुक्त होऊ शकतात - तशी त्यांच्यामध्ये योग्यता असते. ज्यांच्यामध्ये अशी शक्ति— अशी योग्यताच नसते त्यांना अभव्य म्हणतात.

भव्य जीव देखील दोन प्रकारचे आढळतात. काही भव्य जीव असे आहेत की मुक्त होण्याची योग्यता असली तरीदेखील ते कधी मोक्षमार्ग प्रकट करीत नाहीत व मुक्त होत नाहीत - ते अनंतानंत काळ संसार परिभ्रमण करीत रहातील व काही भव्य जीव जे कालांतराने मुक्त होतील.

मुक्त झाल्यानंतर या जीवांना भव्य म्हणत नाहीत, ते अभव्य तर नाहीतच. भव्यत्व शक्तीची अभिव्यक्ति झाल्याने भव्य - अभव्य यांच्या पार हे मुक्त जीव आहेत. त्यांच्यामध्ये 'जीवत्व' पारिणामिक शक्ति असते.

तुम्हाला वाटेल हे भव्य-अभव्य असे विभाजन का बरे केले आहे? अगं - हे कोणीही केलेले नाही! - जीवाची ही सहज योग्यता आहे. म्हणून भव्यत्व व अभव्यत्व हे देखील पारिणामिक भाव आहेत असे म्हटले आहे. कोणत्याही कर्माच्या कोणत्याही अवस्थेमुळे हे ठरत नाही.

'मी अभव्य असेन तर?' असा विचार करून गर्भगळित होण्याचे देखील काहीच कारण नाही. पुरुषार्थहीन व्यक्तीच असे नैराश्यजनक विचार - निगेटिव्ह थिंकिंग करतात. आत्म्याची चर्चादेखील जो अत्यंत प्रीतिपूर्वक ऐकतो तो निश्चितच भव्य आहे व निकटच्या भविष्यात मुक्तीचा पात्र आहे असे पद्मनंदि आचार्यांनी म्हटले आहे.

**तत्प्रति प्रीतिचित्तेन येन वार्ताऽपि हि श्रुता ।**
**निश्चितं स भवेत् भव्यो भावि निर्वाणभाजनम् ।।**

१ल्या गुणस्थानामध्ये भव्य व अभव्य दोन्ही प्रकारचे जीव असतात. २ऱ्या गुणस्थानापासून १४व्या गुणस्थानापर्यंतचे जीव नियमाने भव्यच असतात.

**१२) सम्यक्त्वमार्गणा :–**

येथे केवळ सम्यक्त्वाची चर्चा नसून सम्यक्त्वमार्गणेची चर्चा आहे; सम्यक्त्वाच्या अपेक्षेने जीवांचे विभाजन आहे. यांचे दोन मुख्य भेद पडतील - सम्यक्त्वरहित जीव व सम्यक्त्वसहित जीव. सम्यक्त्वरहित जीवांमध्ये मिथ्यात्व, सासादन व मिश्र (सम्यग्मिथ्यात्व) असे तीन भेद पडतात. व सम्यक्त्वसहित जीवांमध्ये औपशमिक सम्यक्त्ववाले, क्षायोपशमिक अर्थात वेदक सम्यक्त्ववाले व क्षायिक सम्यक्त्ववाले असे तीन भेद पडतात. अशाप्रकारे सम्यक्त्वमार्गणेमध्ये जीवांचे सहा भेद होतात.

यापैकी पहिले तीन भेद अनुक्रमे पहिल्या तीन गुणस्थानात असतात. प्रथमोपशम सम्यक्त्वी जीव ४थ्यापासून ७व्या गुणस्थानापर्यंत असतात, क्षायोपशमिक सम्यक्त्वी जीव ४ थ्या पासून ७व्या गुणस्थानापर्यंत असतात. क्षायिक सम्यक्त्वी जीव ४थ्या पासून १४व्या गुणस्थानापर्यंत असतात. सिद्ध भगवान देखील क्षायिक सम्यदृष्टि असतात.

द्वितीयोपशम सम्यक्त्वी जीव ४थ्यापासून ११व्या गुणस्थानापर्यंत आढळतात. कारण उपशम श्रेणी मांडून परत क्रमाने तो जीव ६व्या पर्यंत येऊन तेथून खाली ४थ्या पर्यंत येऊ शकतो.

**१३) संज्ञीमार्गणा :–**

संज्ञीमार्गणा विषयी चर्चा करताना प्रथम संज्ञी म्हणजे काय ते पाहूया. मन-ज्ञानाने सहित असे संज्ञी पंचेंद्रिय जीव संज्ञी आहेत, मन-ज्ञानाने रहित असे एकेंद्रियांपासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंतचे जीव असंज्ञी आहेत. या मार्गणेतील तिसरा भेद आहे संज्ञी-

असंज्ञीपणाने रहित अशी १३व्या, १४व्या गुणस्थानातील अरहंत दशा. कारण या जीवांचे जाणणे मनाद्वारे होत नाही, त्यांना द्रव्यमन असले तरी क्षायोपशमिक ज्ञानरूप भावमन त्यांना नसते कारण त्यांना तर क्षायिकज्ञान - केवलज्ञान प्रकट झालेले असते.

आपण संज्ञा ही प्ररूपणा पाहिली होती व आता पहात आहोत ती संज्ञी मार्गणा आहे. नामसादृश्यामुळे घोटाळा होऊ नये म्हणून मुद्दाम ही गोष्ट तुमच्या निदर्शनास आणून देत आहे.

संज्ञी अर्थात् मनसहित जीवांचे लक्षण आपण पूर्वी पाहिले होते. मनाद्वारे हित-अहिताचे ग्रहण-त्यागरूप शिक्षण, इच्छेनुरूप हातपायाच्या क्रिया, उपदेश व पाठांतर करणे इत्यादिंचे ग्रहण करणारे जीव-मनुष्य व हत्ती, घोडे, कुत्रा, काही पक्षी व प्राणी आणि देव व नारकी हे सारे संज्ञी जीव आहेत. उरलेले एकेंद्रियांपासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंत सर्व तिर्यंच हे असंज्ञी आहेत.

**१४) आहारमार्गणा :–**

आता शेवटची आहारमार्गणा पाहूया. जीव जे शरीररूप, वचनरूप व द्रव्यमनरूप होण्यायोग्य नोकर्मवर्गणांचे ग्रहण करतो, त्यास 'आहार' असे म्हणतात. आपण पूर्वी सहा प्रकारचे आहार पाहिले होते. आहार नावाची 'संज्ञा' देखील तुम्हाला आठवत असेल. आहार नावाच्या वर्गणेपासून औदारिक, वैक्रियिक व आहारक ही तीन शरीरे तयार होतात हेही आपण शिकलो होतो. येथे आहार मार्गणा प्रकरणामध्ये आहारक व अनाहारक असे दोन भेद आहेत. त्यापैकी नोकर्म वर्गणांचे ग्रहण करणारे ते आहारक जीव आहेत व जे नोकर्मवर्गणांचे ग्रहण करीत नाहीत त्यांना अनाहारक म्हणतात. उपवास करणे म्हणजे अनाहारक असा अर्थ नाही.

अनाहारक जीव कोण कोण असतात हे पाहूया. पूर्वी आपण विग्रहगतिबद्दल सविस्तर माहिती पत्र क्रमांक ३ मध्ये पाहिली होती. ऋजुगतिने जाणारे जीव त्याच समयात आहार ग्रहण करतात, परंतु एक, दोन किंवा तीन मोडवाले विग्रहगतितील जीव अनुक्रमे एक, दोन व तीन समय अनाहारक असतात व नंतर आहारक होतात. प्रतर आणि लोकपूरण प्रकारचा केवलीसमुद्घात करणारे जीव अनाहारक असतात तसेच अयोगीजिन हे १४व्या गुणस्थानातले जीवदेखील अनाहारक असतात. सर्व सिध्द भगवान अनाहारक असतात हे तर सांगायची गरजच नाही. या अनाहारक जीवांव्यतिरिक्त इतर सर्व जीव

आहारक आहेत.

समुद्घात असा जो शब्द वर आला आहे त्याचा अर्थ असा होतो की आत्म्याचे प्रदेश मूळ शरीराला न सोडता, कार्माण आणि तेजसरूप उत्तर शरीरासह मूळ शरीराच्या बाहेर निघतात व फिरून मूळ शरीरात परत पूर्ववत् येतात त्यास समुद्घात म्हणतात. सात वेगवेगळ्या प्रकारचे समुद्घात होऊ शकतात, ते असे - १) वेदना समुद्घात २) कषाय समुद्घात ३) वैक्रियिक समुद्घात ४) मारणांतिक समुद्घात ५) तैजस् समुद्घात ६) आहारक समुद्घात व ७) केवलीसमुद्घात.

अशाप्रकारे चौदा मार्गणांचे स्वरूप आपण पाहिले आता वीस प्ररूपणांपैकी एक उपयोग प्ररूपणा राहिली ती तर समजायला सोपी आहे. ज्ञानमार्गणेप्रमाणे एखाद्या जीवाला किती प्रकारचे ज्ञान असू शकतात व दर्शनमार्गणेप्रमाणे त्या जीवाला किती दर्शन असू शकतात त्या दोन्हीची बेरीज करून त्या जीवाला किती उपयोग असतात त्याचे कथन केले जाते.

आपण सर्व संसारी जीवांचे गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, गति, इंद्रिय, काय, योग, वेद, कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेश्या, भव्य, सम्यक्त्व, संज्ञी, आहार व उपयोग या वीस प्ररूपणांद्वारे वर्णन पाहिले. सिध्द भगवान गुणस्थानातीत आहेत. त्यांना आपण यातून वगळले होते. त्यांच्या बाबतीत या प्ररूपणा कशा लागू होतात हेही थोडक्यात पाहूया.

सिध्दांना गुणस्थान नाही, जीवसमास नाही, पर्याप्ति नाहीत, प्राण (द्रव्यप्राण) नाहीत, संज्ञा नाहीत. त्यांची सिध्दगति आहे. त्यांना इंद्रिय, काय, योग, वेद व कषाय नाहीत. केवलज्ञान व केवलदर्शन आहे परंतु संयम मार्गणेप्रमाणे संयम नाही - ते संयमरहित आहेत. संयम नाही याचा अर्थ चारित्र नाही असा नव्हे. सिध्दांना तर क्षायिक चारित्र असते.

सिध्दांना लेश्या नाही, ते भव्य व अभव्यही नाहीत, सम्यक्त्वापैकी त्यांना क्षायिक सम्यक्त्व आहे. ते संज्ञी अथवा असंज्ञी नाहीत, अनाहारक आहेत व त्यांना केवलज्ञान व केवलदर्शन असे दोन उपयोग आहेत.

मुलींनो, जीवाबद्दलची हा सारी माहिती आपण वीस प्ररूपणांद्वारे पाहिली. हे सारे संयोगांचे, विभावाचे, परद्रव्यसापेक्ष असे कथन आहे. जीवाबद्दलची ही सारी माहिती केवलज्ञानींच्या दिव्यध्वनीतून आपल्याला समजली आहे. हे सर्व कथन यथार्थ आहे. तरीदेखील जेव्हा आपण फक्त शुध्द जीवद्रव्याचा -

एकट्या जीवद्रव्याचा विचार करतो त्यावेळी संयोगाचे हे सारे कथन व्यवहारनयाचे कथन आहे असे आपल्या लक्षात येते. हे सारे जाणल्याने आपल्याला जीवाच्या स्वभावाचे, विभावाचे, संयोगांचे, मोक्षमार्गाचे, मुनींचे, अरहंत सिध्दांचे स्वरूप स्पष्टपणे लक्षात येते. भेदज्ञानाला पुष्टी मिळते व आपले ज्ञान समीचीन होते.

व्यवहारनय हा सम्यग्ज्ञानाचा अंश आहे. याबद्दल जर आपल्या काही भ्रामक कल्पना असतील तर त्या विपरीत ज्ञानासह आपल्याला आत्म्याचे ज्ञान अर्थात आत्मानुभव होऊ शकणार नाही.

जिनवाणी अगाध आहे, अमृतमय अध्यात्मरसाने ओतप्रोत भरलेली आहे. आपण जेवढा सखोल अभ्यास करू तेवढा त्यातील रस व आनंद वाढत जातो. करणानुयोगाच्या अभ्यासात माझाही अजून प्रवेशच झाला आहे. अभ्यास सुरु केला आहे. तुम्हा दोघींच्या व अन्य अनेक वाचकांच्या निमित्ताने करणानुयोगाचा परिचय तुम्हाला करून देताना माझेही तत्त्वचिंतन होत राहिले, स्वसन्मुखता व भेदज्ञान यांना पुष्टी मिळत राहिली.

पं. टोडरमलजींनी सम्यग्ज्ञानचंद्रिकेच्या पीठिकेमध्ये लिहिले आहे की, ''उच्चकुल, पूर्णआयु, इंद्रियांचे सामर्थ्य, निरोगीपणा, सुसंगति, धर्मरूप अभिप्राय, बुध्दिची प्रबलता वगैरे मिळणे उत्तरोत्तर महादुर्लभ आहे, हे आपण प्रत्यक्ष पहातो. ही सर्व साधनसामुग्री मिळाल्याशिवाय ग्रंथाभ्यास होत नाही. तुम्हाला मोठ्या भाग्याने अशी संधी मिळाली आहे. म्हणून हट्ट करून देखील तुमच्या हिताची प्रेरणा देत आहे. जसे जमेल तसे या शास्त्राचा अभ्यास करा. अन्य जीवांना जमेल तसा शास्त्राभ्यास करावयाला लावा. जे जीव शास्त्राभ्यास करीत आहेत त्यांची अनुमोदना करा. पुस्तक लिहिणे, वाचणे, शिकविणाऱ्याची स्थिरता करणे वगैरे शास्त्राभ्यासाच्या बाह्यकारणांचे साधन करा, कारण त्यामुळे परंपरा कार्यसिध्दि होते किंवा महत्पुण्य उपजते''.

पं. टोडरमलजींचा हा सल्ला लक्षात घेऊन तुम्हीही नियमित शास्त्रस्वाध्याय, चिंतन, मनन करावे व स्वसन्मुखतेपूर्वक आत्मानुभव करून भेदज्ञान करीत रहावे अशी माझी इच्छा आहे व तुम्ही असे करालच याची मला खात्री आहे.

कल्याणमस्तु.

कळावे.

**तुमची आई.**

